सभेचे सुरुवातीस मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर, यांची कानिफनाथ देवस्थान ट्रस्ट, मढी येथे विश्वस्त मंडळाचे अध्यक्षपदी निवड झालेबाबत तसेच मा.सौ.सुमित्रा कैलास कोते यांची शिरडी नगरपंचायत, शिरडीचे नगराध्यक्ष पदी निवड झालेबद्दल, सभेने त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला व त्यांचे भावी वाटचालीबाबत सुयश चिंतीले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.४१** **गुंतवणूकीबाबत निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** **(अ)** माहे **डिसेंबर, २०११** अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | बँक ऑफ बरोडा, नासिक | ६/१२/२०११ | ६,५५,२७,२९१/- |
| ०२ | बँक ऑफ बरोडा, नासिक | ७/१२/२०११ | १,०९,२१,२१५/- |
| ०३ | बँक ऑफ बरोडा, नासिक | २०/१२/२०११ | ५,४९,४८,७४३/- |
| ०५ | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | २७/१२/२०११ | ५,००,००,०००/- |
| ०६ | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | ३०/१२/२०११ | ९,५०,००,०००/- |
| | दैनंदिन खर्च वजा जाता माहे डिसेंबर २०११ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | **एकुण रक्कम -** | | **३७,६३,९७,२४९/-** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. ३७.६३ कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१ ) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
८) युको बँक, शिर्डी
९) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
११) विजया बँक, शिर्डी
१२) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते १२ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम **रु. ३७.६३ कोटीची** टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी निर्णयास्तव सादर.

**(ब)** माहे **जानेवारी, २०१२** अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | बँक ऑफ बरोडा, नासिक | १/१/२०१२ | ५,६०,१८,५४४/- |
| ०२ | बँक ऑफ बरोडा, नासिक | ३/१/२०१२ | २,२०,०७,४१७/- |
| ०३ | आंध्र बँक, शिडी | ११/०१/२०१२ | ५,५०,२९,२८९/- |
| ०५ | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | १३/०१/२०१२ | १,५०,००,०००/- |
| ०६ | आंध्र बँक, शिर्डी ( NPAY ) | १७/०१/२०१२ | ४८,४२,५७७/- |
| ०७ | युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २८/०१/२०१२ | ६,६०,४८,०४१/- |
| | दैनंदिन खर्च वजा जाता माहे जानेवारी २०१२ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | **एकूण रक्कम -** | | **३१,८९,४५,८६८/-** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. ३१.८९ कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१ ) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
८) युको बँक, शिर्डी
९) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
११) विजया बँक, शिर्डी
१२) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १२ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम **रु. ३१.८९ कोटीची** टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन,दैनंदिन व इतर आवश्यक खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी अनुक्रमे रक्कम रु. ३७.६३ कोटी व रु. ३१.८९ कोटी वरीलप्रमाणे अ.नं.०१ ते १२ बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**दि.१३-१४.०१.२०१२ रोजीचे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल**

**विषय नं.४२** **संस्थानकडे उपलब्ध असलेले सोने-चांदी वस्तू वितळवून स्टेट बँक ऑफ इंडिया यांचेकडे गोल्ड बॉण्ड स्कीम मध्ये गुंतवणूक करणे बाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साईबाबा संस्थानचे दिनांक ३१ मार्च, २००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.२६२ च्या निर्णया नूसार देणगी रूपाने उपलब्ध होणारे सोने-चांदी वितळुन इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचेकडून श्री साईंची प्रतिमा असलेली चांदीची (२० ग्रॅम), सोन्याची (प्रत्येकी २.५, ५, १० ग्रॅमची ) नाणी साईभक्तांना योग्य किंमतीत उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

**(ब)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनूसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा. व्यवस्थापन समिती पहात आहे. मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये देणगी रुपाने प्राप्त होणारे सोने-चांदी वस्तू अलंकारापैकी, जे अलंकार अत्यंत अत्युत्कृष्ट व असामान्य कलाकुसरीचे असतील, असेच अलंकार व्यवस्थापनाकडे सदैव जतन

करुन ठेवता इतर उर्वरीत सोने-चांदी वस्तूं अलंकार वितळविणे बाबतचे कार्यपध्दतीस मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांनी त्यांचे पत्रक्रमांक सासंवि-२००५/४०७/(६४)-का. सोळा दिनांक ३१ मे, २००७ अन्वये स्थायी मान्यता मिळालेली आहे.

माहे मार्च, २००८ अखेरच्या सोने वस्तु अलंकार दिनांक १४ मे २००९ रोजी इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचेकडे व माहे मार्च २००६ अखेरच्या चांदी वस्तु दिनांक २५ नोव्हेंबर २००९ रोजी नॅशनल रिफायनरी, मुबई यांचेकडे संस्थान अधिकारी व विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी समक्ष हस्तांतरीत करुन वितळविण्यात आलेले आहे. त्यातुन प्राप्त झालेल्या शुध्द सोन्याची नाणी व पेंडंटस् इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचेकडून तयार करुन घेऊन साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच प्राप्त झालेल्या शुध्द चांदीतुन नॅशनल रिफायनरी, मुंबई यांचेकडून नाणी तयार करून घेऊन साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**(क)** सन २०१०-११ च्या वैधानिक लेखापरिक्षणामध्ये सुचविल्यानुसार सध्या संस्थानकडे सन २००८-०९, २००९-१०, २०१०-११ या वर्षात देणगी रूपाने मिळालेले सोने वस्तु पैकी मंदिराकडे वापरात असलेल्या वस्तु वगळता लेखा शाखेकडे ७० किलो सोने वस्तु शिल्लक आहे. सध्या संस्थानकडे शुध्द सोन्यापासून तयार करून घेण्यात आलेली नाणी वजन १० ग्रॅम, ५ ग्रॅम व २.५ ग्रॅम अनुक्रमे २१९९, २१९३ व २८२८ एवढीच शिल्लक आहे. या नाणे विक्रीस भक्तांचा मोठया प्रमाणात प्रतिसाद असुन यापुढे नाणी बनविण्यासाठी संस्थानकडे शुध्द स्वरूपातील सोने शिल्लक नाही. त्यामुळे सध्या सन २००८-०९ व २००९-१० या वर्षातील सोने वस्तु वितळवून त्यापासुन मिळणारे शुध्द सोने स्टेट बँक ऑफ इंडीया यांचेकडे गोल्ड बॉन्ड स्कीम मध्ये गुंतवणूक करता येईल व काही सोन्यातुन नाणी तयार करून घेता येतील.

तसेच संस्थानकडे २००६-०७, २००७-०८, २००८-०९, २००९-१० व २०१०-११ या वर्षात देणगी रूपाने मिळालेली चांदी पैकी मंदिराकडे वापरात असलेल्या वस्तु वगळता लेखा शाखेकडे १,५८८ किलो चांदी वस्तु शिल्लक आहे. सदर चांदीचा साठा मोठया प्रमाणावर झाला असुन स्ट्रॉग रूममध्ये ठेवण्यास जागेअभावी अडचण निर्माण होत आहे. तसेच चांदीपासुन बनविलेल्या नाणी विक्रीसही भक्तांचा चांगला प्रतिसाद आहे. त्यामुळे सन २००६-०७ व २००७-०८ या दोन वर्षाची चांदी वितळवून मिळणाऱ्या शुध्द चांदीपासुन नाणी तयार करून घेता येतील.

**(ड)** देणगी रूपाने मिळालेल्या दि. ०१ एप्रिल, २००८ ते ३१ मार्च, २०१० अखेर सोने वस्तु अलंकाराची समक्ष पाहणी करुन लिलावाच्या दृष्टीने सुयोग्य अशा वस्तुंची निवड करुन २४१८.३०० ग्रॅम सोने वस्तु व दि. ०१ एप्रिल, २००६ ते ३१ मार्च, २००८ अखेरच्या चांदीमधील ४४०.९९० ग्रॅम चांदी वस्तु लिलावासाठी राखुन ठेवण्यात आलेल्या आहेत.

या व्यतिरीक्त सध्या समाधी मंदिराकडे वापरात असलेल्या सोने-चांदी वस्तुपैकी काही वस्तु लिलावाव्दारे विक्री करता येतील.

सध्या लेखाशाखेकडे वितळविणेकामी दिनांक ०१ एप्रिल, २००८ ते ३१ मार्च, २०१० अखेर देणगी रुपाने जमा झालेले सोने व दिनांक १ एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००८ अखेर देणगी रूपाने जमा झालेली चांदी, वस्तू अलंकार शिल्लक आहेत, त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| अ.नं. | तपशिल | वजन |
|---|---|---|
| ०१ | सोने वस्तु | ३७ किलो, ७५४ ग्रॅम, ४९४ मि.ग्रॅम |
| ०२ | चांदी वस्तु | ५१३ किलो, ३७१ ग्रॅम, ७१० मि.ग्रॅम |

स्टेट बँक ऑफ इंडीया यांचेकडील गोल्ड बॉन्ड स्किम मध्ये संस्थानकडे असलेले सोने डिपॉझीट करता येउ शकते. या स्कीममध्ये गुंतपिलेल्या सोन्यावर ३ वर्षासाठी १% , ४ वर्षासाठी १.२५% व ५ वर्षासाठी १.५० दरवर्षी व्याज मिळु शकेल. मुदत संपल्यानंतर त्यावेळची सोन्याची किंमत अथवा सोने परत घेणे हे दोन्हीही पर्याय उपलब्ध आहेत. संस्थानकडे असलेल्या सोने वस्तु बँकेकडे समक्ष वजन करून हस्तांतरीत करणे व त्यानंतर बँक सदर वस्तु समक्ष इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचेकडे वितळविल्यानंतर मिळणाऱ्या शुध्द सोन्याची पावती / प्रमाणपत्र संस्थानला देण्यात येईल व त्यावर संस्थानला वरीलप्रमाणे व्याज मिळु शकेल. गोल्ड बॉन्ड स्किममध्ये सोने ठेवल्यामुळे साठवणुकी बाबतची अडचण दुर होईल व सुरक्षेचा प्रश्न निर्माण होणार नाही तसेच विमा वगैरे यावरील खर्चात बचत होईल. तरी उपरोक्त नमुद केलेल्या वस्तुस्थितीचा विचार करता काही सोने वस्तु गोल्ड बॉन्ड स्किममध्ये गुंतविणे व काही वस्तु इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचेकडे वितळवुन व चांदी वस्तु नॅशनल रिफानरी प्रा. लि., मुंबई यांचेकडे वितळविणेकामी हस्तांतरीत करण्यास मान्यता मिळणेस विनंती व वितळविल्यानंतर प्राप्त होणाऱ्या शुध्द सोने-चांदी पासुन प्रचलित वजनाची नाणी आवश्यकतेनूसार बनवुन घेणेस व स्टेट बँक ऑफ इंडीया यांचेकडे गोल्ड बॉन्ड स्किम मध्ये गुंतवणूक करणेकामी स्टेट बँकेच्या अधिकाऱ्यांना मा. व्यवस्थापन

समिती समोर चर्चेसाठी बोलविण्यास अनुमती असावी तसेच याकामी वेळापत्रक ठरविणेसाठी सदर विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये ठेवणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकडे उपलब्ध असलेले सोने-चांदीच्या वस्तूपैकी ज्या वस्तू लिलावायोग्य आहेत अशा वस्तूची लिलावाव्दारे विक्री करणेकामी वर्तमानपत्रात व इंटरनेटच्या माध्यमातून जाहिरात देण्यात यावी. तसेच देशातील साईमंदिरांनाही कळविण्यात यावे. उर्वरित सोने-चांदी वस्तू मा.विश्वस्तांनी पहाणी करुन त्या इंडिया गव्हर्नमेंट मिंट, मुंबई तसेच नॅशनल रिफायनरी, मुंबई यांचेकडे नेऊन वितळविण्यात याव्यात व त्यापासून मिळणाऱ्या शुध्द सोने-चांदीपासून भक्तांसाठी नाणी व पेंडस् तयार करण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.४३** **ओरिएंटल बँक कॉमर्स, शाखा शिर्डी येथे संस्थानचे बचत खाते उघडणे व त्यांचेकडून संस्थानला सेवा घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** ओरियन्टल बँक ऑफ कॉमर्स, शाखा शिरडी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे बचत खाते त्यांचे बॅकेत उघडणे, देणगी दाखल भक्तांकडून आलेले चेक/डी.डी.कलेक्शन त्यांचे बॅकेस देणे, दक्षिणापेटी मोजणीकामी त्यांना पाचारण करणे, तसेच संस्थानचे आर्थिक व्यवहाराच्या अनुषंगाने इतर सर्व बँक संदर्भातील सेवा त्यांचे बँकेमार्फत सुरु करणेबाबत विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम २० अन्वये संस्थानची रक्कम फक्त राष्ट्रीयकृत बॅकेतच ठेवण्याचे बंधन आहे, व ओरियन्टल बँक ऑफ कॉमर्स ही राष्ट्रीयकृत बँक आहे.

त्याअनुषंगाने, सदर बँकेस दि.१० नोव्हेबर, २०११ रोजीच्या पत्रान्वये, संस्थानला आवश्यक असणा-या बँक सेवा पुरविणेबाबत कळविले असून, त्यांनी त्यांचे उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये संस्थानला आवश्यक त्या सर्व बँक सेवा देणेबाबत संमती दर्शविली आहे.

तथापि, सध्या साधारणतः १५ राष्ट्रीयकृत बँकांमध्ये संस्थानच्या नावाने बचत खाते उघडण्यात आलेले असून या सर्व बँकां संस्थानला विनातक्रार सेवा पुरवित आहेत.

तरी ओरियन्टल बँक ऑफ कॉमर्स, शाखा शिर्डी यांचे शाखेत संस्थानच्या नावाने बचत खाते उघडणेस व इतर बँकांप्रमाणे त्यांचेकडून संस्थानला सेवा घेणेस मान्यता मिळणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.४४** **श्री नितीन एकनाथ गाढवे, रा.रांजणगांव खुर्द ता.राहाता यांचे वैद्यकीय उपचाराकरीता आर्थिक अनुदान देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री नितीन एकनाथ गाढवे,रा.राजंणगाव खुर्द,ता.राहाता यांनी त्यांचे वैद्यकीय उपचाराकरीता आर्थिक मदत मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला असुन सदरचा अर्ज दि.३०/१०/२०११ रोजी इकडील कार्यालयास मिळालेला आहे.

श्री.गाढवे हे किडणीचे विकाराने आजारी आहेत. त्यांचेवर कमलनयन बजाज हॉस्पिटल, औरंगाबाद या रुग्णालयात शस्त्रक्रिया होणार असुन त्यासाठी रु.५,०५,०००/- खर्च येणार असल्याचे प्रमाणपत्र या रुग्णालयाने दिलेले आहे.

श्री गाढवे यांनी अनुदान मागणी अर्जासोबत शस्त्रक्रिया तारखेचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रतिज्ञापत्र, प्रमाणित प्रती व रुग्ण जीवनदायी योजनेचा लाभार्थि आहे किंवा नाही अशी प्रमाणपत्रे दिलेले नाहीत.

श्री गाढवे यांचे वार्षिक उत्पन्न रु. १९,५००/- असल्याने त्यांनी शासनाच्या जीवनदायी आरोग्य योजने अतंर्गत मदत मिळणेबाबत अर्ज केलेला असल्याचे सांगीतलेले आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार "शासनाच्या जीवनदायी आरोग्य योजनेअतंर्गत लाभार्थी असणा-या रुग्णांना संस्थान मार्फत अनुदान देण्यात येत नाही. " असे इकडील जा.नं.एसएसएस/ एसएसएच/ अनुदान/३९७७/२०११ दि.०२/११/२०११ रोजी श्री गाढवे यांना दिलगीरीयुक्त पत्र देण्यात आलेले आहे.

मा.अध्यक्ष महोदय यांनी श्री गाढवे यांना खास बाब म्हणून रु.५०,०००/- मंजूर करणेकामी सदरचा अर्ज मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेपुढे ठेवणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

तरी याबाबत पुढील निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री नितीन एकनाथ गाढवे,रा.राजंणगाव खुर्द,ता.राहाता यांनी त्यांचे वैद्यकीय उपचाराकरीता आर्थिक मदत मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४५ श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागासाठी Opta Pre Balloon खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई येथील डॉ. क्रांती कुमार (कार्डीयोलॉजिस्ट) यांचे मार्गदर्शनाखाली Coarchoplasty with Stenting ची शस्त्रक्रिया करण्यात आलेली असून सदर शस्त्रक्रियेमध्ये मेंदुला रक्तपुरवठा करणारी रक्तवाहिनी मध्ये असलेले Block काढणेसाठी Chelatium Platinium असलेला Medicated Stent (C.P. Stent) वापरला जातो. सदर Stent हा २०१०-२०११ या वर्षाकरीता On Consignment Basis वर नव्हता कारण त्यासाठी कॅथलॅब विभागाकडून मागणी नव्हती तसेच त्याचा वापर देखील खूप क्वचितच होत असतो.

सदर C.P. Stent बसविण्यासाठी Opta Pro Balloon चा वापर करावा लागतो सदर C.P. Stent व Balloon साठी दि.१३/०८/२०११ चे पत्रान्वये मागणी करण्यात आलेली होती. त्यानूसार C.P. Stent बसविणेकामी ४ नग Opta Pro Balloon मे. रेणुका सर्जिकल सिस्टीम, औरंगाबाद यांचेकडून प्रती नग रु.१६,०००/- या प्रमाणे एकूण ४ नगासांठी रक्कम रु.६४,०००/- इतका खर्च आलेला आहे.

तेंव्हा वरीलप्रमाणे ४ नग Opta Pro Balloon मे. रेणूका सर्जिकल सिस्टीम, औरंगाबाद यांचेकडून खरेदीस रु. ६४,०००/- (अक्षरी रु. - चौसष्ठ हजार मात्र) इतका खर्च आलेला आहे.

सदर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागासाठी आवश्यक असणारे ०४ नग Opta Pre Balloon मे. रेणूका सर्जिकल सिस्टीम, औरंगाबाद यांचेकडून केलेल्या खरेदीस व याकामी आलेल्या रक्कम रुपये ६४,०००/- मात्रचे खर्चाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४६ श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात वर्कशॉप करीता तातडीने केलेल्या डिव्हाईसेस व त्याचे साहित्य खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात Device Closure बसविणेकामी दि.०७/०८/२०११ रोजी हैद्राबाद येथील कार्डीयोलॉजिस्ट डॉ. नागेश्वर राव यांचे मार्गदर्शनाखाली वर्कशॉप आयोजित करण्यात आले होते. सदर वर्कशॉप करीता कॅथलॅब विभागाने दि.२८/०७/२०११ चे पत्रान्वये लागणाऱ्या साहित्याची मागणी केलेली होती.

सदर वर्कशॉप पूर्वी Device बसविणेकामी छातीला दोन छेद घेण्यात येत होते त्यामुळे रुग्णास Recover होण्यास जास्त कालावधी लागतो त्यामुळे रुग्णास हॉस्पिटल मधून डिसचार्ज देखील उशीरा दिला जात होता. परंतु वर्कशॉपमध्ये Device बसविणेकामी बगलेखाली एकच छेद घेऊन Device बसवित असल्यामुळे पेशंट Recovery ला जास्त वेळ लागत नाही. त्यामुळे पेशंटला लवकरात लवकर डिसचार्ज देता येतो असा फायदा होऊन यापुढील Device बसविण्याच्या शस्त्रक्रिया सुध्दा याच पध्दतीने करण्यात येत आहे.

सदर वर्कशॉपमध्ये तीन रुग्णांचे Device बसविणेची शस्त्रक्रिया झालेली आहे. त्या रुग्णांची नावे खालील प्रमाणे असून त्यांना जीवनदायी योजने अंतर्गत झालेल्या खर्चाची संपूर्ण रक्कम मंजूर झालेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| अ. नं. | रुग्णाचे नाव | शस्त्रक्रियेसाठी झालेला खर्च रक्कम रु. | जीवनदायी योजने अंतर्गत मंजूर रक्कम रु. | रुग्णाने जमा केलेले डिपॉजीट रु. |
|---|---|---|---|---|
| १. | कु. वैष्णवी सचिन अवचिते | ७०,६६७.०० | ७२,०००.०० | Nil |
| २. | कु. पायल रोहिदास सुर्यवंशी | ७०,८१२.०० | ७२,०००.०० | १४५.०० |
| ३. | चि. साई जितेंद्र मांजरे | ७०,६६७.०० | ७२,०००.०० | Nil |

उपरोक्त रुग्णांना Device बसविणेकामी लागणारे Device, साहित्य आपणाकडे उपलब्ध नसल्याने ती तातडीने खरेदी करण्यात आलेले आहे. त्यासाठी रु.१,२४,२७५/- मात्र खर्च आलेला आहे. वरीलप्रमाणे रुग्णांचे शस्त्रक्रियेसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च जीवनदायी योजने अंतर्गत मंजूर झालेला असून ती रक्कम शासनाकडून मिळणार आहे.

उपरोक्त खरेदीच्या बीलांचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr. No. | Name of Party | Bill/Challan No. | Date | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Seva Medical Equipments Pvt. Ltd., Pune | 378 | 08/08/2011 | 36000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | Seva Medical Equipments Pvt. Ltd., Pune | 381 | 08/08/2011 | 16275.00 |
| 3 | Seva Medical Equipments Pvt. Ltd., Pune | 379 | 08/08/2011 | 36000.00 |
| 4 | Seva Medical Equipments Pvt. Ltd., Pune | 380 | 08/08/2011 | 36000.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **124275.00** |

तरी उपरोक्त प्रमाणे Device, साहित्याचे बीलाची पुर्णांकित रक्कम रु.१,२४,२७५/- (रु. एक लाख चोवीस हजार दोनशे पंचाहत्तर मात्र) चे खरेदीस व खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात वर्कशॉप करीता तातडीने केलेल्या डिव्हाईसेस व त्याचे साहित्य खरेदीस व याकामी आलेल्या रक्कम रुपये रु.१,२४,२७५/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४७** **संस्थान कर्मचारी जादा वैद्यकीय बीलाचा परतावा करणेबाबत**

**प्रस्ताव-** खालील संस्थान कायम कर्मचाऱ्यांची रु.१०,०००/- चे पर्यंतचे खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु.१०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बीले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहे. त्यांची तपशीलवार माहिती खालील प्रमाणे-

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सौ. भोसले उषा रावसाहेब | आई | ब्लडप्रेशर | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ६२८९.०० | ६२८९.०० |
| २ | श्रीमती सुयोगा ईश्वरदास साळवे | स्वतः | | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | २४१४.०० | २२४५.०० |
| ३ | श्रीमती अरगडे सुरेखा सुरेश | आई व वडील | सांधेदुखी, दमा व ब्लड प्रेशर | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | २७८४.०० | २६८०.०० |
| ४ | डॉ.एन.एस.म्हस्के | स्वतः | सांधेदुखी | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | २६४८.०० | २६४८.०० |
| | | पत्नी | सांधेदुखी व मधूमेह | प्रवरा हॉस्पिटल, लोणी | | |
| ५ | श्री. प्रदिप विश्वनाथ त्रिभुवन | स्वतः | डायबेटीज | श्री साईनाथ हॉस्पिटल, शिर्डी | १६५२.०० | १६५२.०० |
| | | मुलगी | सर्दी, ताप, खोकला | | | |
| | | | | **एकुण रक्कम रु.** | **१५७८७.००** | **१५५१४.००** |

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ११/०९/२००४ चे सभेतील निर्णय क्रमांक १९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकिय बीले वैद्यकिय क्षेत्रातील तज्ञ मा.विश्वस्त डॉ.ए.भा.गोंदकर साहेब व मा.विश्वस्त डॉ.प्यारेलाल तिवारी साहेब यांनी तपासून त्यांचे शिफारशीनूसार अंतीम मंजूरीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावीत, असे ठरले आहे.

त्यानुसार वरील बीले ही मा. विश्वस्त श्री. डॉ. ए. भा. गोंदकर साहेब व श्री. डॉ. तिवारी साहेब यांना दाखवून घेतलेली आहे व त्यांनी उपरोक्त प्रमाणे रक्कम अदा करणे बाबतची शिफारस केलेली आहे.

**निर्णय क्र.४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त कर्मचाऱ्यांची जादा वैद्यकीय बिले आदा करणेस मान्यता देण्यात आली. असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४८** **श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा रजिष्टर मधुन निर्लेखित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे लिनन विभागामध्ये सर्व वॉर्ड/ ओ.टी.चे अतीशय जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले तर काही फाटलेल्या अवस्थेत निरुपयोगी कपडे जमा झाले आहेत. सदरचे लिनन हे २००८ साली खरेदी करण्यात आलेले असुन त्यास आता वापरुन तीन वर्षाचा कालावधी झालेला आहे त्यामुळे ते वापरुन खराब झालेले आहे.

यापुर्वी दिनांक ०१/१०/२०१० ते ३१/०३/२०११ पर्यंतचे सर्व वॉर्ड/ओ.टी.चे लिनन मा.व्यवस्थापन सभा दिनांक १२/०६/२०११ निर्णय क्रमांक ३७५ अन्वये रु.२,९५,८९६/- रकमेचे लिनन नष्ट केलेले असुन, दिनांक ०१/०४/२०११ ते ३०/०९/२०११ पर्यंतचे विविध वॉर्ड/ओ.टी.तुन निकामी लिनन जमा झालेले आहे त्याचा तक्ता सोबत सादर केला आहे. सदर लिनन खरेदीची एकुण किंमत रु.३,३२,२२९/- इतकी आहे, परंतु सदर लिनन हे फाटलेल्या व खराब अवस्थेत असल्याने सध्या परिस्थितीत त्याची किंमत शुन्य आहे. सदरचे लिनन वापरण्यास निरुपयोगी असलेबाबतची सहा.अधिसेविका व वैद्यकीय संचालक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे. सदरचे लिनन वापरण्यास योग्य नसल्यामुळे ते नष्ट करुन साठा रजिष्टरमधुन निर्लेखीत करणे गरजेचे आहे.

तरी लिनन हे साठा रजिष्टरमधुन निर्लेखीत करुन नष्ट करणेस तसेच सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी ठेवण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा रजिष्टर मधुन निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४९** **मतिमंद मुलांकरिता कायम स्वरुपी मोफत उपचार,रुग्णवाहिका व गोळ्या औषधे मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** आधार शिक्षण व ग्रामीण विकास मंडळ, संचलित, साई सेवा निवासी मतिमंद मुला मुलींची शाळा, शिर्डी. आसणे वस्ती शेजारी निवासी स्वरुपात सुरु आहे, सदर विद्यालयाला मा. आयुक्त अपंग कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे, यांनी ६० विद्यार्थ्यांसाठी निवासी मान्यता दिली आहे, मतिमंद मुलांमध्ये आजारपणाचे प्रमाण सतत व जास्त स्वरुपात असते. तसेच या मुलांमध्ये फिट्सचे प्रमाण जास्त स्वरुपात असते. सदर विद्यालय हे विनाअनुदान तत्वावर असल्यामुळे औषध उपचारांचा खर्च जास्त प्रमाणात करु शकत नाही, तसेच विद्यालयाकडे रुग्णवाहीका उपलब्ध नाही, त्यामुळे आजारी मुलांना उपचार करण्यासाठी खाजगी वाहनाची व्यवस्था करावी लागते. तरी केसपेपर, उपचार, गोळ्या, औषधे, रुग्णवाहीका व किमान एक महिन्यासाठी थंडी, ताप, खोकला, सर्दी या औषधांचा स्टॉक आपल्या हॉस्पिटलमधून उपलब्ध करण्यास परवानगी मिळणेबाबतची विनंती या संस्थेचे सेक्रेटरी यांनी केली आहे.

श्री साईबाबांच्या शिकवणीनुसार श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णसेवा पुरविली जाते. संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमध्ये विविध अत्याधुनिक सेवा- सुविधा सर्व प्रकारच्या रुग्णांना अत्यल्प दरामध्ये दिल्या जातात, तसेच दुर्बल घटकांतील रुग्णांकरिता शासनाच्या जीवनदायी सारख्या योजनाही कार्यरत असुन रुग्ण याचा पुरेपुर लाभ घेत आहेत. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक यंत्र सामुग्री असुन येथे मोठया आजारांवर शस्त्रक्रिया केल्या जातात, श्री साईबाबा रुग्णालयामध्ये अत्यल्प दरामध्ये रुग्ण सेवा पुरविली जाते. सदर संस्थेने मागणी केलेली सेवा व औषधे श्री साईनाथ रुग्णालयात उपलब्ध असल्याने ती श्री साईनाथ रुग्णालयामार्फत संपुर्ण मोफत पुरविता येईल.

तरी आधार शिक्षण व ग्रामीण विकास मंडळ, संचलित, साई सेवा निवासी मतिमंद मुला मुलींची शाळा, शिर्डी यांच्या ६० विद्यार्थ्यांकरिता उपरोक्त सेवा- सुविधा देणेबाबत सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस्तव, सविनय सादर.

**निर्णय क्र.५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आधार शिक्षण व ग्रामीण विकास मंडळ, संचलित, साई सेवा निवासी मतिमंद मुला मुलींची शाळा, शिर्डी.यांचे प्रतिनिधीस व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे समक्ष चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५०** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांसाठी स्वाईन फ्ल्यूची लस खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील काम करणाऱ्या कायम व कंत्राटी कर्मचाऱ्यास यापुर्वी सन २०१० मध्ये स्वाईन फ्ल्यु या आजारावरील Serum या कंपनीचे नाकाव्दारे स्प्रे करुन दयावयाचे Nasal Vaccine २.५ml मे. सिध्देश्वर मेडीकल अॅन्ड जनरल स्टोअर्स, अहमदनगर यांचेकडून प्रती नग रु.१९६/- याप्रमाणे खरेदी करुन देण्यात आलेले आहे.

परंतु श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील काही नविन व काही जुने कर्मचारी यांनी सदरची लस घेतलेली नाही, त्यांची एकत्रित यादी तयार करण्यात आलेली असून असे एकुण १९९ कर्मचारी आहेत. परंतु सदर Nasovac Vaccine चे उत्पादन Serum Inst., Mumbai या कंपनीने बंद केल्यामुळे त्याऐवजी आता बाजारात Intra Muscular Vaccine (कंबरेला किंवा दंडाला दयावयाचे) आलेले असून ते ०.५ml चे Single dose आहे, तेंव्हा एका व्यक्तीस एकच डोस दयावा लागणार आहे.

उपरोक्त स्वाईन फ्ल्यु लस खरेदीकामी मे. सिध्देश्वर मेडीकल अॅन्ड जनरल स्टोअर्स, अहमदनगर यांचेकडून दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आलेले होते, त्यानुसार त्यांनी दि.१९/१०/२०११ रोजीचे फॅक्स पत्राव्दारे खालीलप्रमाणे तीन कंपन्याचे दर दिलेले आहेत-

| Sr.No. | Name | Mfg. Company | Rate per in Rs. |
|---|---|---|---|
| 1 | Inj. Influvac | Solvay | 400.00 |
| 2 | Inj. Agrippal | Chiron Panacea Vaccines | 514.50 |
| 3 | Inj. Vaxi Grip | Sanofi Aventis | 512.40 |

वरील तीन कंपन्याचे दरानुसार Solvay हया कंपनीचे Inj. Influvac चे दर रु.४००/- हे निम्नत्तम असून त्याचे दरानुसार सदरचे १९९ व्हायल खरेदीकरीता रक्कम रु. ७९,६००/- इतका खर्च आलेला आहे.

तरी मे. सिध्देश्वर मेडीकल अॅन्ड जनरल स्टोअर्स, अहमदनगर यांचेकडून Inj. Influvac प्रती नग रु.४००/- या दराने एकुण १९९ व्हायल खरेदीस रक्कम रु.७९,६००/- इतका खर्च आलेला असून सदर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांसाठी स्वाईन फ्ल्यूची लस मे. सिध्देश्वर मेडीकल अॅन्ड जनरल स्टोअर्स, अहमदनगर यांचेकडून Inj. Influvac प्रती नग रु.४००/- या दराने एकुण १९९ व्हायल खरेदी व त्यासाठी आलेल्या रक्कम रु.७९,६००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**वैद्यकीय संचालक यांनी सदरचे लसीची सध्या आवश्यकता नसल्याचे सांगितले. यावर सभेने त्यांना ज्या वेळेस या लसीची आवश्यकता असेल त्या वेळी खरेदी करावी असे सांगितले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५१** **श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागासाठी लेड अॅप्रॉन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाने दि.१३.०८.२०११ चे मागणी पत्रान्वये Lead Apron (Petticoat & Skirt Medium Size) प्रत्येकी ३ नगांची Kiran Co. च्या लेड अॅप्रॉनची मागणी केलेली आहे.

सध्या त्यांचेकडे ६ नग लेड अॅप्रॉन असून त्यामधील ४ नग वापरुन खराब झालेले असून ते २ ते ३ वर्षापुर्वी घेतलेले आहे. लेड अॅप्रॉनव्दारे शस्त्रक्रियेच्या वेळी सर्जन व त्यांचेसोबत असलेल्या सहाय्यक कर्मचाऱ्यांना मशिनरी मधून होणाऱ्या रेडीएशन पासून संरक्षण मिळणेसाठी उपयोग होतो.

सध्या तातडीची गरज पाहता प्रत्येकी दोन नग घेणेबाबत वैद्यकीय संचालक यांनी शिफारस केलेली आहे. सदरकामी अंदाजे खर्चासाठी मे.अनिता मेडीकल सिस्टीम प्रा.लि.,मुंबई यांचेकडून फोनव्दारे दरपत्रक मागविले असता त्यांनी त्यांचे ई-मेल पत्र क्र.८९९ दि.२१.१०.२०११ अन्वये दरपत्रक पाठविलेले आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| Sr. No. | Description | Size / Type | LE, mm pb | | Dimensions cm | | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Front | Back | W/G | L | | | |
| 01 | Vest - Maxima | M | 0.5 | 0.25 | 55 | 57 | 02 | 22430.10 | 44860.20 |
| 02 | Skirt for Maxima | M | 0.5 | 0.25 | 183 | 53 | 02 | 19020.75 | 38041.50 |
| | | | | | | | | **Total Amt. in Rs.** | **82901.70** |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त दरानुसार प्रत्येकी दोन नग खरेदीकामी अंदाजे रु.८२,९०१.७० इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरील प्रमाणे प्रत्येकी दोन नग Lead Apron (Peticoat & Skirt Medium Size) चे विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे पुर्णांकित रक्कम रु. ८२,९०२/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागासाठी आवश्यक असणारे दोन नग Lead Apron (Peticoat & Skirt Medium Size) लेड अॅप्रॉन विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे (पुर्णांकित) रक्कम रु. ८२,९०२/- खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५२** **श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ओ.टी.विभागातील Autoclave मशिनसाठी Vacuum Pump १ HP खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ओ.टी. विभागात प्रथम M. Shah & Co. चे दोन Autoclave कार्यान्वित होते. सदरचे दोन Autoclave हे सध्या एकाच Vacuum Pump वर चालु आहे, परंतु न्युरो ओ.टी. कार्यान्वित झालेनंतर सदरचे दोन Autoclave पैकी एक Autoclave तेथे स्थलांतरीत करण्यात आलेला आहे. परंतु सदर Autoclave ला Vacuum Pump नसल्यामुळे मशिनव्दारे Sterilise करण्यात येणारे इन्स्ट्रुमेंट व कपडे लवकर सुकत नाहीत, त्यामुळे पुढील शस्त्रक्रियेसाठी विलंब होतो, तसेच Autoclave M.Shah & Co. चा असल्यामुळे त्याच कंपनीचा Vacuum Pump १ HP Motor खरेदी करावा लागणार आहे.

त्यामुळे सदर Vacuum Pump १ HP Motor खरेदीकामी मे. एम. शहा ॲन्ड कंपनी, पुणे यांचेकडून दुरध्वनीवरुन दरपत्रकाची मागणी करण्यात आली होती. त्यांनी त्यांचे पत्र क्र.११० दि. २१/१०/२०११ अन्वये १ नग Vacuum Pump १ HP Motor करीता प्रती नग रु.६१,८७५/- इतका खर्च कळविलेला आहे. तेंव्हा सदरचे खरेदीकामी मे. एम. शहा ॲन्ड कंपनी, पुणे यांचेशी चर्चा / वाटाघाटी करुन खरेदी करता येईल.

वरीलप्रमाणे १ नग Vacuum Pump १ HP Motor खरेदीकामी मे. एम. शहा ॲन्ड कंपनी, पुणे यांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले आहे, तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**मे. एम. शहा ॲन्ड कंपनी, पुणे हे आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी उपस्थित होते, त्यांचेशी चर्चा / वाटाघाटी केल्यानंतर त्यांनी Vacuum Pump १ HP Motor रु.२४,८००/- (सर्व करांसह) इतक्या रक्कमेत देऊ केलेली आहे.**

**निर्णय क्र.५३** **यावर चर्चा होऊन, मे. एम. शहा ॲन्ड कंपनी, पुणे यांनी देऊ केलेली सुट विचारात घेऊन त्यांचेकडून Vacuum Pump १ HP Motor रु.२४,८००/- (सर्व करांसह) इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५३** **Easystat Blood Gas Analyser मशिनचे दुरुस्तीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील पॅथोलॉजी लॅब विभागाकरीता सन २००८ यावर्षी एक ए.बी.जी. मशिन मे. ट्रान्सासिया बायोमेडीकल्स लि.मुंबई यांचेकडुन एकुण रु.४,७०,०००/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदर मशिन करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि.१३/११/२००९ रोजी संपला आहे. पुढील कालावधीत नियमीत दुरुस्ती व देखभाल करणेसाठी कंपनीकडे दि. ०१/०४/२०११ ते ३१/०३/२०१२ या कालावधीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले आहे. AMC कालावधीत दुरूस्तीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व स्पेअर पार्टची व कन्झ्युमेबलची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या उपरोक्त मशिन नादुरुस्त झाले होते. त्यासाठी कंपनी इंजिनीअर तातडीच्या भेटीकरीता आले असता मशीनचा Valve Module पार्ट खराब झाल्याचे सर्व्हीस रिपोर्ट क्र.३६१४२४, दि. २१/१०/२०११ अन्वये कळविले होते. सदर मशिन पॅथोलॉजी विभागात नियमीत वापरात असून तातडीने दुरूस्त करणे आवश्यक असल्याने कंपनी इंजिनीअरकडून पार्ट बदलून घेणेत आला आहे.यापुर्वी सदरचा पार्ट मशिन कार्यान्वीत केल्यापासुन आजपावेतो बदलण्यात आलेला नाही. त्याकरीता कंपनीने त्यांचे पत्र क्र. २१३१२००६, दि.२२/१०/२०११ अन्वये सदरच्या पार्ट करीता सर्व करांसहीत एकुण रू. ४२,४१२/- इतक्या रकमेचे बील पाठविले आहे. सदर पार्ट करीता कंपनीने एक वर्षाची वॉरंटी दिलेली आहे.

तरी मे. ट्रान्सासिया बायोमेडीकल्स लि.मुंबई यांचेकडुन पॅथोलॉजी लॅब विभागातील Blood Gas Analyser मशिनचा EBG Valve Module बदलुन घेणेस व त्यासाठी आलेल्या एकुण रु. ४२,४१२/- च्या खर्चास व सदर रक्कम कंपनीस अदा करणेस कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. ट्रान्सासिया बायोमेडीकल्स लि.मुंबई यांचेकडुन पॅथोलॉजी लॅब विभागातील Blood Gas Analyser मशिनचा EBG Valve Module बदलुन घेणेस व त्यासाठी आलेल्या एकुण रु. ४२,४१२/- च्या खर्चास व सदर रक्कम कंपनीस अदा करणेस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५४** **समुह जनता अपघात विमा योजना लागू करणे बाबत**

**प्रस्ताव-** गुंतागुंतीची दिनचर्या, वेगवान प्रवास व त्यामुळे वाढते अपघात यामुळे सर्वसाधारणतः जीवन असुरक्षीत होत आहे. त्यातच एकत्रीत कुटुंब पध्दतीचे विघटन होत असुन कमवत्या व्यक्तीचे व पर्यायाने संस्थान कर्मचाऱ्यांचे कुटुंब प्रमुख म्हणून वैयक्तीक जबाबदारी अधिकाधिक वाढत आहे. वाढत्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी होणाऱ्या धावपळीमुळे या कर्मचाऱ्यांची जोखीम ही वाढत आहे. कर्मचाऱ्यांचे कुटुंबामध्ये कुटुंबप्रमुख व कमवता घटक बहुतेक तो स्वतः आहे. त्यामुळे कर्मचाऱ्याला व्यक्तीगत कुटुंबाच्या भविष्याची मोठी काळजी असतांना ती पुरेशा तन्मयतेने व उत्साह एकाग्रतेने त्याला नेमून दिलेल्या कामामध्ये सहभागी होऊ शकणार नाही. त्यामुळे त्याच्या कुटुंबाच्या भविष्यकालीन आर्थिक सुरक्षिततेविषयी काही योजना राबविणे आवश्यक ठरते.

याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०२/११/२००६ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ८७५ अन्वये दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी ली., शाखा श्रीरामपूर यांचेकडे २४२३ संस्थान कर्मचाऱ्यांसाठी दि.

०१/१२/२००६ ते दि. ३१/११/२०११ या ५ वर्षे कालावधीसाठी रु. एक लाख विमा संरक्षणसाठी समुह जनता अपघात विमा उतरविलेला आहे. त्याची मुदत दि. ३०/११/२०११ रोजी संपुष्टात येत आहे.
याकामी यापूर्वी प्रती व्यक्ती रु. १७९/- दराने एकुण रक्कम रु. ४,१६,२८७/- विमा कंपनीकडे विमा हप्त्यापोटी जमा केले होते. दरम्यानच्या काळात या योजनेअंतर्गत विमा कंपनीकडून पाच कर्मचाऱ्यांना प्रत्येकी रु. १,००,०००/- या प्रमाणे रु. ५,००,०००/- नुकसान भरपाई प्राप्त झालेली आहे.
याकामी इकडील जा. नं. एसएसएस/वशी ७बी/३४१९/२०११ दि. ०७/१०/२०११ अन्वये पुढील विमा महामंडळाच्या अंगीकृत ५ विमा कंपनी कडून माहिती पत्रके व दरपत्रके मागविण्यात आले होते.

१. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि, राहुरी, २. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि., शिर्डी
३. दि न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लि., राहुरी ४. दि. ओरीयंन्टल इंश्योरंन्स कं. लि., कोपरगाव
५.दि. न्यु. इंडिया एश्योरन्स कं. लि., श्रीरामपुर

त्यानुसार खालील ३ विमा कंपनींकडून दरपत्रके बंद पाकीटात इकडील कार्यालयास प्राप्त झाली आहेत.

| अ. नं. | कंपनीचे नाव | आवक नंबर | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | दि न्यु इंडिया एश्योरेन्स कंपनी लि. शाखा-राहुरी | १३२६९ | १४/१०/२०११ |
| २ | न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लि. शाखा-श्रीरामपुर | १३६१० | २०/१०/२०११ |
| ३ | युनायटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी, शाखा-शिर्डी | १३६६८ | २१/१०/२०११ |

दि. ०७/१०/२०११ चे पत्राअन्वये खालील विमा कंपनींकडून दरपत्रके बंद पाकीटात मागविण्यात आली होती. सदरची दरपत्रके (कोटेशन्स) दि. ०३/११/२०११ रोजी मा. उप कार्यकारी अधिकारी सो. यांचे कार्यालयात त्यांचे समक्ष उघडण्यात आली आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.नं. | **पॉलीसी प्रकार (कालावधी)** | दि न्यु इंडिया एश्योरेन्स कंपनी लि. **शाखा-राहुरी** | न्यु इंडिया एश्योरस कंपनी लि. **शाखा-श्रीरामपुर** | युनायटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी, **शाखा-शिर्डी** |
|---|---|---|---|---|
| १ | १ वर्ष कालावधी करिता प्रत्येक व्यक्ती | ५६/- | **४८/-** | ६०/- |
| २ | २ वर्ष कालावधी करिता प्रत्येक व्यक्ती | ११४/- | -- | ११४/- |
| ३ | ३ वर्ष कालावधी करिता प्रत्येक व्यक्ती | १६२/- | **१२८/-** | १६२/- |
| ४ | ४ वर्ष कालावधी करिता प्रत्येक व्यक्ती | २०४/- | -- | २०४/- |
| ५ | ५ वर्ष कालावधी करिता प्रत्येक व्यक्ती | २४०/- | **१८९/-** | २४०/- |

आता संस्थान आस्थापनेवर एकूण २३०० कर्मचारी आहेत. यांचा पुढील तीन वर्षासाठी म्हणजे दि. ०१/१२/२०११ ते दि. ३०/११/२०१४ अखेर समुह जनता अपघात विमा उतरविणे आवश्यक आहे.

तुलनात्मक दर तक्त्याचे अवलोकन करता द न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लि. शाखा-श्रीरामपुर यांचा तीन वर्षासाठी प्रतीव्यक्ती विमा हप्ता न्युनतम म्हणजे रु. १२८/- आहे. त्यानुसार २३०० कर्मचाऱ्यांसाठी रु. २,९४,४००/- इतका विमा हप्ता भरावा लागेल. दरम्यानच्या काळात कर्मचारी संख्येत वाढ झाल्यास त्या-त्या वेळी नियमितपणे समुह जनता अपघात विमा उतरविता येईल.

तरी याकामी येणाऱ्या खर्चास रु. २,९४,४००/- (अक्षरी रुपये दोन लाख चौन्यानव हजार चारशे मात्र) रकमेस मान्यता असावी. तसेच सदरची रक्कम द न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लि. शाखा-श्रीरामपुर यांना लेखाशाखेमार्फत चेकने अदा करता येईल. त्यास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, समुह जनता अपघात विमा योजना लागू करणेस व दरपत्रकानुसार निम्नतम दराचे दरधारक द न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लि. शाखा-श्रीरामपुर यांचे दर स्विकारणेत येऊन त्यांना ३ वर्षासाठी रु.२,९४,४००/- मात्र आदा करुन कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच यापुढे विमापॉलिसीचे प्रिमियमसाठी कार्यकारी अधिकारी यांनी दरपत्रके मागवून विमा कंपन्यांशी निगोशिएशन करुन न्युनतम दरधारक कंपनीस सदरहू कार्यादेश देण्यात यावा व नोंद घेणेसाठी मा.व्यवस्थापन समितीपुढे प्रस्ताव सादर करावा, म्हणजे गॅप पडणार नाही व व्यवस्थापन समितीचे सभेअभावी पॉलिसी संपुष्टात येणार नाही.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५५** **श्री.संभाजी लक्ष्मण पेरणे यांना Haemophillia Factor VIII मोफत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. संभाजी लक्ष्मण पेरणे रा. तांदुळवाडी ता. राहुरी जि. अहमदनगर यांचा दि.१४/१०/२०११ रोजी नगर - मनमाड रोडवर अपघात झाला होता. तेंव्हा त्यांना प्रथम उपचारासाठी संस्थानचे श्री साईबाबा रुग्णालयात आणले होते. श्री साईबाबा रुग्णालयात आणलेनंतर त्यांचा सि.टी. स्कॅन व इतर तपासण्या केल्यानंतर त्यांच्या मेंदुत जास्त प्रमाणात रक्तस्त्राव झालेला होता. सदर रुग्ण हा Haemophillia चा असून त्याचा रक्तस्त्राव थांबणेकामी त्यांना Haemophillia Factor VIII हे इंजेक्शन दिलेशिवाय रक्तस्त्राव बंद

होत नाही. Haemophillia इंजेक्शन देऊन रक्तस्त्राव थांबणे व त्यावर नियंत्रण ठेवण्याची सुविधा आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे त्यांना पुणे येथील Haemophillia Society येथील डॉ. लोहाटे यांचेकडे पुढील उपचार चालु आहे.

ज्या रुग्णांचा अंतर्गत (Internal) रक्तस्त्राव झाल्यानंतर Haemophillia Factor VIII हे इंजेक्शन घ्यावे लागते. त्याशिवाय त्यांचा रक्तस्त्राव थांबत नाही, अशा रुग्णांना संस्थानचे रुग्णालयात येऊन मोफत उपचार (इंजेक्शन देणे) बाबत मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०७/११/२००९ निर्णय क्रमांक ८२५अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या श्री साईबाबा रुग्णालयात दोन्ही प्रकारचे इंजेक्शन Factor VIII व Factor IX हे प्रत्येकी २००० I.V. ठेवण्यात येऊन त्यांचे प्रत्येक वेळचे असलेल्या पॅकींग व दराप्रमाणे आगाऊ रक्कम हिमोफेलीया सोसायटी, नाशिक यांना देण्यात यावी व अहमदनगर जिल्ह्यातील सर्व रुग्णांना याबाबत अवगत करण्यात येऊन सर्व रुग्णांना मोफत उपचार करावेत, त्याचप्रमाणे संस्थानमार्फत सब सेंटर श्री साईबाबा रुग्णालयात स्थापन करुन या सेंटरव्दारे अशा रुग्णांवर उपचार करण्यात यावे असे ठरलेले आहेत.

श्री. पेरणे यांचे पुणे येथील रुग्णालयात उपचार चालु असुन त्यांना मेंदुतील रक्तस्त्राव थांबणेकामी तेथील डॉ. लोहाटे यांनी २०००० युनीट Factor घेण्याची शिफारस केलेली आहे. श्री. पेरणे यांनी त्यांचे दि.२३/१०/२०११ चे अर्जान्वये त्यांची अर्थिक परिस्थिती नाजुक असुन २०००० युनीट Haemophillia Factor घेण्याची त्यांची परिस्थिती नाही, तेंव्हा त्यांना संस्थानकडून सदरचे इंजेक्शन मोफत मिळावे अशी विनंती केली असून त्यासोबत मा. विश्वस्त श्री. सुरेश वाबळे साहेब व मा. अध्यक्ष श्री. ससाणे साहेब यांचे शिफारस पत्र जोडलेले आहे.

सदरचे २०००० युनीट Haemophillia Factor खरेदीकामी अंदाजे प्रती युनीट रु. १०/- याप्रमाणे रु. २,००,०००/- (अक्षरी दोन लाख मात्र) खर्च अपेक्षित आहे. मा. व्यवस्थापन समिती सभेचे वरील निर्णयानुसार सदर रुग्ण हा अहमदनगर जिल्हयातील आहे, परंतु ते अत्यवस्थ असल्यामुळे त्यांना संस्थानचे रुग्णालयात समक्ष घेऊन इंजेक्शन घेणे शक्य नसल्याने व तातडीचे उपचारासाठी गरज असल्याने त्यांना बाहेरील रुग्णालयात इंजेक्शन दयावेत किंवा कसे ? याबाबत निर्णय घेणेकामी वैद्यकिय समिती सभा दि.२३/१०/२०११ चे सभेत सदर विषय चर्चेसाठी ठेवणेत आले होता. त्यावर चर्चा होऊन श्री. पेरणे यांना २०००० युनीट Haemophillia Factor VIII बाहेरील रुग्णालयात मोफत देण्यात येऊन प्रस्ताव मंजुरीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा तसेच सदरचे इंजेक्शन संस्थानने नाशिक किंवा पुणे येथून घेणेऐवजी Haemophillia Society, Delhi यांचे सदस्य होऊन संस्थानने थेट दिल्लीहून इंजेक्शन खरेदी करुन संस्थानचे रुग्णालयात मोफत उपचार देण्याची सुविधा केंद्र उपलब्ध करुन दयावी अशी शिफारस केलेली आहे.

श्री. पेरणे यांना वरील इंजेक्शन आवश्यकतेनुसार देण्यात येत असून श्री. पेरणे यांना सदरचे इंजेक्शन मोफत देण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. २,००,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.५६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.संभाजी लक्ष्मण पेरणे यांना Haemophillia Factor VIII इंजेक्शन मोफत देण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. २,००,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.५६ **माहे सप्टेबर २०११ मध्ये तातडीने खरेदी केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत**

प्रस्ताव- श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागाकरीता Vacutainer Plain Bulb ची तातडीने आवश्यकता होती. सदर Bulb औरंगाबाद येथून तातडीने खरेदी केलेले आहेत. सदर केमिकल्स आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी रु. ५६७०/- मात्र खर्च आलेला आहे. M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad यांनी सदर खरेदीचे बील हे दि.०४/१०/२०११ रोजी पाठविले होते त्यामुळे त्याची मंजूरी घेण्यात आलेली नव्हती.

सदरची खरेदी ही माहे- सप्टेंबर मध्ये केलेली आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०३/२०११ निर्णय क्र.२५४ अन्वये वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करुन बीले अदा करणेत यावी व रु.१,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बीले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले आहे, त्यानूसार सदरची खरेदी ही वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- चे तरतुदी पेक्षा जास्त रक्कमेची झालेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Siddhi Medical Distributors, Aurangabad | 4759 | 04/10/2011 | 5670.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **5670.00** |

तरी उपरोक्त प्रमाणे खरेदीस पुर्णांकित रक्कम रु.५६७०/- (रु. पाच हजार सहाशे सत्तर मात्र) इतका खर्च आलेला आहे. सदर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे सप्टेबर २०११ मध्ये तातडीने खरेदी केलेल्या रक्कम रु.५६७०/- औषधांचे खरेदीस व खर्चाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५७** **श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागासाठी Single Chamber Temporary pacemaker Set खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाने दि. १७/०९/२०११ चे मागणीपत्रकान्वये दोन नग Single Chamber Temporary Pacemaker Set ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे १ नग Dual Chamber Temporary Pacemaker Set आहे. याशिवाय साईबाबा रुग्णालयातील आय.सी.सी.यु. विभागात दोन नग Single Chamber Temporary Pacemaker Set आहेत. परंतु वाढत्या पेशंटच्या गर्दीमुळे तसेच Emergency condition मध्ये कधी-कधी उपलब्ध पेसमेकर दुसऱ्या पेशंटला लावलेले असल्यामुळे एखादे पेशंटला पेसमेकर लावणे गरजेचे असल्यास तो उपलब्ध नसतो. त्यामुळे कॅथलॅब विभागाने २ नग Single Chamber Temporary Pacemaker Set ची मागणी केलेली आहे.

सदरचे खरेदीकामी मे. क्रिटीकल केअर सिस्टीम्स, पुणे यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रकाची दुरध्वनीवरुन मागणी करण्यात आली होती. त्यांनी दि. २२/१०/२०११ चे ई-मेल पत्रान्वये १ नग Single Chamber Temporary Pacemaker Set करीता प्रती नग रु.१,४०,६२५/- इतका खर्च कळविलेला आहे. तेंव्हा उपरोक्त २ नगांसाठी अंदाजे रक्कम रु. २,८१,२५०/- इतका खर्च येणार आहे.

तरी वरीलप्रमाणे २ नग Single Chamber Temporary Pacemaker Set विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,८१,२५०/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागासाठी Single Chamber Temporary pacemaker Set विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,८१,२५०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं ५८** **Pacemaker चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात प्रियंका रविंद्र शिंदे या पेशंटला दि.१७/०९/२०११ रोजी Biotronik Co. चा Philos SLR - VDDR Pacemaker हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग वापरलेला आहे. सदर पेसमेकर करीता वार्षीक खरेदीमध्ये On Consignment Basis वर पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. परंतू मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

डॉ.वर्मा यांनी वरील रुग्णाकरीता पेसमेकरची दि.१७/०९/२०११ चे पत्रान्वये मागणी केली होती. त्यानुसार M/s.Icon Meditech Pvt. Ltd., Pune यांचेकडून बील क्र.१८५ दि.२१/०९/२०११ (डिलेव्हरी चलन नं. ६२६ दि.१७/०९/२०११) अन्वये एक नग रु.८७४६५/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.१७/०९/२०११ रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे.

सदर पेसमेकर बसविणसाठी रु. १,०९,४६५/- इतका खर्च आलेला असून महाराष्ट्र शासन, उपसंआसे/ लेखा-५/जीवनदायी योजना/ ३२९७४-७५ दि.१५/०९/२०११ अन्वये जीवनदायी योजने अंतर्गत PPI (VDDR) पेसमेकर करीता मंजुरी मिळालेली होती, त्यानुसार Philos SLR - VDDR Pacemaker करीता रु.१,१४,०००/- इतकी रक्कम मंजुर झालेली आहे. सदर पेसमेकर बसविणसाठी रु.१,०९,४६५/- इतका खर्च आलेला असून हॉस्पिटल मध्ये Concession Note No.९८०२२७३९ दि.२०/०९/२०११ अन्वये जमा केलेली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे पेसमेकरचे बीलाची रक्कम रु.८७४६५/- M/s.Icon Meditech Pvt. Ltd., Pune यांना अदा करण्यात आलेली आहे.

तरी सदर पेसमेकर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे Pacemaker चे तातडीने केलेल्या खरेदीस व याकामी आलेल्या रक्कम रु.८७४६५/- मात्रचे खर्चाची नोंद घेण्यात आली.**
(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५९** **श्रीमती संगिता शामराव पवार, हिस्टोपॅथी तंत्रज्ञ (११ महिने कालावधीसाठी) यांचे मुदतवाढीबाबत**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०८/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६५८ (४) नुसार दि. ०५/०१/२०१० रोजीचे दै. सकाळ व महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये आवश्यक असणारे हिस्टोपॅथ तंत्रज्ञ व इतर पॅरामेडिकल स्टाफची पदे भरणेकामी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर पदाकरीता लेखी परिक्षा घेण्यात येऊन दि. १३/०७/२०१० रोजी १० गुणांची प्रात्यक्षिक व तोंडी मुलाखती घेण्यात आल्या. सदर मुलाखतीमधून हिस्टोपॅथ तंत्रज्ञाचे दोन पदाकरीता श्री रसिद रज्जाक शेख व श्रीमती लाळगे कमल जनार्दन यांची नेमणूक करण्यात आली. श्री रसिद रज्जाक शेख यांनी राजीनामा दिल्याने त्यांचे जागेवर अनु. जाती प्रवर्गातून उमेदवाराची नेमणूक करणे आवश्यक होते. अनु. जाती या प्रवर्गातील उमेदवार श्रीमती कविता मिलींद आराक यांना प्रात्यक्षिक व तोंडी परिक्षेत ०.६ इतके गुण मिळालेले होते. अ.नं. ३ वरील खुल्या प्रवर्गातील उमेदवार श्रीमती संगिता शामराव पवार यांना ४.० गुण मिळालेले असल्याने त्यांची ११ महिने कालावधीकरीता मासिक फिक्स पे. रु. १०,०००/- वर नेमणूक करण्यात आलेली असून, त्या दि. ०८/०१/२०११ रोजी कामावर हजर झालेल्या आहेत. त्या प्रत्यक्षात कामकाज श्री साईनाथ रुग्णालयाकडे करत आहेत.

श्रीमती संगिता शामराव पवार यांची ११ महिने कालावधीची मुदत दि. ०७/१२/२०११ रोजी संपुष्टात येत असल्याने, पुढील मुदतवाढ देणेकामी वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचेकडून श्रीमती संगिता पवार यांचेबाबत गोपनीय अहवाल मागविण्यात आलेला असून, त्यांनी पुढीलप्रमाणे अहवाल दिलेला आहे. च्श्रीमती संगिता शामराव पवार यांचे काम व वर्तणूक समाधानकारक आहे. ते हुकुमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात. त्यांचे विषयी काहीही प्रकरण चालू नाहीत. त्यांना संस्थान नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही.

तरी, श्रीमती संगिता शामराव पवार, हिस्टोपॅथ तंत्रज्ञ (११ महिने कालावधीसाठी) श्री साईबाबा हॉस्पीटल यांना दि. ०८/१२/२०११ पासून पुढे सर्व्हिस ब्रेक देऊन त्यानंतर त्यांना पुढील मुदतवाढ देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्रीमती संगिता शामराव पवार, हिस्टोपॅथ तंत्रज्ञ श्री साईबाबा हॉस्पीटल यांना दि. ०८/१२/२०११ पासून पुढे सर्व्हिस ब्रेक देऊन त्यानंतर त्यांना पुढील ११ महीने कालावधीसाठी नेमणूक देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.६०** **Single Doner Platelet (SDP) चे दर निश्चितीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रक्तपेढीकरीता Fenwal या कंपनीचे नवीन अफेरेसिस मशिन नव्याने खरेदी करणेत आलेले आहे. या मशिनद्वारे प्लेटलेट सारख्या पेशी आवश्यकतेनुसार रुग्णांना देणे शक्य होणार आहे. याला Single Donor Platelet (SDP) असे म्हणतात.

अशा प्रकारचे रक्तघटक रुग्णांना देण्याची प्रक्रीया ही नवीन असून, यापुर्वी या प्रकारची सेवा आपल्या रक्तपेढीमार्फत दिली जात नव्हती. त्यामुळे ही सेवा नव्याने सुरु करावयाची असल्याने सदर सेवेचे दर निश्चीत करणे आवश्यक आहे.

ही सेवा श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पीटलमधील रुग्णांना द्यावयाची झाल्यास खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | |
|---|---|
| १) Kit Cost अंदाजे - | रु. ५५००/- |
| २) Pre donation तपासणी - | रु. १००/- |
| ३) तपासणी खर्च (Elisa - Fully Automatic) | रु. ५००/- |
| ४) रिएजंट चार्जेस | रु. ५००/- |
| ५) Storage (Temp./Electricity) for ५ days- अंदाजे- | रु. ३००/- |
| | ----------- |
| **एकूण खर्च** | रु. ६९००/- |

या करीता अंदाजे रु.७०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा अंदाजे असुन आजमितीस (as on today) धरुन आहे. त्यात वेळोवेळी परिस्थितीनुरुप नेहमीच वाढ होण्याची शक्यता असते. (उदा.इंधनवाढ/वीज दरवाढ इ.इ...)

या सेवेकरीता नाशिक, नगर, औरंगाबाद, येथील खालील रक्तपेढयांमध्ये खालीलप्रमाणे दर आकारले जातात.

| | |
|---|---|
| १) अर्पण रक्तपेढी, नाशिक | रु. ७१५०/- |
| २) जनकल्याण रक्तपेढी, नाशिक (Manually) | रु. ७०००/- |
| ३) आनंदऋषिजी रक्तपेढी, अहमदनगर | रु. ९५००/- |
| ४) जनकल्याण रक्तपेढी, अहमदनगर (Fully Automatic) | रु. ११,०००/- |
| ५) धुत हॉस्पीटल, रक्तपेढी, औरंगाबाद | रु. १०,०००/- |
| ६) हेडगेवार हॉस्पीटल, रक्तपेढी, औरंगाबाद | रु. १०,०००/- |

या सेवेकरीता मा. वैद्यकीय संचालक, यांनी रु.७०००/- इतका दर निश्चीत करणेत यावा असे मत मांडलेले आहे.

परंतू वरील सर्व बाबींचा श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये प्लेटलेट (SDP) या सेवेकरीता रु.७५००/- इतका दर निश्चीत करणेत यावा, असे मत आहे.

तरी श्री साईनाथ रक्तपेढीमार्फत नव्याने सुरु करावयाच्या प्लेटलेट (SDP) या सेवेकरीता आपले मर्जिनुरुप दर निश्चीत होणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये प्लेटलेट Single Doner Platelet (SDP)या सेवेकरीता रु.७५००/- इतका दर निश्चीत करणेत यावा असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.६१** **ब्लड बँकेतील फ्रिजर दुरुस्तीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रक्तपेढीकरीता पुरवठा आदेश क्र. १४१७९, दि. १२/१०/२००६ अन्वये M/s. Vijay Trading Corporation, Shrirampur, यांचेकडुन मे. रेमी सेल्स अॅन्ड इंजिनीअरींग लि.,मुंबई या कंपनीचे एक Deep Freezer (Model-UDF-१६५, Sr. No. BDI-४४६६) एकुण रु.२,४६,६४९/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर फ्रीजर दि. ०६/०२/२००७ रोजी कार्यान्वीत करण्यात आले असुन त्याकरीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. ०५/०२/२००८ रोजी संपला आहे. फ्रीजरचे दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीकडे दि. ०१/०४/२०११ ते ३१/०३/२०१२ या कालावधीसाठी रु. १३,३१०/- इतक्या रक्कमेचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) करणेत आलेले आहे. सदर AMC कालावधीत दुरूस्तीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व स्पेअर पार्टची व कन्झ युमेबलची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या उपरोक्त फ्रीजर नादुरुस्त झाल्यामुळे कंपनी इंजिनीअरनी तपासणी करून सर्व्हिस रिपोर्ट क्र. १२८४०, दि १२/१०/२०११ अन्वये फ्रीजरचे कॉम्प्रेसरचे पंपीग कमी झाल्यामुळे सदर कॉम्प्रेसर बदण्याची गरज आहे. तसेच दोन प्रकारचे गॅस भरण्याची आवश्यकता असल्याचे कळविले आहे. त्यासाठी कंपनीने पत्र क्र. QBBD-१२९/१०-११, दि. १३/१०/२०११ अन्वये सर्व करांसहीत एकुण रु. ५७,९६०/- (अक्षरी रु. सत्तावन्न हजार नउशे साठ मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले असुन कंपनीने सदर रकमेची आगाउ मागणी केली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधीसोबत झालेल्या चर्चेनंतर सदर रक्कम उपरोक्त फ्रीजर दुरुस्त झालेनंतर अदा होणेस स्वीकृती दर्शविली आहे. उपरोक्त फ्रीजरचे स्पेअर पार्ट हे फक्त मे. रेमी सेल्स ॲण्ड इंजिनीअरींग ली. मुंबई यांचेकडेच मिळतात.

तरी मे. रेमी सेल्स ॲण्ड इंजि. लि.मुंबई, यांचेकडून UDF-१६५ फ्रीजर दुरुस्त करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ५७,९६०/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ब्लड बँकेतील फ्रिजर मे. रेमी सेल्स ॲण्ड इंजि. लि.मुंबई, यांचेकडून UDF-१६५ फ्रिजर दुरुस्त करुन घेण्यास व याकामी येणाऱ्या एकुण रु. ५७,९६०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.६२** **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS-२ व CRU३ विभागाकरीता खरेदी केलेल्या Ventilator साठी Bi-vent Software व Active Humidifier with Chamber for Adult खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS-२ व CRU-३ विभागाकरीता मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०५/१२/२०१० व दि. २०/१२/२०१० अन्वये मे. मॅक्वेट मेडीकल (इं) प्रा. लि., मुंबई यांचेकडून इकडील पत्र क्र. ६०२२ दि. ०६/०१/२०११ अन्वये ३ नग व्हेन्टीलेटर एकुण रु. ४६,८७,७०८.१७ इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेले होते ते सध्या सदर विभागामध्ये कार्यान्वित आहेत.

दि.०२/०८/२०११ (प्राप्त दि.२३/०९/२०११) चे मागणी पत्रान्वये सदर व्हेन्टीलेटरमध्ये एका व्हेन्टीलेटरसाठी Bi-Vent Software व Active Humidifier with Chamber for Adult ची

मागणी करण्यात आलेली आहे. कार्डीयाक ओ.टी. सुरु करतेवेळी फक्त व्हेन्टीलेटरचीच मागणी करण्यात आली होती, त्यामुळे त्यांनी Bi-Vent Software व Active Humidifier with Chamber for Adult साठी मागणी केलेली आहे.

सदर Bi-Vent Software मुळे एखादया पेशन्टला जास्त वेळ व्हेन्टीवर ठेवावे लागल्यास सदर Software व्दारे योगयप्रकारे व्हेन्टीलेशन मिळून पेशन्टची रिकव्हरी लवकर होण्यास मदत होते. तसेच Active Humidifier with Chamber मुळे पेशंटला पुरविल्या जाणाऱ्या हवेचे आवश्यकतेप्रमाणे Temperature व Humidity राखण्यास मदत होते, असे ॲनेस्थेटीस्ट डॉ. राव यांनी म्हटले आहे.

सदरचे व्हेन्टीलेटर हे मॅक्वेट कंपनीचे असल्यामुळे त्याच कंपनीचे Software व Active Humidifier घ्यावे लागणार आहे.

त्यासाठी मे. मॅक्वेट मेडीकल (इं) लि., मुंबई यांनी Bi-Vent Software साठी रु. २,१०,६३२/- व Active Humidifier with Chamber साठी रु. १,०६,०००/- इतका खर्च कळविला आहे. म्हणजेच दोन्ही रु.३,१६,६३२/- इतका खर्च येणार आहे. तेंव्हा सदरचे खरेदीकामी पुरवठा धारकांस मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलवून चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घेता येईल असे मत आहे.

तेंव्हा उपरोक्तप्रमाणे Bi-Vent Software व Active Humidifier with Chamber for Adult खरेदीकामी मे. मॅक्वेट मेडीकल (इं) लि., मुंबई यांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले आहे, तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**मे. मॅक्वेट मेडीकल (इं) लि., मुंबई हे आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी उपस्थित होते, त्यांचेशी चर्चा/ वाटाघाटी केल्यानंतर त्यांनी कोटेशनमध्ये दिलेले मुळ दर रु. ३,१६,६३२/- वर अजुन १० टक्के सुट देऊ केलेली आहे.**

**निर्णय क्र.६३** **यावर चर्चा होऊन, मे. मॅक्वेट मेडीकल (इं) लि., मुंबई यांनी देऊ केलेली सुट विचारात घेऊन त्यांचेकडून Bi-Vent Software व Active Humidifier with Chamber for Adult पुर्णांकित रक्कम रु. २,८४,९६९/- मध्ये खरेदी करण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.६३** **Xience Prime Stent चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात श्री. गजानन महादेव शेटे या पेशंटला करोनरी ॲन्जीओप्लास्टीसाठी दि.०६/१०/२०११ रोजी Abbott Vascular कंपनीचे Xience Prime हे विशिष्ट प्रकारचे ०२ नग स्टेन्ट वापरलेले आहे.

सदर Stent करीता वार्षीक खरेदीमध्ये On Consignment Basis वर पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. परंतू मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

डॉ.वर्मा यांनी सदर स्टेन्टकरीता दि.०५/१०/२०११ रोजीचे मागणी पत्रान्वये मागणी केली होती. त्यानुसार श्री.गजानन महादेव शेटे या पेशंटकरीता M/s. Shivam Trading Co., Mumbai यांचेकडून बील क्र.६८५ दि.०७/१०/२०११ (डिलेव्हरी चलन नं.८२६ व ८२७ दि.०६/१०/२०११) अन्वये ०२ नग स्टेन्ट रु.१,९०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.०६/१०/२०११ रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेले आहे.

सदर स्टेन्ट बसविणेसाठी श्री.गजानन महादेव शेटे यांना रु.३,०५,९१७/- इतका खर्च आलेला असून त्यांनी संपुर्ण रक्कम रु.३,०५,९१७/- पावती नं.२१०४४८२२ अन्वये रोखीने भरलेली आहे.

उपरोक्त रुग्णासाठी वापरलेल्या २ नग Xience Prime Stent च्या बीलाची रक्कम रु.१,९०,०००/- M/s. Shivam Trading Co., Mumbai यांना अदा करण्यात आलेली आहे.

तरी सदर स्टेन्ट खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे रुग्णासाठी वापरलेल्या २ नग Xience Prime Stent च्या बीलाची रक्कम रु.१,९०,०००/- M/s. Shivam Trading Co., Mumbai यांना अदा करण्यात आली. सदरहू खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

----------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.६४** **कु.ज्योती गंगाधर विखे, लोणी यांचा फिजिओथेरापिस्ट या पदावर नोकरी मिळणेबाबतचा अर्ज**

**प्रस्ताव-** कु. ज्योती गंगाधर विखे यांनी श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये फिजिओथेरापिस्ट या पदावर नोकरी मिळणेस दि. १५/११/२०११ रोजीचे अर्जान्वये विनंती केली आहे. कु. ज्योती गंगाधर विखे यांचे शिक्षण B.P.Tech. - २०१० झालेले आहे.

कु. ज्योती गंगाधर विखे रा. लोणी बु।। ता. राहाता, जि. अहमदनगर यांचे नोकरीचे कामी आपणांस पत्र देत आहे. कु. ज्योती विखे यांनी नुकताच फिजिओथेरपी कोर्स पूर्ण केलेला असून, आपले श्री साईनाथ हॉस्पीटल शिरडी येथे नोकरी मिळावी म्हणून अर्ज केलेला असून माझेकडे विनंती केली आहे.

तरी कृपया कु. ज्योती विखे हीस आपले श्री साईबाबा संस्थानचे हॉस्पिटलकडे नोकरी देणेबाबत नियमानुसार विचार होणेस विनंती. असे पत्र दि. १७/०५/२०११ रोजी पद्मभुषण मा.खा. श्री बाळासाहेब विखे पाटील (माजी केंद्रीय मंत्री) यांनी दिलेले आहे.

सध्या फिजिओथेरपी हा विभाग श्री साईनाथ रुग्णालयाकडे कार्यान्वीत आहे. श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये फिजिओथेरापिस्ट या पदाच्या मंजूर असलेल्या जागांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| रुग्णालयाचे नाव | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | वेतनबॅन्ड | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| **श्री साईबाबा हॉस्पिटल** | Senior Physiotherapists वरिष्ठ भौतीक उपचार तज्ञ | MPT/BPT from any Govt. recognized University. | 6500-10500 Pay band 9300-34800 Grade pay 4400 | ०१ | ०१ | ०० | श्री नवसुपे यांची नेमणूक करण्यात आलेली असून ते प्रत्यक्षात कामकाज श्री साईनाथ रुग्णालयाकडे करत आहे. |
| | Junior Physiotherapists कनिष्ठ भौतीक उपचार तज्ञ | BPT from any Govt. recognized University. | 5000-8000 Pay band 9300-34800 Grade pay 4200 | ०३ | ०० | ०३ | |
| **श्री साईनाथ रुग्णालय** | Junior Physiotherapists कनिष्ठ भौतीक उपचार तज्ञ | BPT from any Govt. recognized University. | 5000-8000 Pay band 9300-34800 Grade pay 4200 | ०१ | ०० | ०१ | |

शासन मान्य कर्मचारी आकृतीबंधामध्ये शासन निर्णयात खालीलप्रमाणे तरतूद आहे.

अटी-शर्ती क्र.०३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

अटी-शर्ती क्र. ०८) समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

कु. ज्योती विखे यांची दि. १५/११/२०११ रोजी वैद्यकिय संचालक व श्री सुरेश रोहीदास नवसुपे, फिजिओथेरापिस्ट यांनी मुलाखत घेतलेली आहे. कु. विखे यांचे फिजिओथेरापी विषयीचे ज्ञान रुग्णालयात फिजिओथेरपी ओ.पी.डी. विभाग चालविणेसाठी उपयोगी पडेल. फिजिओथेरापिस्ट या पदावर कार्यरत असलेले श्री नवसुपे यांना श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये हृदय विकार व मेंदू विकाराच्या रुग्णांना फिजिओथेरपी उपचार देणेसाठी दररोज काही तासांसाठी वापरता येईल. त्यामुळे कु. ज्योती विखे यांना श्री साईनाथ रुग्णालयाकडे कंत्राटदारामार्फत कुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून फिजिओथेरपीचे कामकाजासाठी घेता येईल, असे वैद्यकिय संचालक यांनी सुचविले आहे.

तरी, कु. ज्योती गंगाधर विखे यांचे अर्जावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ज्युनिअर फिजीओथेरापिस्ट,एमआयआय टेक्नीशियन, डायलेसीस टेक्नीशियन, ज्यू.पीएफटी टेक्निीशियन, ज्युनिअर बायोमेडिकल इक्वीपमेंट इंजिनिअर या पदासाठी कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या अर्जदार उमेदवारांना दिनांक २१.०१.२०१२ रोजी मा.उपसमितीचे सभेपूढे कंत्राटदारामार्फत कंत्राटीपध्दतीने कामावर घेणेकामी मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

----------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.६५** **पानमळा गोडावून मधील रुग्णालयाचे साहित्य /रेकॉर्ड ठेवणेकामी लोखंडी स्लॉटेड अँगलच्या रॅक खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात दोन्ही रुग्णालयाचे मिळून एक मध्यवर्ती औषध भांडार आहे. सदर भांडारमध्ये दोन्ही रुग्णालयास लागणारी वार्षिक औषधे खरेदीमधील औषधे टप्याटप्याने खरेदी करण्यात येत असतात परंतु मध्यवर्ती औषध भांडारात येणारे साहित्य व सर्जिकल साहित्य इ. ठेवणेकामी जागा अपुरी असल्याने त्यातील काही सर्जिकल साहित्य पानमळा गोडावून मध्ये ठेवण्यात येते. तसेच दोन्ही रुग्णालयाचे फर्निचर कार्यालयीन फर्निचर जे तातडीचे वेळेस लागते असे थोडेच फर्निचर व जे फर्निचर नादुरुस्त किंवा निकामी झालेले आहे ते विक्री करेपर्यंत (२ ते ३ महिने) ठेवण्यात येते.

तसेच श्री साईबाबा रुग्णालयाचे डिसचार्ज झालेले इनडोअर व MLC रुग्णांचे केस पेपर फाईल ह्या कमीत कमी ५ वर्षापर्यंत जमा करुन ठेवाव्या लागतात परंतु श्री साईबाबा व श्री साईनाथ असे रेकॉर्ड ठेवणेकामी पुरेशी जागा नसल्यामुळे ते तुर्तास पानमळा गोडावूनमध्ये जमिनीवर ठेवलेले आहे. परंतु सदर फाईल्स व रेकॉर्ड हे जमिनीवर ठेवल्यामुळे जास्त जागा व्यापते. मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचा दि.२३/११/२०११ रोजी राऊंड झाला असता रुग्णालयाचे साहित्य व रेकॉर्ड ठेवणेकामी भिंतीच्या कडेला रॅक उभ्याकरुन त्यावर ठेवल्यास व्यवस्थित राहून जागा जास्त प्रमाणात व्यापणार नाही. सदर जागेत इतर विभागाचे साहित्य ठेवण्यास उपयोग होईल.

सध्या रुग्णालयात रॅक शिल्लक नाही, पानमळा गोडावूनमध्ये पोटमाळ्यावर जेथे सध्या साहित्य ठेवण्यात आलेले आहे तेथे भिंती लगत किती रॅक बसतील याकामी बांधकाम विभागाकडून मोजमापे घेण्यात आली असता एकूण भिंतीच्या कडेला रॅक ठेवल्यास १९० रनिंग फूट लांबी असून (खिडक्या वगळता) एक रॅक ३ फूट लांबीची याप्रमाणे एकूण ६५ रॅक लागतील. रुग्णालयात सध्या ८ फूट x ३ फूट x १½ या फूट साईजच्या रॅक औषधे ठेवण्याकामी आहेत. परंतु रेकॉर्ड / सर्जिकल साहित्य इ. चा बल्क स्टॉक व डेडस्टॉक ठेवणेकामी जास्त खोलीच्या रॅक असल्यास त्याचा अधिक फायदा होऊ शकेल.

याकामी रुग्णालयात नेहमीच पुरवठा करणारे मे. जलाराम स्टिल फर्निचर, सुरत यांचेकडून उंची ८ फूट x रुंदी ३ फूट x खोली २ फूट व ६ कप्पे या विशिष्ट साईजच्या रॅककामी अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले असता त्यांचे दरानुसार एका रॅक करीता रु.४८८२.९० व्हॅट सह खर्च याप्रमाणे ६५ नगांसाठी एकूण रक्कम रु.३१७३८८.५० इतका खर्च येईल.

तरी वरीलप्रमाणे रॅक विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु.३,१७,३८९/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पानमळा गोडावून मधील रुग्णालयाचे साहित्य /रेकॉर्ड ठेवणेकामी लोखंडी स्लॉटेड अँगलच्या उंची ८ फूट x रुंदी ३ फूट x खोली २ फूट व ६ कप्पे या साईजच्या ६५ नग रॅक्स विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.३,१७,३८९/- चे खर्चास मान्यता मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.६६** **श्री बाबासाहेब जयराम सोळसे (सफाई कामगार-आरोग्य विभाग) यांचे आगाऊ रक्कम मिळणेबाबतच्या विनंती अर्जाबाबत**

**प्रस्ताव-** श्री. बाबासाहेब जयराम सोळसे यांची मुलगी कु. अश्विनी वय - १२ वर्ष हिचा मनका वाकडा असल्यामुळे त्यांनी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉ. टिंगरे यांना प्रथम दाखविले असता त्यांनी सदर मनक्याचे ऑपरेशन संस्थानचे हॉस्पिटलमध्ये होत नसल्यामुळे के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई येथे पाठविले होते. के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई येथे विविध तपासण्या केल्यानंतर मनक्यातील नसांचे ऑपरेशन सायन हॉस्पिटल, मुंबई येथे करणेस सांगितले. तेथे त्यांच्या मुलीवर दि.१७/१०/२०११ रोजी मनक्यातील नसाचे ऑपरेशन झालेले आहे. आता तीचे वाकड्या मनक्याचे ऑपरेशन के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई येथे करावयाचे आहे. त्यासाठी त्यांना रक्कम रु.६०,०००/- इतका खर्च येणार आहे.

श्री. बाबासाहेब जयराम सोळसे यांनी सदर उपचारासाठी दि.१४/११/२०११ चे अर्जान्वये त्यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची असून रु.६०,०००/- इतका खर्च करण्याची त्यांची ऐपत नाही. तेंव्हा रक्कम रु.६०,०००/- आगाऊ मिळणेस विनंती केलेली आहे.

के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई हे रुग्णालय संस्थानचे मान्य यादीत आहे परंतु मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१०/१०/२०१० चे सभेतील निर्णय क्र.७८५ (३) नुसार प्रथम मा. व्यवस्थापन समिती सभेची मंजूरी घेऊन आगाऊ रक्कम देण्यात यावी असे ठरले आहे.

सदर रुग्णास उपचाराची गरज असल्यामुळे रक्कम रु.६०,०००/- आगाऊ देणेबाबत पुढील आदेश होणेस विनंती.

**निर्णय क्र.६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री बाबासाहेब जयराम सोळसे (सफाई कामगार-आरोग्य विभाग) यांचे आगाऊ रक्कम मिळणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली.**

**याचवेळी येथूनपूढे वैद्यकीय उपचारासाठी अगाऊ रक्कम मिळणेबाबतचे प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे ठेवण्यात येऊ नये असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.६७** **श्री साईबाबा रुग्णालयातील वॉर्ड /ओ.टी तील सोफे दुरुस्तीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील डिलक्स रुमला सन २००६ ला एकुण ५ सोफे देण्यात आलेले आहेत सध्या ते सोफे फाटलेले असल्याने दुरुस्त करुन मिळावे याकरीता त्या विभागाच्या इन्चार्ज सिस्टरांनी डि.पी.नं.७२२ दि.२२/११/२०११ अन्वये मागणी केली आहे कारण तेथे बऱ्याच वेळा महत्वाचे व्यक्ती किंवा अतिमहत्वाचे व्यक्ती उपचारासाठी दाखल होतात.

तसेच इतर वॉर्ड व ओ.टी मध्ये सन २००६ मध्ये सोफे दिलेले आहे सदर सोफ्यांना सहा वर्षाचा कालावधी झालेला असल्याने सदर सोफ्यांचे वरील रेक्झीनचे कव्हर देखील फाटलेले आहे तर काही सोफ्यांचे आतील स्पंजही निघालेले आहे.

त्यामुळे सर्वच वॉर्ड व ओ.टी च्या सोफ्यांची पाहणी केली असता एकुण २३ (एका सोफ्याचे ३ Seat + ३ Back= ६ नग ) खराब झालेले आहे, ते बदलावे लागतील जेणे करुन एकत्रीत काम करुन घेतल्यावर खर्च देखील कमी येईल व वारंवार प्रस्ताव ठेवण्याची गरज पडणार नाही.

एका सोफ्याला साधारणतः ४ मीटर कापड व २७ स्क्वेअर फुट स्पंज अश्याप्रमाणे एकुण २३ सोफ्यांना ९२ मीटर कापड व ६२१ फुट स्पंज लागणार आहे. अंदाजे एक नग सोफा दुरुस्तीला पुर्ण कापड व स्पंज बदलुन फिटींगसह रु.२७००/- प्रमाणे २३ नग सोफा दुरुस्तीला साधारणतः रु.६२१००/- खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे सोफ्यांचे कुशनचे काम करुन घेणेकरीता विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणारा खर्च अंदाजे रु.६२१००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील वॉर्ड /ओ.टी तील सोफे दुरुस्तीकामी विहित पध्दतीने कोटेशन मागवून काम करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६२,१००/- मात्र चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.६८** **डॉ.बी.बी.साबळे, वैद्यकीय अधिकारी, यांचा सेवा जेष्ठतेनुसार प्रमोशन,समान पदविधारकाप्रमाणे वेतन व भत्ते (Incentive) मिळणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** डॉ. भाऊसाहेब भागवत साबळे, वैद्यकिय अधिकारी श्री साईनाथ हॉस्पीटल, शिरडी यांनी वरील विषयी दि.०१.०९.२०११ रोजीचे अर्जान्वये संस्थानकडे विनंती अर्ज सादर केलेला आहे.

मा. उपाध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी यांनी "डॉ. श्री भाऊसाहेब भागवत साबळे, वैद्यकिय अधिकारी, या पदावर गेली १९ वर्षापासून कार्यरत आहे. त्यांनी सेवाजेष्ठतेनुसार प्रमोशन देऊन पदविधारकांप्रमाणे वेतन भत्ते मिळावे म्हणुन विनंती अर्ज केलेला आहे. डॉ. श्री साबळे यांनी केलेला विनंती अर्ज या पत्रासोबत जोडून पाठवित आहे. तरी त्यांचा अर्ज येणाऱ्या मिटींगपुढे ठेवावा व पुढील उचित कार्यवाही राबवावी " असे कळविले आहे.

डॉ भाऊसाहेब बी साबळे, वेद्यकिय अधिकारी, श्री साईनाथ रुग्णालय यांची शैक्षणिक पात्रता व इतर माहिती खालीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| **नांव** | **:-** डॉ भाऊसाहेब भागवत साबळे, वैद्यकिय अधिकारी |
| **जन्म तारीख** | **:-** दि. ०२.०६.१९५७ |
| **शैक्षणिक पात्रता** | **:-** एम डी - १९८७ पीजीडीएचएचएम- २००८ |
| **संस्थान सेवेत दाखल तारीख** | **:-** ०७.०२.१९९२ |
| **झालेली सेवा** | **:-** १९ वर्षे ०७ महिने |
| **वेतनबॅन्ड + ग्रेड पे** | :- १५६००-३९१०० + ६६०० |
| **सध्याचे एकूण वेतन** | :- रु. ६६९८६/- |

डॉ बी बी साबळे यांनी अर्जामध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत रुग्णालयाचे विस्तारीकरण करण्यात आले त्यावेळी जुने वैद्यकिय अधिकारी व नवीन वैद्यकिय अधिकारी यांचे मध्ये कोणताही भेदभाव न करता दोघांचे वेतन भत्ते (Incentive) व इतर सुविधा सारख्याच राहतील असे वेळोवेळी सांगण्यात आले. परंतु प्रत्यक्षात मी सेवाजेष्ठतेने इतर सर्व वैद्यकिय अधिकाऱ्यांपेक्षा सर्वात जेष्ठ असूनही मला इतर वैद्यकिय अधिकारी फिजिशियनप्रमाणे वेतन, भत्ते (Incentive) व इतर सुविधा प्राप्त होत नाहीत.माझ्यापेक्षा सेवा जेष्ठतेने कमी असलेले इतर वैद्यकिय अधिकारी फिजिशियन यांना प्रत्येकी रु.३५,०००/- फिक्स पे किंवा Pay Band १५००० - ३९१००/- संस्थान देत असून अधिक प्रत्येक बाहय व अंतर रुग्णामागे व प्रत्येक मेडिकल प्रोसिजर मागे भत्ते (Incentive) मिळून त्यांना

जवळ-जवळ मासिक पेमेंट रुपये १,००,०००/- ते १,५०,०००/- पेक्षा जास्त वेतन सन २००५ पासून आजपर्यंत प्राप्त होत आहे असे नमुद केले आहे.

याबाबत श्री साईनाथ रुग्णालयाकडील व.वैद्यकिय अधिकारी/ कन्सलटंट यांना इन्सेटिव्ह देणेबाबत प्रस्ताव वित्त विभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल यांचेकडून मा. व्यवस्थापन समितीसमोर विचारार्थ सादर करणेत आलेला आहे.

डॉ. साबळे यांना ०६ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनबॅन्डमध्ये रु. १५६००-३९१०० मध्ये मुळ वेतन + ग्रेड पे ६६०० व अनुज्ञेय भत्ते असे सर्व मिळून एकूण रु. ६६,९८६/- इतके वेतन देण्यात येत असून वेळोवेळी त्यांना वेतनवाढी देण्यात आलेल्या आहेत. सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना कमाल वेतन बँड -०३ रु. १५६००-३९१०० + ५४०० पर्यंत ग्रेड पे घेणाऱ्या एकाकी पदावरील कर्मचाऱ्यांना लागू असल्याने डॉ. साबळे यांना पुढील ग्रेड पे देण्यात आलेला नाही.

श्री साईनाथ रुग्णालयाकडील वेद्यकिय अधिक्षक व फिजिशियन या पदाची वेतनश्रेणी सारखीच आहे. दोन्ही हॉस्पीटलचे मंजूर आकृतीबंधानुसार डॉ साबळे यांना पदोन्नती व वेतनश्रेणी दयावयाची झ ाल्यास वैद्यकिय संचालक/ उपवैद्यकिय संचालक या पदावर वेतनबॅन्डमध्ये रु १५६००-३९१०० + ग्रेड पे ७६००मध्ये देणेबाबत विचार करता येईल. परंतु सध्या उपवैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल या पदावर डॉ. एन.एस.म्हस्के हे कार्यरत असल्याने हे पद रिक्त नाही. तसेच वैद्यकिय संचालक हे पद रिक्त असून या पदाचा अतिरिक्त कार्यभार उप वैद्यकिय संचालक डॉ. एन एस म्हस्के यांचेकडे आहे. तसेच डॉ. आर के कुलकर्णी हे सेवाजेष्ठतेनुसार अ.नं.०१ वर असून डॉ साबळे अ.नं.०२ वर आहे.

डॉ साबळे यांनी इतर फिजिशियनला जे लाभ व भत्ते मिळत आहे ते मलाही मिळण्यास मी सर्वार्थाने पात्र आहे व तसा तो मला (With back effect) मिळावा. सध्या संस्थानने फिजिशियन व इतर पद नेमणुकीबाबतची जाहिरात प्रसिध्द केली आहे. त्या अनुषंगाने देखील माझे विनंतीचा विचार होऊन मला न्याय मिळेल असे अर्जात नमुद केले आहे.

दि.१०.०८.२००८ रोजी श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वैद्यकिय अधिकारी(फिजिशियन) या पदावर नेमणुका करणेकामी जाहिरात देऊन मुलाखती घेण्यात आल्या. त्यावेळी डॉ साबळे यांनी सिनियर इन्टेन्सीव्हीस्ट,फिजिशियन व काडीओलॉजिस्ट इत्यादी पदासाठी अर्ज केले होते. त्यांना सिनियर इन्टेन्सिव्हीस्ट व फिजिशियन या पदासाठी मुलाखत पत्र देण्यात आले होते. ते कार्डीओलॉजिस्ट या पदासाठी पात्र नसल्याने त्यांना सदर पदासाठी मुलाखत पत्र देण्यात आले नव्हते. डॉ. साबळे यांची फिजिशियन व सिनियर इंन्टेन्सीव्हीस्ट या पदासाठी एकाच वेळी मा. विश्वस्त डॉ.प्यारेलाल तिवारी सो, डॉ.गोंदकर सो, मा. श्री खांबेकर सो व मा श्री सुरेशराव वाबळे सो यांचेसमोर मुलाखत घेण्यात आली. त्यावेळी त्यांची नेमणुकीसाठी निवड करण्यात आलेली नाही.

तसेच दि.१३.१०.२०१० रोजीचे टाईम्स ऑफ इंडीया या वर्तमानपत्रात वैद्यकिय संचालक, वैद्यकिय प्रशासक, वैद्यकिय अधिक्षक या पदासाठी जाहिरात देण्यात आलेली होती. त्यानुसार वरील पदासाठी आलेले सर्व अर्ज मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१/११/२०१० रोजीचे सभेतील मा. अध्यक्ष सो. यांचे सुचनेनुसार मा. विश्वस्त डॉ. पी.एल. तिवारी व डॉ. एकनाथ गोंदकर यांचेकडून अर्ज छाननी करुन घेण्यात आले होते. त्यावेळी डॉ. बी बी साबळे यांचा वैद्यकिय अधिक्षक पदासाठी असलेला अर्ज नाकारण्यात आलेला होता.

तरी डॉ. बी बी साबळे यांचा प्रमोशन,समान पदविधारकाप्रमाणे वेतन व इंन्सेन्टीव्ह मिळणेबाबतचा अर्ज निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.बी.बी.साबळे, वैद्यकीय अधिकारी,यांचा सेवा जेष्ठतेनुसार प्रमोशन, समान पदविधारकाप्रमाणे वेतन व भत्ते (Incentive) मिळणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली.**
(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.६९** **दसरा उत्सव कालावधीत (ऑक्टो.,२०११)तातडीने खरेदी केलेल्या औषधे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानमध्ये दरवर्षीप्रमाणे दि.०५/१०/२०११ ते ०८/१०/२०११ या कालावधीत दसरा उत्सव साजरा करण्यात आलेला आहे. या कालावधीत मंदीराचे परीसरात प्रथमोपचार केंद्र श्री साईनाथ रुग्णालयामार्फत चालविण्यात येत असते. मुंबईहून येणाऱ्या विविध पालख्यासाठी संस्थानची रुग्णवाहिका प्रथमोपचारासाठी ठेवण्यात येत असते.

श्री साईनाथ रुग्णालयाचे उप भांडार विभागाने दि.३०/०९/२०११ चे मागणी पत्रान्वये काही औषधे जी त्यांचेकडे उपलब्ध नव्हती ती औषधे मागणी केली होती. तसेच सदरची औषधे औषध भांडारात सुध्दा शिल्लक नव्हती कारण सन २०११-१२ चे वार्षिक औषधे खरेदीचे पुरवठा आदेश दि.२४/०९/२०११ रोजी

पाठविण्यात आले होते. त्यानूसार सदरकामी संबंधित पुरवठा धारकांकडे सदर औषधाची मागणी करण्यात आली होती, परंतु पुरवठा धारकांनी दिलेले दर हे संस्थानकरीता विशिष्ट मंजूर केलेले दर असल्यामुळे कंपनीकडे मालासाठी आदेश पाठवितात व त्यानंतर साधारणतः १५ ते २० दिवसांनी कंपनीकडून माल प्राप्त होईल असे सांगतात. अशा परिस्थितीत सदर औषधे तातडीने मनमाड येथील विक्रेत्याकडून खरेदी करुन देण्यात आलेली आहे, त्यासाठी रु.२५८९४/- मात्र खर्च आलेला आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Munot Medical Agencies, Manmad | 3467 | 06/10/2011 | 25894.00 |
| | | **Total Amt. in Rs.** | | **25894.00** |

तरी उपरोक्त प्रमाणे दसरा उत्सव कालावधीत तातडीने खरेदी केलेल्या औषधे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु.२५,८९४/- (रु. पंचवीस हजार आठशे चौऱ्यान्नव मात्र) इतका खर्च आलेला आहे.

सदर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दसरा उत्सव कालावधीत तातडीने खरेदी केलेल्या औषधे खरेदीकामी आलेल्या रक्कम रु.२५,८९४/-मात्र खरेदी व खर्चाची नोंद घेण्यात आली.**(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.७०** **श्री साईनाथ रुग्णालयासाठी रुग्णालयातील Opthal O.T. साठी इन्स्ट्रुमेंट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर विभागाने डि.पी.क्र. ४८७४ दि.११/११/२०११ अन्वये दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या काही इन्स्ट्रुमेंटची मागणी केलेली आहे.

सदरचे खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी इकडील पत्र क्र. ९६ दि.२५/११/२०११ अन्वये (१) मे. कालेलकर सर्जिकल प्रा. लि., मुंबई (२) मे. अप्पास्वामी असोसिएट्स, मुंबई (३) मे. इन्डो जर्मन सर्जिकल कार्पोरेशन, मुंबई यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मे. इन्डो जर्मन सर्जिकल कार्पोरेशन, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.२३८ दि. २८/११/२०११ अन्वये खालीलप्रमाणे दरपत्रक पाठविलेले आहे.

| Sr. No. | Name of Items | Qty. | Rate Per in Rs. (Incl. of all Taxes) | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| | **Make- Appasamy / Indogerman** | | | |
| 1 | Wire Speculam | 20 | 112.50 | 2250.00 |
| 2 | D.C.R. Instrument Set Consisting of following - | | | |
| a | Cats Paw Retractor (Double ended) | 3 | 1406.25 | 4218.75 |
| b | Bone Punch Size 1mm | 1 | 3543.75 | 3543.75 |
| c | Bone Punch Size 2mm | 3 | 3543.75 | 10631.25 |
| d | Bone Punch Size 3mm | 2 | 3543.75 | 7087.50 |
| e | Toothed Forcep (Small Size) | 2 | 1968.75 | 3937.50 |
| f | Sac Protector | 2 | 1406.25 | 2812.50 |
| g | Sac Scissor (Spring) | 2 | 2193.75 | 4387.50 |
| h | Sharp Dissector | 2 | 2193.75 | 4387.50 |
| i | Curved Mosquito (Small) | 2 | 787.50 | 1575.00 |
| j | Long Lacrimal Sac Dissector | 2 | 2193.75 | 4387.50 |
| k | Corneal Scissor (Medium) | 5 | 2081.25 | 10406.25 |
| | | | **Total-** | **59625.00** |
| | | | **Packing -** | **150.00** |
| | | | **Freight-** | **200.00** |
| | | | | **59975.00** |

उपरोक्त इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी अंदाजे रु.५९,९७५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे इन्स्ट्रुमेंट विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.५९,९७५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील Opthal O.T. साठी इन्स्ट्रुमेंट विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.५९,९७५/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.७१** **मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर २०१२ आयोजित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करणे बाबत श्री प्रकाश गंगवाणी, मुंबई यांनी दि. ११/०८/२०११ रोजीचे पत्रान्वये परवानगी मिळणेकामी विनंती केलेली आहे. याशिबीरात श्री गंगवाणी, मुंबई यांची ०६ नेत्रतज्ञांची टीम जानेवारी (२०१२) महिन्याच्या दुस-या आठवडयात शिरडी येथे येऊन, रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करणार असून, आवश्यक त्या रुग्णांना नंबरचे चष्मे त्यांचेमार्फत मोफत देणार आहेत.

याशिवाय नेत्र चिकीत्सा केलेल्या व निवड झालेल्या ज्या रुग्णांवर मोतीबिंदु शस्त्रक्रिया करणे आवश्यक आहे, अशा रुग्णांना मोतीबिंदु शस्त्रक्रियेसाठी श्री साईनाथ रुग्णालयाचे नेत्रविभागाकडे रेफर करणार (पाठविणार) आहेत. अशा गरजू रुग्णांवर मोतीबिंदु शस्त्रक्रिया संस्थान रुग्णालयामार्फत मोफत करावयाच्या झाल्यास याकामी रुग्णांना कराव्या लागणा-या विविध प्राथमिक तपासण्या व ऑपरेशन इत्यादीवर प्रत्येक रुग्णांवर खालील प्रमाणे खर्च येईल.

| | | |
|---|---|---|
| 1. Lab Investgation | Rs. | 202.00 |
| 2. ECG | Rs. | 30.00 |
| 3. Visco | Rs. | 120.00 |
| 4. Goggal Cost | Rs. | 20.00 |
| 5 Operation Cost | Rs. | 550.00 |
| 6. Hospital Accommodation Charges etc. | Rs. | 06.00 |
| 7. Other (Tea, Lunch,Dinner) | Rs. | 22.00 |
| Per Pts.Expenditure- | Rs. | 950.00 |

उपरोक्त प्रमाणे प्रति रुग्ण रु.९५०/- इतका खर्च अपेक्षित आहे. याशिबीरात अंदाजे २०० रुग्णांच्या मोतीबिंदु शस्त्रक्रिया करावयाचे झाल्यास २०० x रु.९५०/- याप्रमाणे रु.१,९०,०००/- इतका खर्च येत असून, याकामी इतर अनुशंगीक मिळुन अंदाजे रु. २,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

श्री प्रकाश गंगवाणी व त्यांचे टीमला जानेवारी (२०१२) महिन्याच्या दुस-या आठवडयात शिर्डी येथे येऊन, नेत्र तपासणी करणेस व आवश्यक त्या रुग्णास नंबरचे चष्मे वाटप तसेच निवड झालेल्या आवश्यक त्या गरजु रुग्णांकरीता संस्थानचे रुग्णालयात मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करणेबाबत रुग्णालयाचे नेत्र विभागाचे नेत्रतज्ञ, वैद्यकिय अधिक्षक, तसेच वैद्यकिय संचालक, यांची चर्चा झालेली असून, चर्चेनुसार सदर मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीर माहे - जानेवारी - २०१२ च्या चौथ्या आठवडयात आयोजित करता येईल, असे मत व्यक्त केलेले आहे.

सदर शिबीरकामी येणा-या मुंबई येथील श्री गंगवाणी व त्यांचे ६ व्यक्तींची तीन दिवसासाठी राहणेची, जेवणाची व्यवस्था संस्थान मार्फत मोफत करावी लागेल. तसेच शिबीराची प्रसिध्दी करावयाची झाल्यास याकामी बातमी वजा जाहीरात देता येईल याकामी येणा-या खर्चास मंजूरी असावी.

तरी वरील प्रमाणे श्री गंगवाणी व टिमला श्री साईनाथ रुग्णालयात नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटप शिबीर आयोजनास परवानगी देणेस तसेच सदर नेत्र तपासणी शिबीरात निवड झालेल्या आवश्यक त्या रुग्णावर संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीराचे जानेवारी - २०१२ च्या चौथ्या आठवडयात आयोजन करणेस तसेच शिबीरकामी येणा-या अंदाजे रु. २,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री गंगवाणी व त्यांचे टिमला श्री साईनाथ रुग्णालयात नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटप शिबीर आयोजनास परवानगी देणेस तसेच सदर नेत्र तपासणी शिबीरात निवड झालेल्या आवश्यक त्या रुग्णावर संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीराचे जानेवारी - २०१२ च्या चौथ्या आठवडयात आयोजन करणेस तसेच शिबीरकामी येणा-या अंदाजे रु. २,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षक)

---

**विषय नं.७२** **ऑपरेटींग मायक्रोस्कोपचे AMC करणेसाठी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ५२ कंपन्यांचे अंदाजे रु. २८,८०,३०,७६०/- इतक्या रकमेचे ४९६ मेडीकल इक्विपमेंटस खरेदी करणेत आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी काही मशिन्सचे संबंधीत कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता मा. व्य. समितीच्या विविध निर्णयांन्वये दरवर्षी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात येत आहे.

उपरोक्त पैकी २६ कंपन्यांकडे विविध मशिन्सचे सन २०११-२०१२ या वर्षाकरीता मा. व्य. समिती सभेच्या निर्णय क्र. ३७३ अन्वये एकुण १८७ मशिन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी संबंधीत कंपन्यांच्या प्रतिनीधींना वैद्यकिय संचालक यांचे समक्ष बोलावुन दिलेल्या दरांबाबत चर्चा/ वाटाघाटी करुन वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर निश्चीत करणेस व त्यानुसार येणाऱ्या एकुण रकमेच्या

खर्चास मान्यता देणेत आली आहे. सदर सभेत मंजुरी घेताना प्रत्यक्षात १९४ मशिन्स होती परंतू यादीत ती एकुण बेरीज घेताना १८७ दर्शविण्यात आली होती. एकुण रक्कम व १९४ मशिन्स व्यतिरीक्त कोणतीही नविन वाढ केलेली नव्हती.

वरील मंजुरी मिळाले नंतर मा. वैद्यकिय संचालक यांचेशी झालेल्या चर्चेनुसार न्युरो ओ.टी. विभागातील ऑपरेटींग मायक्रोस्कोपचे AMC करणे गरजेचे असलेमुळे मे. कार्ल झैस इंडिया प्रा.लि. मुंबई यांचेकडे सदर मशिनची रू ३४,७४४/- रकमेत इतक्या AMC करणेत आलेली आहे.

त्यामुळे एकुण कंपन्यांची संख्या २७ होउन त्यांच्या १९५ नग मशिन्सचे संबंधीत कंपन्यांकडे एकुण रू. ७६,५८,४६०/- इतक्या रकमेत वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत आलेले आहे.

तरी वरीलप्रमाणे खर्चाची नोंद घेणेस व अतिरिक्त एक मशिनचे (ऑपरेटींग मायक्रोस्कोप) वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता आलेल्या रू.३४,७४४/-च्या खर्चास कार्योत्तर मान्यता असावी विनंती.

**निर्णय क्र.७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे २७ कंपन्याची १९५ मशिन्सचे संबंधीत कंपन्याकडे वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यासाठी आलेल्या एकुण रू ७६,५८,४६०/-च्या खर्चाची नोंद घेणेत आली. तसेच अतिरिक्त एक मशिनचे (ऑपरेटींग मायक्रोस्कोप) वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे करीता आलेल्या रू.३४, ७४४/-च्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.७३** **सन २०११-१२ या वार्षिक औषधे खरेदीमधील M/s. JCPL Pharma Pvt.Ltd. Jalgaon यांचे औषधांचे पुरवठ्याबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे सन २०११-१२ या वर्षाचे वार्षिक औषधे खरेदीमध्ये JCPL Pharma या कंपनीच्या औषधांकरीता M/s. JCPL Pharma Pvt. Ltd., Jalgaon या उत्पादक कंपनीस इकडील पत्र क्र.३१४५ दि.२४/०९/२०११ अन्वये रक्कम रु.१,८२,८५०/- इतक्या रक्कमेचा खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आला होता.

| Sr. No. | Name of Drugs / Item | Brand Name | Make | Packing | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | TAB DICLOFENAC SODIUM 100MG S.R. | ENTEFENAC | JCPL | 10 Tab | 50000 | 0.2250 | 11250.00 |
| 2 | CAP AMPICILLIN 250 Mg | JECILLIN | JCPL | 10 Cap | 200000 | 0.8580 | 171600.00 |
| | | | | | **Total in Rs.** | | **182850.00** |

परंतु M/s. JCPL Pharma Pvt. Ltd., Jalgaon यांनी दि.२१/११/२०११ चे पत्रान्वये कंपनीने त्यांचे कार्यकारी संचालक श्री. दिलीप पी. राणे यांचे अचानक निधन झाल्यामुळे कंपनीने अदयापपर्यंत औषधांचा पुरवठा केलेला नसून यापुढे आम्ही Financial व Technical अडचणीमुळे आम्ही उपरोक्त पुरवठा आदेशातील औषधांचा पुरवठा करु शकत नाही, तसेच वरील पत्रात त्यांनी संस्थानची माफी मागून आमची सुरक्षा रक्कम रु.९१४३/- देखील परत करावी, असे कळविले आहे.

त्यामुळे M/s. JCPL Pharma Pvt. Ltd., Jalgaon यांना पुरवठा आदेश गेलेल्या औषधांकरीता तुलनात्मक दरांचे तक्त्यात प्राप्त झालेले इतर कंपन्याचे औषधांचा तुलनात्मक तक्ता वैद्यकिय संचालक यांना दाखविण्यात येऊन त्यांचे शिफारशीनुसार सदरचे खरेदीकामी रक्कम रु.२,११,६३५/- इतका खर्च येईल. म्हणजे सदरचे खरेदीकामी रु. २८,७८५/- इतका जादा खर्च येणार आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Drugs / Item | Name of Supplier | Make | Brand Name / Packing | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | TAB DICLOFENAC SODIUM 100MG S.R. | *Order to* -Karnataka Antibiotics & Pharmaceuticals Ltd., Bangalore<br>*Copy to* –<br>Snehal Enterprises, Nagpur | KAPL | 10T | 50000 | 0.3050 | 15250.00 |
| 2 | CAP AMPICILLIN 250 Mg | Keps Pharma, Mumbai | ABBOTT HEALTHCARE | PIRA - CILLIN | 200000 | 0.9819 | 196385.14 |
| | | | | | | **Total in Rs.** | **211635.14** |

तरी सदरच्या औषधांचा M/s. JCPL Pharma Pvt. Ltd., Jalgaon यांचा पुरवठा आदेश रद्द करणेस व त्यांची संस्थानकडे जमा असलेली ५% सुरक्षा रक्कम रु.९१४३/- जप्त करण्यास व सदरची औषधे वरीलप्रमाणे दुसऱ्या पुरवठा धारकांकडून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रक्कम रु.२८,७८५/- चे जादा खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे औषधांचा M/s. JCPL Pharma Pvt. Ltd., Jalgaon यांचा पुरवठा आदेश रद्द करणेस व त्यांची संस्थानकडे जमा असलेली ५% सुरक्षा रक्कम रु.९१४३/- जप्त करण्यास तसेच सदरची औषधे वरीलप्रमाणे दुसऱ्या पुरवठा धारकांकडून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रक्कम रु.२८,७८५/- चे जादा खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.७४** **मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे भूसंपादनाचे मिळालेल्या जमिनीच्या उपयोगाबाबत / वापराबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)**मौजे निमगांव कोऱ्हाळे, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांच्या मालकीची व लक्ष्मीवाडा मळा या शाखेअंतर्गत असलेली जमीन (क्षेत्र ४५ हेक्टर ६४ आर) ही संस्थानला माहे जानेवारी, २००५ मध्ये भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेली आहे. त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :

| अ. नं. | संदर्भ | तपशील / जमिनी वापराचा उद्देश |
|---|---|---|
| ०१ | महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील ज्ञापन क्रमांक आय सी एच / ३४२००० /प्र. क्र. २१८ / ल ७, दिनांक १७ सप्टेंबर, २००२ | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांनी निमगांव कोऱ्हाळे येथील ११९.३७ एकर जमीन श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांना हॉस्पीटल व त्या अनुषंगाने इतर सार्वजनिक प्रयोजनासाठी भूसंपादन कायदा, १८९४ अन्वये भूसंपादनाने देणेबाबत मंजुरी दिली. |
| ०२ | मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस इकडील पत्र क्रमांक एसएसएस / वशी ०२/ ८५०५/ २००२, दि. २३ सप्टेंबर, २००२ रोजी भूसंपादनाचा प्रस्ताव सादर केला. | या भूसंपादन प्रस्तावातील, नमुना ख मध्ये, सदरच्या जमिनी दवाखाना व इतर लोकोपयोग कामासाठी या प्रयोजनार्थ आवश्यक असल्याचे नमूद केलेले आहे. |
| ०३ | भूसंपादन करारनामा - भूसंपादन कायद्यातील तरतुदीनुसार मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी स्वाक्षरीत केलेला. | सदर करारनाम्यामध्ये, सदरच्या जमीन दवाखाना व इतर लोकोपयोगी कामासाठी आवश्यक आहेत, असे नमूद केलेले आहे. |
| ०४ | मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडील भूसंपादन अंतिम निवाडा क्रमांक एल ए क्यू / एस आर/ १/२००२, दि. ३१ ऑगष्ट, २००५. | सदर निवाडयात श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांना हॉस्पीटल व त्या अनुषंगाने इतर सार्वजनिक प्रयोजनासाठी असे नमुद केलेले आहे. सदर जमिनीचा ताबा संस्थानला दिनांक १० जानेवारी, २००६ रोजी मिळालेला आहे. |

याचाच अर्थ, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील संस्थानला भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेली ४५ हेक्टर ६४ आर ही जमीन हॉस्पीटल (दवाखाना) व त्या अनुषंगाने इतर सार्वजनिक कामासाठी मिळालेली आहे.

**(ब)** सध्या उपरोक्त भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेल्या जमिनींमध्ये सुरु असणारे व नियोजित प्रकल्पांची माहिती खालीलप्रमाणे :

| अ.नं. | गट नंबर (नविन गट नंबर) | भूसंपादीत केलेले क्षेत्र हे-आर-चौमी | उभारणेत आलेले विकास प्रकल्प | नियोजित विकास प्रकल्प |
|---|---|---|---|---|
| ०१ | ८०/अ/१ पैकी (८०/१) | ०१-७६-०० पोटखराबासह | श्री साईप्रसादालय इमारत | -- |
| ०२ | ८५ पै | ०१-२०-०० | श्री साईप्रसादालय इमारत | -- |
| ०३ | ८७ | ०१-५४-०० पोटखराबासह | महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (क्षेत्र ००-२४-५०)<br>सैनिक आरामगृह (क्षेत्र ००-३३-००)<br>वाहनतळ व रस्ता (उर्वरित क्षेत्र ) | जलसंपदा विभागाचे कार्यालये व कर्मचारी निवासस्थाने (क्षेत्र ००-२४-५०) (बांधकामास सुरुवात) |
| ०४ | ८८ | ०१-४६-०० पौटखराबासह | महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं. (क्षेत्र ००-२७-५०)<br>सैनिक आरामगृह (क्षेत्र ००-२७-००)<br>वाहनतळ व रस्ता (उर्वरित क्षेत्र ) | जलसंपदा विभागाचे कार्यालये व कर्मचारी निवासस्थाने (क्षेत्र ००-१५-५०) (बांधकामास सुरुवात) |
| ०५ | १७२ | ०७-९६-०० पोटखराबासह | साई आश्रम प्रकल्प भाग - २ (बांधकामे अंतिम टप्प्यात) | -- |
| ०६ | १८३ | ०५-४०-०० | पडीत | -- |
| ०७ | १८६ | ०१-२४-०० | पडीत | -- |
| ०८ | १९९ | ०१-९६-०० | -- | साईगार्डन प्रकल्प |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पोटखराबासह | | (बांधकामास सुरुवात) |
| ०९ | १९८ | ०३-३८-०० पोटखराबासह | -- | साईगार्डन प्रकल्प (बांधकामास सुरुवात) |
| १० | २०० | ०१-८८-०० पोटखराबासह | -- | साईगार्डन प्रकल्प (बांधकामास सुरुवात) |
| ११ | २०१ | ००-९८-०० पोटखराबासह | -- | साईगार्डन प्रकल्प (बांधकामास सुरुवात) |
| १२ | १९५ | ०३-५९-०० पोटखराबासह | हेलिपॅड | -- |
| १३ | २३८ पै | ००-२७-०० | पडीत | -- |
| १४ | २३४ पै | ००-८४-०० | पडीत | -- |
| १५ | २२९ | ००-९८-०० पोटखराबासह | निलगिरी | -- |
| १६ | २२१ पै | ०३-२६-०० पोटखराबासह | निलगिरी / आंबा | -- |
| १७ | २४५ पै | ०३-३०-०० | आंबा | -- |
| १८ | २४९ | ०१-७९-०० | पडीत | -- |
| १९ | २५० पै | ०१-८५-०० | पडीत | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना शिर्डी शहरासाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना राबविणेसाठी उपलब्ध करुन देणेसाठी प्रस्तावित. |
| २० | २१८ | ०१-००-०० पोटखराबासह | पडीत | -- |
| | **एकूण** | **४५-६४-०० पोटखराबासह** | | |

**परिच्छेद अ** मध्ये नमुद केलेप्रमाणे जमीन भूसंपादनाचे प्रयोजन दवाखाना व इतर लोकोपयोगी सार्वजनिक कामांसाठी असे आहे. **तथापि,** वर नमुद केलेप्रमाणे या जमिनींमध्ये भक्तांच्या सोयी-सुविधेसाठी निवासस्थाने, उद्याने तसेच इतर सार्वजनिक कामांसाठी जमिनीचा वापर करणेत आलेला आहे. **थोडक्यात,** वरील जमिनींचा वापर दवाखाना व त्या अनुषंगाने इतर सार्वजनिक कामासाठी करणेत आलेला नाही व आता करण्यात येणार नाही, असे दिसून येत आहे.

**(क)** भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेल्या उपरोक्त जमिनींचा वापर दवाखाना व त्या अनुषंगाने इतर सार्वजनिक कामांसाठी या प्रयोजनाकरीता करणेत आला नाही, त्याची कारणे थोडक्यात खालीलप्रमाणे :

**०१.** दवाखाना / रुग्णालय उभारणेसाठी सलग (Compact Block) जमीन उपलब्ध झाल्यास ती उपयुक्त ठरते. विषयांकित भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेली ४५ हेक्टर ६४ आर जमीन ही सलग नाही, ती तुकडया-तुकडयांच्या स्वरुपात विभागलेली असल्याने, सदर जमिनीमध्ये रुग्णालय उभारणी करता येणे शक्य झालेले नाही.

**०२.** विषयांकित भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेल्या जमिनीच्या लगत, शेती महामंडळाची उर्वरित जमीन उपलब्ध आहे. शेती महामंडळाची उर्वरित जमीन भूसंपादनाच्या माध्यमातून घेणेसाठी प्रयत्न करणेत आला होता. तथापि, शेती महामंडळाच्या कामगार संघटनांनी तसेच खंडकरी शेतकऱ्यांनी मा. न्यायालयात दावा दाखल केलेला होता व त्याबाबतची कार्यवाही सुरु होती. त्यामुळे या जमिनींबाबत विनियोगाबाबत मनाई हुकूम होता. या कारणाने उर्वरित जमिनी भूसंपादनाच्या माध्यमातून संस्थानसाठी घेणे शक्य झालेले नाही. त्यामुळे भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेल्या जमिनींमध्ये रुग्णालय व त्या अनुषंगाने इतर सार्वजनिक कामांसाठीचे प्रकल्प उभारणे शक्य झालेले नाही.

**०३.** विषयांकित भूसंपादनाने मिळालेली जमीन ही प्रादेशिक विकास आराखडयात हरित पट्टयात असून तेथे बांधकाम अनुज्ञेय नाही. त्यामुळे नगर रचना विभाग व महसुल विभाग निवासी बांधकामाचे आराखडयांना मंजुरी देत नाहीत. त्यामुळे विषयांकित जमिनी हरित पट्टयातून वगळून निवासी पट्टयात (रहिवास क्षेत्रात) समाविष्ट करणेसाठी संस्थानमार्फत नगरविकास विभाग यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदरचे प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे. त्याचा थोडक्यात तपशील :

**(१)** संस्थानने सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन, मा. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी माहे जून, २००९ मध्ये संस्थानला भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेल्या गट नंबर १७२, १८३ व १८६ यामधील क्षेत्र रहिवास क्षेत्रात समाविष्ट करणेबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६

चे कलम २० अन्वये प्राथमिक सुचना जाहीर करुन जनेतच्या हरकती मागविलेल्या आहेत. सदर हरकतीचे सुनावणीसाठी मा. उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना प्राधिकृत करणेत आलेले होते. याबाबतचा अहवाल मा. उपसंचालक, नगर रचना, नाशिक यांनी पाठविलेला असून, याबाबतची अंतिम सुचना प्रसिध्द झालेली नाही.

**(२)** तसेच उपरोक्त प्रस्तावाव्यतिरिक्त, दिनांक २४ जून, २००८ रोजी मा. नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील संस्थानला भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेल्या उर्वरित जमिनी (एकूण विविध १६ गट नंबर) या हरीत पट्टयातून निवासी क्षेत्रात समाविष्ट करणेबाबत स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे व याबाबत वेळोवेळी पत्रव्यवहारही करणेत आलेला आहे. याबाबत मा. अध्यक्षसाो. यांचे स्तरावरुन ही पाठपुरावा करणेत येत आहे.

**०४.** दरम्यानचे कालावधीत, मौजे नांदुर्खी बुद्रूक ग्रामपंचायतीने माहे डिसेंबर, २००६ मधील त्यांचे ग्रामसभेत, मौजे नांदुर्खी बुद्रूक येथील ग्रामपंचायतीच्या मालकीची गट नंबर ३३१ व ४४६ मधील क्षेत्र १६ हे ४८ आर ही जमीन संस्थानला बाग बगीचा उद्यान उभारणे, भक्तनिवास, हेलिपॅड, शैक्षणिक संस्था, क्रिडा संकुल, मत्स्य उत्पादन अथवा दवाखाना (रुग्णालय) उभारण्यासाठी विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबतचा निर्णय घेतला. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस उपरोक्त जमीन संस्थानला विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आला. त्याबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार होऊन, संस्थानमार्फत दिनांक ०३ मे, २०११ रोजी मौजे नांदुर्खी बुद्रूक येथील गट नंबर ३३१ व गट नंबर ४४६ मधील एकूण २५ हेक्टर ६० आर क्षेत्र सुसज्ज रुग्णालय उभारणीसाठी विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबतचा सुधारीत प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडेस माहे ऑक्टोबर, २०११ मध्ये मा. शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेसाठी सादर करणेत आलेला आहे, असे समजते.

**(ड)** उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेनुसार, मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेल्या जमिनींचा वापर हा हॉस्पीटल व त अनुषंगाने इतर सार्वजनिक प्रयोजनासाठी करण्यात आलेला नसला तरी, त्याचा परिणाम जमिनीच्या संपादनासाठी केलेल्या भूसंपादनाच्या कार्यवाहीवर होऊ शकत नाही हे श्री. अशोक ग्रोव्हर ॲण्ड सन्स लिखित, दि महाराष्ट्र लँड ॲक्वीझिशियन मॅन्युअल या पुस्तकात काही मा. न्यायालयातील दाव्यांचे उदाहरणे देऊन स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे विषयांकित जमिनीचा वापर संस्थानने इतर सार्वजनिक कामांसाठी केला किंवा करण्याचे ठरविले तरी ते उचित आहे.

तथापि, संस्थानने प्रस्तुत जमिनीचा वापर करणेबाबत भूसंपादन कायद्याच्या तरतुदीनुसार जो करारनामा मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस करुन दिलेला आहे तसेच मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपुर भाग, श्रीरामपूर यांनी भूसंपादन अधिकारी म्हणून जो निवाडा जाहिर केला आहे, त्या निवाडयात, भूसंपादनाचे प्रयोजन / जमिनीचा वापर हा दवाखाना (रुग्णालय) व त्या अनुषंगाने इतर सार्वजनिक वापरासाठी असा करणेत आलेला आहे.

परंतु, संस्थानने सदर जमिनींचा वापर भक्तोपयोगी / लोकोपयोगी विविध सार्वजनिक उपक्रमांसाठी / कामांसाठी केलेला असल्याने / प्रस्तावित केलेला असल्याने याबाबत भविष्यात काही कायदेशीर अडचण निर्माण होऊ नये म्हणून मा. महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेमार्फत प्रस्ताव सादर करुन, जमीन वापराच्या प्रयोजनात भक्तोपयोगी / लोकोपयोगी विविध सार्वजनिक उपक्रमांसाठी / कामांसाठी असा बदल करणेस मान्यता मिळविणे उचित राहील.

**(इ)** उपरोक्त परिच्छेदांतील विवेचनास अनुसरुन, मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेल्या उपरोक्त जमिनीचे वापराचे प्रयोजनात भक्तोपयोगी / लोकोपयोगी विविध सार्वजनिक उपक्रमांसाठी / कामांसाठी / विकास प्रकल्प राबविणेसाठी असा बदल करणेस व त्यासाठी मा. जिल्हाधिकारी, महसूल विभाग, अहमदनगर यांचेमार्फत मा. शासनाकडे विहीत पध्दतीने प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेल्या जमिनीचे वापराचे प्रयोजनात भक्तोपयोगी / लोकोपयोगी विविध सार्वजनिक उपक्रमांसाठी / कामांसाठी / विकास प्रकल्प राबविणेसाठी असा बदल करणेस व त्यासाठी मा. जिल्हाधिकारी, महसूल विभाग, अहमदनगर यांचेमार्फत मा. शासनाकडे विहीत पध्दतीने प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.७५** **नाताळ सुट्टीचे व नववर्षा निमित्ताने होणारे गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी शामियाना मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी झालेल्या खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक २५ डिसेंबर, २०११ ते दि. ०२ जानेवारी, २०१२ अखेर ०९ दिवस शैक्षणिक सुट्या असतात. या कालावधीत श्रीं चे दर्शनासाठी साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्याने, मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी साईभक्तांचे सोयीसाठी तात्पुरते निवास व्यवस्थेकरीता खालील ठिकाणी शामियाना मंडप कनात व बिछायतीसह, बॅरेकेटींग, बाथरुम व्यवस्थेसाठी पार्टीशन व्यवस्था ०९ दिवसाकरीता तसेच नववर्षाचे स्वागतासाठी स्वागत कमानी व कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज इ. अनुषंगीक व्यवस्था दि. २९.१२.२०११ ते दि. ०१.०१.२०१२ अखेर पर्यंन्त ०४ दिवस करावयाची होती.

**अ) नाताळ सुट्टी निमीत्ताने शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह व्यवस्था :- दि. २५ डिसेंबर, २०११ ते दि. ०२ जानेवारी, २०१२ अखेर ०९ दिवस**

**०१. शामियाना मंडप, पार्टीशन :-**

| अ.नं. | मंडप तपशिल | साईज | एकुण चौ. फुट |
|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्तनिवासस्थान पार्किंग दक्षिण बाजूस कनात व बिछायतीसह शामियाना मंडप साईभक्तांचे निवास व्यवस्थेसाठी | ४५'x ३९०' | १७,५५०.०० |
| ०२ | साईबाबा भक्तनिवासस्थान पार्किंग पश्चिम बाजूस प्रसाद भोजना करीता शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह | ३०'x ९०' | २,७००.०० |
| ०३ | साईनगर मैदानावर साईभक्तांचे निवासव्यवस्थेकरीता शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह | २००'x१००' | २०,०००.०० |
| ०४ | जुने प्रसादालय पार्किंगचें ठिकाणी कनात व बिछायतीसह | १५०'X१००' | १५,०००.०० |
| ०५ | सभाकुंड येथील मोकळ्या जागेत कनात व बिछायतीसह | ६०'x६५' | ३,९००.०० |
| ०६ | जुने प्रसादालय परिसरामधील लाडू विक्री काउंटर समोर | ६०'x २०' | १,२००.०० |
| | | एकुण चौ. फुट.. | ६०,३५०.०० |

**०२. पार्टीशन व्यवस्था :-**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | दर्शन रांगच्या बाजूने व साईनगर मैदानावर शामियाना मंडपासाठी वापरण्यात येणाऱ्या कापडाची ६ फुट उंचीची कनात बांधून बाथरुम व्यवस्थे कामी ६' उंचीचे पार्टीशनची उभारणी करणे. | ११००.०० रनिंग फुट | ११००.०० |
| | | एकुण रनिंग फुट.. | १,१००.०० |

**०३. दर्शन रांगेसाठी व श्री साई प्रसादालय येथे बॅरेकेटींग व्यवस्था :-**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | दर्शन रांगेकरीता व श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलिंग व्यवस्थेकामी व इतर आवश्यक ठिकाणी ४' उंचीचे लोखंडी पाईप / बांबू वापरुन भक्कम बांधी करुन बॅरेकेटींग करणे. | १००० रनिग फुट | १,०००.०० |

**ब) शिर्डी महोत्सव करीता स्वागत कमाणी उभारणी करणे.:- कालावधी दि. ३१.१२.२०११ ते दि. ०१.०१.२०१२ अखेर ०२ दिवस.**

**०१. स्वागत कमाणी :-**

| अ.नं. | मंडप तपशिल | साईज | परिमाण |
|---|---|---|---|
| ०१ | नगर - मनमाड रोडवर बॉक्स टाईप स्वागत कमाणी उभारणे. २०' उंचीच्या | ३० मिटर लांबी | ०२ नग |
| ०२ | स्वागत कक्षा जवळ स्वागत बॉक्स टाईप कमाण उभारणे. २०' उंचीची | १५ मिटर लांबी | ०१ नग |

**०२. साईनगर येथील मैदानावर शिर्डी महोत्सवाकरीता स्टेज उभारणे :- दि. २९.१२.२०११ ते दि. ०१.०१.२०१२ अखेर ०४ दिवस.**

| अ.नं. | स्टेजचा तपशिल | साईज | परिमाण |
|---|---|---|---|
| ०१ | सदरहू स्टेजवर सुमारे ४० ते ५० कलाकारांसाठी ३'-६" उंचीचे स्टेज अँगल फ्रेममध्ये मजबूत बांधी तयार करुन, स्टेजचे वरिल बाजूने भक्कम असे प्लायवूड वापरुन व मजबूत सपोर्ट देऊन ३०' x२०' साईजचे स्टेज तयार करणे., तसेच सदरहू स्टेजचे वरिल बाजूने ताडपत्री बांधून, आतिल बाजूने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधून, स्टेज फ्रेमचे चारही बाजूने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधणे, स्टेजचे पुढील भागासाठी सुशोभित एकाच रंगांचा सुमारे ३५' लांबीचा व १५' उंचीचा पडदा बसविणे. तसेच स्टेजचे बाजूस कलाकारांचे मेकअपसाठी २०'x१५' साईजच्या ०२ ग्रीन रुम जाड कापडामध्ये तयार करणे. स्टेजवर व साईभक्तांना बसणेकामी १०,००० चौ. फुट मॅटीन, २००० नग फायबर खुर्च्या पुरविणे व कार्यक्रमाचे वेळी व्यवस्थीत मांडणी करुन देणे. तसेच स्टेजचे पुढील बाजूने ०२ ठिकाणी स्पीकर ठेवणेसाठी ६'x६' चे प्लॅटफॉर्म तयार करणे व स्टेजचे समोर ४' उंचीचे १५० रनिंग फुट बॅरेकेटींग करणे इ. सह. स्टेज व्यवस्था | ३०' x२०' | ६००.०० |

मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६.०३.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २६६ अन्वये दोन किंवा अधिक सुट्यांचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी संस्थानचे मोकळ्या जागेत आवश्यक तेथे कापडी / शामियाना मंडप उभारणी करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. नाताळ सुट्टीत २०११ नववर्षानिमित्ताने शामियाना मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेची उभारणीकामी येणारे अंदाजे रु.२,२५,०००/- खर्चास व उपरोक्त मंडप ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागवून घेणेस व प्राप्त होणारी दरपत्रके मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उघडून त्यावर निर्णयार्थ सादर करणेस इकडील दि.१० नोव्हेंबर २०११ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील जा. नं. ४४९४/२०११ दि.०१/१२/२०११ रोजीचे कोटेशन पत्राव्दारे खालील मंडप ठेकेदारांकडून निविदा मागविणेत आल्या होत्या.

| अ. नं. | मंडप फर्मचे नांव | अ. नं. | मंडप फर्मचे नांव |
|---|---|---|---|
| ०१. | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | ०९. | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर |
| ०२. | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | १०. | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर |
| ०३. | श्री. भिमराज भागुजी गाडेकर, राहाता | ११. | कला साधना डेकोरेटर्स, नाशिक |
| ०४. | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | १२. | शरद साबु डेकोरेटर्स, इंदौर |
| ०५. | स्वस्तिक मंडप वर्क्स, अहमदनगर | १३. | प्रकाश मंडप डेकोरेटर्स, वैजापूर |
| ०६. | कल्याणी टेन्ट हाऊस, नांदुर | १४. | जोंधळे मंडप डेकोरेटर्स, कोकणगांव (संगमनेर) |
| ०७. | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड | १५. | नाना उजवणे मंडप कॉन्ट्रक्टर ॲण्ड डेकोरेशन, अकोला |
| ०८. | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | १६. | शर्मा मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, वैजापूर |

उपरोक्तपैकी खालील ठेकेदारांनी निविदा फॉर्म खरेदी करुन सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | मंडप ठेकेदारांचे नांव | आवक नं. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | साईकृपा टेन्ट हाऊस , बेलापूर | १६१६२ | ०२/१२/२०११ |
| ०२ | रोशनी मंडप, संक्रापूर | १६३५४ | ०६/१२/२०११ |
| ०३ | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, मनमाड | १६२७२ | ०५/१२/२०११ |
| ०४ | झुराळे मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | १६२७३ | ०५/१२/२०११ |
| ०५ | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर | १६३५५ | ०६/१२/२०११ |
| ०६ | कल्याणी टेन्ट हाऊस, नांदूर | १६५२६ | ०८/१२/२०११ |
| ०७ | कैलास डेकोरेटर, नगर | १६५५० | ०९/१२/२०११ |
| ०८ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | १६६१६ | १०/१२/२०११ |

उपरोक्तपैकी बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर यांची निविदा उशिरा प्राप्त झाली आहे. वरीलपैकी विहीत मूदतीत प्राप्त झालेल्या निविदा दि.२२/१२/२०११ रोजी मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आल्या असून दि.२२/१२/२०११ रोजी मा.विश्वस्त श्री. अशोक भिमाशंकर खांबेकर तसेच मा. उपकार्यकारी अधिकारी यांचे समक्ष कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी त्यावेळी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव | कामाचा तपशिल / परिमाण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अ) नाताळ सुट्टी निमीत्ताने (दि. २५.१२.२०११ ते दि. ०२.०१.२०१२ अखेर ०९ दिवस ) | | | ब) शिर्डी महोत्सव करीता (दि.३१/१२/२०११ ते दि.०१/०१/२०१२ अखेर ०२ दिवस) | |
| | | ०१. शामियाना मंडप एकुण ६०३५०चौ. फुट | ०२. पार्टीशन व कनात व्यवस्था ११०० र. फुट. | ०३. बॅरेकेटींग व्यवस्था. एकुण १००० रनिंग फुट | ०१. नगर मनमाड रोड व स्वागत कक्षाजवळ बॉक्स टाईप स्वागत कमान उभारणे एकुण नग ०३ | ०२.स्टेज व्यवस्था ६०० चौ. फुट चार दिवसाकरीता |
| | | प्र. दि. प्र. चौ. फुट | प्र. दि. प्र. र. फुट | प्र. दि. प्र. र. फुट | प्र. दि. प्र. नग | चार दिवस |
| | | ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| ०१ | **साईकृपा टेन्ट हाऊस , बेलापूर** | | | | | |
| | कोटेशन मधील दर | १.९० | १५.०० | १८.०० | - | - |
| | चर्चा अंती देऊ केलेले दर | १.०० | **४.००** | १२.०० | - | - |
| ०२ | **रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर** | | | | | |
| | कोटेशन मधील दर | २.५० | १५.०० | २०.०० | २०००.०० | ६००००.०० |
| | चर्चा अंती देऊ केलेले दर | १.५० | ७.०० | ८.०० | **१३३३.३३** | **४५०००.००** |
| ०३ | **बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, मनमाड** | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कोटेशन मधील दर | २.०० | १०.०० | - | - | - |
| | चर्चा अंती देऊ केलेले दर | १.६० | १०.०० | - | - | - |
| ०४ | **झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी** | | | | | |
| | कोटेशन मधील दर | १.८८ | १३.०० | १८.०० | २६००.०० | - |
| | चर्चा अंती देऊ केलेले दर | १.३९ | ६.०० | १४.०० | २४००.०० | - |
| ०५ | **लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर** | | | | | |
| | कोटेशन मधील दर | २.०० | १०.०० | २०.०० | २५००.०० | ७२०००.०० |
| | चर्चा अंती देऊ केलेले दर | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०६ | **कल्याणी टेन्ट हाऊस, नांदूर** | | | | | |
| | कोटेशन मधील दर | २.०० | २०.०० | २०.०० | - | - |
| | चर्चा अंती देऊ केलेले दर | १.०० | १०.०० | २०.०० | - | - |
| ०७ | **कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर** | | | | | |
| | कोटेशन मधील दर | ०.७५ | ५.०० | ६.०० | ३५००.०० | १४००००.० |
| | चर्चा अंती देऊ केलेले दर | **०.६५** | ५.०० | **५.५०** | ३५००.०० | १४००००.०० |

उपरोक्त ठेकेदारांनी चर्चा तथा वाटाघाटी अंती देऊ केलेले दरामध्ये मे. कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे मंडप उभारणी तसेच बॅरेगेटींगचे, साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापुर यांच कनात व पार्टीशनचे तसेच रोशनी मंडप, संक्रापुर यांचे स्वागतकमान व स्टेज व्यवस्था इत्यादी अनुषंगीक व्यवस्थेचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यानुसार त्यांना कार्यादेश देऊन त्यांचेकडून सदरचे काम करुन घेण्यात आलेले आहे. प्रत्यक्ष झालेल्या मोजमापांनुसार उपरोक्त मंडप ठेकेदार यांची बिले अदा करणेची कार्यवाही करणेत येत आहे. याकामी एकूण रु.४,८१,६०७/- मात्र इतका खर्च झालेला आहे. तरी याप्रमाणे झालेल्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे नाताळ सुट्टीचे व नववर्षा निमित्ताने होणारे गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी शामियाना मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी झालेल्या एकूण रु.४,८१,६०७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.७६** **शिर्डी नागरी विकास प्राधिकरणाचे कार्यालयासाठी संस्थानचे शांतीनिकेतन इमारतीत जागा उपलब्ध करुन देणे बाबत**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.टीपीस-१६०८/१९८१/प्र.क्र.१०९/ ०९ नवी-९ दिनांक १९/०४/२०११ नुसार शासनाने शिर्डी नागरी विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४० (१) नुसार सुधारीत शासन निर्णयान्वये मंजूरी दिली आहे. याबाबत नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे दि.०३/०८/२०११ रोजी मा. नामदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री, कृषी व पणन यांचे अध्यक्षतेखाली व श्री.टी.सी. बेंजामीन, प्रधान सचिव यांचे उपस्थितीत शिर्डी नागरी विकास प्राधिकरणाची प्रथम बैठक झाली. सदर बैठकीत प्राधिकरणाचे कार्यालयासाठी जागेची उपलब्धता करुन घेणेबाबत चर्चा होऊन निणर्य क्र.०१ अन्वये असे ठरले की, श्री साईबाबा संस्थानने प्राधिकरणाचे कामकाजासाठी सध्या अंदाजे २५०० चौ.फुट जागा उपलब्ध करुन द्यावी याबाबत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर व कार्यकारी अधिकारी यांनी संयुक्तपणे पुढील आठवड्यात जागा पाहून निर्णय घ्यावा असे ठरले आहे.

याबाबत शिर्डी पिंपळवाडी रस्त्यावर संस्थान मालकीची शांतीनिकेतन इमारत (G+३) असून सदर इमारतीमध्ये १५ निवासी खोल्या आहेत. या खोल्या साईभक्तांना तात्पुरत्या निवासाकरीता देण्यात येतात. शिर्डी नागरी विकास प्राधिकरणाचे काम पूर्ण क्षमतेने सुरु होईपर्यंत सध्या या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील पूर्ण भाग (१५४३ चौ.फुट) व दुसऱ्या मजल्यावरील उत्तर बाजुकडील अर्धा भाग (७१३.१२ चौ.फट) म्हणजेच एकूण २२५६.१२ चौ.फुट जागा शिर्डी नागरी विकास प्राधिकरणाचे कार्यालयासाठी अकरा महिन्यांचे कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देणेबाबत विचार करता येईल. तथापी अकरा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी भाडेपट्टयाने द्यावयाचे झाल्यास त्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ चे कलम १७(३) अन्वये राज्य शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

**निर्णय क्र.७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे शांतीनिकेतन इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील पूर्ण भाग (१५४३ चौ.फुट) व दुसऱ्या मजल्यावरील उत्तर बाजुकडील अर्धा भाग (७१३.१२ चौ. फुट) म्हणजेच एकूण २२५६.१२ चौ.फुट जागा शिर्डी नागरी विकास प्राधिकरणाचे कार्यालयासाठी अकरा महिन्यांचे कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.७७** **श्री साईनाथ कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, शिर्डी यांची मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गट नं.७४/१ ही जमीन संस्थानला घेणे व त्या बदल्यात गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यांना घरे बांधून देणेबाबतचा प्रस्ताव.**

**प्रस्ताव-** **(अ)** चेअरमन, श्री साईनाथ कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, शिर्डी यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०१० रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे अटी-शर्तीसह प्रस्ताव दिलेला होता, त्यामध्ये संस्थेची मौजे निमगांव कोऱ्हाळे, तालुका राहाता येथे संस्थेच्या मालकीची गट नंबर ७४/१ क्षेत्र ०१ हे ७८ आर जमीन आहे, सदरची जमीन सदर संस्था हस्तांतरीत करावयास तयार आहे. त्याबद्ल्यात, मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील संस्थान मालकीच्या गट नंबर १९५ मध्ये संस्थेच्या ६० सदस्यांकरीता स्वतंत्र बंगले प्रत्येकी ११०० स्क्वेअर फुट कारपेट एरियाचे सर्व सोयींनी युक्त असे संस्थान खर्चाने बांधून द्यावेत. तसेच याठिकाणी अंतर्गत रस्ते, कंपाऊाड, पार्किग, ओव्हरहेड पाण्याची टाकी, स्ट्रीट लाईट, सामुहिक वापराकरीता हॉल, संस्थानमार्फत पाणीपुरवठा, ड्रेनेज व्यवस्था आदि सुविधा असाव्यात, अशा अटी शर्ती नमुद केलेल्या आहेत.

गृहनिर्माण संस्थेने वर नमूद केलेल्या अटी-शर्तीच्या प्रस्तावास अनुसरुन, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १३ फेब्रुवारी, २०११ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक १२० नुसार, यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. श्री साईनाथ कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, शिर्डी यांना आवश्यक सर्व सोयी-सुविधायुक्त ६० बंगले बांधून देणेबाबत आर्किटेक्ट यांचेमार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घ्यावा असे ठरले.

तद्नंतर, इकडील कार्यालयाचे दिनांक ०७ एप्रिल, २०११ रोजीचे पत्राव्दारे, संस्थानमार्फत तसेच आपले संस्थेमार्फत प्रस्तावित करणेत आलेल्या विविध जमिनींची समक्ष पाहणी करुन, योग्य अशा जमिनीची निवड निश्चित करावी, असे ही कळविणेत आले होते.

त्यावर, विषयांकित गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन यांनी मा. अध्यक्षसाो. यांना अग्रेषित केलेल्या दिनांक ०९ जून, २०११ रोजीचे पत्राव्दारे, संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गट नंबर १८६ पैकी जागेत संस्थेच्या सभासदांसाठी एकुण ६० स्वतंत्र आर.सी.सी. बंगले सर्व सोयीयुक्त संस्थानतर्फे बांधून देण्यात यावेत, सर्व सभासदांचे स्वतंत्र संमतीपत्र (जागा हस्तांतर पत्र) देण्यास तयार आहोत, असे कळविले होते.

त्यास अनुसरुन, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ जुलै, २०११ रोजी सभेत, विषयांकित गृहनिर्माण संस्थेचा गट नंबर १८६ मध्ये बंगले बांधून देणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्रमांक ५३४ नुसार, प्रस्तावित जागेची मा. स्थानिक विश्वस्तांनी समक्ष पहाणी करुन अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा, असे ठरले.

**(ब)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ जुलै, २०११ रोजीचे सभेतील उपरोक्त निर्णयानुसार, मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य / विश्वस्त मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर, मा. श्री. अशोक भिमाशंकर खांबेकर, मा. श्री.पांडुरंग गमाजी अभंग व मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी मा. कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित केलेल्या दिनांक १५ ऑक्टोबर, २०११ रोजीचे पत्राने असे कळविले आहे की, सदरचे गट नंबर १८६ मध्ये हौसिंग सोसायटीस ६० बंगले बांधण्यासाठी गट नंबर १८६ निमगांव कोऱ्हाळे मधील जागा, जमीन देण्यास आमची हरकत नाही. त्याच्या बदल्यात हौसिंग सोसायटीची निमगांव कोऱ्हाळे गट नंबर ७४/१ पैकीची क्षेत्र ०१ हे ७८ आर अधिक खराब क्षेत्र अशी एकूण जमीन संस्थानला देण्याचे अटीवर (हस्तांतर) करण्याचे अटीवर देण्यास आमची संमती आहे, हरकत नाही. तशी नोंद मा.व्यवस्थापन मंडळाचे ठरावात घेण्यात यावी.

**(क)** मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील गट नंबर १८६ क्षेत्र ०१ हे २४ आर ही जमीन संस्थानला भूसंपादनाचे माध्यमातून मिळालेली आहे. यापूर्वी मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयानुसार, मे. अलोक इंडस्ट्रीज लि., मुंबई, मे. राजू वेगेसना फौंडेशन, विशाखापट्टणम्, मे. आयव्हीआरसीएल, हैद्राबाद व मे. साईग्रेस फौडेंशन, मुंबई_आदि संस्थांना काही अटी शर्तीस अधिन राहून अतिथीगृह उभारणेसाठी अंदाजे प्रत्येकी १० आर जमीन उपलब्ध करुन देणेबाबतचा निर्णय घेणेत आलेला आहे. त्यानुसार मे. अलोक इंडस्ट्रीज लि., मुंबई यांचेशी समझोता करारनामाही करणेत आलेला आहे, तथापि, सदरहू जमीन सध्या हरित पट्टयात असल्याने तेथे बांधकाम अनुज्ञेय नाही त्यामुळे मे. अलोक इंडस्ट्रिज, मुंबई यांना अद्याप बांधकाम परवानगी मिळालेली नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन, इतर संस्थांशी अद्याप पावेतो समझोता करारनामा करणेत आलेला नाही. या व्यतिरिक्त काही संस्थांचे प्रस्ताव स्थगित ठेवणेत आलेले आहेत. तसेच, संस्थानने मा. शासनाकडे मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील भूसंपादनाच्या माध्यमातून संस्थानला मिळालेल्या जमिनी रहिवास क्षेत्रात समाविष्ट करणेबाबत प्रस्ताव सादर केलेला असून, सदर प्रस्ताव मा. शासनाचे मान्यतेस्तव विचाराधीन आहे.

**(ड)** तरी, उपरोक्त परिच्छेदांतील विवेचनानुसार व मा. व्यवस्थापन समितीचे सदस्यांच्या अभिप्रायास अनुसरुन, श्री साईनाथ कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, शिर्डी ( निमगांव ) यांना त्यांचे गट नंबर ७४/१ मधील जमिनीचे बदल्यात, यापुर्वीचे टिपणीत नमुद केलेल्या सर्व त्रुटींची पूर्तता करुन घेऊन, तसेच याकामी मा. शासनाचे संबंधित विभागाची मान्यता घेऊन, संस्थान मालकीची मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील गट नंबर १८६ पैकी मधील जमिनीमध्ये घरकुले बांधून ते जमिनीसह हस्तांतरीत करण्यास तसेच पुर्वी ठरलेप्रमाणे वास्तुविशारद यांचेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घेणेस मान्यता मिळणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.७८** **श्री साईनाथ कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, शिर्डी यांची मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गट नं.७४/१ ही जमीन संस्थानला घेणे व त्या बदल्यात गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यांना मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १३ फेब्रुवारी, २०११ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक १२० अन्वये ठरलेनुसार मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील संस्थान मालकीच्या गट नंबर १९५ मध्ये घरे बांधून देणेबाबत मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांनी अंतिम निर्णय घ्यावा, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग )

---

**विषय नं.७८** **श्री साई समिती, नोएडा (रजिष्टर्ड) (उत्तर प्रदेश) यांची जागा संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेकरीता स्वीकारणे बाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री. आर. पी. चहडा, सचिव, श्री साई समिती, नोएडा (रजिष्टर्ड) (नोंदणीकृत कार्यालयः६४-डी /२, एफ ब्लॉक, सेक्टर ४०, नोएडा - २०१ ३०३, उत्तरप्रदेश) यांनी त्यांचेकडील जावक क्रमांक एसएस/३०१, दिनांक ०८ नोव्हेंबर, २०११ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे कळविले आहे :

.. आमचे संस्थेचे आश्रयदाते श्री. विजय आर. राघवन यांचे शिर्डी भेटीत चर्चा झालेप्रमाणे आमचे (संस्थेच्या) मंदिर इमारतीत श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे माहिती केंद्र सुरु करणेसाठी आम्ही कळवित आहोत.

आम्ही संस्थानचे माहिती केंद्रासाठी आमचे संस्थेच्या मंदिर इमारतीतील, स्वतंत्र प्रवेशव्दाराची सोय असलेल्या एका मजल्यावर संपूर्ण वातानुकूलित असलेली अंदाजे ५०० चौरस फुट जागा निश्चित केली आहे. सदरच्या जागेत (संस्थानचे) माहिती केंद्रासह संस्थान प्रकाशने विक्री करणेसाठी सोयीप्रमाणे जागा उपलब्ध होऊ शकते.

आमच्या संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे रविवार, दिनांक ०६ नोव्हेंबर, २०११ रोजी झालेल्या सभेत (बैठकीत) याबाबत सविस्तर चर्चा झाली आणि श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीला अंदाजे ५०० चौरस फुट जागा सहाय्यभूत सुविधांसह विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबतचा निर्णय घेणेत आला आहे.

तरी कृपया आमचे संस्थेने निश्चित केलेल्या जागेची पाहणी करुन स्वीकृती कळवून, याबाबत आमचे संस्थेने पुढील काय कार्यवाही करावी, याबाबत कळवावे, ही विनंती.

उपरोक्त पत्रासोबत, श्री साई समिती यांनी त्यांचे व्यवस्थापन समितीचे सभेत / बैठकीत घेण्यात आलेल्या ठरावाची प्रत जोडली असून, त्यामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :

श्री साई समिती नोएडा यांनी असे निश्चित केले आहे की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना माहिती केंद्र सुरु करणेसाठी संस्थेच्या मंदिर इमारतीतील, स्वतंत्र प्रवेशव्दाराची सोय असलेल्या एका मजल्यावर (Mezzanine चा शब्दशः अर्थ - दोन मोठया मजल्यांपैकी एका लहान मजल्यावर) संपूर्ण वातानुकूलित असलेली अंदाजे ५०० चौरस फुट जागा देणेत यावी. तसेच असेही निश्चित करणेत आले की, निवासी व इतर सहाय्यभूत सुविधा ही विनामुल्य उपलब्ध करुन देणेत यावी.

**(ब)** शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनासाठी देश-विदेशातून मोठया प्रमाणावर साईभक्त येत असतात. या भक्तांमध्ये दिल्ली, उत्तरप्रदेश, उत्तराखंड या पश्चिमोत्तर राज्यांतून येणाऱ्या भक्तांची संख्या बऱ्याच मोठया प्रमाणावर आहे. त्यामुळे दिल्लीचे जवळ असलेल्या नोएडा यासारख्या मोठया महानगरामध्ये संस्थानचे अधिकृत माहिती केंद्र असणे अत्यंत आवश्यक आहे. या माहिती केंद्रातून संस्थानच्या दैनंदिन पूजा-अर्चा, उत्सव, भक्तांच्या पुरविणेत येणाऱ्या सेवा-सुविधा, देणगी आदिबाबत माहिती तसेच संस्थान प्रकाशित श्री साईंचे जीवनावरील प्रकाशने विक्रीसाठी उपलब्ध करुन देता येतील. संस्थानने यापुर्वी याच धर्तीवर विविध राज्यात जसे, दिल्ली, सिकंदराबाद, चेन्नई, बंगलोर येथे माहिती केंद्र सुरु केलेले असून, अहमदाबाद येथे माहिती केंद्र सुरु करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

या सर्व बाबींचा विचार करता, नोएडा (उत्तरप्रदेश) येथे संस्थानचे माहिती केंद्र उभारणेबाबत श्री साई समिती यांनी प्रस्तावित व देऊ केलेली अंदाजे ५०० चौरस फुट जागा स्वीकारणेस हरकत नाही. श्री साई समिती यांनी पत्रात नमूद केलेल्या सर्व अटी / बाबी हा सर्वधारणपणे स्वरुपाच्या व स्वीकारार्ह आहेत.

तथापि, श्री साई समिती, नोएडा यांनी प्रस्तावित केलेली जागा नोएडाच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे किंवा कसे, तेथे पोहचण्यासाठी कोणत्या प्रकारची सुविधा उपलब्ध आहे, सदरचे ठिकाण मध्यवर्ती आहे किंवा कसे, सदरची जागा ते किती वर्ष उपलब्ध करुन देणार याबाबत काहीच माहिती सादर केलेली नाही. याव्यतिरिक्त, यापूर्वी सिकंदराबाद, चेन्नई, बंगलोर येथे माहिती केंद्र सुरु करणेसाठी संबंधित संस्थांनी दिलेल्या प्रस्तावाप्रमाणे भाडेपट्टा करारनामा नोंदविणेसाठी नाममात्र भाडे शुल्क आकारणी दाखविणे आवश्यक असल्याने याबाबत श्री साई समिती, नोएडा यांचेशी चर्चा करुन याबाबत ठरविता येईल. याकामी श्री साई समिती, नोएडा यांनी प्रस्तावित केलेल्या जागेची प्रत्यक्ष पहाणी करुन निर्णय घेता येईल, असे मत आहे.

**(क)** तरी वर नमुद केलप्रमाणे, नोएडा (उत्तरप्रदेश) येथे भक्तांच्या सोयी-सुविधेसाठी माहिती केंद्र सुरु करणेत यावे किंवा कसे, माहिती केंद्र सुरु करावयाचे ठरल्यास, श्री साई समिती, नोएडा यांनी नोएडा (उत्तरप्रदेश) येथील प्रस्तावित केलेली जागा स्वीकारणेपूर्वी जागेची प्रत्यक्ष पहाणी करुन, जागा उचित व योग्य असल्यास, ती उपलब्ध करुन घेणेकामी काय अटी शर्ती असाव्यात याबाबत सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई समिती, नोएडा (रजिष्टर्ड) (उत्तर प्रदेश) यांनी संस्थानला माहिती केंद्र सुरु करणेसाठी देऊ केलेल्या प्रस्तावित जागेची मा.विश्वस्तांनी पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा. जागा पसंती झाल्यास जागा उपलब्ध करुन घेणेबाबत काय अटी -शर्ती रहातील याबाबत संबधित संस्थेच्या प्रतिनिधीशी चर्चा करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.७९** **शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचा शिर्डी भुमिगत गटर योजनेचे काम पूर्णत्वाकडे जाण्यासाठी अतिरिक्त लागणाऱ्या खर्चाची रक्कम संस्थानकडून परतावा बोलीवर मिळणेबाबतचा प्रस्ताव.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दिनांक ०६ मे, २००६ रोजी पायाभूत सुविधा विकास योजनेअंतर्गत शिर्डी शहरासाठी भुयारी गटर योजना राबविणेकामी लोकवर्गणी भरणेसाठी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्ताव सादर केला होता. सदरच्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०६ जानेवारी, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २१ नुसार मान्यता देण्यात आली होती.

तद्नंतर, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक २१ ऑगष्ट, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार, केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहरांच्या पायाभूत सुविधांचा विकास योजनेअंतर्गत शिर्डी शहरासाठी भूमिगत गटार योजना राबविणेकरीता शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना लोकवर्गणी पोटी भरावयाच्या रक्कमेपैकी ९० टक्के रक्कम रुपये २,१८,३४,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी अठरा लाख चौतीस हजार मात्र) चा निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या विश्वस्त निधीतून खर्च करण्यास मान्यता देण्यात आली.

मा. व्यवस्थापन समितीचे व मा. शासनाचे मान्यतेनुसार, माहे मार्च, २०११ अखेर दोन टप्प्यात रक्कम रुपये २,१८,३४,०००/- मात्रचा निधी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस वर्ग करणेत आलेला आहे. सध्या भुमिगत गटर योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

**(ब)** आता, मा. अध्यक्षा व मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक नपं / कावि-५ / ८६१ / २०११, दिनांक २० ऑक्टोबर, २०११ व पत्र क्रमांक नपं / कावि-५ / ९०८ /२०११, दिनांक १६ नोव्हेंबर, २०११ रोजीचे पत्राने पुनःश्च नव्याने खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे :

**(०१)** शिडी नगरपंचायतीस UIDSSMT योजनेअंतर्गत केंद्र व राज्य शासन यांनी शिर्डी शहरातील भुयारी गटर योजनेचे प्रकल्पास व कामास मंजुरी दिलेली असून, सदर मंजूर प्रकल्पाची किंमत रुपये २४२५.६५ लक्ष आहे. सदर योजनेचा निधी नगरपंचायतीस खालीलप्रमाणे प्राप्त झालेला आहे :

**तक्ता क्रमांक ०१-**

| **अ. नं.** | **तपशील** | **मंजूर निधी (लक्ष रुपये)** | **कोणाकडून प्राप्त** | **प्राप्त निधी (लक्ष रुपये)** |
|---|---|---|---|---|
| ०१ | केंद्र शासन ८० टक्के | १९४०.८० | केंद्र शासन | १९४०.८० |
| ०२ | राज्य शासन १० टक्के | ०२४२.३० | राज्य शासन | ०२४२.३० |
| ०३ | नगरपंचायत १० टक्के | ०२४२.६० | नगरपंचायत | ००२४.२६ |
| | | | **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी** | **०२१८.३४** |
| | **एकूण -** | **२४२५.७०** | **एकूण -** | **२४२५.७०** |

**(०२)** भुयारी गटर योजनेचे काम पुर्ण करणेसाठी निविदा दरानुसार रुपये ३७९५.२४ लक्ष निधीची आवश्यकता आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

**तक्ता क्रमांक ०२-**

| अ. नं. | तपशील | अंदाजपत्रकीय रक्कम (लक्ष रुपये) | निविदा दरानुसार आवश्यक रक्कम (लक्ष रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | भूमीगत गटर पाईप लाईन टाकणे | १२३९.३९ | १९५८.२४ |
| ०२ | पंप हाऊस व रायझिंग मेन | ०२८७.०८ | ०६३१.५९ |
| ०३ | स्वेज् ट्रिटमेंट प्लॅन्ट | ०६१६.२० | १२०५.४१ |
| | **एकूण -** | **२१४२.६७** | **३७९५.२४** |

**(०३)** भुमिगत गटर योजना कामाचे पुर्णत्वासाठी शासनाकडून, नगरपंचायतीकडून तसेच संस्थानकडून एकूण रुपये २९२६.७० लक्ष मात्र रक्कम उपलब्ध झालेली असून, योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

**(०४)** भुमिगत गटर योजनेचे काम पुर्ण करणेसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डीस वाढीव निधी रुपये ०८६८.५४ लक्ष मात्र रक्कमेची आवश्यकता आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

**तक्ता क्रमांक ०३-**

| अ. नं. | योजना पुर्ण करणेसाठी लागणारी एकूण रक्कम (लक्ष रुपये) | आजपावेतो उपलब्ध झालेली रक्कम (लक्ष रु.) | वाढीव / उपलब्ध करावयाची रक्कम (लक्ष रुपये) |
|---|---|---|---|
| ०१ | ३७९५.२४ | २९२६.७० | **०८६८.५४** |

**(०५)** शिर्डी नगरपंचायत, शिर्डीने वर नमुद केलेली वाढीव रक्कम रुपये ८६८.५४ लक्ष मात्र उपलब्ध करुन घेणेच्या प्रयत्नाचा भाग म्हणून महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड, मुंबई यांचेकडेस रुपये ५००.०० लक्ष कर्ज मिळणेसाठी दिनांक १७ फेब्रुवारी, २०१० रोजी प्रस्ताव सादर केला होता. परंतु सदर कंपनीच्या अधिकाऱ्यांची मा. मुख्याधिकारी यांनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०११ रोजी समक्ष भेट घेऊन चर्चा केली असतां, सदर कंपनीकडे सन २०११-१२ मध्ये फक्त रुपये २५ कोटी मात्र निधी उपलब्ध होता व सदर निधी यापुर्वीच इतर संस्थांना वितरीत करणेत आला असल्याचे सांगणेत आले. त्यामुळे सदरचा निधी नगरपंचायतीस कर्जाऊ रुपाने उपलब्ध होऊ शकत नाही.

तसेच, सदर योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाकडून यापुर्वीच निधी प्राप्त झालेला असल्याने, त्यांचेकडून वाढीव निधी उपलब्ध होण्याची शक्यता दिसून येत नाही.

**(०६)** शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ रोजीचे सर्वसाधारण सभेत विषय क्रमांक ०९ (ब) नुसार शिर्डी भुमिगत गटर योजना राबविण्यासाठी काम पुर्णत्वाकडे जाण्यासाठी अतिरिक्त लागणाऱ्या खर्चाची रक्कम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडेस परतावा बोलीवर मागणी करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर ठराव क्रमांक १३४ (ब) नुसार निर्णय घेणेत आलेला आहे, त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे :

ठराव क्रमांक १३४ (ब) - चर्चेअंती असे ठरले की, शिर्डी शहराच्या भुमिगत गटर योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. सदर कामासाठी निविदा रक्कमेनुसार रुपये ३७९५.२४ लक्ष निधीची आवश्यकता असून, शासनाकडून व इतर स्त्रोताकडून नगरपंचायतीने आतापर्यन्त रुपये २९२६.७० लक्ष निधीची उपलब्धता केलेली आहे. योजनेचे काम पुर्ण करण्यासाठी निविदा रक्कमेनुसार अजून रुपये ८६८.५४ लक्ष निधीची आवश्यकता आहे. सदरचे काम करण्यासाठी एवढी रक्कम उभी करणे नगरपंचायतीस शक्य नसल्याने नगरपंचायतीने Maharashtra Urban Infrastructure Development Co. Ltd., Mumbai यांचेकडे रुपये ५०० लक्ष रकमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. कर्ज मिळण्याची शक्यता दिसून येत नाही. तसेच कर्ज घेतल्यास इतर कोणतेही काम करणे नगरपंचायतीस शक्य होणार नाही तरी भविष्यात कर्जाचे हप्ते भरणे इत्यादी बाबीवर जादा खर्च होईल. सदर योजना पुर्ण करणे आवश्यक असल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे बिनव्याजी परतावा बोलीवर कर्जाच्या रकमेची मागणी करणे आवश्यक झालेले आहे. तरी सदर बाबत भुयारी गटर योजनेचे काम पुर्णत्वाकडे जाण्यासाठी व नागरीकांना तसेच साईभक्तांना या योजनेचा फायदा होण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे परतावा बोलीवर बिनव्याजी रक्कम रुपये ८६८.५४ लक्ष मागणी करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दरवर्षी ठराविक रक्कम परत करण्यात यावी अथवा घरपट्टी अथवा विशेष स्वच्छता करापोटी रक्कम कपात करण्यात यावी. त्याबाबत जी बाब संस्थान व नगरपंचायत यांना सोईची असेल त्याप्रमाणे निर्णय घेण्यात यावा. तरी संस्थानकडे रुपये ८६८.५४ लक्ष निधी बिनव्याजी परतावा बोलीवर घेण्यासाठी मागणी करण्यास या ठरावान्वये सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे.

**(०७)** उपरोक्त ठरावानुसार, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना भुमिगत गटर योजना प्रकल्प पुर्ण करणेसाठी रुपये ८६८.५४ लक्ष निधी बिनव्याजी परतावा बोलीवर मिळणेस विनंती आहे.

**(क)** थोडक्यात, परिच्छेद अ मध्ये व नगरपंचायतीचे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे विषयांकित योजना शिर्डी शहरात राबविणेसाठी केंद्र व राज्य शासनाकडे भरावयाच्या लोकवर्गणीच्या रक्कमेपैकी ९० टक्के रक्कम म्हणजेच रुपये २१८.३४ लक्ष मात्र संस्थानने मा. शासन मान्यतेने निधी स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली असून, योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. आता, शिडी नगरपंचायत, शिर्डी यांना परिच्छेद ब मध्ये नमुद केलेप्रमाणे सध्या शिर्डी शहरात राबविणेत येत असलेल्या व काम प्रगतीपथावर असलेल्या अंतर्गत भूमिगत गटर योजना प्रकल्पाचे पूर्णत्वासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून रक्कम रुपये ८६८.५४ लक्ष ( पूर्णांकित रक्कम अक्षरी रुपये आठ कोटी अडुसष्ट लाख चोपन्न हजार मात्र) इतका निधी बिनव्याजी परतावा बोलीवर (कर्जाऊ स्वरुपात) उपलब्ध करुन हवा आहे. याबाबत विवेचन असे की,

**(०१)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग या शीर्षाखालील कलम २१ (२) (दोन) मध्ये राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करण्यासाठी असे नमुद केलेले आहे.

**(०२)** तसेच, माहे जून, २०११ मधील अध्यादेशानुसार व तद्नंतर कायद्यामध्ये रुपांतरीत झालेल्या अधिनियमातील तरतुदीनुसार, कलम २१ (क) मधील पोटकलम (१ ) मध्ये विश्वस्तव्यवस्थेस, राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल, असे नमुद करणेत आलेले आहे.

उपरोक्त तरतुदींनुसार, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना विषयांकित भूमिगत गटर योजना पूर्ण करणेसाठी आवश्यक असणारा वाढीव निधी अनुदान / सहायक अनुदान म्हणून मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने विहीत पध्दतीने मा. शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करुन उपलब्ध करुन देता येईल.

तथापि, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचे उपरोक्त प्रस्तावाने, भुमिगत गटर योजना पूर्ण करणेसाठी आवश्यक असणारा रुपये ८६८.५४ लक्ष इतका निधी बिनव्याजी परतावा बोलीवर (कर्जाऊ रुपाने) उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केलेली आहे. याबाबत विवेचन असे की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मध्ये, एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेस/ शासकीय महामंडळांना/ कंपन्यांना/ उपक्रमांना परताव्याचे बोलीवर व्याजाने अथवा बिनव्याजी कर्जाऊ रक्कम म्हणून उपलब्ध करुन देणेबाबत स्पष्टपणे निर्देश दिलेले नाहीत अथवा मार्गदर्शक तत्वे दिलेली नाहीत.

**(ड)** त्यामुळे, उपरोक्त परिच्छेदांमध्ये विशेषतः परिच्छेद क मधील विवेचनास अनुसरुन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना भुमिगत गटर योजना प्रकल्प पूर्ण करणेसाठी आवश्यक असणारी वाढीव खर्चाची/ निधीची रक्कम रुपये ८६८.५४ लक्ष मात्र बिनव्याजी परताव्याच्या बोलीवर (कर्जाऊ स्वरुपाने) उपलब्ध करुन देणेत यावी किंवा कसे, तसेच सदरची रक्कम कर्जाऊ रुपाने उपलब्ध करुन द्यावयाची ठरल्यास कोणत्या अटी शर्ती असाव्यात, त्याची कर्जाऊ रक्कमेची वसुली कशा पध्दतीने करणेत यावी, कर्जाऊ रक्कम वसुलीचा कालावधी किती असावा आदि अनुषंगिक बाबींवर निर्णय होणेकामी उपरोक्त प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.८०** **याबाबत शिर्डी नगरपंचायतीचे पदाधिकारी व मुख्याधिकारी यांचेशी चर्चा करुन परतावा कसा व कधी करणार याबाबत सविस्तर चर्चा करुन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.८०** **शिर्डी बस स्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारतीचे बांधकाम ठेकेदार पाटील कन्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. पुणे यांचे मुदतवाढ मागणी बाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथिल सर्व्हे क्र. १७१/२ मध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचे बसस्थानक व त्यावरील संस्थान वापरासाठींचे भक्तनिवास इमारतीचे संपूर्ण बांधकाम संस्थानचे निधीतून करण्यात येत आहे. त्याचा संक्षिप्त तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | :- | शिर्डी बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास संस्थान निधीतून विकसीत करणे. |
| ०२ | आर्किटेक्ट | :- | मे. काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | ठेकेदार | :- | मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे |
| ०४ | मंजूर निविदा रक्कम | :- | रु. ७,६०,९०,०८९/- |
| ०५ | कार्यादेश क्र. व दिनांक | :- | जा.क्र.६८२१/१०, दि.२९/०४/२०१० |
| ०६ | करारनाम्यानुसार काम सुरु करण्याचा दिनांक | :- | १४/०५/२०१० |
| ०७ | प्रत्यक्ष काम सुरु केलेलर दिनांक | :- | २६/०६/२०१० |
| ०८ | काम पूर्ण करण्याचा कालावधी | :- | १५ महिने |
| ०९ | करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याचा दिनांक | :- | १३/०८/२०११ |
| १० | कामाची सद्यस्थिती | :- | नियोजीत इमातरीचे मुळ ढाच्याचे / पायाचे एकूण ८० आर.सी.सी. कॉलम्स पैकी ६९ कॉलम पूर्ण केले असून त्यावरील तळमजल्याचे ८०% स्लॅबचे कॉंक्रीटींग पूर्ण केले आहे. पहिल्या मजल्याचे ३२ कॉलमचे कॉंक्रीटींग केले असून स्लॅब शटरींगला सुरुवात केली आहे. |

उपरोक्त ठेकेदार यांनी दि.२५/०८/२०११ चे पत्राव्दारे सदर बांधकाम पूर्ण करणेसाठी मूदतवाढ मिळणेची विनंती केली आहे. तसेच त्यानंतर दि.३०/०९/२०११ रोजीचे पत्राव्दारे दि.३१/०७/२०१२ अखेरपर्यंत मूदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे. सदर कामाचे आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांनी दि.०३/११/२०११ चे पत्राव्दारे याबाबत खालिलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"जुने बसस्थानकाचे जागेवरील काही भाग ताब्यात नसल्याने पूर्ण बांधकाम करण्यास ठेकेदार यांना अडचणी येत असल्याने त्यांचे मागणी प्रमाणे दि.३१/०७/२०१२ पर्यंत मूदतवाढ देणत यावी तसेच उपलब्ध भागातील कामाचा वेग वाढविणेबाबत समज देणेत यावी."

म.रा.मा.प. महामंडळ यांचेकडून अद्यापही बसस्थानक इमारतीतील बुक स्टॉल, कॅन्टीन, पान स्टॉल, रसवंती, फ्रुट ज्युस सेंटर, झुणका भाकर केंद्र, एस.टी.डी. बुथ आदी वाणिज्य आस्थापनां खालील जागेचा ताबा मिळालेला नसल्याने ११ कॉलम्स उभारणीचे काम करता आलेले नाही. त्यामुळे नियोजीत इमारतीचे तळमजल्यावरील ४३७ चौ.मी. क्षेत्रफळातील पायापासूनचे बांधकाम अद्याप सुरु करता आलेले नाही.

तरी वरील काम पूर्ण करणेसाठी ठेकेदार यांना दि.३१/०७/२०१२ अखेर मूदतवाढ मंजूर होणेस विनंती.

**निर्णय क्र.८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी बस स्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारतीचे बांधकामासाठी ठेकेदार पाटील कन्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. पुणे यांना दिनांक ३१.०७.२०१२ अखेर मुदतवाढ देण्यात यावी. मात्र दरवाढीची मागणी केल्यास ती अमान्य करण्यात यावी, असें ठरलें.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.८१** **श्रीं ना अर्पण केलेले नारळ विक्री करणे बाबत**

**प्रस्ताव-** व्दारकामाई, समाधीमंदिर बाहेरील काऊंटर,गुरुस्थान या ठिकाणी साईभक्त श्रीफळ अर्पण करतात. सदर नारळ आपण गोळा करुन नारळ स्टॉल या ठिकाणी साठवण करण्यात येते. गरजे प्रमाणे वापरतो.

मंदिर परिसरात सारंमजामे बागेत 'श्रींना 'अर्पण केलेले श्रीफळ एका खोलीत (काऊंटरला) जमा करण्यात येतात. साईभक्त या काऊंटरला नारळ जमा करतात. जमा झालेले नारळ बगीचा विभागातील कर्मचाऱ्यां मार्फत पोत्यात भरुन सदरची पोते नारळ जमा करण्याच्या काऊंटरच्या पाठीमागील स्टोअर मध्ये जमा करतात व तेथूनच प्रसादालयात बनविण्यात येणाऱ्या बर्फीसाठी व सत्यनारायण पुजेसाठी नारळ पोते देण्यात येतात.

दरमहा अंदाजे ४०० ते ५०० नारळ पोते जमा होतात संस्थानसाठी नारळांचा वापर होवुनही दरमहा १५० ते २०० नारळ पोते शिल्लक राहतात. उत्सवात व सुट्टीच्या कालावधीत जमा होणाऱ्या नारळ फळांचे प्रमाणे जास्त असते. नारळ फळे उन्हाळयात जास्त दिवस टिकत नसल्याने ते लवकर खराब होतात.

मा.व्यवस्थापन समितीचे दि. १३/०२/२०११. रोजीचे सभेतील निर्णय क्र .०९ अन्वये (दर रु.५.७५ प्रती फळ) या दराने श्री इम्तीयाज रफिक पठाण मु,पो.ता. कोपरगांव यांना १५/०२/२०११. ते दिनांक ३१/०३/२०१२. अखेर कालावधीसाठी नारळ विक्री करण्याचे टेंडर देण्यात आलेले होते. सदरच्या

टेंडरची मुदत माहे- मार्च २०१२ अखेर संपत आहे. करिता एप्रिल २०१२ ते मार्च २०१३ अखेर नारळ विक्रीसाठी निविदा मागविण्यास मान्यता मिळावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीं ना अर्पण केलेले नारळांची एप्रिल २०१२ ते मार्च २०१३ अखेर विक्री करणेसाठी निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.८२** **नववर्ष -२०१२ निमित्ताने मंदीर व मंदीर परिसरात केलेल्या फुलांचे सजावटीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.राजस जैन,पुणे.यांनी दि.०१/१२/२०१२. रोजी नववर्ष निमित्ताने समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान व श्री दत्त मंदिर या ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करुन देण्यास तयार आहे. यासाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे.

संस्थान, संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी , गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी म्हणुन सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

मकर संक्रात-२०११ या निमित्ताने साई फ्लोरिस्ट डेकोरेटेर्स,नवी मुंबई., श्री रामनवमी उत्सव -११ या निमित्ताने श्रीमती रिम्पल लोहीया , विश्वस्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी .,श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०११. या निमित्ताने के.सी. सुब्रामणी राजु ,बंगलोर यांनी ., श्रीमती. अंबिका व्ही नायर, मुंबई. यांनी , श्री पुण्यतिथी उत्सव -२०११., श्री राविंद्र तलवार,दिल्ली यांनी दिपावली -२०११ व श्री डंग, दिल्ली.यांना श्री दत्त जयंती निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरास फुलांची सजावट करणेस परवानगी देण्यात आलेली होती.मागील वर्षी श्री.राहुल तुपे.पुणे यांनी नववर्षीनिमित्त फुलांची सजावट केलेली होती.

श्री.राजस जैन, पुणे. यांना नववर्ष निमित्ताने दि.०१/०१/२०१२ रोजी फुलांची सजावट करण्यात आलेली आहे. तरी उपरोक्त प्रस्तावास कार्यात्तर मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.राजस जैन,पुणे.यांनी दि.०१/०१/२०१२ रोजी नववर्ष निमित्ताने समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान व श्री दत्त मंदिर या ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करुन दिली त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.८३** **सन २०११-१२ करिता विद्युत, पाणीपुरवठा, ध्वनीक्षेपण, आरोग्य व बगीचा विभागासाठी वार्षिक साहित्य खरेदीबाबत**

**निर्णय क्र.८४** **उपरोक्त विषयाबाबत वर निर्णय क्र. ०१ (०२) पारित होऊन निर्णय घेण्यात आलेला आहे**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.८४** **मे.कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड यांची हरबराडाळीची बयाना रक्कम परत करणे बाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक असणारा किराणा माल खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०.०४.२०११ मधील निर्णयानुसार मे.कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड यांना खालील प्रमाणे पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

| अ.नं. | मालाचा तपशिल | जात/ प्रकार | मागणी | सुट दर प्रती क्विंटल | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | हरबरा डाळ बिगर पॉलीश | B | ८००० क्विं. | ३,२००/- | २,५६,००,०००/- |
| ०२. | तुरदाळ लातुर फटका | A | १७०० क्विं. | ६,०५०/- | १,०२,८५,०००/- |
| | | | | **एकुण रक्कम रुपये** | **३,५८,८५,०००/-** |
| | | | | **५% सुरक्षा अनामत रक्कम** | **१७,९४,२५०/-** |

पुरवठा आदेशातील अट व शर्त क्र.७ नुसार माल पुरवठा करणेची हमी म्हणून एकुण रक्कमेच्या ५% रक्कम त्यांचे सुरक्षा अनामत खाती वर्ग करणेत आलेली आहे. अनामत रक्कम माल पुरवठा करार वर्ष संपल्यानंतर अथवा मालाचा पुरवठा पुर्ण झाल्यानंतर त्यांची सुरक्षा अनामत रक्कम परत करावी लागेल.

मे.कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड यांनी त्यांचे दि.२७.१०.२०११ रोजीचे पत्रान्वये हरबरादाळीचे टेंडर बद्दल संस्थानकडे जमा असलेले डिपॉझीट परत मिळणेबाबत विनंती केली आहे.

मे.कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड यांनी हरबरादाळीचा पुरवठा पुर्ण केलेला नाही. त्यांनी त्यांचेकडील दि.२४/०८/२०११ चे पत्रान्वये " चालू वर्षी हरबरा डाळीमध्ये खुपच भाव वाढ झालेली आहे. दर रु.४०/- प्रति किलो प्रमाणे झालेला आहे. त्यांचा सध्याचा पुरवठा आदेशातील दर प्रति किलो रु.३२/- असा आहे. तरी दरवाढ मिळवून देण्याची कृपा करुन प्रति किलो रु.४०/- मात्र प्रमाणे भाव द्यावा."अशी

विनंती केली होती. पुरवठा आदेशानुसार त्यांनी ८००० क्विंटल हरबरा डाळीपैकी २३४७ क्विटलचा पुरवठा केलेला आहे. माहे मार्च.२०१२ अखेर ५६५३ क्विंटल हरबरा डाळीचा पुरवठा करणे बाकी होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०८.२०११ रोजीचे सभेत सदरचा विषय चर्चेस ठेवला असता हरबरा डाळीचे बाजारभाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने उर्वरीत ५६५३ क्विंटल हरबरा डाळ खरेदीकामी संस्थानचे नियमित पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागवून हरबरा डाळ खरेदी करावी ,असे ठरले.

त्यानुसार ५६५३ क्विंटल हरबरादाळ खरेदीकामी अधिकृत वितरकांकडून त्यांचे लेडरहेडवर सिलबंद निविदा मागविणेकामी, निविदा सुचनेच्या जाहिरातीचा मसुदा मंजूर करुन दैनिक सकाळचे , पुणे - नाशिक आवृत्तीमध्ये दि.०८.०९.२०११ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२४.०९.२०११ अशी होती. मुदतीअंती प्राप्त निविदा दि.२४.०९.२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडून हरबरादाळ खरेदीबाबत निर्णय होऊन मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड यांचे दर व नमुना स्विकारुन त्यांना प्रति क्विंटल रु.४,७७५/- मात्र या दराने ५६५३ क्विंटल हरबरादाळ पुरविणेबाबत पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

मे.कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड यांचे पुरवठा आदेशातील अट क्र. १३ मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे. "मंजूर झालेल्या दराने व नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे संबंधीत पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाव वाढ दिली जाणार नाही/ मागता येणार नाही. आपण माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास आपली पुर्णतः/अंशतः सुरक्षा अनामत रक्कम संस्थान जमा करणेत येईल. त्याबाबत संस्थान व्यवस्थापन निर्णय घेईल "

तरी उपरोक्त परिस्थितीमध्ये मे.कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड यांचे हरबरादाळीचे डिपॉझिट परत करावे अगर कसे? निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी आवश्यक असणारा किराणा माल न पुरविलेल्या किती पुरवठाधारकांचे डिपॉझिट जप्त केले याबाबत सविस्तर माहिती व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे सादर करावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.८५** **आरोग्य साहित्याचा पुरवठा न केल्याने अनामत रक्कम जमा करुन घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** मे. शिरोडे ॲण्ड सन्स,कोपरगांव यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि. १०.१०.२०१० चे सभेतील निर्णयाप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे आरोग्य विभागासाठी इकडील जा.नं.एसएसएस/खरेदी /आरोग्य /१०४१२ दि. १३/११/२०१० नुसार आदेशासोबत देण्यात आलेल्या परिशिष्टात अ.नं. १ ते ४ प्रकारचे साहित्य निम्नतम दराने पुरवठा करणेचा आदेश देणेत आलेला आहे.

आदेशासोबत देणेत आलेले परिशिष्ट अ.नं. १ ते ४ प्रकारचे साहित्य तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | साहित्य तपशील | मागणी | जमा | येणे |
|---|---|---|---|---|
| ०१ | हायड्रोक्लोरीक ॲसिड | २५०० लिटर | २५०० लिटर | --- |
| ०२ | क्लिनींग पावडर | ३००० किलो | ३००० किलो | --- |
| ०३ | खराटे | ३००० नग | ६५० नग | २३५० नग |
| ०४ | कुंचे | ३००० नग | ३००० नग | --- |

वरील आदेशात अट क्र. ३ मध्ये साहित्य पुरवठयाचा कालावधी दि. ०१ नोव्हेंबर २०१० ते ऑक्टोंबर २०११ या १२ महिन्यात टप्प्याटप्प्याने पुरविणेस आदेश देण्यात आलेला आहे. त्यांचेकडील साहित्यांचा पुरवठा अंतिम कालावधी ऑक्टोबर २०११ अखेर पूर्ण झाला आहे. त्यांनी आदेशीत अ.नं. ३- खराटे ३००० नगापैकी फक्त ६५० नगांचा पुरवठा १० महिन्यात केला आहे.अद्याप त्यांचेकडून खराटे २३५० नगांचा पुरवठा होणे बाकी आहे. त्यांनी आदेशातील अ.नं. ३ नुसार खराटे वगळता इतर साहित्यांचा आदेश पूर्ण केला आहे.

यापुर्वी त्यांना वेळोवेळी ३ स्मरण पत्रान्वये कळवूनही त्यांनी त्याची दखल घेतली नाही. त्यामुळे त्यांनी आदेशीत खराटेचा पुरवठा न केल्याने संस्थानचे आरोग्य विभागाचे दैनंदिन कामात गैरसोय निर्माण केली आहे. तसेच त्यांना इकडील जा.नं.एसएसएस/खरेदी /आरोग्य/३३९६ दि. ३०/०९/२०११ अन्वये साहित्यांचा पुरवठा न केल्यास आपली निविदा सोबतची बयाणा रक्कम संस्थान खाती जमा करण्यात येईल. असे कळविणेत आलेले होते. वरील सर्व पत्रांची दखल न घेता त्यांनी खराटे २३५० नगांचा पुरवठा केला नाही.

मे. शिरोडे ॲण्ड सन्स,कोपरगांव यांना देणेत आलेल्या आदेशात अट क्र.१० नुसार " मंजूर झालेल्या मान्य दराने व नमुन्याप्रमाणे साहित्यांचा पुरवठा करणे आपणावर बंधनकारक राहील. मान्य दराने कोणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. आपण साहित्य पुरवठा

करावयाचे नाकारल्यास अथवा साहित्य पुरवठा न केल्यास आपली पूर्णता:/अशंतः सुरक्षा अनामत रक्कम संस्थान जमा करणेत येईल. त्याबाबत संस्थान व्यवस्थापन निर्णय घेईल." याप्रमाणे तरतुद आहे.

मे. शिरोडे ॲण्ड सन्स,कोपरगांव यांची संस्थानकडे लेखाशाखा जमा पावती नंबर ८३१ दि.३१.०८.२०१० अन्वये रु. ५,०००/- व पावती नंबर ११३५ दि. ६,२७०/- अशी एकूण रक्कम रु. ११,२७०/- संस्थानकडे अनामत खाते जमा आहे.

मे. शिरोडे ॲण्ड सन्स,कोपरगांव यांनी त्यांचे दि. ०५.११.२०११ चे पत्रान्वये बाजारात संस्थानचे मागणीप्रमाणे पावसाळी वातावरणामुळे खराटे पुरवठा करु शकत नाही. त्यापोटी आपणाकडे जमा असणारी अनामत रक्कम परत मिळणेस विनंती, पत्राने कळविले आहे.

मे. शिरोडे ॲण्ड सन्स,कोपरगांव यांचेकडून खराटे २३५० नग येणे आहे त्याचे मंजूर दर रु. १५.६४ पैसे प्रमाणे रु. ३६,७५४/- होते आहे. आजचे बाजार भाव रु. २१.०० प्रति नग आहे. त्यामुळे खराटे २३५० नग बाजार भाव दर रु. २१/- प्रमाणे रु. ४९,३५०/- एवढी होते आहे.दोहोतील फरक रु. १२,५९६/- आहे. त्यांची अनामत रु. ११,२७०/- संस्थान खाते जमा करुन घेतलेस रु. १,३२६/- जादा रक्कम आदा करावी लागणार आहे.

मे. शिरोडे ॲण्ड सन्स,कोपरगांव यांची अनामत खाते जमा असलेली रक्कम रु. ११,२७०/- एवढी रक्कम पूर्णता सुरक्षा अनामत रक्कम संस्थान जमा करावी लागेल, त्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आरोग्य साहित्याचा पुरवठा न केल्याने मे. शिरोडे ॲण्ड सन्स,कोपरगांव यांची अनामत खाते जमा असलेली रु. ११,२७०/- एवढी पूर्णता सुरक्षा अनामत रक्कम संस्थान जमा करुन, त्यांना काळया यादीत टाकण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.८६** **संस्थान प्रकाशित पुस्तकांचा साठा ठेवणेकामी पी.व्ही.सी. पॅलटस् खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रशासन शाखा जा.नं.एसएसएस/वशी-काअ/पीए/४०२४ दि.०९.१२.२०११ नुसार संमत अहवालात अ.नं.२० यात नमुद केले प्रमाणे भांडार मध्ये पुस्तकांचा साठा ठेवण्यासाठी पॅलेटस् तातडीने खरेदी करावेत असे आदेशीत केले आहे. या आगोदर संस्थान प्रकाशित पुस्तके, फोटो इ. साठा ठेवणेकामी पीव्हीसी पॅलेटस् सन २००० मध्ये एकुण २० नग खरेदी करण्यात आलेले आहेत. सदरचे २० नग पीव्हीसी पॅलेटस् कमी पडत असुन आणखी ८० नग पीव्हीसी पॅलेटस् संस्थान प्रकाशित पुस्तके ठेवणेकामी खरेदी करावे लागतील. सदरचे पीव्हीसी पॅलेटस् मे.आर.आर. भिंगारवाला अ.नगर येथुन खरेदी करण्यात आलेले आहेत.दि.१२.१२.२०११ रोजी मे.आर.आर. भिंगारवाला हे कार्यालयात प्रत्यक्ष आले असता पीव्हीसी पॅलेटस् प्रति नग रु.६०००/- अंदाजे खर्च येईल असे सांगितले. सदरचे खरेदी कामी अंदाजे रु.४,८०,०००/- खर्च येईल.

तरी संस्थान प्रकाशित पुस्तके,फोटो इ. साठा ठेवणेकामी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने दरपत्रके मागवुन ८० नग पीव्हीसी पॅलेटस् खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या एकुण रु.४,८०,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान प्रकाशित पुस्तके,फोटो इ. साठा ठेवणेकामी आवश्यक असणारे ८० नग पीव्हीसी पॅलेटस विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये.४,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग )

---

**विषय नं.८७** **नवीन प्रेसधारकांचे नांव निवडक प्रेसधारकांचे यादीत समाविष्ट करुन घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** मे.मनीपाल टेक्नालॉजी लिमिटेड,प्रेस कॉर्नर, मनीपाल (कर्नाटक) यांनी दि.१५.१०.२०११ चे पत्रान्वये संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो/श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका छपाई कामासाठी संस्थान अधिकृत निवडक प्रेसधारकांचे यादीत नाव समाविष्ट करुन घेणेविषयी विनंती पत्र दिले आहे.

पुस्तके/ फोटो/ श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका छपाईकामासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.०३.२००९ चे सभेतील निर्णय क्र.२५० नुसार २२ निवडक प्रेसधारक व मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१.०६.२००९ चे सभेतील निर्णय क्र.२८९ नुसार ०१ प्रेसधारक, तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७.०१.२०१० चे सभेतील निर्णय क्र.२३६ नुसार ३ प्रेसधारक, मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.०४.२०१० चे सभेतील निर्णय क्र.४०५ नुसार २, मा. व्यवस्थापन समितीचे दि.१२.०६.२०११ चे सभेतील निर्णय क्र.४२६ नुसार २ प्रेसधारक असे एकूण ३० अधिकृत प्रेसधारकांची यादी करण्यात येऊन त्यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येतात निम्नतम दर असणा-या प्रेसधारकांना छपाई कामाचे आदेश देऊन काम करुन घेण्यात येत आहे.

मे.मनीपाल टेक्नालॉजी लिमिटेड,प्रेस कॉर्नर, मनीपाल (कर्नाटक) या प्रेसधारकाची वार्षिक उलाढाल ही २ कोटीच्या वर असून, मा.व्यवस्थापन समितीने ठरवून दिलेल्या निकषानुसार निवडक यादीत घेणेस ते पात्र आहेत.

सबब उक्त प्रेसधारकाचा संस्थान निवडक प्रेसधारकांच्या यादीत समाविष्ट करणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.मनीपाल टेक्नालॉजी लिमिटेड,प्रेस कॉर्नर,मनीपाल (कर्नाटक) यांचे नावं संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो/श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका छपाई कामासाठी संस्थान अधिकृत निवडक प्रेसधारकांचे यादीत समाविष्ट करुन घेणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.८८** **कै.दासगणूकृत अर्वाचिन भक्त आणि संतलिलामृत (चार अध्याय) या पुस्तीकेचा गुजराथी भाषेत अनुवाद करणेस अनुमती देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री राकेश पटेल, सुरत यांनी दि.०६.१०.२०११ चे पत्रान्वये, संस्थान प्रकाशित कै.दासगणूकृत अर्वाचीन भक्त आणि संतलीलामृत (चार-अध्याय) मराठी या पुस्तीकेचा गुजराथी भाषेत अनुवाद करणेस अनुमती मागीतली असून, सदर पुस्तीका श्री साईबाबा संस्थान ट्रस्टचे नावाने प्रकाशित करणेत यावी अशी इच्छा त्यांनी प्रदर्शित केली आहे. पुस्तीकांची छपाई करुन सदर पुस्तीकेच्या १००० प्रती ते देणगीदाखल देणार आहेत. त्यापुढील छपाईचे सर्वाधिकार (Copy Right) ते संस्थानला प्रदान करणार आहेत.

सदर मराठी पुस्तीकेचा इतर कोणत्याही भाषेत अनुवाद झालेला नाही. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम २००४ कलम नं.१७ ठ नुसार, "श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व शिकवण याबाबतचा उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील " अशी तरतुद आहे.

त्यानुसार गुजराथी भाषेत अनुवाद करणेस अनुमती देता येईल, गुजराथी भाषिक भावीकांना त्याचा लाभ होईल.

**निर्णय क्र.८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री राकेश पटेल, सुरत यांना कै.दासगणूकृत अर्वाचिन भक्त आणि संतलिलामृत (चार अध्याय) या पुस्तीकेचा गुजराथी भाषेत अनुवाद करणेस परवानगी देण्यात यावी, मात्र सदरचा अनुवाद त्यांची पुणे विद्यापीठाकडून प्रमाणीत करुन आणावा, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.८९** **श्री साईचरित्र इंग्रजी ग्रंथाचा फ्रेंच भाषेत अनुवाद करणेस अनुमती मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री अंकन दत्त हे भारतीय असुन त्यांनी सन २००१ मध्ये प्रवरा इंजिनियरींग कॉलेज मध्ये अभियांत्रिकीची पदवी घेतली आहे. नंतर ते नोकरी निमित्ताने पॅरिस (फ्रान्स) येथे स्थायिक झाले आहेत.त्यांनी दि.१.११.२०११ चे पत्रान्वये श्रीसाईसत्चरित्र इंग्रजी पुस्तकाचा फ्रेंच भाषेत अनुवाद करणेस अनुमती मागितली आहे. त्यामुळे विदेशात श्री साईबाबांच्या तत्वज्ञानाचा, शिकवणीचा प्रचार प्रसार होणार आहे. सदर फ्रेंच भाषेत अनुवाद प्रकाशित झाल्यावर प्रगत तंत्रज्ञानाच्या साहयाने अनुवादीत पुस्तक स्मार्ट फोनवर अपलोड करणेत येईल. धावपळीच्या युगात लोकांना वाचनास वेळ मिळत नाही. विदेशात बहुतांश लोक लॅपटॉपचा वापर करतात. प्रवासात मोबाईलव्दारा अथवा लॅपटॉपव्दारा श्री साईचरित्राचे पठण करु शकतील असे त्यांनी पत्रात नमुद केले आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र १४ च्या कलम नं. १७ ठ मध्ये "श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य,त्यांच्या लीला व शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील" अशी तरतुद आहे. विदेशात श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार प्रसार होत असल्याने, मा. व्य.समितीचे मान्यतेने संस्थान प्रकाशनांच्या विहीत शर्ती /अटीस अधीन राहुन अनुमती देता येईल असे नम्र मत आहे.

**निर्णय क्र.९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री अंकन दत्त यांना श्री साईचरित्र इंग्रजी ग्रंथाचा फ्रेंच भाषेत अनुवाद करणेस अनुमती देण्यात यावी, मात्र त्यांनी श्री साईचरित्र इंग्रजी ग्रंथाचा फ्रेंच भाषेत अनुवाद पुणे विद्यापीठाचे फ्रेंच प्राध्यापकाकडून प्रमाणित करुन घेण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.९०** **भक्तांनी देणगी दिल्यानंतर संस्थानमार्फत श्री साईबाबांचा पॉकेट साईज थ्रीडी फोटो भेट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.०९.२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६० नुसार भक्तांनी देणगी दिल्यानंतर त्यांना २.५" x ३.५" पॉकेट साईजचा, कृष्णधवल, दगडावर बसलेले श्री साईबाबा लॅमिनेट असलेला फोटो भेट म्हणून देण्यात यावा असा निर्णय पारीत झाला आहे.

तथापि किती रकमेची देणगी दिल्यानंतर फोटो भेट म्हणून देण्यात यावा, तसेच वस्तु स्वरुपात देणगी देणा-या भक्तांना व चेक,डी.डी., परकीय चलन ,क्रेडीट/डेबीट कार्डद्वारे देणगी देणा-या भक्तांनाही फोटो भेट देण्यात यावा किंवा कसे ? याबाबतचा कोणताही उल्लेख निर्णयात नाही. याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

लेखाशाखेचे पत्र क्र.३८४२ दि.२६.११.२०११ नुसार दैनंदिन एकूण रोख व इतर वस्तुंच्या दररोज सरासरी ५२५० देणगी पावत्या होतात. त्याचा विचार करता दररोज ५२५० फोटो भेट द्यावे लागतील. प्रती फोटो सरासरी रु.५/- प्रमाणे दररोज ५२५० फोटोसाठी रु.२६२५०/- खर्च अपेक्षीत आहे. कमीतकमी सहा महिन्यासाठी फोटोंची छपाई करुन घ्यावी लागेल. वार्षिक छपाईकामी अंदाजे रु.९५,८१,०००/- खर्च अपेक्षीत आहे.

सबब उक्त उल्लेख केलेप्रमाणे धोरणात्मक निर्णय होणेस व छपाईसाठी अपेक्षीत खर्चाचे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जे साईभक्त रोखीने अथवा वस्तूरुपाने रुपये ५,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त देणगी देतील अशा भक्तांनी देणगी दिल्यानंतर संस्थानमार्फत श्री साईबाबांचा पॉकेट साईज कृष्ण धवल,दगडावर बसलेले बाबा थ्रीडी फोटो विनामूल्य भेट देणेत यावा,असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.९१** **थ्री डी वॉल कॅलेंडर २०१२ ची खरेदी व विक्री किंमत कमी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२.०६.२०११ चे सभेतील निर्णय क्र.४३४ नुसार श्री साईबाबा थ्रीडी -वॉल कॅलेंडर २०१२आकार १९ x २९ चे २५००० नग, प्रती नग रु.२६१/- प्रमाणे एकूण रु.६५,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

मे.साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई यांना जा.क्र.१९९३ दि.१९.०७.२०११ अन्वये श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स २०१२ आकार १९ x २९ चे २५००० नग, प्रती नग रु २६१/- प्रमाणे छपाई करुन पुरवठा करणेबाबत कार्यादेश देणेत आलेला आहे. त्यानुसार दि.२०.१२.२०११ अखेर त्यांचेकडुन पुरवठा झालेले कॅलेंडर्स, विक्री व शिल्लक साठा यांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| | संख्या |
|---|---|
| एकुण जमा संख्याः- | १०२१२ |
| एकुण विक्री संख्याः- | २५८७ |
| एकुण शिल्लक संख्याः- | ७६२५ |

मे.साईग्रेस फाऊंडेशन,मुंबई यांनी दि.२०.१२.२०११ चे पत्रान्वये कळविले आहे की, असंख्य साईभक्तांना कॅलेंडर्स विकत घेता यावे म्हणुन उक्त कलेंडर्सची खरेदी किंमत रु २६१/- ऐवजी रु २४१ /- ठेवावी व विक्री किंमत २७०/- ऐवजी रु.२५०/- ठेवावी,त्यामुळे खरेदी व विक्री किंमत रु.२०/- ने कमी होईल.

मे.साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई यांना १०,२१२ कॅलेंडर्सची देयकांची रक्कम आतापावेतो आदा केली आहे. त्यातुन आजअखेर विक्री झालेले कॅलेंडर्सची संख्या वजा जाता शिल्लक साठा ७६२५ असलेल्या कॅलेंडर्सची x रु.२०/- प्रमाणे रक्कम रु.१,५२,५००/- मे.साईग्रेस फाऊंडेशन मुंबई यांचेकडुन वसुल करावी लागेल.

सबब श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स २०१२ साईज १९ x २९ चे खरेदी व विक्री किंमत रु २०/- ने कमी करुन, रु.२५०/- प्रमाणे विक्री करणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स २०१२ साईज १९"x २९" चे खरेदी व विक्री किंमत रु २०/- ने कमी करुन, रु.२५०/- प्रमाणे विक्री करणेस मान्यता देण्यात आली.**

**याच वेळेस मा.अध्यक्ष महोदय यांचे निर्देशानुसार दिनांक १२.०१.२०१२ पासूनच विक्री किंमत रुपये २५०/- करण्यात आली असून, दिनांक ११.०१.२०१२ अखेर १०,८३२ कॅलेडर्सचा पुरवठा झाल्याची माहिती सभेस देण्यात आली. मे. साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई यांना १०,८३२ कॅलेडर्सची रुपये २६१/- प्रमाणे रक्कम आदा करण्यात आल्याने दि. ११.०१.२०१२ अखेर शिल्लक ४,७१८ (शिरडी कार्यालय) + ६२ (मुंबई कार्यालय) अशी एकूण ४,७८० कॅलेंडर्सची रुपये २० प्रमाणे रक्कम मे.साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई यांचेकडून वसूल करण्यात यावी,असें ठरलें.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.९२** **श्री साई समर्थ सतचरित्र (अनुवादक श्रीमती झरीन) या पुस्तकाचा मल्याळम भाषेतील अनुवाद प्रकाशित करणेस संमती देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री शिरडी साईबाबा आश्रमक्षेत्र चॅरीटेबल ट्रस्ट मंगाट्टूकोणम (केरळ) यांनी त्यांचे दि.१४.०९.२०११ चे पत्रान्वये श्री साई समर्थ सतचरित्र इंग्रजी (अनुवादक श्रीमती झरीन) या संस्थान प्रकाशित (मुळ श्री साईसत चरित्र ग्रंथ मराठी पद्यात्मक ग्रंथ) पुस्तकाचा मल्याळम भाषेत केलेला अनुवाद प्रकाशित करण्यास संमती मिळणेबाबत विनंती केली आहे. सदर पुस्तकाचे प्रकाशन मा.अध्यक्ष महोदय, श्री ज.मु.ससाणे, यांचे हस्ते व्हावे अशीही त्यांनी इच्छा प्रदर्शित केली आहे.

सदर इंग्रजी पुस्तकाचा मल्याळम भाषेत केलेला अनुवाद योग्य असल्याबाबत अभिप्रायार्थ त्यांनी खाली प्रमाणे प्रमाणपत्र सादर केले आहेत.

१) प्रोफेसर, युनिर्व्हसिटी कॉलेज,तिरुवनंतपुरम
२) पोलिस डिपार्टमेंट,केरळराज्य,ऑफीशियल अनुवादक
३) ॲडव्होकेट,- पब्लीक नोटरी
४) जॉईन्ट सेक्रेटरी, कायदा सचिवालय, केरळ राज्य

सदर पुस्तकाची छपाई संदर्भीय ट्रस्ट करणार असून, श्री साईबाबांच्या जीवन व कार्याचा प्रचार/प्रसार व्हावा या उद्देशाने विक्री ना नफा ना तोटा या तत्वावर करणार असल्याचे कळविले आहे. पुस्तकाचे प्रकाशनाचे सर्वाधिकार (Copy Right) त्यांचे ट्रस्ट कडेच राहणार आहेत. तथापि मुळ इंग्रजी पुस्तकाचे सर्वाधिकार (Copy Right) संस्थानकडे असल्याने उक्त पुस्तकाचा अनुवाद करणेस व तो प्रकाशित करणेस त्यांनी अनुमती मागीतली आहे.

सबब मुळ इंग्रजी संस्थान प्रकाशित पुस्तकाचा मल्याळम अनुवाद प्रकाशित करणेत मान्यता देणेकामी सादर.

**निर्णय क्र.९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई समर्थ सतचरित्र (अनुवादक श्रीमती झरीन) या इंग्रजी पुस्तकाचा मल्याळम भाषेत अनुवाद करण्यास मान्यता आली, मात्र सदर अनुवाद पूणे विद्यापीठाचे मल्याळम भाषेतील प्राध्यापकाकडून प्रमाणित करुन त्याची प्रत संस्थान दप्तरी ठेवण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक-प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.९३** **श्री साई समर्थ सतचरित्र-इंग्रजी (अनुवादक श्रीमती झरीन) या पुस्तकाचे ओरिया भाषेत अनुवाद करणेस अनुमती देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री जयमेजय प्रधान, पब्लीशर्स सिसुकलम, भुवनेश्वर यांनी दि.१०.१०.२०११ चे इमेलनुसार संस्थान प्रकाशित श्री साई समर्थ सच्चरीत्र - इंग्रजी (अनुवादक श्रीमती झरीन) या (श्री साईसच्चरित - कै.दाभोळकर लिखीत -मराठी ग्रंथाचा) ओवी टू ओवी ओडीया भाषेत अनुवाद करणेस अनुमती मागीतली आहे.

सदर अनुवादाचे काम सिसुकलम या ओडीया पब्लीशर्स द्वारा श्री सोवकारदास फतेसिंग हे करणार आहेत. श्री फतेसिंग यांनी श्री साईंचे जीवनावर ओरीया भाषेत छोटी - मोठी पुस्तके लिहीली असून ते ओडीया भाषेचे चांगले जाणकार आहेत असे कळविले आहे. सदर पुस्तकाचे प्रकाशन तेच करणार आहेत. तसेच कॉपीराईटही त्यांचेकडेच राहील, ना नफा ना तोटा तत्वावर पुस्तकांची विक्री करणेत येईल असा पत्रात उल्लेख आहे.

श्री साईसमर्थ सच्चरित्र - इंग्रजी (अनुवादक - श्रीमती झरीन) या मुळ पुस्तकाचे कॉपीराईट संस्थानकडे असल्याने त्यांनाअनुमतीची आवश्यकता आहे.

श्री साई समर्थ सच्चरित्र- इंग्रजी (अनुवादक श्रीमती झरीन) या पुस्तकाचा आता पावेतो एकाही भाषेत अनुवाद प्रकाशित झालेला नाही.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम १७ ठ मध्ये च्श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्याच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील छ अशी तरतूद आहे.

त्यानुसार श्री साईसमर्थ सच्चरित्र-इंग्रजी (अनुवादक श्रीमती झरीन) पुस्तकाचे ओडीया भाषेत अनुवाद करणेस अनुमती देणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई समर्थ सतचरित्र-इंग्रजी (अनुवादक श्रीमती झरीन) या इंग्रजी पुस्तकाचा ओडीया भाषेत अनुवाद करण्यास मान्यता देण्यात आली, मात्र सदर अनुवाद पुणे विद्यापीठाचे ओडीया भाषेतील प्राध्यापकाकडून प्रमाणित करुन त्याची प्रत संस्थान दप्तरी ठेवण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.९४** **श्री साई सच्चरित मराठी ग्रंथाचे ओरिया भाषेतील भागवत नबखरी छंदातील अनुवाद प्रकाशित करणेस मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री वैकुंठनाथ महापात्रा, कटक, ओरीया यांनी दि.२२.११.२०११ चे पत्रान्वये श्री साईसच्चरित मराठी (कै.गोविंद रघुनाथ दाभोलकर लिखीत) ग्रंथाचे ओरीया भाषेतील भागवत नबखरी छंदात (नऊ शब्दांची ओवी) अनुवाद केला असून, सदर अनुवाद मुळग्रंथाचा ओवी टू ओवी असून त्यात काहीही बदल करणेत आलेला नाही असे त्यांनी नमूद केले आहे.

मुळ ग्रंथ श्री साईचरित्राचे प्रकाशनाचे सर्वाधिकार संस्थानकडे असल्याने त्याचा ओरीया भाषेत पद्यात्मक अनुवाद करुन तो प्रकाशित करणेस त्यांनी रितसर अनुमती मागितली आहे.

श्री साईबाबांचे शिकवणूकीचा व तत्वज्ञानाचा प्रचार-प्रसार ओरीया भाषेत होणार असल्याने प्रस्तावास मान्यता देणेस हरकत नाही.

सबब श्री वैकुंठनाथ महापात्रा, कटक, ओरीया यांना श्री साईसच्चरित - मराठी ग्रंथाचा भागवत नबखरी छंदात (पद्यात्मक) अनुवाद प्रकाशित करणेस अनुमती देणेसाठी मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री वैकुंठनाथ महापात्रा, कटक, ओरीया यांना श्री साईसच्चरित - मराठी ग्रंथाचा ओरिया भाषेतील भागवत नबखरी छंदातील अनुवाद प्रकाशित करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.९५** **श्री गोविंद महादेव दामले,पुणे यांनी जर्मन भाषेत अनुवादीत केलेले मराठी आरती व स्तवन मंजरी या पुस्तकाची संस्थानद्वारे छपाई करुन प्रकाशित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.गोविंद महादेव दामले, निवृत्त प्रोफेसर, जर्मन भाषा व परराष्ट्र भाषा विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ, पुणे यांनी त्यांचे दि.०५.०१.२०११ चे पत्रान्वये श्री साईनाथ सगुणोपासना (आरती ) व श्री साईनाथ स्तवन मंजिरी मराठी या पुस्तीकांचा जर्मन भाषेत अनुवाद करणेस व अनुवादीत पुस्तीका संस्थानने प्रकाशित करावी अशी विनंती त्यांचे दि.०५.०१.११ चे पत्रान्वये केली होती.

त्यांचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३.०२.२०११ चे सभेत मान्यतेसाठी ठेवला होता. त्यावर विचार होऊन, सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मधील च श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करीलछ या तरतुदीनुसार परराष्ट्रामध्येही श्री साईबाबांचे तत्वज्ञानाचा प्रचार-प्रसार व्हावा,जर्मन भाषिक साईभक्तांना श्री सगुणोपासना (आरती) व श्री साईनाथ स्तवन मंजिरी वाचता यावी या उद्देशाने सभेतील निर्णय क्र.१०६ नुसार सदर पुस्तीकांचा जर्मन भाषेत अनुवाद प्रकाशित करणेस मान्यता देणेत आली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार इकडील जा.नं.१५०६ दि.२४.०६.२०११ नुसार श्री दामले यांना सदर पुस्तीकांचा जर्मन भाषेत अनुवाद करणेस व केलेला अनुवाद, मुळ भाषेतील अर्थात कोणताही बदल न करता जर्मन भाषेत झालेला आहे अशा आशयाचे पुणे विद्यापीठाचे लेटरहेडवर प्रमाणित केलेले प्रमाणपत्र व अनुवादीत सी.डी. सादर करणेबाबत कळविले होते.

श्री दामले यांनी त्यांचे दि.२३.११.२०११ चे पत्रान्वये मागणीप्रमाणे दोन्ही पुस्तीकांचा जर्मन अनुवादीत सी.डी. व एक प्रिंट प्रत, तसेच पुणे विद्यापीठाचे प्रमाणपत्र सादर केले आहे.

श्री दामले यांनी सदर पुस्तीकांचा जर्मन भाषेत अनुवाद करतांना खालल प्रमाणे पद्धत वापरली आहे.

अ) श्री साईनाथ स्तवन मंजिरीः- पुस्तीकेचे दोन भाग केले आहेत

**पहिल्या भागात** - १) मुळ ओवीचा जर्मन भाषेत अनुवाद
२) अनुवादाचा जर्मन भाषेत अर्थ
३) अर्थामध्ये विशेष शब्द तारांकित केले आहेत
४) मुळ ओवीच्या अनुवादाचे २६ पाने आहेत

**दुस-या भागात** - १) तारांकित शब्दांचे जर्मन भाषेत विवरण दिले आहे.
त्याचे एकूण १० पाने आहेत.

पहिला व दुसरा भाग मिळून एकूण ३६ पाने होतील पॉकेट साईजमध्ये छपाई करता येईल.

ब) श्री साईनाथ सगुणोपासना - (आरती) १) मुळ ओवींचा जर्मन भाषेत अनुवाद
२) अनुवादाचा जर्मन भाषेत अर्थ
३) अर्थामध्ये विशेष शब्द तारांकित केले आहेत.
४) तारांकित शब्दांचे विवरण पुढे दिले आहे.
एकूण १५० पाने होतील पॉकेट साईजमध्ये छपाई करता येईल.

दोन्ही पुस्तीकांच्या प्रथम २५०० प्रती छपाई कराव्यात असे वाटते. विक्रीस प्रतिसाद मिळाल्यास पुढील आवृत्तीचे वेळी संख्या वाढविता येईल.

छपाईकामी खालीलप्रमाणे खर्च अपेखीत आहे.

अ) स्तवनमंजिरी - २५०० प्रती X १५/- प्रमाणे रु. ३७५००/- अंदाजे खर्च

ब) सगुणोपासना (आरती) २५०० प्रती X५० प्रमाणे रु १,२५,०००/- अंदाजे खर्च

----------------------------

एकूण खर्च रु. १,६२,५००/-

--------------------------------

अंदाजे एकूण रु.१,६२,५००/- खर्च अपेक्षीत आहे.

सबब श्री दामले यांनी जर्मन भाषेत अनुवादीत केलेले श्री स्तवनमंजिरी व सगुणोपासना आरती या मराठी पुस्तीकांची प्रत्येकी २५०० प्रती छपाई करणेस व छपाईकामी येणारे अंदाजे रु.१,६२,५००/- चे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गोविंद महादेव दामले,पुणे यांनी जर्मन भाषेत अनुवादीत केलेले मराठी आरती व स्तवन मंजरी या पुस्तकाची प्रत्येकी २५०० प्रती छपाई करणेस व छपाईकामी येणारे अंदाजे रु.१,६२,५००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.९६** **नविन साईआश्रम १ व २ येथे अंतर्गत दूरध्वनी सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी मशिनरी (EPBX) खरेदी करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानची अंतर्गत दूरध्वनी व्यवस्था गतीमान व अत्याधुनिक होणेसाठी Siemens Hipath ४३०० IP ही डिजीटल ईपीएबीएक्स यंत्रणा मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून माहे ऑगस्ट, २००४ मध्ये खरेदी करुन, कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. या अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेव्दारे (१) समाधी मंदिर परिसर (२) रुग्णालये, स्टॉफ क्वॉर्टर्स व धर्मशाळा परिसर (३) नविन भक्तनिवासस्थान ५०० रुम्स (४) नविन प्रसादालय या चार ठिकाणी दूरध्वनी एक्सचेंज बसविण्यात आलेले असून, ही चारही दूरध्वनी एक्सचेंज (EPBX) एकमेकांना ऑप्टिकल फायबर केबलव्दारे कार्यान्वित केलेले आहेत. या चारही दूरध्वनी यंत्रणेव्दारे एकुण सध्या ७०० अंतर्गत दूरध्वनी विविध विभागांना संदेशवहनासाठी देण्यात आलेले आहेत.

श्री साईभक्तांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संस्थानने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. या उपक्रमांतर्गत नुकतेच साई आश्रम १ (नविन भक्तनिवासस्थान ५०० रुम्स जवळ) व साई आश्रम २ (सेवाधाम, निमगांव शिवारजवळ) साईभक्तांना निवासासाठी सुरु करण्यात येत असून, या दोन्ही ठिकाणी विविध विभागांना अंतर्गत दूरध्वनी कनेक्शन संपर्कासाठी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

**अ) <u>साई आश्रम १ अंतर्गत दूरध्वनी व्यवस्था</u>-** साई आश्रम १ इमारतीमध्ये अंतर्गत दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन देणेसाठी या इमारतीचे स्वतंत्र कक्षामध्ये सिमेन्स किंवा इतर नामांकित कंपनीची अद्ययावत दूरध्वनी यंत्रणा ( EPBX ) बसवून, त्या EPBX पासून साई आश्रम १ मधील कार्यालये, प्रत्येक मजल्यावरील मदतनीस व विविध कार्यालयांत अंतर्गत दूरध्वनी द्यावे लागणार आहेत.

**ब) <u>साई आश्रम २ अंतर्गत दूरध्वनी व्यवस्था</u>-** साई आश्रम २ इमारतीमध्ये अंतर्गत दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन देणेसाठी या इमारतीचे स्वतंत्र कक्षामध्ये सिमेन्स किंवा इतर नामांकित कंपनीची अद्ययावत दूरध्वनी यंत्रणा (इ.पी.ए.बी.एक्स.) बसवून, त्या इ.पी.ए.बी.एक्स. पासून साई आश्रम २ मधील कार्यालये, प्रत्येक मजल्यावरील मदतनीस व विविध कार्यालयांत अंतर्गत दूरध्वनी द्यावे लागणार आहेत.

साई आश्रम १ व २ या ठिकाणी अंतर्गत दूरध्वनी कार्यान्वीत करण्यासाठी खालीलप्रमाणे दूरध्वनी यंत्रणेची, साहित्याची व दुरध्वनी संचाची आवश्यकता आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

**साई आश्रम १-**

| Sr.No. | Configuration | Quantity | Approx. Cost |
|---|---|---|---|
| 01 | Siemens / Reliance / Tata make EPBX System for internal Communication – 400 Extensions. Ready Distributed Access Point equipped with conference, MOH & Standard Features with support for Networking on Fiber & our Existing Siemens Hipath 4300 IP Telephone system.<br>a) 08 Trunk P & T Lines (Clip) – 1 No.<br>b) 24 Digital Extensions – 1 No.<br>c) 24 Analog Extensions (Clip) – 10 Nos.<br>d) Battery Back up for this site Sealed maintenance free (SMF) batteries. – 1No.<br>e) MDF (Crone type) 400 x 400 – 1 Nos. | Job | 14,00,000/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | f) Telephone Instrument – 400 Nos. | | |

**साई आश्रम - २**

| Sr.No. | Configuration | Quantity | Cost |
|---|---|---|---|
| 01 | Siemens / Reliance / Tata make EPBX System for internal Communication – 300 Extensions. Ready Distributed Access Point equipped with conference, MOH & Standard Features with support for Networking on Fiber & our Existing Siemens Hipath 4300 IP Telephone system.<br>a) 08 Trunk P & T Lines (Clip) – 1 No.<br>b) 24 Digital Extensions – 1 No.<br>c) 24 Analog Extensions (Clip) – 7 Nos.<br>d) Battery Back up for this site Sealed maintenance free (SMF) batteries. – 1No.<br>e) MDF (Crone type) 300 x 300 – 1 No.<br>f) Telephone Instrument – 300 Nos. | Job | 11,00,000/- |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे साई आश्रम १ व साई आश्रम २ इमारतीमध्ये अंतर्गत दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन देणेसाठी दोन्ही ठिकाणी दूरध्वनी यंत्रणा,दुरध्वनी संच व इतर साहित्य खरेदी करावे लागणार असून, यासाठी दोन्ही मिळून अंदाजे रुपये २५,००,०००/- चा खर्च अपेक्षित आहे. सदरील दूरध्वनी यंत्रणा, दुरध्वनी साहित्य व दुरध्वनी संच वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहीर निविदा मागवून खरेदी करता येईल.

प्रस्तावावर विचार विनिमय होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नविन साईआश्रम १ व २ येथे अंतर्गत दूरध्वनी सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी मशिनरी (EPBX) खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख/ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

---

**विषय नं.९७** **भक्तनिवास येथे स्वयंसेवी भोजन हॉलचे दरवाजांना कोलॅप्सीबल गेट बसविणेकामी आलेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** भक्तनिवासस्थान इमारतीमधील साईभक्तांचे सोईसाठी स्वयंसेवी प्रसादभोजन व्यवस्था चालू केलेली आहे. सदर ठिकाणी दररोज सुमारे ४००० ते ५००० पर्यंत भक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात. स्वयंसेवी प्रसादभोजन हॉलला एकुण ५ दरवाजे आहेत. पैकी १ दरवाजातून भक्तांना भोजनासाठी प्रवेश दिला जातो.उर्वरीत ४ दरवाजे लाकडी झडपाने बंद केलेले आहेत. सदर दरवाजे बंद असल्याने हॉलमध्ये नैसर्गिक प्रकाश व हवा येत नाही. अंधार दिसतो व नैसर्गिक हवा नसल्यामुळे भक्तांना त्रास होतो. भक्तनिवासस्थान स्वयंसेवी भोजन हॉलमध्ये नैसर्गिक हवा व प्रकाश येण्यासाठी सदर ४ दरवाजांना विद्युत विभागाकडून खालीलप्रमाणे कॉलेप्सीबल गेट तयार करुन बसविणे अत्यंत गरजेचे होते.

यापुर्वी श्री साईबाबा हॉस्पीटलकडील विविध ठिकाणी कोलॅप्सीबल गेट तयार करुन बसविण्याचे काम मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १३-०२-२०११ चे सभेतील विषय क्र.०३ निर्णय क्र.७६ अन्वये मे.सुपर फॅब्रिकेशन अॅण्ड फर्निचर, साकुरी-राहाता यांचेकडून करुन घेण्यात आले होते.

भक्तनिवासस्थान स्वयंसेवी भोजन हॉलचे दरवाजांना कोलॅप्सीबल गेट बसविणेचे काम तातडीचे असल्याने याबाबत मे.सुपर फॅब्रिकेशन अॅण्ड फर्निचर, साकुरी-राहाता यांना विचारणा केली असता त्यांनी लेखी पत्र दिले आहे. त्यानुसार पूर्वीच्या मंजूर दरात काम करुन घेणेस व याकामी येणारे रक्कम रुपये २९,६००/- इतक्या खर्चास दि.१७-०६-२०११ चे टिपणीनुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार मे.सुपर फॅब्रिकेशन अॅण्ड फर्निचर, साकुरी-राहाता यांना जा.क्र. एसएसएस / विद्युत / १५७० /२०११ दिनांक २७-०६-२०११अन्वये त्यांना रक्कम रुपये २९,६००/- इतक्या रकमेचा कार्यादेश देऊन कोलॅप्सीबल गेट बसविण्याचे काम करुन घेण्यात आलेले आहे. आता त्यांनी झालेल्या कामाचे रक्कम रुपये २९,६००/- मात्र खर्चाचे बील सादर केले आहे. बीलाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | भक्तनिवासस्थान स्वयंसेवी भोजन हॉलचे दरवाजांना कोलॅप्सीबल गेट बसविणे. | १६० स्क्वेअर फूट | रु. १८५/- (प्रति स्क्वेअर फूट) | रु. २९,६००/- |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. २९,६००/-** |

तरी भक्तनिवास येथील स्वयंसेवी भोजन हॉलचे दरवाज्यांना कोलॅप्सीबल गेट बसविणेकामी आलेल्या रुपये २९,६००/- चे खर्चास व बीलाची रक्कम मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता यांना आदा करण्यास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तनिवास येथील स्वयंसेवी भोजन हॉलचे दरवाज्यांना कोलॅप्सीबल गेट बसविणेकामी आलेल्या रुपये २९,६००/- चे खर्चास व बीलाची रक्कम मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता यांना आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.९८** **श्री साई प्रसादालय ५०० केव्हीए कमिन्स डिझेल इंजिन क्र.२५३२०२७१ मॉडेल केटीए-१९ जी ९ पॉवरींग स्टँण्डबाय डिझेल इंजिनचे मशिनचे रेडीएटर बदलणेसाठी येणारे खर्चाबाबत**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयाकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.चा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर करावयाच्या पर्यायी वीजपुरवठयासाठी दिनांक ०४-१०-२००७ रोजी ५०० के.व्ही.ए.क्षमतेचा स्टँडबाय डिझेल जनरेटरसेट बसविण्यात आलेला आहे. श्री साई प्रसादालयाकरीता असलेल्या ५०० केव्हीए डि.जी.सेट इंजिन क्र.२५३२०२७१ मॉडेल केटीए-१९ जी-९ हा जनसेट नेहमी लोडवर ओव्हर हिटींग होतो. याबाबत या जनसेटची उत्पादक कंपनी मे.कमिन्स सेल्स ॲण्ड सर्व्हिस, पुणे यांचे इंजिनिअरने शिर्डी येथे येऊन पाहणी केली असता सदर जनरेटरसेट हा ०४ वर्षापुर्वी बसविलेला आहे. कालांतरामुळे या जनसेट्च्या इंजिनचे रेडीएटर श्री साई प्रसादालयातील किचनमधील तेलकट वाफेमुळे चोकप झालेले असल्याने जनसेट गरम होतो. त्यामुळे इतर पार्टचेही टेम्परेचर वाढून मशिन लोडवर येत असल्याचे आढळले. त्यावर पुन्हा एकदा समक्ष पाहणी करुन ५०० केव्हीए जनसेटच्या रेडीएटर दुरुस्ती खर्चाचा अहवाल देण्याबाबत या जनसेटची उत्पादक कंपनी मे.कमिन्स सेल्स ॲण्ड सर्व्हिस, पुणे यांना कळविण्यात आले होते.

त्यानंतर मे.कमिन्स सेल्स ॲण्ड सर्व्हिस, पुणे यांचे श्री.सुरेश राव यांनी शिर्डी येथे येऊन जनसेटची समक्ष पाहणी केली. व या मशिनचा रेडीएटर बदलून बाय बॅक करुन त्याजागी रिमोट रेडीएटर (कॉईल कुलर) बसविण्याबाबत सुचविले आहे. या रिमोट रेडीएटरमुळे मशिनची कार्यक्षमता वाढून मशिन १० टक्के जादा लोड घेऊ शकेल. हा रिमोट रेडीएटर (कॉईल कुलर) जनसेटची उत्पादक कंपनी मे.कमिन्स सेल्स ॲण्ड सर्व्हिस, पुणे यांचेमार्फत मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक हे स्वतः सप्लाय करणार असून त्याचे इन्स्टालेशनचे काम मे.कमिन्स या जनसेट उत्पादक कंपनीचे अहमदनगर, नाशिक, जळगांव व औरंगाबाद जिल्ह्याकरीता तसेच संपूर्ण गोवा राज्याकरीता असलेले एकमेव मान्यताप्राप्त अधिकृत सेल्स ॲण्ड सर्व्हिस डिलर असलेले मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक हे करणार आहे. तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पार्टीचे नांव व गांव | कामाचा तपशील | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | कमिन्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस (इंडिया) लि., पुणे | रिमोट रेडीएटर (कॉईल कुलर) पुरविणे. | रु. ०७,४८,०५९.०० सर्व करासहित |
| | | लोडींग, अनलोडींग ॲण्ड ट्रान्सपोर्ट चार्जेस तसेच सुपरव्हिजन चार्जेस. | रु. ००,४०,०००.०० |
| ०२ | मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक | रिमोट रेडीएटर (कॉईल कुलर) इन्स्टालेशन करुन कार्यान्वित करणे. | रु. ०३,०४,५५४.०० सर्व करासहित |
| | | रक्कम :- | रु. १०,९२,६१३.०० |
| | | वजा जुने रेडीएटर बायबॅक करणे. | रु. ००,१५,०००.०० |
| | | एकुण रक्कम :- | रु. १०,७७,६१३.०० |

श्री साई प्रसादालयाकरीता असलेल्या ५०० केव्हीए डि.जी.सेट इंजिन क्र.२५३२०२७१ मॉडेल केटीए-१९ जी-९ या जनसेटच्या इंजिनसाठी जुना रेडीएटर बायबॅक करुन नविन कॉईल कुलर पुरविण्याचे कामासाठी या जनसेटची उत्पादक कंपनी मे.कमिन्स सेल्स ॲण्ड सर्व्हिस, पुणे यांनी पाठविलेल्या पत्रानुसार मे.कमिन्स यांचे महाराष्ट्राकरीता असलेले ऑथराईज्ड सेल्स ॲण्ड सर्व्हिस डिलर, मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक यांचे नांवे कार्यादेश देण्यासाठी तसेच येणा-या रक्कम रुपये १०,७७,६१३/- चे खर्चास मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय ५०० केव्हीए कमिन्स डिझेल इंजिन क्र.२५३२०२७१ मॉडेल केटीए-१९ जी ९ पॉवरींग स्टँण्डबाय डिझेल इंजिनचे मशिनचे रेडीएटर बदलणेसाठी औरंगाबाद,पुणे,मुंबई, नाशिक येथील मे.कमिन्स या कंपनीचे अधिकृत डिलरकडून कोटेशन्स मागविण्यात यावीत असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं ९९** **श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता बसविण्यात आलेल्या एल.टी. पॅनेल व ट्रॉन्सफॉर्मर/ सब स्टेशनच्या कामास कराव्या लागलेल्या आवश्यक कामाकरीता खर्चास मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** (०१) श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता पॅनेल खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०४-०७-२०१० रोजी झालेल्या सभेतील विषय क्र. २१ निर्णय क्र. ५४२ अन्वये मे. इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईज, मुंबई यांना जा. क्र. एसएसएस- विद्युत- ८८०६- २०१० दि. ०३-०८-२०१० अन्वये रु. ७४,००,०००/- इतक्या रकमेच्या कामाचा कार्यादेश देण्यात आलेला होता.

(०२) श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता ट्रान्सफॉर्मर - सबस्टेशन उभारणे कामी मा .व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४-०७-२०१० रोजी झालेल्या सभेतील विषय क्र. १९ निर्णय क्र. ५४० अन्वये मे. इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईज, मुंबई यांना जा. क्र .एसएसएस- विद्युत - ८८०३ - २०१० दिनांक ०३-०८-२०१० अन्वये रु.३९,३५,०००/- इतक्या रकमेच्या कामाचा कार्यादेश देण्यात आलेला होता.

मे.इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईज, मुंबई यांनी एल.टी. पॅनेल व ट्रान्सफॉर्मर- सबस्टेशन पुरविलेले आहे. यातील ट्रान्सफॉर्मर- सबस्टेशन व एल.टी. पॅनेल बसवून यशस्वीपणे कार्यान्वित झाले आहेत.

या एल. टी. पॅनेलमध्ये नविन बसविण्यात येणाऱ्या १०१० केव्हीए चा जनरेटरचा सप्लाय हा मुख्य आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा सप्लाय बंद झाल्यानंतर करावयाच्या पर्यायी व्यवस्थेसाठी नविन १०१० केव्हीए जनरेटरसेट बसविण्यात येत आहे. या जनसेट पासून पॅनेल रुमपर्यंत टाकाव्या लागणा-या केबलसाठी लागणा-या केबल ट्रेंचचा समावेश टेंडरमध्ये नसल्याने केबल ट्रेंचचे बांधकाम मे.इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईज,मुंबई यांच्याकडून करुन घेण्यात आलेले आहे. त्याकरिता रक्कम रु.१,०६,८९५/- इतका खर्च झालेला असून मे.इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईज,मुंबई यांनी दि.१९/१०/२०११ च्या पत्रानुसार बील सादर केलेले आहे.

त्याचप्रमाणे पॅनल रुममध्ये पॅनल ट्रेंचवर ठेवणेकरिता सपोर्टसाठी एम.एस. चॅनलचा वापर करुन पॅनल चॅनेलच्या आधारे ट्रेंचवरती ठेवण्यात आलेले आहे. सदरच्या एम.एस.चॅनलच्या कामाचा समावेश टेंडरमध्ये नसल्याने सदरचे काम मे.इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईज, मुंबई यांचेकडून करुन घेण्यात आलेले आहे.त्याकरिता रक्कम रु.१,०६,७४६/- इतका खर्च झालेला असून मे.इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईज, मुंबई यांनी दि.२६/०९/२०११च्या पत्रानुसार बील सादर केलेले आहे.वरील प्रमाणे करण्यात आलेल्या दोन्ही कामाची एकत्रित रक्कम रु.२,१३,६४१/- इतकी झालेली आहे. सदर कामाची पाहणी संस्थान कन्सल्टंट मे. डिझाईन इंजिनिअर्स,मुंबई यांनी समक्ष केली असून बील आदा करणेबाबत त्यांनी बीलावर अभिप्राय दिलेला आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता बसविण्यात आलेल्या एल.टी. पॅनेल व ट्रान्सफॉर्मर- सबस्टेशनकरिता कराव्या लागलेल्या आवश्यक कामाची रु.२,१३,६४१/-इतकी रक्कम मे.इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईज, मुंबई यांना आदा करणेसाठी व झालेल्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता बसविण्यात आलेल्या एल.टी. पॅनेल व ट्रान्सफॉर्मर- सबस्टेशनकरिता कराव्या लागलेल्या आवश्यक कामाची रु.२,१३,६४१/-इतकी रक्कम मे.इलेक्ट्रोमेक एन्टरप्राईज, मुंबई यांना आदा करणेस व झालेल्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०० शांतीनिकेतन इमारतीवरील जुनी सोलर वॉटर हिटींग सिस्टीम बायबॅक करुन त्याजागी नविन सोलर वॉटर हिटींग सिस्टीम बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** शांतिनिकेतन इमारत याठिकाणी साईभक्तांना गरम पाणी मिळावे, यासाठी ७५० लि.क्षमतेच्या एकुण ०२ नग सोलर वॉटर हिटींग सिस्टिम टेरेसवर बसविलेल्या आहे. सदरची सिस्टिम ही १५ वर्षापूर्वी जनरल संडास-बाथरुमवर बसविण्यात आलेली होती. त्यानंतर ९ वर्षापूर्वी ती तेथून काढून घेऊन शांतिनिकेतन इमारतीवर शिफ्ट करुन बसविण्यात आलेली आहे. परंतू आपल्या पाण्यामध्ये क्षाराचे प्रमाण जास्त असल्याने कलेक्टर पॅनलमधील टयूब चोकअप झालेल्या आहेत. (त्यामध्ये क्षार जमा झालेले आहेत.) त्या कारणामुळे पाणी गरम होण्यास अडथळा निर्माण होतो. पॅनल चोकअप झाल्याने सोलर सिस्टिमच्या कलेक्टरव्दारे पाण्याचे तापमानाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे सिस्टिमचा योग्य रिझल्ट मिळत नाही.

शांतिनिकेतन येथील साईभक्तांच्या वास्तव्यासाठी एकुण व्हीआयपी टाईपच्या १५ रुम वापरात आहेत. परंतू कलेक्टरमधील टयूब्ज चोकअप झालेल्या असल्याने पाणी कमी प्रमाणात गरम होऊन स्टोरेजचे प्रमाण कमी पडत आहे. त्यामुळे साईभक्तांना पुरेशा प्रमाणात गरम पाणी उपलब्ध होत नाही. यामुळे साईभक्त तक्रारी करतात. शिवाय रुमची पावती करतानाच भक्तांकडून गरम पाण्याचा सेवाआकार घेतलेला असतो. परंतू सदर सेवेचा लाभ पुर्णतः भक्तांना मिळत नाही. यामुळे भक्त सकाळी तक्रारी घेऊन प्रसंगी तीव्र शब्दात वादावादी करतात.

सोलर वॉटर हिटींग सिस्टिमचे प्लेट चोकअप होणे व स्टोअरेज टँक लिकेज होण्याचे प्रमाण वाढल्याने मे.जैन इरिगेशन सिस्टिम लि.,जळगांव यांनी सर्व प्लेटच्या ग्रिड नविन बसविणे, स्टोअरेज टँक

स्टॅण्डसह नविन बसविणे, प्लंबींग सिस्टिमचे सर्व्हिसिंग,प्लंबींग कामे, इत्यादी कामाच्या दुरुस्तीसाठी रु.३,००,०००/- इतका खर्च कळविलेला आहे. परंतु जुनी सिस्टिम रिपेअर करुन जास्त दिवस चालेल याची गॅरंटी नसल्याने त्याठिकाणी ही जुनी सिस्टिम बायबॅक करुन नविन सिस्टिम बसविणे योग्य ठरेल.

तरी शांतिनिकेतन इमारतीवरील जुनी सोलर वॉटर हिटींग सिस्टिम बायबॅक करुन त्याजागी १२५० लिटर क्षमतेच्या ०२ नग नविन सोलर वॉटर हिटींग सिस्टिम बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये ३,५०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतिनिकेतन इमारतीवरील जुनी सोलर वॉटर हिटींग सिस्टिम बायबॅक करुन त्याजागी १२५० लिटर क्षमतेच्या ०२ नग नविन सोलर वॉटर हिटींग सिस्टिम बसविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,५०,०००/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०१** **सोलर वॉटर हिटींग सिस्टीमचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे व्दारावती इमारत, श्री साईनाथ रुग्णालय, साईनगर+श्री साईबाबा हॉस्पीटल व साईनिवास अतिथीगृह याठिकाणी भक्तांना तसेच रुग्णांना पहाटेच्या वेळेस स्नानाची सोय व्हावी म्हणून सोलर वॉटर हिटींग सिस्टिम बसविण्यात आलेली आहे. या यंत्रणेमध्ये काचेचे रिफ्लेक्टर, पाण्याच्या स्टोअरेज टाक्या व पाण्याच्या जी.आय.पाईपलाईन यांचा समावेश असतो. या यंत्रणेमध्ये काही बिघाड झाल्यास तो त्वरीत दुरुस्त करुन घ्यावा लागतो. सोलर वॉटर हिटींग सिस्टिम यंत्रणा सतत कार्यान्वित राहण्यासाठी सर्व ठिकाणच्या सोलर वॉटर हिटींग सिस्टिमचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे गरजेचे आहे. कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये कलेक्टरची काच फुटली ती बदलणे, टाकी खराब झाली, टाकी लिक झाली तर ती बदलून नविन बसविणे, इतर लिकेज काढणे, व्हाल्व्ह मेन्टेनन्स करणे, दैनंदिन साफसफाई ठेवणे इत्यादि कामांचा समावेश राहील.

संस्थानचे विविध ठिकाणी बसविण्यात आलेल्या सोलर वॉटर हिटींग सिस्टिमचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | प्लॅन्ट कपॅसिटी | वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टची एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| १ | व्दारावती इमारत | ३२००० | रु. ७,००,०००/- |
| २ | साईनिवास अतिथीगृह | ५००० | |
| ३ | श्री साईबाबा हॉस्पीटल | १८००० | |
| ४ | श्री साईनाथ रुग्णालय | २०००० | |

श्री साईबाबा संस्थानचे व्दारावती इमारत, श्री साईनाथ रुग्णालय, साईनगर+श्री साईबाबा हॉस्पीटल व साईनिवास अतिथीगृह याठिकाणी भक्तांना तसेच रुग्णांना पहाटेच्या वेळेस स्नानाची सोय व्हावी म्हणून सोलर वॉटर हिटींग सिस्टिमचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी सोलर सिस्टिमचे प्रोव्हाईडर तसेच सप्लायर्स कडून टेंडर मागवावे लागणार असून कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टसाठी अंदाजे रक्कम रुपये ७,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे व्दारावती इमारत, श्री साईनाथ रुग्णालय, साईनगर,श्री साईबाबा हॉस्पीटल व साईनिवास अतिथीगृह याठिकाणी भक्तांना तसेच रुग्णांना स्नानाकरीता गरम पाण्याची सोय व्हावी म्हणून बसविण्यात आलेल्या सोलर वॉटर हिटींग सिस्टिमचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी सोलर सिस्टिमचे प्रोव्हाईडर तसेच सप्लायर्स कडून कोटेशन मागविण्यास तसेच सदरहू कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टसाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये ७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०२** **एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.,नाशिक, पाणी नमुने तपासणी कामी नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** पाणी पुरवठा विभागाकडिल कनकुरी साठवण तलाव येथून शुध्द केलेले पाणी पिण्यासाठी व इतर वापरासाठी संस्थान परीसरामध्ये विविध ठिकाणी वितरित केले जाते. सदरचे पाणी शुध्द होऊन ते पिण्यायोग्य आहे किंवा नाही याबाबत पाण्याच्या नमुन्यांची लॅबमध्ये तपासणी होणे आवश्यक असल्याने त्याची पाणी पुरवठा विभागाकडिल लॅबमध्ये अणुजीव व रासायनिक पध्दतीने तपासणी केली जाते. तसेच अहमदनगर येथील जिल्हा आरोग्य केंद्रात पाणी नमुने अणुजीव तपासणी करीता दर महिन्याला पाठविले जातात. याशिवाय एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची याकामी पाणी नमूने तपासणीसाठी (रासायनिक व अणुजीव) नेमणूक करण्यात आलेली होती व त्यांचेकडून पाणी नमुने तपासणीचा दरमहा

अहवाल मागविला जात आहे. व त्यांनी केलेल्या सुचना अमलात आणून पाणी शुध्दीकरणासाठी उपाय योजिले जातात.

एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक गेली ०९ वर्षे दरमहा पिण्याचे पाण्याचे नमुने तपासणी करुन देण्याचे काम करीत आहे. त्यांची वार्षिक पाणी नमुने तपासणीची मुदत दि.३१-१२-२०११ अखेर संपत आहे.

एनव्हायरो केअर लॅब नाशिक यांचे गेली ०९ वर्षाचे काम अगदी समाधानकारक असुन वेळोवेळी ते पाणी शुध्दीकरणाच्या कामाबाबत मार्गदर्शन करतात. पाणी नमूने तपासणी कामी त्यांचे पुन्हा नेमणूक करणे आवश्यक आहे. याकामी त्यांना प्रति शॅम्पल रुपये ९००/- मात्र दरमहा ०४ शॅम्पल + रुपये २००/- मात्र व्हीजीट चार्ज + १०.३० % सर्व्हीस टॅक्स द्यावा लागणार आहे.

तरी दिनांक ०१-०१-२०१२ ते दिनांक ३१-१२-२०१२ अखेर एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची पाणी तपासणी कामी नेमणूक करणेसाठी मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.१०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन,पाणी तपासणीकामी संस्थानची स्वतंत्र लॅब तयार करणेकामी सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा, दरम्यानचे काळात मे.एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांना दिनांक १/०१/२०१२पासून पूढे सहा महिने कालावधीसाठी पूर्वीचेच अटी शतीवर मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०३** **नविन स्टाफ क्वॉर्टर (साईचिंन ए-१,ए-२,बी-१,बी-,२बी,-३बी-४) वा साईसहवास १ व २ इमारतीचे टेरेसवरील सिंटेक्स टाक्या बदविलणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे नविन स्टाफ क्वॉर्टर (साईचिंतन A१,A२,B१,B२,B३,B४) व साईसहवास इमारत १,२ इमारतीच्या टेरेसवर सदर इमारतीसाठी पाणी पुरवठा करणेसाठी सिंटेक्स टाक्या बसविण्यात आलेल्या आहेत. सदरच्या सिंटेक्स टाक्या दहा ते बारा वर्षापासून वापरात असून सततच्या वापराने व उन्हाने त्या खराब झालेल्या आहेत. सदर इमारतींवर एकुण २००० लिटर्स क्षमतेच्या १२ नग व ३००० लिटर्स क्षमतेच्या ८ नग अशा एकुण २० नग टाक्या ठेवण्यात आलेल्या आहेत तसेच साईसहवास १ व २ इमारतीच्या टेरेसवर १००० लिटर्स क्षमतेच्या ८ टाक्या बसविण्यात आलेल्या आहेत.

साईचिंतन इमारतीचे टेरेसवर बसविण्यात आलेल्या सदरच्या टाक्या उन्हाने कडक झालेल्या आहेत तसेच ठिकठिकाणी लिकेज झालेल्या आहेत. टाक्यांचे झाकणे खराब झालेली आहेत. याकरीता सदरच्या टाक्या बदलविणे आवश्यक आहे.

साईसहवास इमारत १ व २ च्या टेरेसवर ठेवण्यात आलेल्या १००० लिटर्स क्षमतेच्या टाक्यांची क्षमता कमी पडत असल्याने वारंवार मोटार चालू करुन टाक्या भराव्या लागतात. तसेच यातील ब-याच टाक्यांची झाकणे खराब झालेली असून काही टाक्या जास्त दिवस उन्हात ठेवल्याने लिकेज होण्यास सुरवात झालेली आहे. याकरीता सदर ठिकाणी बसविण्यात आलेल्या १००० लिटर्स क्षमतेच्या टाक्या बदलून त्याऐवजी २००० लिटर्स क्षमतेच्या ठेवता येतील.

टाक्या खरेदी करणेसाठी दराबाबत चौकशी केली असता सध्या मार्केटमध्ये ४ लेअर फोम टॅंक उपलब्ध असून त्या हेवी आहेत. सदरच्या टाक्यांना फोम लेअर असल्यामुळे टाक्या उन्हात असुनही टाकीतील पाणी थंड राहते.

आपणास ३००० लिटर्स क्षमतेच्या २० नग व २००० लिटर्स क्षमतेच्या ८ नग टाक्या खरेदी करावयाच्य आहेत. याकरीता अंदाजे रु. ६,००,०००/- (अक्षरी सहा लाख) मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी उन्हाळा सिझन आल्याने टाक्या बदली करणे गरजेचे आहे. उपरोक्त प्रमाणे ३००० लिटर्स क्षमतेच्या २० नग व २००० लिटर्स क्षमतेच्या ८ नग टाक्या खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रुपये ६,००,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.१०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नविन स्टाफ क्वॉर्टर (साईचिंन ए-१, ए-२, बी-१, बी-२, बी-३, बी-४) व साईसहवास १ व २ इमारतीचे टेरेसवरील ३००० लिटर्स क्षमतेच्या २० नग व २००० लिटर्स क्षमतेच्या ८ नग नामांकित कंपनीच्या सिंटेक्स टाक्या कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रुपये ६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०४** **लिक्विड सोप, सेंटेड फिनेल बनविणेसाठी केमिकल खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे स्वच्छता विभाग, प्रसादालय विभाग, रुग्णालय विभाग यांना साफ-सफाई करणेसाठी लिक्विड सोप व सेंटेड फिनेलची मोठया प्रमाणावर गरज भासते. याकरीता या विभागांना लागणारे मटेरियल कनकुरी साठवण तलाव येथे तयार करण्यात येते. यासाठी लागणारे केमिकल्स (कच्चा माल) खरेदी करून त्यापासून लिक्विड सोप व सेंटेड फिनेल तयार करण्यात येत आहे. मागील वर्षी वरील विभागांना

सदरचे मटेरियल वर्षभर पुरविणेसाठी ते तयार करणेसाठी लागणारे केमिकल्स मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१-११-२०१० रोजीचे सभेत आयत्या वेळचा विषय नं.०७, निर्णय क्रं.९४२ अन्वये मान्यता घेवून खरेदी करण्यात आलेले होते.

मागील वर्षी खरेदी करण्यात आलेले विभागाकडील शिल्लक केमिकल वर्षभर पुरणार नाहीत. संस्थानचा वाढता व्याप लक्षात घेता पुन्हा लिक्विड सोप, सेंटेड फिनेल तयार करण्यासाठी केमिकल्स खरेदी करावे लागणार आहे.

सन २०११-२०१२ चे पाणी पुरवठा विभागाची प्लँबींग व इतर साहित्याचे यादीत सदर मटेरियलचा समावेश करण्यात आलेल्या नसल्याने दिनांक २५-११-२०११ चे टिपणीन्वये मान्यता घेवून सदर साहित्याचा समावेश सन २०११-१२ चे वार्षिक खरेदी यादीत करणेसाठी मान्यता घेण्यात आलेली होती. परंतू खरेदी विभागामार्फत उपरोक्त संदर्भान्वये सदर प्रस्तावास लेखाधिकारी यांची मान्यता घेवून खरेदीचा खर्च अंदाजे रु. २,९८,८०० मात्र असल्याने व्यवस्थापन मंडळाची मान्यता घेण्याचे सुचविण्यात आलेले आहे.

तरी संबंधीत विभागांना दैनंदिन वापराकरीता लिक्विड सोप पुरविणे गरजेचे असल्याने त्यासाठी सोबतच्या तक्त्याप्रमाणे केमिकल्स (कच्चा माल) तातडीने खरेदी करावा लागेल.

तरी लिक्विड सोप, सेंटेड फिनेल तयार करण्यासाठी आवश्यक केमिकल्स (कच्चा माल) खरेदी करण्यासाठी अंदाजे रु. २,९८,८००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त केमिकल्स खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने खरेदी करून मिळणेस तसेच त्यासाठी येणारे रु.२,९८,८००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.१०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागासाठी आवश्यक असणारे लिक्विड सोप, सेंटेड फिनेल बनविणेसाठी लागणारे केमिकल्स कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,९८,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख/अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.१०५** **शिर्डी (साईनगर) रेल्वे स्टेशनकरिता पाणी पुरवठा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. वरिष्ठ विभागीय अभियंता, मध्य रेल्वे, सोलापूर विभाग यांनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०११ व मा. वरिष्ठ सहाय्यक मंडल इंजिनिअर, मध्य रेल्वे विभाग, अहमदनगर यांनी दिनांक ०५ मार्च, २०११ रोजीचे पत्राने, संस्थानमार्फत शिर्डी (साईनगर) रेल्वे स्टेशनकरीता दररोज अंदाजे ५०,००० लिटर्स (पन्नास हजार) पाणीपुरवठा व्हावा तसेच या पाणीपुरवठासाठी टाकावी लागणारी जलवाहिनी व इतर अनुषंगिक खर्च रेल्वे विभागामार्फत करणेत येईल, अशी विनंती केली होती.

सदर विनंती प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १२ जून, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४१४ नुसार खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आला :

यावर सविस्तर चर्चा होऊन, मध्य रेल्वे, सोलापूर विभाग / अहमदनगर कार्यालय यांचेकडून साईनगर शिर्डी रेल्वे स्टेशन करीता दररोज अंदाजे ५०,००० लिटर्स पाण्याची मागणी करणेत आलेली आहे. तथापी संस्थानच्या पाणीपुरवठा तलावाची क्षमता व संस्थानला भविष्यात लागणारी पाण्याची गरज विचारात घेतां, तूर्त मध्य रेल्वे, साईनगर रेल्वे स्टेशन यांना त्यांनी मागणी केलेल्या मागणीच्या २० टक्के किंवा जास्तीत जास्त १०,००० लिटर्स पाणी पुरविण्यात यावे. सदर पाणीपुरवठा करीता टाकावी लागणारी उचित क्षमतेची जलवाहिनी, त्याची करावी लागणारी खोदाई आदि, पाणीमापन मीटर व इतर अनुषंगिक साहितयाचा तसेच करारनाम्याचा सर्व खर्च मध्य रेल्वेने करावा. तसेच मध्य रेल्वे यांचेकडून साईनगर शिर्डी रेल्वे स्टेशनला करण्यात येणारा पाणी पुरवठयाचे बिल शासकिय नियम व दराप्रमाणे वार्षिक पध्दतीने वसूल करणेत यावे आणि याकामी प्रथमतः ५ वर्षासाठी करारनामा करणेत यावा. पाच वर्षानंतर संस्थानकडे असणाऱ्या पाण्याची उपलब्धता व गरज लक्षात घेऊन करारनाम्याचे नुतनीकरण विहीत पध्दतीने मान्यता घेऊन करणेत यावे, असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार, पाणीपुरवठा विभागामार्फत दिनांक ०५ नोव्हेंबर, २०११ रोजीचे पत्राने मा. वरिष्ठ सहाय्यक मंडल इंजिनिअर, मध्य रेल्वे, अहमदनगर यांना मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, अटी शर्तीसह दररोज १०,००० लिटर्स पाणी पुरवठा करणेत येईल व याकामी यथायोग्य कार्यवाही करणेत यावी, असे कळविणेत आलेले आहे.

**(ब)** आता, मा. उपविभागीय इंजिनिअर, मध्य रेल्वे, अहमदनगर यांनी मा. कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित केलेल्या त्यांचेकडील क्रमांक डब्ल्यू-६/जनरल, दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे कळविले आहे :

संस्थानमार्फत शिर्डी रेल्वे स्टेशनकरीता दररोज कमीत कमी अंदाजे ५०,००० लिटर्स पाणीपुरवठा व्हावा म्हणून रेल्वे विभागामार्फत आपणांस विनंती करणेत आली होती, तथापि, आपलेमार्फत दररोज फक्त १०,००० लिटर्स पाणीपुरवठा करण्यात येईल असे कळविणेत आलेले आहे.

भविष्यात साईनगर शिर्डी रेल्वे स्टेशनव्दारे हजारो भक्त शिर्डी येथे भेट देणार आहेत, त्या निमित्ताने ये-जा करणाऱ्या रेल्वेची संख्याही वाढणार आहे. रेल्वे विभागास रेल्वे गाडयांना देखभालीकरीता पाणीपुरवठा करणेसाठी पाण्याची आवश्यकता आहे. भविष्यात रेल्वे विभागास दररोज अंदाजे ०२ लाख लिटर्सपेक्षा जास्त पाण्याची आवश्यकता भासणार आहे. आपले संस्थेमार्फत दररोज १०,००० लिटर्स पाणी पुरवठा करणेस मान्यता देण्यात आली आहे. तथापि, आपल्यामार्फत दररोज करण्यात येणारा १०,००० लिटर पाणीपुरवठा हे एका पूर्ण भरलेल्या पाण्याचे टँकर एवढा असल्याने, या पाणीपुरवठयासाठी टाकावी लागणारी जलवाहिनी, पाण्याची टाकी इत्यादी मोठा खर्च येणार असून तो आर्थिकदृष्टया व्यवहार्य ठरत नाही.

तरी कृपया आमच्या मागणीचा फेरविचार करुन, दररोज कमीत कमी अंदाजे ५०,००० लिटर्स पाणीपुरवठा मंजूर करावा, ही विनंती.

**(क)** उपरोक्त बाबींस अनुसरुन विवेचन असे की, सध्या संस्थान परिसरास कनकुरी - पिंपळवाडी - संस्थान या संयुक्त पाणीपुरवठा योजनेच्या कनकुरी हद्दीतील पाणी साठवण तलावातून पाणीपुरवठा करणेत येत आहे. सन १९९५ पासून सदरची पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत करणेत आली असून, सध्या या ठिकाणी असणाऱ्या ०३ साठवण तलावांची साठवण क्षमता ३३२ दशलक्ष लिटर्स आहे. सदर साठवण तलावासाठी जलसंपदा विभागामार्फत दर ४५ दिवसांनी (चारीव्दारे) पाणीपुरवठा केला जातो.

सध्या या साठवण तलावातून कनकुरी व पिंपळवाडी या गांवासह संस्थान परिसरातील मंदिरे, श्री साई प्रसादालय, भक्तनिवासस्थाने, रुग्णालये, शैक्षणिक संकुले यांसह कर्मचारी वसाहती, ०३ कर्मचारी हौसिंग सोसायटी, पोलिस स्टेशन, जिल्हा परिषद शाळा आदि ठिकाणी दररोज अंदाजे सरासरी ४० ते ४५ लाख लिटर्सचा पाणीपुरवठा केला जात आहे. या ठिकाणच्या पाणीपुरवठयाच्या मागणीत सातत्याने वाढच होत असून, कनकुरी व पिंपळवाडी या गांवाच्या पाणीपुरवठा मागणीतही वाढ झालेली आहे.

या पाणीपुरवठाव्यतिरिक्त संस्थानमार्फत श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, श्री साईनाथ रुग्णालय (जुना धर्मशाळा परिसर), श्री साईप्रसादालय आदि ठिकाणी कुपनलिका (बोअरवेल्स) खोदण्यात आलेल्या असून, त्यांच्यामार्फत पुरक पाणीपुरवठा करणेत येत आहे.

उपरोक्त परिसरांना कराव्या लागणाऱ्या शुध्द पाणीपुरवठयाठी सध्याचा कार्यान्वीत असणारा पाणी शुध्दीकरण प्रकल्प (फिल्टरेशन प्लॅन्ट) २४ तास चालवावा लागत असून, त्यासाठी करावे लागणारे पंपिग व विद्युतपुरवठा आदि इतर अनुषंगिक सुविधांव्दार मोठा ताण पडत आहे. तसेच पाण्याचे होणारे बाष्पीभवन, जमिनीत जिरणारे पाणी, पाणी शुध्दीकरणासाठी करावा लागणारा पाण्याचा उपसा व त्यात वाया जाणारे पाणी आदिंचा विचार करता, पाणी साठवण तलाव, कुपनलिका तसेच विहीरीमधून होणारा पाणीपुरवठा सध्या संस्थान परिसराला जेमतेम ३० ते ३५ दिवस पुरत आहे. त्यातच उन्हाळयात इतर पुरक साधनांची क्षमता घटत असल्याने, पाणीपुरवठा योजनेवर मोठा ताण येऊन पाणीपुरवठयात काटकसर करावी लागत आहे.

तसेच, सध्या संस्थानमार्फत साई आश्रम प्रकल्प भाग १ व २ हा निवासस्थान प्रकल्प अंतिम टप्प्यात असून, तो लवकरच भक्तांच्या निवासासाठी खुला करणेत येणार आहे, त्यामुळे त्यासाठी ही मोठया प्रमाणावर पाण्याची गरज लागणार आहे. याव्यतिरिक्त संस्थानमार्फत नेहमी, वेळोवेळी बांधकाम प्रकल्प सुरु असतात, त्यांनाही वेळप्रसंगी पाणीपुरवठा करावा लागत आहे.

या सर्व बाबींचा विचार करुनच, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १२ जून, २०११ रोजीचे सभेपुढे शिर्डी रेल्वे स्टेशनला करावयाच्या पाणीपुरवठयाविषयीचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यावर मा. व्यवस्थापन समितीने साधकबाधक चर्चा करुन, शिर्डी रेल्वे स्टेशनला तूर्त दररोज १०,००० लिटर्स पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतलेला होता आणि सदर निर्णयानुसारच, मध्य रेल्वे, अहमदनगर विभाग यांना कळविणेत आलेले होते.

**(ड)** आता पुनःश्च, वर परिच्छेद ब मध्ये नमुद केलेप्रमाणे मध्य रेल्वे, अहमदनगर विभाग यांनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ रोजीचे पत्राने, शिर्डी (साईनगर) रेल्वे स्टेशनसाठी दररोज कमीत कमी ५०,००० लिटर्स पाणीपुरवठा मंजूर करावा, म्हणून विनंती केलेली आहे. रेल्वे विभागाने त्यांचे पत्रात, नमुद केलेल्या बाबींचा विचार करता, सध्या शिर्डी रेल्वेस्टेशनवर ये-जा करणाऱ्या रेल्वे प्रवासी गाडयांची संख्या निश्चितच वाढलेली असून, प्रवासी संख्येत ही वाढ झालेली आहे, त्यामुळे त्यांनी केलेली मागणी भक्तांच्या सोयीच्या दृष्टीने उचित आहे.

उपरोक्त परिच्छेदांतील विवेचनाचा विचार करतां, सध्या संस्थानला होणारा पाणीपुरवठा अत्यंत अपुरा असून, पाणी वापरात सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत वाढीव पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत करणेसाठी कार्यवाही सुरु करणेत आलेली असून, याकामी मोठा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्या संस्थानची दैनंदिन

वापरासाठी लागणाऱ्या पाण्याची मोठी मागणी, मागणीच्या प्रमाणात होणारा सध्याचा पाणीपुरवठा व सध्या संस्थानकडे उपलब्ध असलेली पाण्याची साठवण क्षमता, सदरच्या साठवण तलावातील पाणी विशिष्ट दिवस / कालावधीसाठी पुरावे म्हणून करावे लागणारे काटेकोर नियोजन आदिं बाबींचा विचार करतां शिर्डी (साईनगर) रेल्वेस्टेशनला जादा पाणी वापरासाठी देणे शक्य होणार नाही, तथापि, मध्य रेल्वे विभाग, अहमदनगर / सोलापूर यांनी पुनःश्च दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ रोजी केलेल्या विनंती नुसार, शिर्डी (साईनगर) रेल्वेस्टेशनला दररोज ५०,००० लिटर्सचा पाणीपुरवठा उचित अटी शर्तीनुसार करणेत यावा किंवा कसे याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.१०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मध्य रेल्वे, सोलापूर विभाग / अहमदनगर कार्यालय यांचेकडून साईनगर शिर्डी रेल्वे स्टेशन करीता दररोज अंदाजे ५०,००० लिटर्स पाण्याची मागणी करणेत आलेली आहे. तथापी संस्थानच्या पाणीपुरवठा तलावाची क्षमता व संस्थानला भविष्यात लागणारी पाण्याची गरज विचारात घेतां, तूर्त मध्य रेल्वे, साईनगर रेल्वे स्टेशन यांना २०,००० लिटर्स पाणी पुरविण्यात यावे. सदर पाणीपुरवठा करीता टाकावी लागणारी उचित क्षमतेची जलवाहिनी, त्याची करावी लागणारी खोदाई, पाणीमापन मीटर व इतर अनुषंगिक साहित्याचा तसेच करारनाम्याचा सर्व खर्च मध्य रेल्वेने करावा. तसेच मध्य रेल्वे यांचेकडून साईनगर शिर्डी रेल्वे स्टेशनला करण्यात येणारे पाणी पुरवठयाचे बिल शासकिय नियम व दराप्रमाणे वार्षिक पध्दतीने वसूल करणेत यावे. याकामी प्रथमतः ५ वर्षासाठी करारनामा करणेत यावा. पाच वर्षानंतर संस्थानकडे असणाऱ्या पाण्याची उपलब्धता व गरज लक्षात घेऊन करारनाम्याचे नुतनीकरण विहीत पध्दतीने मान्यता घेऊन करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०६** **साईनिवास अतिथीगृह रुममधील टीव्हीसाठी सन- २०११ ते २०१२ पर्यंत टाटा स्काय डीशचे रिचार्ज फी पोटी भरलेल्या रकमेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई निवास अतिथी गृह येथिल २५ रूमसाठी टाटा स्काय डीश बसवून डीशचे कनेक्शन घेणे बाबद सन २००९मध्ये विषय ठेवला होता सदर विषयात डीश फिट करणे कामी रू.४४,९७५/- + माहे २१ जुलै,२००९ ते २० जुलै,२०१० अखेर प्रति महीना प्रति चायनलसाठी १२५/-रू. याप्रमाणे २५रूमसाठी १ वर्षाची फी ३७,५००/- असे एकुण ८२,४७५/-रू टाटा स्काय या कंपनीकडे भरणेबाबद व १ वर्ष संपल्यानंतर कंपनीने पॅकेजचे दर वाढवीले अथवा घटवीले तर त्याप्रमाणे प्रत्येक वर्षी फि भरावी लागेल, याप्रमाणे विषय मा.व्य.समीतीपुढे मान्यतेसाठी ठेवला होता.

त्यावर दि.१७/०५/२००९ रोजी झालेल्या मा.व्यवस्थाना समीतीचे सभेतील विषय नं.२५ निर्णय क्र.४८८ अन्वये ८२,४७५/-रू.व वायरींग फिटींगसाठी ८,०००/-रू.असे एकुण ९०,४७५/- चे पुर्णांकीत ९५,०००/- च्या खर्चास मान्यता मिळाली होती. त्याप्रमाणे सर्व काम पुर्ण होवून डिश कनेक्शन चालु आहे. परंतू झालेल्या निर्णयामध्ये उपरोक्त कनेक्शन फी १ वर्ष संपल्यानंतर टाटा स्काय कंपनीने पॅकेजचे दर वाढीले अथवा घटवले तर त्याप्रमाणे प्रत्येक वर्षी फि भरण्यास मान्यता देण्यात येत आहे असा उल्लेख ठरावात आलेला नाही.

आता सन २०११ ते सन २०१२ साठी पुर्ण १ वर्षाची फि रू.५२,०७५/- भरून अतिथी गृहातील २५ रूमचे कनेक्शन रीचार्ज केले असून कनेक्शन चालु आहे.

तरी कृपया वरीलप्रमाणे टाटा स्काय रीचार्जच्या भरलेल्या फि पोटी रू.५२,०७५/- (अक्षरी रूपये बावन्न हजार पंच्च्याहत्तर रूपये ) चे खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळावी हि विनंती.

**निर्णय क्र.१०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृह रुममधील टीव्हीसाठी सन- २०११ ते २०१२ पर्यंत टाटा स्काय डीशचे रिचार्ज फी पोटी भरलेल्या रक्कम रुपये ५२,०७५/-मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०७** **LED T.V.खरेदी करणे अथवा भाडे तत्वावर घेणेबाबत MIC कंपनीच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी बोलविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री च्यां मंदिरात व परीसरात टिव्हीच्यां स्क्रीनवर श्रींचे दर्शन व्हावे यासाठी LCD टिव्ही बसवलेले आहेत.परंतू एल.सी.डी. टीव्हीचे दृष्य दिवसा व उन्हात दिसत नाही. हल्ली नविन टेक्नॉलॉजीचे एल.इ.डी टीव्ही बाजारात आला असून त्याव्दारे चित्र दिवसा, उन्हात व सर्व ऋतुंमध्ये सुध्दा खुपच सुस्पष्ट दिसते. असे LED टाइप टीव्ही मोठया शहरातील रेल्वे स्टेशन, मोठे मॉलच्या जाहिरातीसाठी तसेच क्रीकेटच्या स्टेडीयममध्ये असतात.

अशा प्रकारचे एल.इ.डी. टीव्ही हैद्राबाद येथिल MIC इलेक्ट्रॉनीक्स लीमीटेड, हैद्राबाद ह्या कंपनीत तयार करतात. या कंपनीकडून तिरूपती देवस्थानने टीव्ही खरेदि केलेले आहे सदर कंपनीचे

प्रतिनीधी श्री व्ही.के.प्रसाद,श्री बी.व्ही.पिलाई यांनी श्री रामनवमी २०१० उत्सवात १६ ठिं ठे येथे मोबाइल व्हॅनवर १२x९ फुट या साइजची आउट डोअर व स.मंदिराच्या उत्तर बाजूस स्टेडीयममध्ये ६x४.५ फुट या साइजची इनडोअर स्क्रीन लावून प्रात्याक्षीक दिले होते.

वरील कंपनीचे १२x९ फुट या साइजची आउट डोअर स्क्रीन एक व ६x४.५ फुट या साइजची इनडोअर स्क्रीन सुमारे ९५ लाख रूपये इतक्या किंमतींमध्ये खरेदि बाबतचा प्रस्ताव विषय नं. १५ अन्वये दि.२२/०५/२०१० रोजी झालेल्या मा.व्य.समीतीचे सभेपुढे ठेवला होता, परंतू त्यावर निर्णय क्र.५११ अन्वये सदर प्रस्ताव नामंजूर झालेला आहे.

आता त्याच कंपनीचे इनडोअर व आउटडोअर LED टाइप टिव्ही खरेदि बाबद, MIC कंपनीचे प्रतिनीधींनी मा.चेअरमन सो.यांचेसमवेत केलेल्या चर्चे अन्वये सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समीतीपुढे पुन्हा ठेवण्यात येत आहे.

वरील टीव्हींचे LED लँप जळाल्यांनंतर त्यांचे लँप अथवा ब्लॉक बदलवीणे याबाबतचे कायम मेन्टनन्स करावे लागणार आहे. त्यापेक्षा उपरोक्त MIC कंपनीचे टीव्ही मेन्टनन्ससह भाडेतत्वावर देवू शकतात काय? किंवा खरेदिसाठी कंपनी किती सुट देवू शकते, याबाबद कंपनीच्या प्रतिनीधींना चर्चेकरीता मा.व्य.समीतीच्या पुढील सभेपुढे बोलावीणे बाबत मान्यता मिळावी हि विनंती.

**निर्णय क्र.१०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे MIC कंपनीचे टीव्ही मेन्टनन्ससह भाडेतत्वावर देवू शकतात काय? किंवा खरेदिसाठी कंपनी किती सुट देवू शकते, याबाबद कंपनीच्या प्रतिनीधींना चर्चेकरीता मा.व्य.समीतीच्या पुढील सभेपुढे बोलाविण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०८** **नवीन टायर्स खरेदीकामी झालेल्या वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१२/०६/२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.४८० अन्वये, संस्थानचे स्कुल बसेस, न.भ.निवासस्थान बस, मालवाहतुक टाटाACE व महिंद्रा कॅम्पर या वाहनांकरीता आवश्यक असणारे १७ टायर्स कोटेशन मागवून खरेदी करणेस व या कामी येणारे अंदाजे रु.१,६०,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख साठ हजार) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली होती.

वरील निर्णयानुसार, नवीन १७ टायर्स खरेदी करणे कामी अपोलो व ब्रिजस्टोन कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून जा.नं.एसएसएस/वाहन/२०१९/२०११, दि.२०/०७/२०११ ने कोटेशन्स बोलाविण्यात आलेली होती. प्राप्त झालेली कोटेशन मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने दि.१३/०८/२०११ रोजी विशेष कार्य अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आली. त्यानुसार, मान्यता घेवुन निम्नतम दरधारक नरेंद्र टायर्स, कोपरगांव यांना नवीन १७ टायर्स खरेदी कामी रु.१,६७,६००/- मात्र रक्कमेचा पुरवठा आदेश इकडील जा.क्रं.एसएसएस/वाहन/२७०७/२०११ नुसार देण्यात येवुन नवीन १७ टायर्स खरेदी करण्यात आलेले आहेत. याकामी मंजुर रक्कमे पेक्षा रु.७,६००/- मात्र वाढीव खर्च झालेला आहे.

तरी संस्थान वाहनांकरीता नवीन १७ टायर्स खरेदी कामी झालेल्या वाढीव रक्कम रु.७,६००/- (अक्षरी रक्कम रु.सात हजार सहाशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान वाहनांकरीता नवीन १७ टायर्स खरेदी कामी झालेल्या वाढीव रक्कम रु.७,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०९** **जाहीरातीसाठी झालेल्या खर्चास मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक १० ऑक्टोबर २०११ रोजी दुपारी ०४.०० वा. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) च्या नियोजीत साईगार्डन प्रकल्पाचा पायाभरणी समारंभ व सुरक्षा नियंत्रण कक्षाचा शुभारंभ मा.ना.श्री.पृथ्वीराज चव्हाण, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते झालेला आहे. सदर कार्यक्रमाची निमंत्रण वजा जाहिरात वर्तमानपत्रात देणेबाबत मा.अध्यक्ष सो. यांनी निर्देश दिलेले होते. त्याअनुषंगाने रंगीत जाहिरात स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तरी सदर कार्यक्रमाच्या जाहिरातीकामी येणा-या रुपये २,५०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार मात्र) चे अपेक्षित खर्चास कार्योत्तर मान्यता मिळावी ही विनंती.

सदरचा खर्च जनसंपर्क कार्यालयासाठी सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षाच्या साईबाबा रुग्णालयाव्यतिरिक्त इतर विभागांच्या जाहिरात प्रसिध्दीसाठी मंजूर असलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीतून करता येईल. सदरची अंदाजपत्रकीय तरतुद रुपये ५०,००,०००/- मंजूर आहे.

**निर्णय क्र.११०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक १० ऑक्टोबर २०११ रोजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) च्या नियोजीत साईगार्डन प्रकल्पाचा पायाभरणी समारंभ व सुरक्षा नियंत्रण कक्षाचा शुभारंभ मा.ना.श्री.पृथ्वीराज चव्हाण, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते**

**करण्यात आले असून. त्याअनुषंगाने रंगीत जाहिरात स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात आली असून याकामी रुपये २,५०,०००/-मात्र खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.११० दर्शनपास स्टीकर बंडल खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** जनसंपर्क विभागामार्फत महत्वाच्या/अतिमहत्वाच्या देण्यात येणारे पासेस हे संगणकाव्दारे देण्याची कार्यवाही दिनांक २१.०७.२०११ पासून सुरु करण्यात आलेली आहे. या कार्यप्रणालीसाठी पास ऐवजी बार कोड असलेले स्टीकर्सची आवश्यकता आहे. सध्या या स्टीकर्सची उत्पादक कंपनी मे.प्रिंटेक इन्फोटेक सर्व्हिसेस प्रा.लि.,पुणे यांचेकडून स्टीकर्स तातडीने खरेदी करुन संगणकाव्दारे पासेस देण्याची सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. आता पर्यंत सदर कंपनीने संस्थानला स्टीकर्सचा पुरवठा केलेला आहे. यापुढेही मार्च २०१२ पर्यंत सदरचे स्टीकर्स दरपत्रके मागवून खरेदी करणेची प्रक्रीया पुर्ण होई पावेतो मे.प्रिंटेक इन्फोटेक सर्व्हिसेस प्रा.लि.,पुणे यांचेकडून खरेदी करुन व्ही.आय.पी. पासेस वितरणाचे काम सुरु ठेवता येईल.

सध्या जनसंपर्क विभागात ०२ संगणकावर व्हीआयपी पास व ०१ संगणकावर ऑनलाईन पास वितरण सुरु आहे. जनसंपर्क विभागाचे नुतनीकरणाचे काम पुर्ण झालेनंतर ०४ संगणकावर व्हीआयपी पास व ०१ संगणकावर ऑनलाईन पास वितरण सुरु करण्यात येणार असल्याने दररोज अंदाजे १००० पास वितरीत होतील असे वाटते. एका बंडलमध्ये १००० स्टीकर्स असतात व एक स्टीकर बंडल खरेदीसाठी रुपये ३४२/- (करासह) खर्च येतो. साधारणपणे माहे नोव्हेंबर २०११ ते माहे मार्च २०१२ अखेर अंदाजे १५१ स्टीकर बंडलची आवश्यकता आहे. त्यासाठी रुपये ५२,०००/- पुर्णांकित खर्च अपेक्षित आहे.

जनसंपर्क विभागाचे २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रकात स्टेशनरी खरेदीसाठी तरतुद नाही. तथापि माहे मार्च २०१२ अखेर पर्यंत स्टीकर्स खरेदीसाठी होणारे खर्चाचा सन २०११-१२ चे पुरवणी अंदाजपत्रकामध्ये समावेश करता येईल.

सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकात स्टेशनरी खरेदीकामी तरतुद करुन खरेदी विभागामार्फत निविदा मागवून खरेदी करता येईल असे मत आहे.

**निर्णय क्र.१११ यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे नोव्हेंबर २०११ ते माहे मार्च २०१२ अखेर आवश्यक असणारे अंदाजे १५१ दर्शन पास स्टीकर बंडल मे.प्रिंटेक इन्फोटेक सर्व्हिसेस प्रा.लि.,पुणे यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.तसेच यापूढील सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील दर्शन पास स्टीकर बंडल खरेदी विभागामार्फत निविदा मागवून खरेदी करण्यात यावेत असे ठरले.** (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.१११ फायर एक्स्ट्रीग्युशर सिलेंडर खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन समाधी मंदिर व परीसरात तसेच नविन भक्त निवासस्थान व परीसर,शैक्षणिक संकुल,साईउद्यान,गॅसटैंक,नविन मध्यवर्ती भांडार, सेवाधाम, धर्मशाळा, ब्लडबॅक, पॉवर-हाऊस, चहा-कॅन्टीन इ.ठिकाणी आवश्यकतेनुसार संरक्षण विभागामार्फत वेगवेगळ्या टाईपचे फायर एक्स्टींग्यूशर सिलेंडर बसविण्यात आलेले आहेत.

तथापी,आय.टी.आय.विभाग,विद्युत विभाग,श्री साईनाथ हॉस्पिटल या महत्वाचे ठिकाणी फायर एक्सटिंग्युशर सिलेंडर नसल्याने सदर विभागानी सिलेंडरची मागणी केलेली आहे.

त्यानुसार या कार्यालयाकडून श्री एस.एस.अहलुवालीया फायर ॲन्ड सेफ्टी सर्व्हीसेस,पुणे यांना एक्स्टीग्युशर सिलेंडर बसविण्याच्या ठिकाणचा सर्व्हे करणे कामी तसेच या कामासाठी येणाऱ्या खर्चा बाबत माहिती मिळणेकामी शिर्डी येथे बोलविण्यात आले होते.

त्यानुसार, श्री अहलुवालीया, फायर ॲन्ड सेफ्टी सर्व्हिसेस पुणे हे समक्ष शिर्डी येथे आले व त्यांनी फायर फायटरचे काम पहाणारे संरक्षण विभागातील कर्मचारी श्री प्रताप कोते,यांनी दि.२०.०९.२०११ रोजी संस्थानचे आय.टी.आय,विद्युत,साईबाबा हॉस्पिटल या विभागाची पाहणी केली व त्यासाठी येणारा खर्च श्री अहलुवालीया यांनी त्यांचे पत्राद्वारे इकडील कार्यालयास कळविला आहे.

| विद्युत विभाग | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. | ठिकाण | सिलेंडर/क्षमता | नग | अंदाजे प्रति नं.रुपये | एकुण नग रुपये |
| ०१ | इलेक्ट्रीक पॅनल | CO२ टाईपचे ०२ किलो क्षमतेचे | १३१ | ३१५०/- | ४,१२,६५०/- |
| ०२ | जनरेटर रुम | CO२ टाईपचे ०९ किलो क्षमतेचे | १५ | ७२००/- | १,०८,०००/- |
| | | CO२ टाईपचे ०२ किलो क्षमतेचे | १५ | ३१५०/- | ४७,२५०/- |
| | | DCP टाईपचे १० किलो क्षमतेचे | १५ | १६००/- | २४,०००/- |
| ०३ | डिझेल रुमसाठी | DCP टाईपचे ०५ किलो क्षमतेचे | १० | ११५०/- | ११,५००/- |

| | | | | | एकुण खर्च | ६,०३,४००/- |
|---|---|---|---|---|---|---|

| आय टी आय विभाग<br>विभागातील वेगवेगळया ट्रेडच्या मुलांना प्रशिक्षणासाठी आवश्यक असणारे फायर उपकरणे खालील प्रमाणे | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ नं** | **सिलेंडरचा प्रकार** | **क्षमता** | **नग** | **अंदाजे प्रति नं.रुपये** | **एकुण नग रुपये** |
| ०१ | ABC | ५ किलो | ५ | १,४५०/- | ७,२५०/- |
| ०३ | CO२ | २ किलो | ३ | ३,१५०/- | ९,४५०/- |
| ०४ | DCP | ५ किलो | ५ | १,१५०/- | ५,७५०/- |
| ०५ | मॅंक फोन | ९ लिटर | ७ | १,२६०/- | ८,८२०/- |
| ०६ | वाटर Co२ | ०९ लिटर | २ | १,१००/- | २,२००/- |
| ०७ | फायर बकेट | १० लिटर | ५० | २१५/- | १०,७५०/- |
| | | | | **एकुण खर्च** | **४४,२२०/-** |

| साईनाथ हॉस्पिटल | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ नं | सिलेंडरचा प्रकार | क्षमता | नग | अंदाजे प्रति नं.रुपये | एकुण नग रुपये |
| ०१ | DCP | ५ किलो | २ | ११५०/- | |
| | | | | **एकुण खर्च** | **२३००/-** |

उपरोक्त प्रमाणे विद्युत विभागासाठी रु ६,०३,४००/- + आय टी विभागासाठी रु. ४४,२२०/- + साईनाथ हॉस्पिटल रु.२,३००/- अशा प्रकारे विविध टाईपचे एक्स्टींग्युशर सिलेंडर खरेदीसाठी एकुण रु ६,५०,०००/- (अ.रु.सहालाख पन्नास हजार) मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी एक्स्टीग्युशर सिलेंडर खरेदीसाठी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन टेंडर मागविण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.११२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विद्युत विभाग, आय.टी. विभाग व साईनाथ हॉस्पिटल या विभागासाठी आवश्यक असणारे विविध टाईपचे फायर एक्स्ट्रीग्युशर सिलेंडर खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.११२** **गुरुवार, रविवार व सुट्यांचे कालावधीत गावकारी गेट व ऑफिसगेटवर होणाऱ्या गर्दीबाबत.**

**प्रस्ताव-** दिवसेंदिवस श्री साईबाबांची महती व प्रचिती वाढत असून श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांची प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे त्यातल्या त्यात गुरुवार, रविवार व सुट्यांचे कालावधीत गर्दीचे प्रमाण प्रचंड स्वरुपात असते.

श्रींचे दर्शनासाठी वेळोवेळी मंत्री,मान्यवर,शासकिय अधिकारी यांचीही संख्या वाढत आहे.त्यांचे साठी पी.आर.ओ.मार्फत दर्शन/आरतीचे पास देण्यात येतात.तसेच बऱ्याच वेळा पी.आर.ओ.कडील कर्मचारी त्यांना घेऊन थेट ऑफिस गेट येथे येऊन त्यांना दर्शनासाठी सोडतात तसेच शिर्डीतील प्रतिष्ठीत नागरीक, नगरसेवक हे सुद्धा त्याच गेटने दर्शनासाठी प्रवेश करतात व इतर स्थानिक ग्रामस्थांचे दर्शनासाठी अभिषेक गेट (गावकरीगेट )चा वापर करण्यात येतो.

सदर गेटवर गुरुवार, रविवार या गर्दीचे दिवशी पंचक्रोषीतील बरेच नागरिक गेटमधून प्रवेश करण्यासाठी त्याठिकाणी घुटमळत असतात व प्रतिष्ठीत ग्रामस्थ अथवा पी.आर.ओ.कडील व्ही आय पी पासधारक आलेनंतर सदर गेटवर अथवा स्थानिक ग्रामस्थांना गावकरी गेटमधून सोडतेवेळी आसपास वाट पहात असलेले पंचक्रोषीतील नागरीकही सदर गेटमधून प्रवेश करावयाचे दृष्टीने त्याठिकाणी येतात व आम्ही ग्रामस्थ आहोत,आम्ही सुद्धा ह्याच गेटने जाणार असे सांगून कर्तव्यावरील सुरक्षा रक्षकांशी हुज्जत घालतात.

गुरुवार दि.२४.११.२०११ रोजी जवळके येथील दोन तरुण ऑफिस गेटजवळ दर्शनास जाण्यासाठी ऑफिसगेट उघडण्याची वाट पहात घुटमळत होते. त्यावेळी काही ग्रामस्थ सदर गेटजवळ आले असता त्यांना सोडतेवेळी सदरचे हे तरुण ही दमदाटी करुन ऑफिस गेटने घुसण्याचा प्रयत्न करु लागले .त्यावेळी कर्तव्यावरील सुरक्षा रक्षक व त्या दोन तरुणांमध्ये बाचाबाची झाली. सदर गेटवर उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनाही त्या तरुणांनी दमदाटी करुन शिवीगाळ केली त्यामुळे स्थानिक गावकऱ्यांनी सदर तरुणांना मारहाण केली या प्रकारामुळे सदर परिसरातील दर्शनार्थी भक्तांच्या मध्ये घबराट निर्माण झाली.

दिवसें-दिवस गुरुवार, रविवार व सलग सुट्यांचे कालावधीत श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या पंचक्रोषीतील नागरिकांची वाढ होत असल्याने असे प्रकार वारंवार घडत आहेत. यासाठी सदरचे ऑफिसगेट व अभिषेक (गावकरी) गेट बाबत त्वरीत योग्य तो निर्णय घेऊन यावर दुसरा काही उपाय योजावा लागेल अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. जेणेकरुन मंदिर परिसरात असणाऱ्या भक्तांना त्याचा त्रास होणार नाही व त्यांचेमध्ये गैरसमज होणार नाही.

**निर्णय क्र.११३ सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.११३ व्यायामशाळेतील व्यायाम साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००२ पासून श्री साईबाबा संस्थान मार्फत व संरक्षण विभागातर्गंत व्यायामशाळा कार्यरत असून त्यात संस्थान कर्मचाऱ्यांची मुले,स्थानिक तरुण व पंचक्रोषीतील तरुण मिळून साधारण ४०० ते ५०० सभासद दरमहा रितसर शुल्क भरुन व्यायामासाठी येत असतात.

व्यायामशाळेत असलेले खालील प्रमाणे साहित्य खराब झाल्याने व काही साहित्य नव्याने खरेदी करणे आवश्यक आहे.

१) व्यायामशाळेत असलेले डंबेल्स सन २००२ पासून वापरुन-वापरुन खराब झाले आहे सदरचे डंबेल्स बऱ्याच वेळा आय.टी.आय, विद्युत विभागामार्फत वेल्डींग करुन त्याचा आजतागायत वापर चालू होता.परंतु आता ते पूर्णपणे डॅमेज झाल्यामुळे दुरुस्त करणे अशक्य आहे करीता खालीलप्रमाणे वेगवेगळया वजनाच्या नऊ जोडया डंबेल्स खरेदी करणे आवश्यक आहे.

२) व्यायाम करणोर सभासदांना वजन करणेकामी इलेक्ट्रॉनिक वजन काटा आवश्यक आहे.

३) व्यायामासाठी आधुनिक पद्धतीचे डिजीटल डिसप्ले युनिटची आवश्यकता आहे (स्थूल शरीर कमी करावयाचे मशीन )

उपरोक्त प्रमाणे व्यायामासाठी नव्याने साहित्य खरेदी करावयाचे आहे.त्यासाठी येणारा खर्च खालील प्रमाणे आहे.

**अ ) डंबेल्स :-**

| **अ. नं.** | **डंबेल्स वजन** | **नग** | **वजन** | **रु.१३०/- प्रति किलो प्रमाणे एकुण किमंत** |
|---|---|---|---|---|
| ०१ | ५ किलो | ०१ जोड | १० किलो | १३००/- |
| ०२ | ७.५ किलो | ०१ जोड | १५ किलो | १९५०/- |
| ०३ | १० किलो | ०१ जोड | २० किलो | २६००/- |
| ०४ | १२.५ किलो | ०१ जोड | २५ किलो | ३२५०/- |
| ०५ | १५ किलो | ०१ जोड | ३० किलो | ३९००/- |
| ०६ | १७.५ किलो | ०१ जोड | ३५ किलो | ४५५०/- |
| ०७ | २० किलो | ०१ जोड | ४० किलो | ५२००/- |
| ०८ | २२.५ किलो | ०१ जोड | ४५ किलो | ५८५०/- |
| ०९ | २५ किलो | ०१ जोड | ५० किलो | ६५००/- |
| | **एकुण** | **०९ जोड** | **२७० किलो** | **३५१००/-** |

**ब)** इलेक्ट्रॉनिक वजन काटा :- रु.९००/- मात्र किंमत

**क)** डिजीटल डिसप्ले युनिट :- रु.१,३५,०००/-मात्र किंमत.

उपरोक्त प्रमाणे व्यायाम साहित्य खरेदी कामी एकुण अंदाजे खर्च रु.१,७५,०००/- मात्र अपेक्षित असून संरक्षण विभागाचे सन २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रसकात सदर साहित्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी सदरचे व्यायामशाळा साहित्य खरेदी करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.११४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे व्यायामशाळेतील व्यायाम साहित्य खरेदी खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.११४ कायम कर्मचारी सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२४.१०.२०११ रोजीच्या उपसमितीची आस्थापना विषयक मिटींगमध्ये संस्थानचे संरक्षण विभागाकडील सुरक्षा रक्षकांमध्ये कामाची गुणवत्ता वाढविण्याचे दृष्टीने,आधुनिक प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.त्यासाठी महाराष्ट्र पोलिस ॲकडमी,नाशिक यांचेकडे सुरक्षा कर्मचारी गटागटाने पाठविण्यात येऊन त्यांना एक

महिन्याचे ट्रेनिंग देणे बाबत मा.विश्वस्त श्री शैलश श्रीहरी कूटे सो,यांची संबधित अधिकाऱ्यांशी चर्चा झ ाल्याने त्यांनी महाराष्ट्र पोलिस ॲकडमी यांचेशी पत्रव्यवहार करण्यात यावा,याबाबत निर्देश दिले होते.

त्यानुषंगाने महाराष्ट्र पोलिस ॲकडमी,नाशिक यांना केलेल्या पत्रव्यवहारानुसार महाराष्ट्र ॲकडमी,नाशिक यांनी पाठविलेल्या पत्रात श्री साईबाबा संस्थानचे ८० सुरक्षा रक्षकांना महिना (४ आठवडे)कालावधीचे प्रशिक्षण देणे शक्य आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे प्रशिक्षण शुल्क त्यांच्या कार्यालयात आगावू जमा करणे आवश्यक राहील असे नमुद केले आहे.

**(१)**

| अ.नं | तपशिल | रक्कम प्रति प्रशिक्षणार्थी प्रतिदिन | प्रत्येक प्रशिक्षणार्थीस ४ आठवडयांसाठी | ८० सुरक्षा रक्षकांना ४ आठवडयांसाठी |
|---|---|---|---|---|
| **०१** | भोजन खर्च (नाष्टा,दुपारचे व रात्रीचे जेवण ) | .१५०/- | ४,८००/- | ३,८४०००/- |
| **०२** | ग्रंथालय सभासद फी व वर्गणी | --- | २००/- | १६०००/- |
| **०३** | जलतरण तलाव सभासद फी व वर्गणी (प्रत्येक प्रशिक्षणार्थींसाठी २आठवडयासाठी रु.१५०/- याप्रमाणे) | -- | ३००/- | २४०००/- |
| **०४** | लॉजींग चार्जेस | २००/- | ६४००/- | ५१२०००/- |
| **०५** | स्टेशनरी खर्च (प्रत्येक प्रशिक्षणार्थीसाठी २ आठवडयासाठी रु.५००/- याप्रमाणे ) | | १०००/- | ८००००/- |
| **०६** | ट्रेनिंग फी (प्रत्येक प्रशिक्षणार्थीसाठी २ आठवडयासाठी १०००/- याप्रमाणे | | २०००/- | १,६०,०००/- |
| **०७** | व्याख्यात्यांचे मानधन, गोळीबार सराव इत्यादीसाइी दारुगोळा इतर साहित्य (प्रत्येक प्रशिक्षणार्थीसाठी २ आठवडयासाठी रु.४०००/- याप्रमाणे ) | | ८०००/- | ६,४०,०००/- |
| **०८** | गोळीबार सरावासाठी प्रशिक्षणार्थीचा प्रवासखर्च | | | ८०००/- |
| **०९** | न्हावी | ६०/- प्रतिमाह | ६०/- | ४,८००/- |
| **१०** | धोबी | ३३०/- | ३३०/- | २६,४००/- |
| **११** | अकॅडमी विकास निधी | ४००/- | ४००/- | ३२,०००/- |
| | | | एकुण | १८,८७,२००/- |

**२)** उपरोक्त प्रशिक्षण सत्रांसाठी लागणारा एकूण खर्च रु.१८,८७,२००/- असून सदर रक्कमेचा धनादेश ओ.एस.डायरेक्टर,एम.पी.ए.नाशिक या नावाने प्रशिक्षण सत्र सुरु होण्यापूर्वी या कार्यालयास जमा करणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे.

**३)** प्रशिक्षण शुल्क प्राप्त झाल्यानंतर प्रशिक्षण सत्र दि.०२.०१.२०१२ ते दि.०२.०२.२०१२ या कालावधीत आयोजित करता येईल.

**४)** प्रशिक्षण सत्राचा कालावधी, अभ्यासक्रम व इतर अनुषंगीक बाबींची निश्चिती करण्यासाठी आपले विभागाकडून एक समन्वय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी. तसेच इनडोअर/आऊटडोअर विषयांचा ०१ महिन्याचा अभ्यासक्रम त्यांच्या कार्यालयास पाठवावा अशी विनंती केलेली आहे जेणेकरुन त्यांना प्रशिक्षण देता येईल.

तसेच सुरक्षा रक्षकांचे प्रशिक्षण सत्रातील प्रशिक्षणार्थीसाठी मार्गदर्शन सुचनांचा तक्ता सोबत जोडला आहे.त्यात सुरक्षा कर्मचाऱ्यांना वैयक्तिक लागणाऱ्या वस्तू खरेदी करण्यासाठी प्रशिक्षणार्थीनी रु.५०००/- मात्र स्वतः सोबत आणावे व इतरही काही सुचना पत्रात नमूद केलेल्या आहेत.

करीता उपरोक्त प्रमाणे संस्थानमधील ८० सुरक्षा रक्षकांना एक महिन्याचे प्रशिक्षण देणेकामी रु.१८,८७,२००/- (अठरालाख सत्यांशी हजार दोनशे मात्र)खर्च येणार असून सदरची रक्कम महाराष्ट्र पोलिस ॲकडमी, नाशिक यांना आगावू स्वरुपात भरावयाची आहे.

सदरचा खर्च निश्चितच जास्त वाटतो व म्हणून याबाबत योग्य तो निर्णय घेणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.११५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र पोलिस ॲकडमी, नाशिक यांचे प्रतिनिधीस शिर्डी येथे बोलावून संस्थानमधील ८० सुरक्षा रक्षकांना एक महिन्याचे प्रशिक्षण देण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.११५** **संस्थानची वेबसाईटवरील माहिती साईभक्तांना सहज उपलब्ध होणेसाठी डोमेन (Domain) नावाचे रजिष्ट्रेशन बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानची अधिकृत वेबसाईट www.shrisaibabasansthan.org ही सन १९९९ मध्ये सुरु करण्यात आलेली आहे. या वेबसाईटमध्ये काळाप्रमाणे वेळोवेळी बदल करुन आज हीच वेबसाईट इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेमध्ये भक्तांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे संस्थान प्रकाशीत विविध भाषेतील सर्व साईचरित्र सन-१९२३ पासूनच्या श्रीसाईलीला वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेल्या असल्याने संस्थान वेबसाईटला दररोज सुमारे ७ ते ८ हजार श्री साईभक्त भेट देतात. सदर वेबसाईटवर साधारणपणे ११००० पाने व १००० फोटो अशा रितीने साडेचार जीबी एवढा डाटा लोड करण्यात आला आहे.

श्री बाबांच्या जीवनावरील संस्थानच्या अधिकृत वेबसाईट व्यतिरिक्त खाजगी मंदिरे व खाजगी व्यक्तींकडून साधारणतः दीड ते दोन हजार वेबसाईट दाखविल्या जात आहेत. काही खाजगी वेबसाईट संस्थानच्या नावाशी साधर्म्य असल्याने, भक्तांचा गैरसमज होऊ नये तसेच संस्थानच्या नावाशी व भक्तांच्या सहज लक्षात येईल अशा नावाने संस्थानची वेबसाईट उघडली जावी म्हणून एकूण २६ डोमेन नावे वेळोवेळी मान्यता घेऊन पाच वर्षासाठी रजिस्ट्रेशन करण्यात आलेले आहेत.

संस्थानने रजिस्ट्रेशन केलेल्या नावांची यादी-

| SR. NO | DOMAIN NAME | DURATION | Reg.Date | EXPIRY DATE | REGISTRAR |
|---|---|---|---|---|---|
| 1 | www.shrisai.org | 5 Year | 09/09/2006 | 09/09/2011 | **Hostindia.net** |
| 2 | www.shreesai.org | 5 Year | 09/09/2006 | 09/09/2011 | **Hostindia.net** |
| 3 | www.shrisaibabasansthan.net | 5 Year | 09/09/2006 | 09/09/2011 | **Hostindia.net** |
| 4 | www.saibabasansthan.net | 5 Year | 09/09/2006 | 09/09/2011 | **Hostindia.net** |
| 5 | www.shirdiwalesai.org | 5 Year | 09/09/2006 | 09/09/2011 | **Hostindia.net** |
| 6 | www.saibabakishirdi.org | 5 Year | 09/09/2006 | 09/09/2011 | **Hostindia.net** |
| 7 | www.shirdiwalesaibaba.org | 5 Year | 09/09/2006 | 09/09/2011 | **Hostindia.net** |
| 8 | www.jaisaibaba.org | 5 Year | 09/09/2006 | 09/09/2011 | **Hostindia.net** |
| 9 | www.shirdisaibabaki.org | 5 Year | 09/09/2006 | 09/09/2011 | **Hostindia.net** |
| 10 | www.gurusthan.org | 5 Year | 09/09/2006 | 09/09/2011 | **Hostindia.net** |
| 11 | www.sainaam.org | 5 Year | 09/09/2006 | 09/09/2011 | **Hostindia.net** |
| 12 | www.saidarbaar.org | 5 Year | 09/09/2006 | 09/09/2011 | **Hostindia.net** |
| 13 | www.saiparivar.net | 5 Year | 11/12/2006 | 10/12/2011 | **Hostindia.net** |
| 14 | www.shirdisai.org.in | 5 Year | 11/12/2006 | 11/12/2011 | **Hostindia.net** |
| 15 | www.shrisaibaba.in | 5 Year | 11/12/2006 | 11/12/2011 | **Hostindia.net** |
| 16 | www.shirdi.org.in | 5 Year | 11/12/2006 | 11/12/2011 | **Hostindia.net** |
| 17 | www.shirdisaibaba.org.in | 5 Year | 11/12/2006 | 11/12/2011 | **Hostindia.net** |
| 18 | www.sai.org.in | 5 Year | 11/12/2006 | 11/12/2011 | **Hostindia.net** |
| 19 | www.saiparivar.org.in | 5 Year | 11/12/2006 | 11/12/2011 | **Hostindia.net** |
| 20 | www.sabkasai.org | 5 Year | 11/12/2006 | 11/12/2011 | **Hostindia.net** |
| 21 | www.shrisaibaba.org.in | 5 Year | 18/12/2006 | 18/12/2011 | **Hostindia.net** |
| 22 | www.shrisaibabasansthan.org.in | 5 Year | 19/12/2006 | 19/12/2011 | **Hostindia.net** |
| 23 | www.saidevotee.org.in | 5 Year | 20/02/2007 | 20/02/2012 | **Hostindia.net** |
| 24 | www.shrisaibabasansthan.org | 5 Year | 11/08/1999 | 11/08/2012 | **People-Connect** |
| 25 | www.shrisaibabasansthantrust.org | 5 Year | 09/01/2009 | 09/01/2014 | **Hostindia.net** |
| 26 | www.shrisaibabasansthantrustshirdi.org | 5 Year | 09/01/2009 | 09/01/2014 | **Hostindia.net** |

उपरोक्त परिच्छेद मध्ये नमूद केलेल्या डोमेन नावांपैकी अ.नं. १ ते १२ डोमेन नावांचे रजिस्ट्रेशनची मुदत माहे ०९ सप्टेंबर, २०११ अखेर संपुष्टात आल्याने त्यांचे दि. १८/०८/२०११ रोजीचे टिपणीअन्वये Hostin Services Private Limited Pune यांचेकडून पुढील ५ वर्षासाठी रजिस्ट्रेशनचे नुतनीकरण मा.कार्यकारी अधिकारी सो यांचे मान्येतेने करुन घेण्यात आलेले आहे. याकामी एका डोमन नावास रू.१९००/- प्रमाणे एकूण रु. २२,८००/- मात्र इतका खर्च आलेला आहे.

आता उपरोक्त अ.नं. १३ ते २२ या डोमेन नावांचे ५ वर्षाचे रजिस्ट्रेशन मुदत माहे डिसेंबर, २०११ मध्ये संपुष्टात येत आहे. सदर डोमेन नाव संस्थान वेबसाईटसाठी सुरु ठेवणेसाठी त्यांचे पुढील ५ वर्षासाठी नूतनिकरण करावे लागणार आहे. तसेच अ. नं. २३ ते २४ चे नावांची मुदत अनुक्रमे माहे २०फेब्रुवारी, २०१२ व माहे ११ऑगष्ट, २०१२ मध्ये संपुष्टात येत आहे. तसेच अ.नं. २५ व २६ चे नावांचे रजिस्ट्रेशनची मुदत दि. ०९/०१/२०१४ अखेर संपुष्टात येणर असल्याने भविष्यात त्यांचेही नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे अ.नं. १ ते २६ डोमेन नावांचे रजिस्ट्रेशन करणेकामी रजिस्ट्रेशनची मुदत संपुष्टात आलेनंतर त्यांचे पुढील ५ वर्ष कालावधीसाठी Hostindia.net Pune यांचेमार्फत रजिस्ट्रेशन करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच भविष्यात संस्थान

वेबसाईटशी साधर्म्य असलेली नवीन नावे मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी व मा. के.व्ही. रमणी सो. यांनी सुचविल्यास त्यांचेही रजिस्ट्रेशन करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.११६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे अ.नं. १ ते २६ डोमेन नावांचे रजिस्ट्रेशन करणेकामी रजिस्ट्रेशनची मुदत संपुष्टात आलेनंतर त्यांचे पुढील ५वर्ष कालावधीसाठी Hostindia.net Pune यांचेमार्फत रजिस्ट्रेशन करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच भविष्यात संस्थान वेबसाईटशी साधर्म्य असलेली नवीन नावे मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी व मा.श्री के.व्ही रमणी यांनी सुचविल्यास त्यांचेही रजिस्ट्रेशन करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

---

**विषय नं.११६** **साईटेक प्रकल्पाअंतर्गत Tape Backup Media खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत मा. श्री. के. व्ही. रमणी सो. यांचे मार्गदर्शनाखाली साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना उपरोक्त संदर्भ क्र. ०२ ने कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार साईटेक प्रकल्पाचे पहिल्या टप्यातील संगणक प्रणाली दिनांक १५/०७/२०११ पासून सुरु करण्यात आलेल्यो आहेत. पहिल्या टप्यात ऑनलाईन दर्शन, रुम बुकींग, ऑनलाईन देणगी, प्रसाद भोजन आदी कार्यप्रणाली सुरु करण्यात आलेल्या आहेत.

साईटेक प्रकल्पातील संगणक प्रणाली सुरु झालेनंतर त्यांचा डाटा सुरक्षित राहणेसाठी त्याचा Backup घ्यावा लागणार आहे. त्यासाठी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांचेकडून Backup Tape वापरण्यात येणार आहे. करारनाम्यातील अटीशर्ती नुसार Backup साठी लागणारे Tape Backup Media चा संस्थानने पुरवठा करणेबाबत ठरलेले आहे. त्यामुळे माहिती तंत्रज्ञान विभागाला खालील तपशिलाप्रमाणे Tape Backup Media खरेदी करावे लागणार आहे.

| Sr. No. | Description | Qty. | Rate (Lumsum) | Total (Lumsum) |
|---|---|---|---|---|
| 01. | Tape Backup Media<br>WORM Data Cartridage (1-Pack) for LTO4 (One year warranty) | 10 | 5,000.00<br>+ Tax | **50,000.00**<br>**Tax** |

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे १० नग Tape Backup Media खरेदी करावे लागणार आहे. एक नगास अंदाजे किंमत रक्कम रुपये ५,०००/- + Tax इतका खर्च येईल. १० नग Tape Backup Media खरेदीस अंदाजे रक्कम रुपये ५०,०००/- + Tax इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी, १० नग Tape Backup Media संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५०,०००/- + Tax इतक्या खर्चास मान्यता मिळेणेसाठी सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.११७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साईटेक प्रकल्पाअंतर्गत १० नग Tape Backup Media संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५०,०००/- + Tax इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-आय.टी विभागप्रमुख)

---

**विषय नं.११७** **शिकाऊ उमेदवारांसाठी ८६ व्या अखिल भारतीय कौशल्य स्पर्धेत संस्थान आस्थापनेवरील प्रशिक्षणार्थी बाराहाते निखील भाऊसाहेब देशात सर्वप्रथम ठरलेबाबत**

**प्रस्ताव-** वरील विषयाबाबत कळविण्याचे की, शिकाऊ उमेदवारी कायदा व केंद्रशासनाच्या रोजगार व श्रम मंत्रालयांतर्गत शिकाऊ उमेदवारी योजनेत संस्थानच्या वेगवेगळया विभागात (१) इलेक्ट्रिशियन-०६ , (२) वेल्डर-०६, (३) मोटार मेकॅनिक व्हेईकल-०४, (४) रेफ्रीजरेशन ॲण्ड एसी.मेकॅनिक-०४, (५) प्रोग्रामिग ॲण्ड सिस्टीम (पासा)-०८, (६) ट्रॅक्टर मेकॅनिक,-०२, (७) आयटी ॲण्ड ई.एस.एम.-०६ याप्रमाणे ३६ उमेदवारांना प्रशिक्षण दिले जाते.त्यासाठी त्यांना शासकिय नियमानुसार विद्यावेतन दिले जाते.त्यांचे प्रात्यक्षिक संस्थानच्या वेगवेगळया विभागात तर सैध्दातींक विषयाचे तास औ.प्र.संस्थेमध्ये होतात.

वरील ०७ पैकी पहिल्या ०४ ट्रेडसाठी राष्ट्रीय स्तरापर्यंत कौशल्य स्पर्धापरीक्षा कार्यक्रम लागु आहे. राष्ट्रीय कौशल्य स्पर्धेचे टप्पे खालील प्रमाणे असतात.

१) जिल्हयातील सर्व आस्थापनेमधील शिकाऊ उमेदवारांची परीक्षा अभ्यासक्रम पुर्ततेनंतर जिल्हास्तरीय शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील परीक्षा केंद्रावर होते.

२) जिल्हास्तरावरील परीक्षा केंद्रातुन सर्व प्रथम येणाऱ्या उमेदवारास गोवा-गुजरात व महाराष्ट्र या तीन राज्यांसाठी असलेल्या विभागीय शिकाऊ उमेदवारी स्पर्धा परीक्षेला बसता येते.

३) विभागीय शिकाऊ उमेदवारी कौशल्य स्पर्धेत प्रथम किंवा व्दितीय क्रमांकाने पात्र होणाऱ्या उमेदवारास राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी कौशल्य स्पर्धेस बसता येते.

४) राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी कौशल्य स्पर्धेत सर्वप्रथम क्रंमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या स्पर्धेकास मेरीट सर्टीफिकेट व रु. ५०,०००/- (अक्षरी रु. पन्नास हजार मात्र.) रोख पारितोषिक तर व्दितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यास मेरीट सर्टीफिकेट व रु.२५०००/- (पंचवीस हजार मात्र.) रोख पारितोषिक डीजीईटी नवी दिल्ली यांचे कडून देण्यात येते.

५) प्रशिक्षणार्थी ज्या आस्थापनेवर प्रशिक्षण घेतो त्या आस्थापनेला आस्थापनेमधील स्पर्धेसाठी त्यांनी मिळविलेले गुण देण्यात येतात.

६) ज्या आस्थापनेवर पात्र प्रशिक्षणार्थ्यांव्दारा मिळलेले गुण सर्वाधिक असतात.तिला त्या वर्षाची **"सर्वोष्ट आस्थापना Best Establishment"** ची ट्रॉफी व प्रमाणपत्र महामहिम राष्ट्रपती यांचेकडून देण्यात येते.

कळविण्यात आनंद होतो की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमध्ये ऑक्टोंबर २००९ ते सप्टेंबर २०१० या कलावधीत इलेक्ट्रशियन ट्रेडमध्ये शिकाऊ उमेदवारीसाठी असलेला प्रशिक्षणार्थी बाराहाते निखिल भाऊसाहेब हा ८६ व्या अखिल भारतीय कौशल्य स्पर्धेत प्रथम क्रमांकाने उत्त्तीर्ण होवून स्पर्धेचा विजेता ठरला असून त्याने केंद्र शासनाने रु. ५०,०००/- ( रु. पन्नास हजार मात्र.) रोख पारितोषिक व मेरीट प्रमाणपत्र जिंकले आहे.

निखील बाराहाते हा आपल्या औ.प्र.केंद्राचा प्रशिक्षणार्थी असून त्याने २०१० मध्ये शिल्पकारागीर प्रशिक्षण योजणेतील राष्ट्रीय कौशल्य स्पर्धा परीक्षाही प्रथम क्रमांकाने जिंकुन त्यासाठीचे रु. १०,०००/- रोख व मेरीट प्रमाणपत्र मिळविले आहे. त्याचा उचीत सत्कार व्हावा. यासाठी निर्णयार्थ टिपणी मा.व्यवस्थापन समितीसमोर विचारार्थ आहे.

मा.व्यवस्थापन समिती व संस्थान प्रशासन यांचा पाठींबा व प्रोत्साहन, संस्थानचे विद्युत अभियंता, त्यांचे सर्व सहकारी , औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ट्रेडशी व कौशल्य स्पर्धेशी संबधित निदेशक यांचे मार्गदर्शन तसेच या प्रशिक्षणार्थ्याने केलेले अथक परिश्रम यातुन हे अत्युच्च यश प्राप्त झालेले आहे.

सदरचे यश हे अभिमानास्पद व संस्थानचे कार्य राष्ट्रीय पातळीवर झळकवणारे आहे.' त्यामुळे चि.निखील याचा उचित सन्मान व कौतुक संस्थानव्दारा व्हावा असे मत आहे.

या यशाची माहिती व निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर.

**निर्णय क्र.११८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

---

**विषय नं.११८** **श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने राज्यस्तरावर हॅट्रीक केलेबाबत**

**प्रस्ताव-** नम्रपणे कळविण्याचे की, सलग तिसऱ्या वर्षी आपले प्रशिक्षणार्थी कौशल्य स्पर्धा परीक्षेत राज्यस्तरावर प्रथम क्रमांकाने उत्त्तीर्ण होवून संस्थेने यशाची हॅट्रीक केली आहे! सन २००९ मध्ये चार , २०१० मध्ये दोन व चालू वर्षी २०११ मध्ये तीन प्रशिक्षणार्थी राज्यात सर्वप्रथम आले!

संदर्भ क्रं.०१ नुसार नोंहेंबर २०११ मध्ये पुणे, अंबरनाथ व मुंलुड येथील शासकिय औ.प्र.सस्थेत ४८ व्या राज्यस्तर कौशल्य स्पर्धा परीक्षेमध्ये आपल्या संस्थेचे अनुक्रमे धनवटे सुनिल लुईस-टर्नर , रोकडे अश्विनकुमार रमेश -मेकॅनिक रेफ्रीजरेशन एसी. व पेटारे योगेश माधव -इलेक्ट्रीशियन हे तीन प्रशिक्षणार्थी त्यांच्या-त्यांच्या ट्रेडमध्ये राज्यात सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होवून जानेवारी २०१२ मध्ये होणाऱ्या अखिल भारतीय कौशल्य स्पर्धा परीक्षेसाठी राज्याचे प्रतिनिधीत्व करण्यास पात्र ठरले आहेत.याशिवाय शासकिय औ.प्र.संस्था,सांगली येथे झालेल्या राज्यस्तर कौशल्य स्पर्धा परीक्षेत आपल्या संस्थेचा प्रशिक्षणार्थी जगदाळे मयुर सुनिल -मोटार मेकॅनिक हा राज्यात सर्वव्दितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे.

संदर्भ क्रं.०२ व ०३ नुसार शासनानी आपल्या संस्थेचे प्राचार्य यांची जानेवारी २०१२ मध्ये लुधियाना (पंजाब) येथे होणाऱ्या ४८ व्या अखिल भारतीय कौशल्य स्पर्धा परीक्षेसाठी राज्यातुन पात्र ठरलेल्या ०४ ट्रेडच्या प्रशिक्षणार्थ्यांचे 'संरक्षक (Escort)' म्हणून नियुक्ती करुन संचालनालयाचे प्रतिनीधी म्हणून काम करण्याची जबाबदारी आपल्या संस्थेवर सोपवली आहे.संदर्भ कं.०४ नुसार परीक्षा पार पडणार आहेत.

<u>संस्थेशी संबधित राष्ट्रीय कौशल्य स्पर्धा कार्यक्रम खालील प्रमाणे:-</u>

| अ.नं | सर्वप्रथम प्रशिक्षणार्थी | ट्रेड | औ.प्र.संस्था | परीक्षा केंद्र | पाठवावयाचे निदे. | शासन नियुक्त संरक्षक |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | रोकडे अश्विनकुमार रमेश | आर.ए. सी | शिर्डी | ए.टी.आय. हावडा | पी.आर.जोशी | डी.एस.जाधव, उपप्राचार्य, शा. औ.प्र.संस्था, नाशिक |
| ०२ | धनवटे सुनिल लुईस | टर्नर | शिर्डी | ए.टी.आय. लुधियाना | जे.के.घाडगे | एस.बी.पटणे, प्राचार्य, श्री साईबाबा औ.प्र.केंद्र, |
| | पेटारे योगेश माधव | इलेक्ट्रीशियन | शिर्डी | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | जाधव विजय संजय | मशिनिष्ट | कोल्हापूर | पंजाब) | एस एस.चौधरी | शिर्डी. |
| | थिक अविनाश अनंत | मोटार मेकॅ. | रत्नागिरी | | | |

संबधित व्यवसायाचे व्यवसाय-विषय- गटनिदेशक तसेच संस्थेतील 'कौशल्य स्पर्धा पुर्वतयारी समिती' यांची एकत्रित मेहनत, प्रशासन व व्यवस्थापन यांचेकडून वेळोवेळी मिळालेली मदत,मार्गदर्शन व खंबीर पाठींबा यातून हे नेत्रदिपक यश प्राप्त होऊ शकले. असे प्राचार्य यांनी कळविले आहे. औ.प्र. संस्थेच्या यशाची माहिती मा.व्यवस्थापन समितीसमोर अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.११९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

---

**विषय नं.११९ कर्मचाऱ्यांचे आगमन -निर्गमन वेळेकरीता बसविणेत आलेल्या फिंगर प्रिंट सिस्टीम (बायोमेट्रीक) मशिन्सचे वार्षिक देखभाल सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे बाबत**

**प्रस्ताव-** मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांचेकडून संस्थान कर्मचाऱ्यांचे आगमन-निर्गमन वेळेची नोंद होणेकरीता ०७ नग फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् माहे मे-जुन २००६ मध्ये अनुक्रमे ०१) प्रशासन शाखा (शांतीनिवास इमारत), ०२) चौकशी व निवासस्थान कार्यालय, ०३) श्री साईबाबा हॉस्पीटल, ०४) श्री साईनाथ हॉस्पीटल, ०५) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, ०६) आय.टी.आय., ०७) मुंबई कार्यालय या ठिकाणी इन्स्टॉल करुन (बसवून) देणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांचेकडून अनुक्रमे मंदिर व संरक्षण विभागातील कर्मचाऱ्यांसाठी- ०१ व नविन श्री साई प्रसादालयातील कर्मचाऱ्यांसाठी-०१ असे एकूण ०२ नग फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् माहे नोव्हेंबर-२००८ मध्ये बसविणेत आलेले आहेत. या व्यतिरिक्त मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांचेकडून दक्षिणा पेटी मोजणी हॉल करीता आणखी एक (बायोमेट्रीक फिंगर प्रिंन्ट अटेंडन्स) मशीन माहे एप्रिल-२०१० मध्ये बसविणेत आलेले आहे.

अशाप्रकारे एकूण-१० ठिकाणी बसविणेत आलेल्या फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्सद्वारे संस्थान कर्मचाऱ्यांच्या आगमन-निर्गमन वेळेची नोंद केली जात आहे. पैकी माहे मे-जून २००६ मध्ये बसविणेत आलेल्या ०७ नग फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्सचा वॉरंटी कालावधी दि.२३-०५-२००९ अखेर संपुष्टात आला. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७-११-२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८६२ नुसार सदर ०७ नग बायोमेट्रीक फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम मशिन्स व टाईम ॲन्ड अटेंडन्स सॉफटवेअरचे वार्षिक देखभाल सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट रूपये २०, ०००/- प्रतिनग याप्रमाणे एकूण रूपये १, ४०, ०००/- (अक्षरी रूपये एक लाख चाळीस हजार) मात्र या दराप्रमाणे प्रतिवर्षी मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांना देणेत आलेले आहे.

माहे नोव्हेंबर-२००८ मध्ये मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांचेकडून अनुक्रमे संरक्षण व श्री साई प्रसादालय या ठिकाणी बसविणेत आलेल्या ०२ (बायोमेट्रीक फिंगर प्रिंन्ट अटेंडन्स) मशीन्सचा वारंटी कालावधी दि.०१-१०-२००८ पासून ते दि.३०-०९-२०११ अखेर असा ०३ वर्षाचा होता. मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई या कंपनीने तीन वर्षाचे वॉरंटी पिरियडमध्ये वेळोवेळी त्यांचा प्रतिनिधी संस्थानमध्ये पाठवून फिंगर प्रिन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स व सॉफ्टवेअरची देखभाल, दुरूस्तींची कामे चांगल्याप्रकारे करून दिलेली आहेत. सदर वॉरंटी कालावधी दि.३०-०९-२०११ रोजी संपलेला आहे.

म्हणून मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांनी उपरोक्त प्रमाणे माहे नोव्हेंबर-२००८ मध्ये बसविणेत आलेल्या ०२ फिंगर प्रिन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स्चे दि.०१-१०-२०११ ते दि.३०-०९-२०१२ या एक वर्ष कालावधीकरीता, वार्षिक देखभाल सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (ॲन्युअल मेन्टेंनन्स कॉन्ट्रॅक्ट) संदर्भात दि.१९-०९-२०११ रोजीचे पत्रान्वये कोटेशन सादर केलेले आहे. सदर कोटेशनप्रमाणे त्यांनी ०२ फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स व टाईम ॲन्ड अटेंन्डन्स सॉफ्टवेअरचे वार्षिक देखभाल सर्व्हिस (ॲन्युअल मेन्टेंनन्स कॉन्ट्रॅक्ट) कामी रूपये २०,००० प्रति मशिन नग याप्रमाणे एकूण रूपये ४०, ००० (अक्षरी रूपये चाळीस हजार) मात्र सर्व्हिस टॅक्स धरून रक्कम मिळावी अशी विनंती केली आहे. मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांनी सदर वार्षिक देखभाल सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (ॲन्युअल मेन्टेंनन्स कॉन्ट्रॅक्ट) च्या जनरल अटी व शर्ती खालीलप्रमाणे दिलेल्या आहेत.

**GENERAL TERMS & CONDITIONS-**

- This contract will be a comprehensive service contract.
- The Contract excludes Power Adaptor/Display parts.
- 12 months service support for the contract period mentioned in work order.
- The immediate support will be telephonic or through mail or through remote login to your system.
- Service turn-a-round time will be within 24 hrs if required, reported by authorized person from IT Department or Labour department.

- ❖ There will be single point contact with your IT person and all the quires will be reported by your authorized IT Person to Alacrity Techonologies.
- ❖ Provision of stand-by biometric finger print reader. This service will be provided free of cost but at your risk in the event of the technical failure of the product.
- ❖ The provision of stand-by unit will free of cost but at your risk.
  The standby unit will be the sole property of M/s Alacrity Technologies Pvt.Ltd & will be billed, if returned with any physical damage of Non-working condition.
- ❖ The following cases will be excluded from the service contract.
  1. Physical damage of the product and its components.
  2. Product damage in case of fire, flood, short-circuit, electrical problems.
- ❖ No warranty on physically damaged or burnt parts.
- ❖ Civil, Cabling, Carpentry & providing power points & NETWORK points are not in our scope.
- ❖ All network related and database related support activities such as Backups, Maintenance of the Database are not in our scope, All network related, Database related activites should be provided by Sansthans IT department.
- ❖ Further Value Added Services-Monthly visit of an engineer can be provided for the contract period, Subject to provision of free accommodation by the Sansthan.

सबब, उपरोक्तप्रमाणे मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि., मुंबई यांना माहे नोव्हेंबर-२००८ मध्ये बसविणेत आलेल्या ०२ फिंगर प्रिन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स व टाईम अॅन्ड अटेंन्डन्स सॉफ्टवेअरचे दि.०१-१०-२०११ ते दि.३०-०९-२०१२ या एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक देखभाल सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (अॅन्युअल मेन्टेंनन्स कॉन्ट्रॅक्ट) देणेबाबत, व सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कामी रक्कम रूपये २०,००० प्रतिनग याप्रमाणे एकुण रूपये ४०,०००/- (अक्षरी रूपये चाळीस हजार) मात्र सर्व्हिस टॅक्स धरून मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि., मुंबई यांना अदा करणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१२० **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि., मुंबई यांना माहे नोव्हेंबर-२००८ मध्ये बसविणेत आलेल्या ०२ फिंगर प्रिन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स व टाईम अॅन्ड अटेंन्डन्स सॉफ्टवेअरचे दि.०१-१०-२०११ ते दि.३०-०९-२०१२ या एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक देखभाल सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (अॅन्युअल मेन्टेंनन्स कॉन्ट्रॅक्ट) देणेबाबत, व सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कामी रक्कम रूपये २०,००० प्रतिनग याप्रमाणे एकुण रूपये ४०,०००/- (अक्षरी रूपये चाळीस हजार) मात्र सर्व्हिस टॅक्स धरून मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि., मुंबई यांना आदा करणेत यावे. तसेच प्रचलित दराप्रमाणे प्रती वर्षी एकूण रुपये ४०,०००/-कॉन्ट्रॅक्ट रक्कम त्यांना मान्य असल्यास, यापुढे दरवर्षी वार्षिक देखभाल सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे नुतनीकरण करणेस व त्याकामी प्रतीवर्षी एकूण रक्कम रुपये ४०,०००/- मात्र सर्व्हिस टॅक्स धरुन त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१२० श्री देवीदास दगडू अडांगळे, सफाई कामगार आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत**

**प्रस्ताव-** श्री.देविदास दगडु अडांगळे, सफाई कामगार, आरोग्य विभाग हे दि.०६-०३-१९८९ पासून संस्थान सेवेत वर्ग ४ चे कर्मचारी म्हणून काम करीत आहेत. श्री.अडांगळे हे आरोग्य विभागात सफाई कामगार म्हणून कार्यरत असतांना त्यांचेकडून दि.२८-५-२०१० ते दि.२०-०१-२०११ या कालावधीत खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन घडलेले आहे.

श्री.देविदास दगडु अडांगळे, सफाई कामगार, आरोग्य विभाग हे दि.२८-०५-२०१० ते दि.३१-०५-२०१०, दि.०४-०६-२०१० ते दि.२१-०६-२०१०, दि.२२-०६-२०१०, दि.२९-०६-२०१० ते दि.३०-०६-२०१०, दि.१०-०७-२०१०, दि.२६-०७-२०१० ते दि.२८-०७-२०१०, दि.०९-०८-२०१० ते दि.१२-०८-२०१०, दि.१६-०८-२०१० ते दि.२०-०८-२०१०, दि.२१-०८-२०१० ते दि.२३-०८-२०१०, दि.२४-०८-२०१०, दि.१२-१०-२०१०, दि.२५-१०-२०१०, दि.२३-११-२०१०, दि.२७-११-२०१० ते दि.२९-११-२०१०, दि.०४-१२-२०१०, दि.११-१२-२०१० ते दि.२०-१२-२०१०, दि.२१-१२-२०१० ते दि.२०-०१-२०११ व दि.२१-०१-२०११ ते दि.०३-०२-२०११ या कालावधीत **९९ दिवस** पुर्व परवानगीशिवाय व रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले आहे. त्यामुळे कामाची गैरसोय झाली. श्री.अडांगळे यांना विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहण्याची सवयच झालेली आहे. असे प्र.आरोग्य विभाग प्रमुख यांची निवेदने प्राप्त झालेली आहे. श्री.अडांगळे यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून, गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते.

म्हणून उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.अडांगळे यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३६६९/२०१० दि.३०-०६-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४१३८/२०१० दि.३१-०७-२०१०, जा.नं. एसएसएस/वशी-७ए/४२९८/२०१० दि.११-०८-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४५०३/२०१० दि.२८-०८-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४६२०/२०१० दि.०३-०९-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४६२६/२०१० दि.०३-०९-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५६९९/२०१० दि.१६-११-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५५३६/२०१० दि.३०-१०-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६५२३/२०१० दि.३०-१२-२०१०, जा.नं. एसएसएस/वशी-७ए/६९३०/२०११ दि.२७-०१-२०११ अन्वये कारणे दाखवा नोटीसा काढून, त्यांचे लेखी खुलासे मागविणेत आले होते. तथापि, श्री.अडांगळे यांना सदर कारणे दाखवा नोटीसा अनुक्रमे दि.०२-०७-२०१०, दि.०२-०८-२०१०, दि.१३-०८-२०१०, दि.३१-०८-२०१०, दि.०६-०९-२०१०, दि.०६-०९-२०१०, दि.१८-११-२०१० रोजी प्राप्त होऊन देखील त्यांनी लेखी खुलासे सादर केलेले नाहीत. यावरून सदर गैरशिस्त वर्तन केल्याचे त्यांना मान्य असल्याचे दिसून येते.

म्हणून श्री.अडांगळे यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/७१७७/२०११ दि.१४-०२-२०११ अन्वये आरोपपत्र देवून, त्यांचेवर दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडिंग ऑर्डर्स) ॲक्ट, १९४६ चे कलम क्र.२४ (एफ) प्रमाणे नेहमी नेहमी रजेशिवाय गैरहजर राहणे किंवा रजेशिवाय सलग १० पेक्षा जास्त दिवस गैरहजर राहणे., कलम क्र.२४ (एल) आस्थापनेच्या जागेत शिस्तीला व सद्वर्तनाला बाधक ठरेल असे कोणतेही कृत्ये करणे याप्रमाणे आरोप ठेवण्यात आले होते.

श्री.देविदास दगडु अडांगळे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे विरूध्द दि.१४-०२-२०११ रोजी ठेवणेत आलेल्या आरोप पत्रातील आरोपांची खातेचौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगांव, खाते चौकशी अधिकारी यांनी पूर्ण करून, त्यांचा दि.२५-०८-२०११ रोजीचा खाते चौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केला आहे. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढलेला आहे.

## आदेश-

श्री.देविदास दगडु अडांगळे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचेवर ठेवलेले आरोप शाबीत झ ाल्याने ते दोषी आहेत. श्री.अडांगळे यांनी दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडिंग ऑर्डर्स) ॲक्ट, १९४६ मधील मॉडेल स्टॅंडींग ऑर्डर्स कलम २४(एफ), २४(एल) चा भंग केल्याने ते दोषी आहेत.

श्री.देविदास दगडु अडांगळे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांनी यापूर्वी केलेल्या गैरशिस्त वर्तनाचा तपशिल व त्यांना यापूर्वी करणेत आलेल्या शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.अडांगळे हे दि.१३-०८-२००८ ते दि.२०-०८-२००८ अखेर या कालावधीत विनापरवानगी कामावरून गैरहजर राहीले म्हणून त्यांना दि.१६-०५-२००८ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

२) श्री.अडांगळे हे दि.२१-०१-२००८ ते दि.०४-०२-२००८, दि.०६-०२-२००८, दि.११-०२-२००८, दि.१८-०२-२००८, दि.१९-०२-२००८, असे १९ दिवस विनापरवानगी कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१६-०५-२००८ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

३) श्री.अडांगळे हे दि.१२-०५-२००८ ते दि.२५-०५-२००८ अखेर या कालावधीत विनापरवानगी कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

४) श्री.अडांगळे हे दि.२४-०७-२००९ ते दि.०२-०८-२००९ या कालावधीत विनापरवानगी कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१७-०९-२००९ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

५) श्री.अडांगळे हे दि.१८-१०-२००९ ते दि.२५-१०-२००९ अखेर या कालावधीत विनापरवानगी कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२३-११-२००९ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

६) श्री.अडांगळे हे दि.२८-०१-२०१० ते दि.१२-०२-२०१० अखेर या कालावधीत विनापरवानगी कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२५-०३-२०१० रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

७) श्री.अडांगळे हे दि.१०-१२-२००९ ते दि.१६-१२-२००९ या कालावधीत विनापरवानगी कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.३०-०१-२०१० रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

८) श्री.अडांगळे हे दि.०९-०९-२०१०ते दि.१३-०९-२०१०, दि.१५-०९-२०१०, दि.१७-०९-२०१० ते दि.२०-०९-२०१० या कालावधीत विनापरवानगी कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०१-११-२०१० रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

९) श्री.अडांगळे हे दि.२९-०९-२०१० रोजी विनापरवानगी कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१०-११-२०१० रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

१०) श्री.अडांगळे हे दि.२१-०२-२०११ ते दि.०९-०३-२०११ अखेर या कालावधीत विनापरवानगी कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२२-०४-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

११) श्री.अडांगळे हे दि.२०-०५-२०११ रोजी विनापरवानगी कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

१२) श्री.अडांगळे हे दि.१०-०६-२०११ रोजी विनापरवानगी कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२५-०८-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

अशाप्रकारे श्री.अडांगळे यांना यापूर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत एकूण १२ वेळा शिक्षा झालेली असून, त्यांचे सेवेत व वर्तनात सुधारणा होत नसल्याचे दिसून येते.

त्याचप्रमाणे श्री.अडांगळे हे पुन्हा दि.२०-०७-२०११ ते दि.२१-०७-२०११, दि.२५-०७-२०११ ते दि.२८-०७-२०११, तसेच दि.०५-०८-२०११ पासून ते आज अखेरपर्यंत **१०८ दिवस** सतत, दिर्घकाळ विनापरवानगी व रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले आहेत. त्यामुळे कामाची गैरसोय होत आहे. त्यांना विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहण्याची सवयच झालेली आहे. म्हणून श्री.अडांगळे यांना पुन्हा जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३५४६/२०११ दि.०७-११-२०११ अन्वये दुसरे आरोपपत्र देवून, खातेचौकशीचे कामकाज चालु करणेत आले आहे.

श्री.अडांगळे यांचे विरुध्द गैरशिस्त वर्तनाबाबत ठेवणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोप सिध्द झालेले आहेत. आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेल्या अथवा दोषी आढळुन आलेल्या कर्मचा-यास गैरशिस्त वर्तनाबाबत दि.बॉम्बे इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅडींग ऑर्डर्स) रुल्स १९५९ चे कलम २५ (१) अन्वये खालीलप्रमाणे शिक्षा करणेची तरतुद आहे.

**अ)** ताकीद द्यावी किंवा ठपका द्यावा.

**ब)** पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, १९३६ हयाच्या तरतुदींच्या मर्यादेत राहुन आणि त्यानुसार दंड करावा. (एकुण वेतनाचे ३% इतका दंड)

**क)** चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीच्या लेखी आदेशाने सस्पेंड करावे.

**ड)** नोटीशी शिवाय बडतर्फ (डिसमीस) करावे.

सबब, श्री.देविदास दगडु अडांगळे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, व ते खातेचौकशीत दोषी आढळुन आलेले असल्याने, त्यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत उपरोक्त नमुद केलेल्या चार शिक्षेंपैकी **ड** प्रमाणे संस्थान सेवेतून नोटीशीशिवाय कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.१२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.देविदास दगडु अडांगळे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, व ते खातेचौकशीत दोषी आढळुन आलेले असल्याने, त्यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत नियमाप्रमाणे प्रथम त्यांचे विरुद्ध ठेवणेत आलेल्या आरोप पत्रातील आरोपांचे गांभिर्य विचारात घेता, त्यांना संस्थानचे सेवेतून बडतर्फ (डिसमीस) का करण्यात येऊ नये अशी सेकंड शो-कॉज नोटीस देण्यात यावी. त्यानंतर श्री.अडांगळे यांनी सदर नोटीशीस मुदतीत लेखी खुलासा सादर न केल्यास, अथवा श्री.अडांगळे यांनी दिलेला लेखी खुलासा असमाधनकारक आढळून आल्यास श्री अडांगळे यांना उपरोक्त ड प्रमाणे संस्थान सेवेतून नोटीशीशिवाय कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१२१** **श्री जगन्नाथ कारभारी गोंदकर, मदतनीस श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग यांचे सतत, सलग व दिर्घकाळ गैरहजेरीबाबत**

**प्रस्ताव-** श्री.जगन्नाथ कारभारी गोंदकर हे दि.०१-०९-१९८४ पासून वर्ग ४ चे कर्मचारी म्हणून संस्थान सेवेत आहेत. श्री.गोंदकर हे संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग येथे मदतनीस म्हणून कार्यरत असतांना त्यांनी दि.१५-१२-२००७ पासून ते दि.३१-०५-२०१० अखेर या कालावधीत एकूण-८९९ दिवस विनावेतन रजा अधिक्षक, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग यांचेकडून वेळोवेळी मंजूर करून घेऊन, दीर्घकाळ सलग विनावेतन रजेवर राहिले होते. सदर कालावधीत श्री.गोंदकर हे एकही दिवस कामावर हजर नव्हते. त्यांचे दीर्घकाळ व सततचे विनावेतन रजेमुळे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान

विभागातील दैनंदिन कामामध्ये अडचणी निर्माण झालेल्या आहेत. तसेच श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागातील कामकाजावर परिणाम होवून,कामाची गैरसोय झालेली आहे.

असे असतांनाही श्री.गोंदकर यांनी पुन्हा दि.३१-०५-२०१० रोजीचे रजा अर्जान्वये रजेबाबत कुठलेही कारण न देता, दि.०१-०६-२०१० ते दि.३०-०६-२०१० अशी ३० दिवस, दि.२९-०६-२०१० रोजीचे रजा अर्जान्वये हॉटेल बांधकामासाठी दि.०१-०७-२०१० ते दि.३१-०८-२०१० अशी ६२ दिवस व दि.३१-०८-२०१० चे रजा अर्जान्वये दि.०१-०९-२०१० ते दि.३१-१२-२०१० अखेर १२२ दिवस अर्जित रजेची मागणी केलेली आहे. तथापि, श्री.गोंदकर यांची अर्जित रजा शिल्लक नसल्यामुळे दि.०१-०६-२०१० ते दि.३१-१२-२०१० अखेर या कालावधीतील त्यांची अर्जित रजा नामंजूर करणेत आलेली आहे. तशी श्री.गोंदकर यांना श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग प्रमुख यांचे मार्फत वेळोवेळी समक्ष सुचना देखील देणेत आलेली होती. तसेच रजा नामंजूर केलेबाबत श्री.गोंदकर यांना जा.क्र.एसएसएस/ वशी७ए/ ४६५०/ २०१० दि.०६-०९-२०१० व जा.क्र.एसएसएस/वशी७ए/४८०९/२०१० दि.१७-०९-२०१० अन्वये कारणे दाखवा नोटीसा काढुन, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. तथापी, श्री.गोंदकर यांनी सदर कारणे दाखवा नोटीसा अनुक्रमे दि.१०-०९-२०१० व दि.२७-०९-२०१० रोजी प्राप्त होवून देखील, लेखी खुलासे सादर केलेले नाही व ते कामावर देखील हजर/रुजु झाले नाहीत. यावरुन सदर गैरशिस्त वर्तन केल्याचे त्यांना मान्य आहे असे दिसुन येते.

त्यानंतर श्री.गोंदकर हे दि.०१-०१-२०११ ते दि.२५-०१-२०११ अखेर या कालावधीत २५ दिवस विनापरवानगी, रजा अर्ज मंजूर करून न घेता, दिर्घकाळ कामावरून गैरहजर राहीले आहेत. म्हणुन त्यांना अनुक्रमे जा.क्र.एसएसएस/वशी-७ए/६७१४/२०११ दि.१२-०१-२०११, जा.क्र.एसएसएस/वशी-७ए/ ११७३८/ २०११ दि.२१-०१-२०११,जा.क्र.एसएसएस/वशी-७ए/ ११८५४/ २०११ दि.२८-०१-२०११ व जा.क्र.एसएसएस/ वशी-७ए/ ११८८४/२०११ दि.०१-०२-२०११ अन्वये कारणे दाखवा नोटीसा काढुन, त्यांचे लेखी खुलासे मागविणेत आले होते. तथापी, श्री.गोंदकर यांनी दि.१२-०१-२०११ व दि.०१-०२-२०११ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसा स्वीकारलेल्या नाहीत. तसेच दि.२१-०१-२०११ व दि.२८-०१-२०११ रोजीची कारणे दाखवा नोटीसा श्री.गोंदकर यांना अनुक्रमे दि.२५-०१-२०११ व दि.३१-०१-२०११ रोजी प्राप्त होवून देखील त्यांनी लेखी खुलासे सादर केलेले नाही. श्री.गोंदकर यांनी दि.२६-०१-२०११ रोजीचे रजा अर्जान्वये दि.२६-०१-२०११ ते दि.३१-१२-२०११ अखेर या कालावधीतील ३४० दिवस अर्जित रजा हॉटेल बांधकामाकरीता मिळावी अशी मागणी केली होती. तथापि, अर्जित रजा शिल्लक नसल्यामुळे श्री.गोंदकर यांनी मागणी केलेली दि.२६-०१-२०११ ते दि.३१-१२-२०११ या कालावधीची ३४० दिवस अर्जित रजा नामंजुर करणेत आलेबाबत त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/११८८४/२०११ दि.०१-०२-२०११ रोजीचे कारणे दाखवा नोटीशी अन्वये लेखी कळविणेत आलेले आहे. तरी देखील श्री.गोंदकर हे कामावर हजर न होता दि.०४-११-२०११ अखेरपर्यंत विनापरवानगी गैरहजर राहीले आहेत.श्री.गोंदकर हे कामावर हजर न झाल्यामुळे त्यांना पुन्हा जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१०८०/२०११ दि.१०-०६-२०११ व जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ३९९२/२०११ दि.०४-११-२०११ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटीस काढून त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. तथापि, सदर कारणे दाखवा नोटीसा श्री.गोंदकर यांना अनुक्रमे दि.१६-०६-२०११ व दि.०९-११-२०११ रोजी प्राप्त होवून देखील त्यांनी लेखी खुलासा सादर केलेला नाही. तसेच ते कामावर देखील हजर/रुजू झालेले नाहीत. त्यामुळे साईभक्तांना सेवा देणेस अडचणी निर्माण होवुन, कामांची गैरसोय झाली आहे व सध्या देखील कामाची गैरसोय होत आहे.

उपरोक्तप्रमाणे श्री.गोंदकर हे दि.०१-०६-२०१० पासून ते दि.०४-११-२०११ अखेर पर्यंत ५२१ दिवस व दि.०५-११-२०११ पासून ते आज पावेतो विनापरवानगी, रजा अर्ज मंजूर करून न घेता, दिर्घकाळ कामावरून गैरहजर राहीले आहेत. यावरून त्यांना संस्थान सेवेची/नोकरीची आवश्यकता व गरज नाही. तसेच त्यांना संस्थानच्या सेवेमध्ये/कामामध्ये स्वारस्य नसल्याचे दिसून येते. अशाप्रकारे श्री.गोंदकर यांनी विनापरवानगी व रजा अर्ज मंजूर करून न घेता, सतत, सलग व दिर्घकाळ गैरहजर राहून गंभीर स्वरूपाचे गैरशिस्तवर्तन केलेले आहे.

सबब, श्री.जगन्नाथ कारभारी गोंदकर, मदतनीस, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग यांना नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतनाइतकी रक्कम नोटीस-पे म्हणून अदा करून, त्यांना संस्थान सेवेतून कायम स्वरूपी सेवामुक्त (टर्मिनेट) करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.१२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.जगन्नाथ कारभारी गोंदकर, मदतनीस, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग यांना नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतनाइतकी रक्कम नोटीस-पे म्हणून अदा करून, त्यांना संस्थान सेवेतून कायम स्वरूपी सेवामुक्त (टर्मिनेट) करण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१२२ श्री सुनिल भाऊसाहेब मोगले, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत**

**प्रस्ताव-** श्री.सुनिल भाऊसाहेब मोगले, मदतनीस, कॅन्टीन विभाग हे दि.०५-१२-२००६ पासून संस्थान सेवेत वर्ग ४ चे कर्मचारी म्हणून काम करीत आहेत. श्री.मोगले हे कॅन्टीन विभागात मदतनीस म्हणून कार्यरत असतांना त्यांचेकडून दि.०९-०६-२०१० ते दि.०४-०२-२०११ या कालावधीत खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन घडलेले आहे.

श्री.सुनिल भाऊसाहेब मोगले, मदतनीस, कॅन्टीन विभाग हे दि.०९-०६-२०१० ते दि.१७-०६-२०१०, दि.१८-०६-२०१० ते दि.२०-०६-२०१०, दि.०३-०७-२०१० ते दि.१०-०७-२०१०, दि.११-०७-२०१० ते दि.२०-०७-२०१०, दि.२१-०७-२०१० ते दि.०६-०८-२०१०, दि.०७-०८-२०१० ते दि.१३-०८-२०१०, दि.१४-०८-२०१० ते दि.२५-०८-२०१०, दि.२६-०८-२०१० ते दि.२५-०९-२०१०, दि.२६-०९-२०१० ते दि.२०-१०-२०१०, दि.२१-१०-२०१० ते दि.२०-११-२०१०, दि.२१-११-२०१० ते दि.०४-०२-२०११ या कालावधीत **एकूण-२२९** दिवस पुर्व परवानगीशिवाय व रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले आहेत. त्यामुळे कामाची गैरसोय झाली. श्री.मोगले यांना विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून सतत, सलग व दिर्घकाळ गैरहजर राहण्याची सवयच झालेली आहे. असे प्र.अधिक्षक कॅन्टीन विभाग यांची निवेदने प्राप्त  झालेली आहे. श्री.मोगले यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून, गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते.

म्हणून उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.मोगले यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/७९२५/२०१० दि.१९-०६-२०१०,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/८०६९/२०१० दि.३०-०६-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/८३८९/२०१०दि.१६-०७-२०१०,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/८५८३/२०१० दि.२३-०७-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/८९२९/२०१० दि.११-०८-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/९०३५/ २०१० दि.१६-०८-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/९१०७/२०१० दि.२८-०८-२०१०, जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/९६२३/२०१० दि.२९-०९-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१०२३१/२०१० दि.०१-११-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५९४६/२०१० दि.०३-१२-२०१० अन्वये कारणे दाखवा नोटीसा काढून, त्यांचे लेखी खुलासे मागविणेत आले होते. त्यास अनुसरून श्री.मोगले यांनी दि.०७-०९-२०१० रोजी चार व दि.०४-११-२०१० रोजीचे लेखी खुलासे सादर केले असून, सदर लेखी खुलासे असमाधानकारक असल्याचे दिसून येते.

म्हणुन श्री.सुनिल भाऊसाहेब मोगले, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/७२२४/२०११ दि.१५-०२-२०११ अन्वये आरोपपत्र देवुन, त्यांचेवर दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडिंग ऑर्डर्स) ॲक्ट, १९४६ चे कलम क्र.२४ (एफ) प्रमाणे नेहमी नेहमी रजेशिवाय गैरहजर रहाणे किंवा रजेशिवाय सलग १० पेक्षा जास्त दिवस गैरहजर रहाणे., कलम क्र.२४ (एल) आस्थापनेच्या जागेत शिस्तीला व सद्वर्तनाला बाधक ठरेल असे कोणतेही कृत्ये करणे याप्रमाणे आरोप ठेवण्यात आले होते.

श्री.सुनिल भाऊसाहेब मोगले, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांचे विरूध्द दि.१५-०२-२०११ रोजी ठेवणेत आलेल्या आरोप पत्रातील आरोपांची खातेचौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगांव, खाते चौकशी अधिकारी यांनी पूर्ण करून, त्यांचा दि.२९-११-२०११ रोजीचा खाते चौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केला आहे. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढलेला आहे.

**आदेश-**

श्री.सुनिल भाऊसाहेब मोगले, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांना दि.१५-०२-२०११ रोजी दिलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झाल्याने ते दोषी आहेत. श्री.सुनिल भाऊसाहेब मोगले यांनी दि. इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडींग ऑर्डर्स) ॲक्ट, १९४६ खालील स्थायी आदेश क्रं.२४(एफ), २४ (एल) नुसार गैरवर्तन केले आहे.

श्री.सुनिल भाऊसाहेब मोगले, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांनी यापूर्वी केलेल्या गैरशिस्त वर्तनाचा तपशिल व त्यांना यापूर्वी करणेत आलेल्या शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.मोगले हे दि.२४-०२-२००८ रोजी विनापरवानगी रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.१६-०३-२००८ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ताकीद** देणेत आली.

२) श्री.मोगले हे दि.०६-०७-२००८ ते दि.२७-०७-२००८ अखेर विनापरवानगी रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.२३-०८-२००८ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ताकीद** देणेत आली.

३) श्री.मोगले हे दि.०४-०९-२००८ ते दि.१४-०९-२००८ रोजी विनापरवानगी रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.३०-१०-२००८ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ताकीद** देणेत आली.

४) श्री.मोगले हे दि.२८-०८-२००८ रोजी विनापरवानगी रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.३०-१०-२००८ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ताकीद** देणेत आली.

५) श्री.मोगले हे दि.१८-०१-२००९ रोजी विनापरवानगी रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.११-०२-२००९ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

६) श्री.मोगले हे दि.१३-०२-२००९ ते दि.२५-०२-२००९ अखेर विनापरवानगी रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.०८-०४-२००९ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

७) श्री.मोगले हे दि.१३-०७-२००९ ते दि.१४-०७-२००९ रोजी विनापरवानगी रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.०७-०८-२००९ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ताकीद** देणेत आली.

८) श्री.मोगले हे दि.१५-०४-२००९, दि.२२-०४-२००९ ते दि.२९-०४-२००९, दि.०९-०५-२००९ ते दि.१९-०५-२००९ व दि.३०-०५-२००९ या कालावधीत विनापरवानगी रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.२४-०८-२००९ रोजीचे आदेशान्वये संस्थान **सेवेतुन दोन दिवस तात्पुरते सेवा निलंबीत** करणेत आले.

९) श्री.मोगले हे दि.०१-०८-२००९ ते दि.११-०८-२००९, दि.१२-०८-२००९ ते दि.२०-०८-२००९, दि.२१-०८-२००९ ते दि.२५-०८-२००९ या कालावधीत विनापरवानगी रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.२८-०९-२००९ रोजीचे आदेशान्वये संस्थान **सेवेतुन चार दिवस तात्पुरते सेवा निलंबीत** करणेत आले.

१०) श्री.मोगले हे दि.०७-१२-२००९ ते दि.११-०१-२०१० या कालावधीत विनापरवानगी रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.१८-०१-२०१० रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून संस्थान **सेवेतुन चार दिवस तात्पुरते सेवा निलंबीत** करणेत आले.

११) श्री.मोगले हे दि.०७-०३-२०१०, दि.०९-०३-२०१० ते दि.२३-०३-२०१०,दि.२४-०३-२०१० ते दि.०५-०४-२०१०, दि.०६-०४-२०१० ते दि.१५-०४-२०१०, दि.१६-०४-२०१० ते दि.२७-०४-२०१० या कालावधीत विनापरवानगी रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.२७-०५-२०१० रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून संस्थान **सेवेतुन चार दिवस तात्पुरते सेवा निलंबीत** करणेत आले.

१२) श्री.मोगले हे दि.२१-०२-२०११ ते दि.२०-०३-२०११ या कालावधीत विनापरवानगी रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.१०-०६-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ताकीद** देणेत आली.

१३) श्री.मोगले हे दि.२१-०३-२०११ ते दि.०१-०४-२०११ या कालावधीत विनापरवानगी रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले म्हणुन त्यांना दि.२४-०६-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ताकीद** देणेत आली.

अशाप्रकारे श्री.मोगले यांना यापूर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत एकूण **१३ वेळा** शिक्षा झालेली असून, त्यांचे सेवेत व वर्तनात सुधारणा होत नसल्याचे दिसून येते.

श्री.मोगले यांचे विरुध्द गैरशिस्त वर्तनाबाबत ठेवणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोप सिध्द झालेले आहेत. आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेल्या अथवा दोषी आढळुन आलेल्या कर्मचा-यास गैरशिस्त वर्तनाबाबत दि.बॉम्बे इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅडींग ऑर्डर्स) रुल्स १९५९ चे कलम २५ (१) अन्वये खालीलप्रमाणे शिक्षा करणेची तरतुद आहे.

**अ)** ताकीद द्यावी किंवा ठपका द्यावा.

**ब)** पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, १९३६ हयाच्या तरतुदींच्या मर्यादेत राहुन आणि त्यानुसार दंड करावा. (एकुण वेतनाचे ३% इतका दंड)

**क)** चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीच्या लेखी आदेशाने सस्पेंड करावे.

**ड)** नोटीशी शिवाय बडतर्फ (डिसमीस) करावे.

सबब, श्री.सुनिल भाऊसाहेब मोगले, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, व ते खातेचौकशीत दोषी आढळुन आलेले असल्याने, त्यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत उपरोक्त नमुद केलेल्या चार शिक्षेंपैकी **ड** प्रमाणे संस्थान सेवेतून नोटीशीशिवाय कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.१२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.सुनिल भाऊसाहेब मोगले, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, व ते खातेचौकशीत दोषी**

**आढळुन आलेले असल्याने, त्यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत, नियमाप्रमाणे प्रथम त्यांचे विरुद्ध ठेवणेत आलेल्या आरोप पत्रातील आरोपांचे गांभिर्य विचारात घेता, त्यांना संस्थानचे सेवेतून बडतर्फ (डिसमीस) का करण्यात येऊ नये अशी सेकंड शो-कॉज नोटीस देण्यात यावी. त्यानंतर श्री.मोगले यांनी सदर नोटीशीस मुदतीत लेखी खुलासा सादर न केल्यास, अथवा श्री.मोगले यांनी दिलेला लेखी खुलासा असमाधनकारक आढळून आल्यास श्री.मोगले यांना उपरोक्त ड प्रमाणे संस्थान सेवेतून नोटीशीशिवाय कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१२३ सौ.मोनिका सतिष चव्हाण,परिचारिका श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत**

**प्रस्ताव-** सौ. मोनिका सतिष चव्हाण, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन केलेले असल्यामुळे जा. नं. एसएसएस/वशी ७बी/१२८८/२०१०. दि. १७/०४/२०१० अन्वये त्यांना संस्थान सेवेतुन खाते चौकशीसाठी तात्पुरते सेवा निलंबीत करण्यात आलेले होते. तसेच इकडील जा. नं. एसएसएस/ वशी ७बी/१४४८/२०१०. दि. २४/०४/२०१० अन्वये त्यांचेवर आरोपपत्र ठेवण्यात आलेले होते. जा. नं. एसएसएस/वशी ७बी/१४४९/२०१० दि. २४/०४/२०१० अन्वये सदरच्या आरोपपत्राचे खाते चौकशीकामी ॲड. बी. वाय. काळवाघे, कोपरगाव यांची खाते चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांनी नियमाप्रमाणे खाते चौकशी पूर्ण करुन दि. ०६/०९/२०१० रोजीचा निष्कर्ष अहवाल सादर केलेला आहे.

सौ.मोनिका सतिष चव्हाण या दि. १६/०४/२०१० रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या डयुटीत डिलक्स/ स्पेशल रुम येथे कामावर होत्या. सदर दिवशी सकाळी १० ते ११ च्या दरम्यान सौ. चव्हाण या त्यांची नेमुन दिलेली कामाची जागा विनापरवानगी, योग्य कारणाशिवाय सोडून TSR वॉर्ड मध्ये आल्या. सदर दिवशी TSR वॉर्ड मधील रुम नं. १० मध्ये श्री. संजय बबन गावडे, संस्थान कर्मचारी रुग्ण म्हणुन ॲडमीट होते. त्याच रुममध्ये श्री साहेबराव पंढरीनाथ कोबरणे या नावाचे रुग्ण ॲडमीट होते. श्री कोबरणे रुग्णास फक्त गोळयांच्या स्वरुपात औषधोपचार चालु होते. श्री गावडे या रुग्णास इंजेक्शन व गोळयांच्या स्वरुपात औषधोपचार चालु होते. सौ. मोनिका चव्हाण यांनी श्री कोबरणे यांची फाईल न बघता चुकीने श्री गावडे यांचे फाईलमध्ये लिहीलेली इंजेक्शने (Inj. Rantac, Inj. Emset, Inj. Voveron) श्री कोबरणे यांना दिली. वास्तविक सौ. चव्हाण यांनी श्री कोबरणे यांना इंजेक्शन देण्यापुर्वी त्यांच्या फाईलमधील ड्रगचार्ट बघणे आवश्यक होते. तसे न करता सौ. चव्हाण यांनी श्री कोबरणे या रुग्णास श्री गावडे यांची इंजेक्शन्स दिली.

ॲड. बी. वाय. काळवाघे, कोपरगाव खाते चौकशी अधिकारी यांनी चौकशी पूर्ण करुन दि. ०६/०९/२०१० रोजीचा निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढल्याचे नमुद केले आहे. सौ. मोनिका सतिष चव्हाण यांचेवरिल आरोप निर्विवाद शाबीत झ ााल्याने त्या दोषी आहेत.

इकडील जा. नं. एसएसएस/वशी ७बी/१७०/२०१० दि. ०५/१०/२०१० अन्वये सौ. चव्हाण यांना दि. ०५/१०/२०१० ते दि. ०८/१०/२०१० अखेर ४ दिवस संस्थान सेवेतुन तात्पुरते निलंबीत करण्यात आलेले आहे. दि. ०९/१०/२०१० पासुन सौ. चव्हाण पूर्ववत कामावर हजर झालेल्या आहेत. परंतु दि. २८/०८/२०११ रोजी मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. ६७३(४) खालील प्रमाणे झालेला आहे.

श्री साईबाबा रुग्णालयातील परिचारीका मोनिका सतिष चव्हाण (वक्ते) यांनी रुग्णास चुकीचे इंजेक्शनस दिले या प्रकरणी चौकशी करुन त्यांना चार दिवस सस्पेंड करण्यात येऊन कामावर हजर करुन घेण्यात आले आहे. हा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत सांगितले असतांनाही विषय सादर झालेला नाही. सबब सदरचा विषय व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करावा.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन सदरचा विषय दि. २४/०९/२०११ रोजी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्यात निर्णय क्र. ७३० असा झालेला आहे की, सदर प्रकरणी संस्थान कामगार कायदे सल्लागार ॲड. अशोकराव पाटील यांचा सल्ला घेऊन फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील उपरोक्त निर्णयास अनुसरुन, संस्थान कामगार कायदा सल्लागार ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी असा सल्ला दिला आहे की, एकदा सुनावणी होऊन शिक्षेची कार्यवाही झालेनंतर त्याबाबत पुन्हा विचार करता येणार नाही ती दुहेरी शिक्षा ठरेन व ते कायदेशिर दृष्टया योग्य नाही.

**निर्णय क्र.१२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१२४ श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी शिर्डी यांना गुरुस्थान मंदिराचे दक्षिण बाजुस संस्थान मालकीचे नगरपंचायत मिळकत नं.७०६ व सिटी सर्व्हे नं.२० मध्ये चालवत असलेल्या मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायास पुढील मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या साईभक्तांचे मोबाईल कॅमेरा मंदीर परिसराच्या बाहेर ठेवणेसाठी संस्थानने श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटीला गुरुस्थान मंदीराचे दक्षिण बाजूची खोली मा.व्यवस्थापन समितीचे दि. २७/०२/२०११ चे सभेतील विषय. नं. ५१ व निर्णय क्र. १७५ ने इतर अटी-शर्ती प्रमाणे मासिक परवाना फी रु. ४४००/- + इलेक्ट्रीक बील याप्रमाणे आकारणी करुन एक वर्षाचे मुदती करीता चालविण्यास देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सोसायटीस जा.नं. एसएसएस/ वशी- विधी /२९७/२०११ दि. ११/०४/२०११ चे आदेशाने दि. २०/०२/२०११ ते दि. १९/०२/२०१२ या कालावधी साठी गुरुस्थान मंदीराचे दक्षिणेकडील १ खोली देण्यात आलेली आहे. या कारणासाठी साईनाथ छाया तसेच इतर ठिकाणचे व्यवस्थे प्रमाणे व क्लोकरुम प्रमाणे मोबाईल कॅमेरा एका नगास रु. २/- प्रमाणे साई भक्तांकडून दर आकारणी करणेबाबत सोसायटीस कळविणेत आले होते. व त्याप्रमाणे सदर व्यवस्थेच्या बदल्यात सोसायटी भक्तांकडून प्रती मोबाईल , कॅमेरा ( एका नगास ) रु. २ प्रमाणे आकारणी करीत आहे. त्यांनी ऑगष्ट २०११ अखेर मासिक परवाना फी भरलेली आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज केडीट को-ऑप सोसायटीने दि.०१/०२/२०११ चे पत्राने साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी संस्थानचे गुरुस्थान मंदिराचे दक्षिण बाजूस संस्थानचे मालकीचे नगरपंचायत मिळकत नं.७०६ व सिटी सर्व्हे नं.२० मध्ये चालवत असलेल्या मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायाची मुदत दि १९/०२/२०११ रोजी पुर्ण होत आहे. तरी साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी सदर व्यवसाय संस्थेस पुढील पाच वर्षा करीता चालविण्यास मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे. मात्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ प्रमाणे ( शासनाचे परवानगी शिवाय ) १ वर्ष कालावधी पेक्षा जास्त कालावधीसाठी जागा वापरांस देता येत नाही. १ वर्षापावेतो मिळकत लिव्ह अँड लायसन्स तत्वावर वापरात देणेबाबत विचार करता येतो.

उपरोक्त बाब विचारांत घेवून गुरुस्थान मंदीराचे दक्षिणेकडील क्लोकरुम व्यवस्थेला श्री साई संस्थान एम्प्लॉईज केडीट को-ऑप सोसायटी यांना मागील अटी शर्ती प्रमाणेच, मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजे रु.४,४००/- + ४४०/- = ४,८४०/- मात्र आकारुन ११ महिने कालावधीसाठी ( दि. २०/०२/२०१२ ते दि. १९/०१/२०१३ पावेतो ) चालविण्यास देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सादर.

**निर्णय क्र.१२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी शिर्डी यांना गुरुस्थान मंदिराचे दक्षिण बाजुस संस्थान मालकीचे नगरपंचायत मिळकत नं.७०६ व सिटी सर्व्हे नं.२० मध्ये चालवत असलेल्या मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायास पूर्वीचेच अटी शर्ती प्रमाणे दिनांक २०.०२.२०१२ पासून पूढे ११ महिने कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर चालविण्यास देण्यास व त्यांचेकडून सध्या घेण्यात येत असलेल्या मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.१२५ साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील सोलर वॉटर हिटींग सिस्टीमव्दारे गरम पाणी वाटपास मुदतवाढ देणे बाबत**

**प्रस्ताव-** चेअरमन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.,शिर्डी यांनी, नविन भक्तनिवासस्थान (५००रुम) येथे चालवत असलेल्या स्नानगृह (गरमपाणी) या व्यवसायाची मुदत दि. ०५/१२/२०११ रोजी पुर्ण होत असल्याने सदर व्यवसाय पुढील पाच वर्षाकरीता चालविण्यास मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थानने, साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये (५०० खोल्या) येथे साईभक्तांची राहण्याची सोय केलेली आहे. सदर इमारतीत एकुण ४ विंग असुन एकुण ४९२ खोल्यांमध्ये अंदाजे २००० साईभक्तांची निवासाची सोय होते. साईभक्तांना स्नानाकरीता गरमपाण्याची सोय व्हावी म्हणुन दि.१३/१२/२००१ व नंतर दि.०१/०३/२००४ पासुन संस्थानने सोलर वॉटर हिटींग सिस्टीम उभारलेली आहे. त्यासाठी संस्थानने रु.३८,६०,०००/- एवढा खर्च केलेला आहे. सोलर वॉटर हिटींग सिस्टीमद्वारे ४ विंग्जसाठी ५४ हजार लिटर पाणी गरम होण्याची क्षमता असुन सदर पाणी ४,५०० लिटर क्षमतेच्या १२ टाक्यामध्ये साठविण्याची व्यवस्था केलेली आहे.

दि. २९-३०/०५/२००४ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन मंडळाच्या सभेत विषय नं.५६ निर्णय क्र. २६४ अन्वये, ठरावास अनुसरुन दि. ०१/०३/२००४ पासुन, भक्तनिवासस्थान इमारतीतील ४ विंगमधील खोल्याकरीता सोलर वॉटर हिटींग सिस्टीमद्वारे होणारे गरमपाणी प्रत्येक माळयावरील स्टोअर

रुम ते साईभक्तांच्या खोल्यांपर्यंत वितरणाची व्यवस्था व त्या अनुषंगिक खर्च याकरीता प्रती बादली, प्रती व्यक्ती, प्रती दिवशी रु.३/- (रुपये तीन मात्र) प्रमाणे जमा होणारे रक्कमेपैकी मा. चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.,शिर्डी यांना अर्धी रक्कम रु. १.५० पैसे मात्र याप्रमाणे प्रत्येक महिन्यानंतर अदा करण्यात येत आहे.

दि.२६/०३/२०११ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.२, निर्णय क्र - २०२ (०३) निर्णय क्र.६५. नुसार,यावर सविस्तर चर्चा होऊन, पुर्वीचेच अटी-शर्तीवर ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले. तसेच सोलर वॉटर हिटींग सिस्टीमद्वारे गरमपाणी वाटपाचा कालावधी पहाटे ३.०० ते दुपारी १२.०० असा ठेवण्यात यावा. असा ठराव मंजुर झालेला आहे.

प्रचलीत पद्धतीनुसार, लिव्ह ॲण्ड लायसेन्सी करारनामा रु.६००/- चे स्टॅम्प पेपरवर लायसेन्सॉर-श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व लायसेन्सी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.,शिर्डी यांचेमध्ये करारनामा दि. ०६/०१/२०११ ते दि. ०५/१२/२०११ अखेर (११ महिने) या कालावधीसाठी झाला असुन त्याची मुदत दि.०५/१२/२०११ रोजी संपुष्टात येणार आहे.

एक वर्ष किंवा अधिकची मुदतवाढ याबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील सोलर वॉटर हिटींग सिस्टीमव्दारे गरम पाणी वाटपास श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.,शिर्डी यांना दि.०६.१२.२०११ पासून पुढे पुर्वीचेच अटी-शर्तीवर ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.१२६** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि.,शिर्डी यांना चालविण्यात देण्यात आलेल्या मंदीर परिसरात व परिसराबाहेरील व्यवसायास मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** **०१)** शिर्डी येथे येणारे श्री साईबाबांचे भक्तांचे सोयीसाठी संस्थान परिसरात श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सो.लि.शिर्डी यांचेमार्फत कांही व्यवसाय चालविणेस परवानगी दिलेली आहे. मा. व्य.समितीचे दि. १०/०१/२०१० चे सभेतील विषय नं.८९, निर्णय क्र. १९२ अन्वये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सो.लि.शिर्डी स दि. ०१/०६/२००९ ते दि. ३१/०५/२०१० अखेर असे संस्थान जागेत/गाळ्यात चालविणेस मुदतवाढ देण्यात आली होती. दि. ३१/०५/२०१० रोजी सदर मुदत संपल्याने दि. ०४/०७/२०१० रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विषय नं. ७६ व निर्णय क्र.५९७ स अनुसरुन संस्थान परिसरात (मंदीर परिसराबाहेरील)खालील तक्त्यातील गाळे / स्टॉलचे व्यवसायास जा.क्र. एसएसएस / वशी / विधी / १२०९०/ २०११ दि. १४/०२/२०११ ने दि.०१/०६/२०१० ते दि. ३१/०५/२०११ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | कालावधी | मासिक भाडे | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | **कार पार्किग**<br>अ)नविन भक्तनिवासस्थान<br>ब ) धर्मशाळा ( २०० रुम ) | दि. ०१/०६/२०१० ते<br>दि. ३१/०५/२०११ | रु. ५१,८७६/-<br>रु. १२,९७१ /- | १) भक्तनिवास परिसर ( ५०० रुम )<br>२ ) धर्मशाळा परिसर ( २०० रुम ) |
| ०२ | **क्लोकरुम**<br>अ) सुलभ क्लोकरुम,<br>ब ) साईप्रसाद क्लोकरुम | दि. ०१/०६/२०१० ते<br>दि. ३१/०५/२०११ | रु. ५,६६३/-<br>**(एकत्रित फी )** | १) सुलभ शौचालय इमारत हॉल<br>२) जुने चौकशी कार्यालय शेजारी रुम |
| ०३ | **एस.टी.डी.बुथ**<br>अ) एस.टी.डी.-०१,<br>(सद्या प्रसाद विक्री )<br>ब) एस.टी.डी.-०२,<br>(सद्या जनरल स्टोअर्स व दुध स्टॉल ) | दि. ०१/०६/२०१० ते<br>दि. ३१/०५/२०११ | रु. २,३६३/-<br>रु. २,३६३/- | १) साईप्रसाद पॉ.हाऊस समोर स्टॉल<br>२) धर्मशाळा परिसर (२००रुम) गाळा |
| ०४ | **प्रसाद नॉव्हेल्टी**<br>अ) नॉव्हेल्टी स्टोअर नं.-३,<br>ब ) प्रसाद स्टोअर नं.०२, | दि. ०१/०६/२०१० ते<br>दि. ३१/०५/२०११ | रु. २,३६३/-<br>रु. २,३६३/- | १)धर्मशाळा कॅन्टीन जवळ गाळा नं. १ (२००रुम)<br>२)धर्मशाळ कॅन्टीन जवळ गाळा नं. २ (२००रुम) |
| ०५ | **दुध स्टॉल**<br>१) दुध स्टॉल नं.२,<br>२) दुध स्टॉल नं.५, | दि. ०१/०६/२०१० ते<br>दि. ३१/०५/२०११ | रु. २,३६३/-<br>रु. २,३६३/- | १) साईप्रसाद परिसर स्टॉल - स्टॉल<br>२) स्वागत कक्ष स्टॉल - स्टॉल |

**२)** श्री साई संस्थान ए.क्रे.को.ऑप. सोसायटी ही साईभक्तांकडून प्रति मोबाईल/कॅमेरा रु. २/- प्रमाणे व प्रति पादत्राणे जोडीस रु. १/- याप्रमाणे आकारणी करत असून प्रत्येक स्टॉलचे ठिकाणी

साधारणपणे प्रति दिवस रु. ४,०००/- ते ५,०००/- पर्यंत भरणा होत असतो. अशी चौकशीअंती माहिती मिळालेली आहे.

**३)** उपरोक्त गाळ्यांची वापराची परवानगी मुदत दि. ३१/०५/२०११ रोजी संपुष्टात येत असल्याने सोसायटीचे दि.०२/०४/२०११ रोजीचे मुदतवाढीचे विनंती अर्जावर दि.२४/०७/२०११ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं. ७२ सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ५६३ ने चर्चा होवून संस्थान मंदीर परिसरातील सोसायटीस देण्यात आलेले (इतर कांही गाळे )गाळे मंदीर परिसराबाहेर न हलविल्याने सदरहू प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आलेला आहे.

**४)** सोसायटीने मंदिर परिसराबाहेरील उपरोक्त व्यवसायाचे ठिकाणीच आणखी काही व्यवसाय वाढविले आहेत. साईभक्तांचे सेवेसाठी संस्थानचे वरीष्ठ पातळीवरील सुचनेनुसार प्रस्तुतचे व्यवसाय नव्याने व संलग्न सुरु आहेत. वाढीव व्यवसायाचा तपशील खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **व्यवसायाचे ठिकाण व नांव** | **व्यवसाय सुरु केल्याचे वर्ष** | **प्रस्तावीत लायसन्स फी, + डिपॉझीट** |
|---|---|---|---|
| ०१. | साईप्रसाद नं.१ चे पत्राशेडमध्ये-१) मोबाईल कॅमेरा क्लोकरुम, २) पादत्राणे गृह. | डिसेंबर २००८ | १) सन २००८-०९ साठी प्रति स्टॉल रु.१,०७४/-, २) सन २००९-१० साठी प्रति स्टॉल रु.२,१४८/-, ३) सन २०१०-११ साठी प्रति स्टॉल रु.२,३६३/-, ४) सन २०११-१२ साठी प्रति स्टॉल रु.५,५००/-, अशी आकारणेत यावी. तसेच लाईट बील व डिपॉझीट प्रति स्टॉलसाठी रु.१०,०००/- व आरसीसी रुमसाठी डिपॉझीट रु.५०,०००/- |
| ०२. | साईप्रसाद नं. १ चे रुम नं. १३-१४ मध्ये क्लोकरुम | आक्टोबर २०१० | |
| ०३. | साईउद्यान परिसर पिंपळवाडी रोडलगत-१) मोबाईल कॅमेरा क्लोकरुम, २) पादत्राणे गृह व इतर स्टॉल | मे २००९ | |
| ०४. | द्वारावती निवासस्थान गेटलगत क्लोकरुम - फायबर स्टॉल | जुलै २०१० | |

**५)** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सो.लि.शिर्डीस दि.२४/०७/२०११ मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील ठरावाची माहिती दि.०४/११/२०११ चे पत्राने देण्यात आलेली आहे. व मंदिर परिसरातील गाळे हलविण्यास विनंती केलेली आहे. परंतू त्यानंतरही सोसायटीने मंदिर परिसरातील गाळे हलविलेले नाहीत व त्या गाळयाचा वापर मंदिर परिसरात चालूच आहे. त्याचबरोबर उपरोक्त गाळ्यांचाही (दि.३१/०५/२०११ अखेर संपूष्टात आलेनंतरही) पुढील मुदतवाढीचा (दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२) विषय स्थगीत आहे.

उपरोक्त परिस्थितीचा विचार करता-

(अ) मंदिर परिसरातील गाळे न हलविल्यामुळे मंदिर परिसराबाहेरील इतर व्यवसायासाठीचे उपरोक्त गाळ्याचे ३१/०५/२०११ नंतरचे मुदतवाढीचे प्रस्ताव स्थगीत ठेवणेत आलेला आहे, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सो.लि.शिडी यांना मंदिर परिसराबाहेरील गाळ्यांचे कामी पुढील मुदतवाढ देणे असलेस दि.०१.०६.२०११ ते दि.३०/०४/२०१२ मुदतीत गाळे वापरांस देणे सोयीचे होईल, पूर्वीचेच अटी/शर्तीवर व (०१) कारपार्किंगचे मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन (१) न.भ.नि.स्थान रुपये ५७,०६४/- व (२) २०० रुम - धर्मशाळा रु. १४,२६८/- मासिक परवाना फी आकारणे. (लाईट बील वेगळे) दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ पावेतो लिव्ह अँड लायसन्स तत्वावर व्यवसाय चालविणेस परवानगी देणेबाबत. तसेच-

(०२) उर्वरीत प्रत्येक ठिकाणचे (१- सुलभ क्लोकरुम, २ - साईप्रसाद क्लोकरुम) व्यवसायास व प्रसाद नॉव्हेल्टी , एस.टी.डी. बुथ व दुध स्टॉल इ. साठी प्रत्येक स्टॉलला / गाळयाला मासिक परवाना फी रु.२,३६३/- ऐवजी इतर संस्थेचे स्टॉल प्रमाणे रु. ५,५००/- प्रति महा ( लाईट बील वेगळे ) आकारुन लिव्ह अँड लायसन्स तत्वावर पुढील मुदतवाढ देणेबाबत पुढील विचारार्थ व मान्यतेसाठी प्रस्ताव पुनःश्च सादर.

(ब) श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सो.लि.शिडीने नव्याने सुरु केलेले व्यवसायावर वर प्रस्तावित केलेले लिव्ह अँड लायसन्स फी, विद्युत बील व डिपॉझीट आकारुन नियमीत करणेबाबतचे निर्णयास्तव व विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.१२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नविन भक्त निवासस्थान व धर्मशाळा परिसरातील कारपार्कीग व्यवसायास सध्या असलेला मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करून (विद्युत आकार वेगळा) दिनांक १/६/२०११ ते ३१/५/२०१२ या कालावधीत लिव्ह अँन्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देण्यात यावी, तसेच मंदिर परिसरा बाहेरील क्लोकरुम,एस.टी.डी. बुथ, प्रसाद नोव्हहेल्टीज स्टोअर, दुध स्टॉल या साठी देण्यात आलेल्या प्रती गाळयास रु.२३६३/- ऐवजी इतर संस्थानचे स्टॉलप्रमाणे**

**प्रतिमाह रु.५५००/- (लाईट बील वेगळे ) परवाना फी आकारुन लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर दि.१/६/२०११ ते ३१/५/२०१२ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी. तसेच साई संस्थान एमप्लॉईज क्रेडीट को. सोसायटी यांनी साईप्रसाद नं.१ परिसरात तसेच साईउद्यान परिसरात व द्वारावती निवास्थान गेटलगत नव्याने सुरु केलेले मोबाईल कॅमेरा क्लोकरूम,पादत्रानगृहे इत्यादी साठी प्रस्तावीत केलेली लिव्ह अँन्ड लायसन्य फी, विद्युत बील व डिपॉझीटची आकारणी करून स्टॉल नियमीत करण्यात यावेत व या सर्व स्टॉलसाठी दिनांक ३१.०५.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले. त्याचबरोबर श्री साई संस्थान एमप्लॉईज क्रे.को-ऑप सोसायटी, शिर्डी यांनी मंदिर परिसरातील गाळे परिसराबाहेर हलविण्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी यासाठी त्यांना पत्र देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१२७ जुने प्रसादालय परिसरातील सहकारी संस्थांचे स्टॉलला पुढील मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांचे सोयीसाठी यापुर्वी वेळोवेळी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार लिव्ह अँन्ड लायसेन्स तत्वावर ११ महिन्याचे कालावधी साठी खालील तक्त्यातील सहकारी संस्थांना मासिक परवाना फी आकारुन संस्थानचे स.नं. २ व ३ मधील जुने प्रसादालय परिसरातील मोकळ्या जागेत स्टॉलमध्ये व्यवसाय चालविण्यास परवानगी दिलेली आहे.

| **अ.क्र.** | **लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर दिलेले वर्ष / सन** | **श्रीरामपूर दुध जिल्हा मध्य. सह.दुध संघ लि. बाभळेश्वर दुध व दुग्धजन्य पदार्थ विकी साठी** | **संगमनेर तालुका सह.दुध उत्पादक व प्र.संघ मार्या. घुलेवाडी संगमनेर दुध व दुग्धजन्य पदार्थ विकी साठी** | **गोदावरी खोरे दुध संघ, कोपरगांव स्टॉल दुध व दुग्धजन्य पदार्थ विकी साठी** |
|---|---|---|---|---|
| १. | २००६-२००७ | मासिक परवाना फी रु. १०००/- डिपॉझीट रु. १०,०००/- | मासिक परवाना फी रु. १०००/- डिपॉझीट रु. १०,०००/- | मासिक परवाना फी रु.४००/- |
| २. | २००७-२००८ | मासिक परवाना फी रु. २०००/- डिपॉझीट रु. १०,०००/- | मासिक परवाना फी रु. २०००/- डिपॉझीट रु. १०,०००/- | मासिक परवाना फी रु.४००/- |
| ३. | २००८-२००९ | मासिक परवाना फी रु. ३०००/- डिपॉझीट रु. १०,०००/- | मासिक परवाना फी रु. ३०००/- डिपॉझीट रु. १०,०००/- | मासिक परवाना फी रु.४००/- |
| ४. | २००९-२०१० | मासिक परवाना फी रु. १०,०००/- डिपॉझीट रु. १०,०००/- | मासिक परवाना फी रु. १०,०००/- डिपॉझीट रु. १०,०००/- | मासिक परवाना फी रु. १०,०००/- |
| ५. | २०१०-२०११ | मासिक परवाना फी रु. ५,०००/-दि.०५/१२/२०१० चे मा.व्य.स.चे नि.क्र.९९७ नुसार डिपॉझीट रु. १०,०००/- | मासिक परवाना फी रु. ५,०००/-दि.०५/१२/२०१० चे मा.व्य.स.चे नि.क्र.९९७ नुसार डिपॉझीट रु. १०,०००/- | मासिक परवाना फी रु. ५,०००/- दि. ५/१२/२०१० चे मा. व्य. स. चे नि.क्र.९९७ नुसार डिपॉझीट रु.१०,०००/- |
| ६. | २०११-२०१२ | मासिक परवाना फी रु. ५,५००/-दि. १३/०२/२०११ चे मा.व्य.स.चे नि.क्र.११८ नुसार डिपॉझीट रु. १०,०००/- | मासिक परवाना फी रु. ५,५००/-दि. १३/०२/२०११ चे मा.व्य.स.चे नि.क्र.११८ नुसार डिपॉझीट रु. १०,०००/- | मासिक परवाना फी रु. ५,५००/- दि. १३/०२/२०११ चे मा.व्य.स.चे नि.क्र.११८ नुसार डिपॉझीट रु. १०,०००/- |

उपरोक्त १) श्रीरामपूर दुध जिल्हा मध्य. सह.दुध संघ लि.बाभळेश्वर २) संगमनेर तालुका सह.दुध उत्पादक व प्र.संघ मार्या. घुलेवाडी संगमनेर ३) गोदावरी खोरे दुध संघ,कोपरगांव या तीनही संस्थांच्या जुन्या प्रसादालय परिसरातील स्टॉलच्या जागेची मुदत दि. ३१/१२/२०११ रोजी संपुष्टात येत असल्याने पुढील कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेसाठी दि. २३/१२/२०११ च्या पत्राने श्रीरामपूर दुध जिल्हा मध्य. सह.दुध संघ लि.बाभळेश्वर यांनी विनंती केली आहे. तसेच संगमनेर तालुका सह.दुध उत्पादक व प्र.संघ मर्या. घुलेवाडी संगमनेर व गोदावरी खोरे दुध संघ,कोपरगांव यांचे प्रस्ताव सादर होत आहेत.

उपरोक्त ३ संस्थांना दि. १३/०२/२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ११८ नुसार डिपॉझीट रक्कम रु. १०,०००/- व मासिक परवाना फी रु. ५,५००/- (विद्युत बील वेगळे)आकारुन दि. ०१/०२/२०११ ते दि. ३१/१२/२०१२ अखेर ११ महिन्यासाठी दि.२९/०४/२०११ चे आदेशाने लिव्ह अँड लायसन्स तत्वावर जुन्या प्रसादालय परिसरातील मोकळ्या जागेतील स्टॉलला दुध, दुग्धजन्य पदार्थ इ. विक्रीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

आता ०१) श्रीरामपुर दुध जिल्हा मध्यवर्ती सहकारी व्यवसायीक संघ लि.बाभळेश्वर ०२) संगमनेर तालुका सहकारी दुध उत्पादक, ०३) गोदावरी खोरे दुध संघ, कोपरगांव या सहकारी संस्थांना जुन्या प्रसादालय परिसरातील मोकळ्या जागेमध्ये पुढील १२ महिन्यासाठी दि. ०१/०१/२०१२ ते दि. ३१/१२/२०१२ पावेतो जुन्या प्रसादालय परिसरातील मोकळया जागेमध्ये उपरोक्त व्यवसाय / स्टॉल चालविणेस लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर देणेबाबत त्याच प्रमाणे संबंधीत संस्थेकडून दि.३१/१२/२०११ अखेर आकारणेत आलेले रु.५,५००/- मात्रचे मासिक परवाना फी मध्ये १० % वाढ करुन म्हणजे रु. ६,०५०/- व डिपॉझीट रक्कम रु. १०,०००/- मात्र (विद्युत बील वेगळे)आकारुन लिव्ह अँड लायसन्स तत्वावर व्यवसाय चालविणेस देणेबाबत मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.१२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामपुर दुध जिल्हा मध्यवर्ती सहकारी व्यवसायीक संघ लि.बाभळेश्वर संगमनेर तालुका सहकारी दुध उत्पादक, गोदावरी खोरे दुध संघ, कोपरगांव या सहकारी संस्थांना दि. ०१/०१/२०१२ ते दि. ३१/१२/२०१२ पावेतो, जुन्या प्रसादालय परिसरातील मोकळया जागेमध्ये उपरोक्त व्यवसाय / स्टॉल चालविणेस लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर जागा देणेस त्याच प्रमाणे संबंधीत संस्थेकडून दि.३१/१२/२०११ अखेर आकारणेत आलेले रु.५,५००/- मात्रचे मासिक परवाना फी मध्ये १० % वाढ करुन म्हणजे रु. ६,०५०/- व डिपॉझीट रक्कम रु. १०,०००/- मात्र (विद्युत बील वेगळे) आकारण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.१२८** **मुंबई कार्यालयाचे फ्रँकींग मशिन खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे मुंबई कार्यालयातून श्री साईलीला मराठी, हिन्दी व इंग्रजी या भाषेतील सुमारे २५,००० अंक तसेच इतर कार्यालयीन टपाल उदा. चेक, मनिऑर्डरच्या पावत्या, उदीप्रसाद पाकीटे, कार्यालयीन पत्र इ. फ्रँक करुन पाठविण्यात येतात. त्यासाठी निओपास्ट या कंपनीचे SCP २१८२ या मॉडेलचे एक फ्रँकींग मशीन कार्यरत आहे.

भारत सरकारच्या निर्देशानुसार मा.सिनीअर सुपरिन्टेडेंट पोस्ट ऑफिस, मुंबई सिटी इस्ट डिव्हीजन, मुंबई यांनी मुंबई कार्यालयात सध्या चालू असलेले फ्रँकींग मशीन दि.०१.०१.२०१२ पासून पुढे वापरता येणार नाही, असे कळविल्याने मुंबई कार्यालयासाठी एक नवीन फ्रँकींग मशीन खरेदी करणे आवश्यक झाले. त्यामुळे सदरचे फ्रँकींग मशीन खरेदी करणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव दि.१९.११.२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करण्यात आला होता. परंतु या विषयावर निर्णय झाला नाही.

उपरोक्तप्रमाणे परिस्थिती विचारात घेता दि.०१.०१.२०१२ पासून मुंबई कार्यालयाचे काम थांबू नये म्हणून कार्यालयीन कामाची तातडीची गरज व आवश्यकता विचारात घेऊन दि.३१.१२.२०११ रोजीचे मंजुर टिपणीनुसार मा.अध्यक्ष साहेब यांचे मान्यतेने मुंबई येथील मे.किलबर्न, मे. कोपरस इंडिया लि. तसेच मे.ओ.एस.टी. इले. लि., या अधिकृत वितरकांकडून ३ निविदा मागविण्यात आल्या. सदरच्या प्राप्त झालेल्या निविदा दि.०६.०१.२०१२ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे समोर उघडणेत आल्या. त्यामध्ये मुंबई कार्यालयात सध्या वापरात असलेले निओपोस्ट या कंपनीचे एस.सी.पी.- २१८२ या मॉडेलचे फ्रँकींग मशीन निविदाधारकास देऊन याच कंपनीचे आय जे- ४० या मॉडेलचे नवीन फ्रँकींग मशीन रु.१,११,४६६/- या रकमेचे मे.कोरस इंडिया लि., वरळी मुंबई यांची निविदा निम्नतम दराची असल्याने त्यांचेकडून खरेदी करण्यात आलेले आहे.

तरी सदरचे खरेदीस व खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मुंबई कार्यालयात सध्या वापरात असलेले निओपोस्ट या कंपनीचे एस.सी.पी.-२१८२ या मॉडेलचे फ्रँकींग मशीन निविदाधारकास देऊन याच कंपनीचे आय जे-४० या मॉडेलचे नवीन फ्रँकींग मशीन खरेदीसाठी रु.१,११,४६६/- या रकमेची मे.कोरस इंडिया लि., वरळी मुंबई यांची निविदा निम्नतम दराची असल्याने त्यांचेकडून करण्यात आलेल्या मशीन खरेदीस व त्यासाठी आलेल्या रु.१,११,४६६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,मुंबई कार्यालय)

---

**विषय नं.१२९** **झेरॉक्स मशीन मॉडेल- ५६४५ चा नादुरुस्त झालेला पार्ट बदलणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे कार्यालयीन कामासाठी सामान्य प्रशासन विभागात खालील झेरॉक्स मशीन कार्यरत आहे.

| अ. नं. | मशीनचा तपशिल | वापरास सुरवात केलेली तारीख | मशीनची आयुष्य मर्यादा | झालेल्या झेरॉक्स प्रती, (दि.०९/१०/२०११) | किंमत रुपये | प्रती मिनीट स्पीड |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशिन, मॉडेल | दि.२७/०३/२०१० | २० लाख कॉपीज् | ४,८५,६४९ | ५,०१,०००/- (देणगी) | ४५ कॉपीज् |

| | नं. ५६४५ | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|

झेरॉक्स मशीन मॉडेल ५६४५ मशीनचे झेरॉक्समध्ये पानाच्या मध्ये पांढरी रेषा येत आहे. त्यामुळे सदर मशीनचे डिलर ओम साई मार्केटींग औरंगाबाद यांनी दि.१३/१०/२०११ रोजी मशीन दुरुस्तीसाठी मॅकेनिक पाठवला होता. मॅकेनिकने दि.१५/१०/२०११ चे पत्राने सदर मशीनचा Fuser Modul हा पार्ट खराब झाल्याचे कळविले असुन त्याची किंमत रु.४८,०००/-+२४००/-(५%व्हॅट) एकूण रुपये ५०,४००/- (रुपये-पन्नास हजार चारशे मात्र) खर्च येणार आहे, असे कळविले आहे.

मशीनच्या Fuser Modul हया पार्टची क्षमता ३ लाख झेरॉक्स कॉपीज् ची आहे. प्रत्यक्ष मशीनवर ४.८५ लाख झेरॉक्स कॉपीज् झालेल्या असल्यामुळे पार्ट बदलुन झेरॉक्स मशीन तातडीने दुरुस्त करुन घेणे आवश्यक आहे. झेरॉक्स मशीन दुरुस्ती व देखभाल खर्चासाठी सन २०११-२०१२ या वर्षासाठी रु.१,००,०००/- बजेट मंजुर आहे.

मशीनचे दुरुस्तीसाठी रुपये ५०,४००/- (पन्नास हजार चारशे मात्र) खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, झेरॉक्स मशीन मॉडेल- ५६४५ चा नादुरुस्त झालेला पार्ट मशीनचे डिलर ओम साई मार्केटींग औरंगाबाद यांचेकडून बदलून घेण्यास व याकामी येणारे रक्कम रुपये ५०,४००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-१२)

---

**विषय नं.१३०** **श्री विरभद्र बिरोबा बन येथील श्री विरभद्र यात्रेतील कुस्त्यांचे हंगामाकरीता आर्थिक मदत देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री हरी. हेमा. बनकर, श्री विरभद्र यात्रा कमिटी, शिर्डी (बिरेगांव बन) यांनी त्यांचे दिनांक १०/१०/२०११ रोजीचे अर्जात विरभद्र (बिरोबा) या दैवताची यात्रा हि दि.०८/११/२०११ ते दि.१०/११/२०११ अखेर बिरोबा बन, शिरडी येथे मोठया थाटात भरणार असून यात दि.१०/११/२०११ रोजी कुस्ती हंगामही आयोजित केलेला आहे, या कुस्त्यात भाग घेणा-या व विजयी पहिलवानांना वाटण्यासाठी म्हणून मागील वर्षी रु.७५,०००/- मात्रची रक्कम मदत मिळाली होती , तरी यावर्षीही रु.१,००,०००/- ची आर्थिक मदत मिळावी अशी विनंती केलेली आहे.

दि.१७/११/२००४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.११९ नुसार एक विशेष बाब म्हणून विरभद्र यात्रा बन, शिर्डी यांना दि.२६/११/२००४ रोजी होणा-या कुस्त्यांच्या हंगाम्यासाठी रु.२५ हजार रक्कम श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे संस्थान प्रतिनिधी नेमून देण्यात यावी, "असे ठरल्याप्रमाणे रक्कम देणेत आली होती. तसेच त्यानंतर दरवर्षी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार खालीलप्रमाणे रक्कम मंजूर करुन वाटणेत आलेली आहे.

| अ.नं. | सभेची तारीख व निर्णय क्र. | मंजूर रक्कम | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| ०१. | दि.१७/११/२००४, निर्णय क्र.११९ | २५,०००.०० | २४,४९९.०० |
| ०२. | दि.०५/११/२००५, निर्णय क्र.७१२ | ५०,०००.०० | ४८,१५२.०० |
| ०३. | दि.१४/१०/२००६, निर्णय क्र.८६६ | ५०,०००.०० | ४३,५३३.०० |
| ०४. | दि.१८/११/२००७, निर्णय क्र.७८२ | ५०,०००.०० | ४९,०२०.०० |
| ०५. | दि.०३/०१/२००८, निर्णय क्र.०४(१९) | ७५,०००.०० | ६४,०८०.०० |
| ०६. | दि.०७/११/२००९, निर्णय क्र.८६७ | ७५,०००.०० | ६९,५७०.०० |
| ०८ | दि.२१/१०/२०१०, निर्णय क्र.९२३ | ७५,०००.०० | ७२,०८०.०० |

दि.२१/१०/२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ९२३ नुसार मागीलवर्षी सदरकामी रु. ७५,०००/- मात्रची आर्थीक मदत संस्थानमार्फत देण्यात आली होती. त्यापैकी रु. ७२,०८०/- इतकी रक्कम बिदागी म्हणून वाटली असून उर्वरीत रक्कम लेखाशाखेत जमा-नांवे करण्यात आलेली होती.

चालूवर्षीही गेल्या वर्षाप्रमाणे रु. ७५,०००/- मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने मंजूर करुन श्री रामनवमी उत्सवातील प्रथेप्रमाणे संस्थानचा प्रतिनिधी (लेखाशाखेतील कर्मचारी) नियुक्त करुन विजयी पहिलवानांना बिदागी म्हणून एकूण रक्कम रु.७०,२७०/- वाटप करणेत आलेले आहे.

तरी उपरोक्तकामी आलेल्या रक्कम रु.७०,२७०/- चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१३१** **श्री विरभद्र बिरोबा बन येथील श्री विरभद्र यात्रेतील कुस्त्यांचे हंगामाकरीता विजयी पहिलवानांना सस्थान मार्फत बिदागी म्हणून एकूण रक्कम रु.७०,२७०/- वाटप करणेत आले, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.१३१** **श्री रामनवमी उत्सव २०११ चे अंदाजपत्रकातील काही बाबींवर तरतूदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री रामनवमी उत्सव २०११ मधील खर्चाकरीता मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७/०२/२०११ चे सभेतील निर्णय क्रं. १७० अन्वये व दिनांक १२/६/२०११ चे सभेतील निर्णय क्रंमाक ३४२ अन्वये एकूण रु. ६०,२५,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे.

प्रत्यक्षात मात्र अंदाजीत खर्चापेक्षा काही बाबीवर जादा तर काही बाबीवर कमी खर्च झालेला आहे. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | मा.व्य.समितीने मंजूर केलेली रक्कम | प्रत्यक्ष खर्च | तरतुदी पेक्षा जादा खर्च | तरदीपेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १. | मंडप, कमानी, गादीभाडे, स्टेज, उन्हाळी मंडपासह व पाणपोई इ. | १५०००००.०० | १६६०५५३.०० | १६०,५५३.०० | ०.०० |
| २. | कलाकार बिदागी, | ७२५०००.०० | ८०३,०१०.०० | ७८,०१०.०० | ०.०० |
| ३. | भक्तांना मिष्टान्न मजूरीसह | ४२५०००.०० | ४२१,६११.०० | ०.०० | ३३८९.०० |
| ४. | विद्युत रोषणाई | ८०००००.०० | ८८१,९५२.०० | ८१,९५२.०० | ०.०० |
| ५. | निमंत्रणपत्रिका, उदीप्रसादासह पोष्टेज, जाहिरात, बॅनर | १५२००००.०० | १५५५२९६.०० | ३५,२९६.०० | ०.०० |
| ६. | जादा कामगार | २२५०००.०० | २१३,०४८.०० | ०.०० | ११९५२.०० |
| ७. | इतर खर्च- मंदिर रंगकाम, कुस्त्या, लस्सी, मंदिर प्रसाद, कावडी, जादा फर्निचर, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ. शुटींग, पेंटर बिले, पोलीस स्टेशन इंधन बीलासह. | ८००००.०० | ५७,३६४.०० | ०.०० | २२६३६.०० |
| ८. | पालख्या, पिण्याचे पाणी इ. | ४५००००.०० | १७७,२०९.०० | ०.०० | २७२७९१.०० |
| ९ | कुस्ती हगामा | ३०००००.०० | २१४९५०.०० | ०.०० | ८५०५०.०० |
| | एकूण- | ६०२५०००.०० | ५९८४९९३.०० | ३५५८११.०० | ३९५८१८.०० |

उपरोक्त तपशिल पाहता अ.नं. १. मंडप कमानी व स्टेज करीता १५ लाख मात्रची तरतुद करण्यात आलेली होती. बांधकाम विभागाने याकामी आलेल्या खर्चास व्यवस्थापन समितीचे दिनांक २६/०३/२०११ चे सभेतील निर्णय क्रं २०६ अन्वये मान्यता घेतलेली आहे. अ.नं. २. कलाकार बीदागी,करीता रु. ७,२५,०००/- ची तरतुद केलेली होती , या उत्सवात शिर्डी के साईबाबा हे महानाटयाचा प्रयोग निश्चीत केलेने कलाकार बीदागीत तरतुदी पेक्ष ७८,०१०/- जादा खर्च झाला आहे. अ.नं. ४. विद्युत रोषणाई करीता ८ लाख तरतूद असताना शिर्डी के साईबाबा हे महानाटय आयोजित केलेले असलेने या करीता जनरेटर व्यवस्थेमुळे तरतुदी पेक्षा ८१,९५२/- जादा खर्च झाला आहे. अ.नं.५ निमंत्रण पत्रिका , उदी प्रसाद पोष्टेज, जाहीरात, बॅनर याकरीता १५,२०,०००/- ची तरतूद असताना नगरमनमाड रोडवरील कमानींना स्वागताचे बोर्ड लावलेने तरतुदीपेक्षा ३५२९६/-जादा खर्च झाला आहे. उर्वरीत इतर बाबीवर तरतुदीपेक्षा कमी खर्च झालेला आहे.

श्री रामनवमी उत्सव २०११ करीता एकूण ६०,२५,०००/- (अक्षरी रुपये साठ लाख पंचवीस हजार मात्र) अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आलेली होती. या उत्सवा करीता प्रत्यक्षात एकूण रु ५९,८४,९९३/- (अक्षरी रुपये एकाणसाठ लाख, चौ-याऐंशी हजार, नऊशे त्र्यॅन्नव मात्र ) खर्च झालेला आहे

तरी सदर उत्सवाकरीता उपरोक्त तपशिलप्रमाणे झालेल्या एकूण रु ५९,८४,९९३/- (अक्षरी रुपये एकाणसाठ लाख, चौ-याऐंशी हजार, नऊशे त्र्यॅन्नव मात्र ) चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.१३२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव २०११ उत्सवासाठी अंदाजपत्रकीय तरतूदीपेक्षा कमी-जास्त प्रमाणात झालेल्या खर्चाची नोंद घेण्यात येऊन उत्सवासाठी प्रत्यक्ष झालेल्या एकूण रु. ५९,८४,९९३/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.१३२ शिर्डी महोत्सव-२०११ चे अंदाजपत्रकास मान्यता व कलाकार निश्चितीबाबत**

**प्रस्ताव-** चालू वर्षाचा शेवट व नविन वर्षाची सुरुवात चांगल्यारितीने व्हावी सदरचा दिवस श्रींच्या सान्निध्यात जावा या उद्देशाने दरवर्षी ३१ डिसेंबरला भारतातून तसेच परदेशातून प्रचंड संख्येने साईभक्त शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी येत असतात. श्रींच्या दर्शनापासून कोणीही वंचीत राहू नये म्हणून मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार समाधी मंदिर भक्तांना साईबाबांचे दर्शनासाठी म्हणून रात्रभर उघडे ठेवण्यात येत असते. ३१ डिसेंबरच्या रात्री भजन, नृत्य, गायन वगैरे कार्यक्रम आयोजित केला जातो. शिर्डी महोत्सव हा सन २००४ पासून सुरु झालेला आहे.

**अ) अंदाजपत्रक:** सन २०१० चे शिरडी महोत्सवा करीता झालेल्या व सन २०११ चे शिर्डी महोत्सवासाठी अपेक्षीत खर्चाची माहीती खालील प्रमाणे आहे-

| अ.नं. | तपशील | २०१०-करीता मंजूर रक्कम | २०१० चा प्रत्यक्ष खर्च | सन २०११ करीता येणारा अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१. | स्टेज, ड्रेसींग रुम व १००० खुर्च्यांसह बैठक व्यवस्था | ००,५०,०००.०० | ३८२००/- | ५०,०००/- |
| ०२. | जाहिरात, कापडी बॅनर्स व बोर्ड इत्यादी | ००,१०,०००.०० | ९२४०/- | १५,०००/- |
| ०३. | कलाकार मानधन व प्रवास खर्च | ०१,५०,०००.०० | ७७०४३/- | १,५०,०००/- |
| ०४. | इतर किरकोळ खर्च (मंदिर सजावट, जादा कर्मचारी व इतर खर्च ) | ९०,०००.०० | ४५५१७/- | ९०,०००/- |
| | **एकूण खर्च** | **०३,००,०००.००** | **१,७०,०००/-** | **३,००,०००/-** |

**ब) कलाकार निश्चीती :-**

याहीवर्षी मागील वर्षाप्रमाणे शिर्डी महोत्सवासाठी मान्यवर गायकांचे व कलाकारांचे दि.३१/१२/२०११ रोजी गायन व नृत्य कार्यक्रम व मानधन वेळा निश्चीत करावे लागणार आहेत. याबाबत आलेल्या अर्जांचा तपशिलवार तक्ता अलाहिदा सादर करण्यात येईल.

**क) कार्यक्रमाचे स्थळ :-**

मागीलवर्षी साईनगर मैदानावर कलाकार कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते, त्यावेळी प्रतिसाद म्हणावा तसा मिळाला नव्हता. तरी या वर्षीचे शिर्डी महोत्सवातील कलाकार कार्यक्रमाची जागा निश्चीत करणेस विनंती आहे.

तरी उपरोक्त शिरडी महोत्सवाकरीता **अ)** रु.३,००,०००/- चे अंदाजपत्रकास, **ब)** कलाकार कार्यक्रम व मानधन निश्चीती तसेच **क)** कार्यक्रमाचे स्थळ निश्चीतीचे विचारार्थ व निर्णयार्थ सदरचा विषय व्यवस्थापन समीतीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.१३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, शिरडी महोत्सव- २०११ साठी झालेल्या खर्चाचा तपशील पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.१३३** **श्री साई संगम प्रतिष्ठाण, शिर्डी यांना साई भजन संध्या कार्यक्रमासाठी साईनगर मैदान देणेबाबत**

**प्रस्ताव-** अध्यक्ष, साई संगम प्रतिष्ठाण, शिरडी शहर यांनी" सालाबाद प्रमाणे याही वर्षी मंगळवार दि. ३१/०१/२०१२ रोजी साईभजन संध्या हा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेकडून साईनगर मैदानाचा वापर तसेच विद्युत पुरवठा पुरविला जातो. या कार्यक्रमाच्या सादरीकरणासाठी यावर्षी देखील आम्हांला आपणाकडून वरील अपेक्षीत मदत मिळणेकरीता आम्ही आपल्या कार्यालयाच्या नियमानुसार असणारे शुल्क भरण्यास तयार आहोत. या कार्यक्रमाच्या सादरीकरणासाठी, मंडप डेकारेशन, आसन व्यवस्था इत्यादी स्वरुपातील कामाच्या पुर्व तयारीसाठी वेळ लागत असल्याने सदरचे साईनगर मैदान ताब्यात मिळणेसाठी व कार्यक्रमासाठी आवश्यक क्षमतेचा विद्युत पुरवठा बुधवार दिनांक २५ जानेवारी २०१२ पासून सुरु करावा." अशी विनंती केलेली आहे.

साईसंगम प्रतिष्ठाण, शिर्डी यांना सन २००८ पासून प्रतीवर्षी साईभजन संध्या कार्यक्रम करण्यास साईनगर मैदान वापराबाबत व्यवस्थापन समितीचे मान्यतेने परवानगी देण्यात आली आहे.

चालू वर्षी अध्यक्ष, साईसंगम प्रतिष्ठाण, शिर्डी यांना दि. ३१/०१/२०१२ रोजी कार्यक्रम करणेस साईनगर मैदान मिळणेस विनंती केलेली आहे. तरी उपरोक्त कार्यक्रम धार्मिक / स्थानिक ग्रामस्थांचा असल्याने खालील अटी शर्तीवर साईनगर मैदान दयावे किंवा कसे याबाबत निर्णयास्तव सविनय सादर.

**अटी शर्ती-**

०१) सदर कार्यक्रमासाठी पोलिस निरीक्षक व नगरपंचायत शिर्डी यांचे नाहरकत प्रमाणपत्रासह आवश्यक त्या परवानग्या मंडळाने घेवून त्याची प्रत संस्थानला सादर करावी.

०२) कार्यक्रमा करीता स्टेज, मंडप, विद्युत व ध्वनीक्षेपण व्यवस्था मंडळास स्वखर्चाने करावी लागेल.

०३) परिसरातील राहणारे संस्थान कर्मचारी व साईबाबा हॉस्पीटल मधील रुग्णांना आवाजाचा त्रास होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

०४) कार्यक्रमाचे वेळी ध्वनीक्षेपणाचा आवाज व वेळेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

०५) परिसरात स्वच्छता ठेवावी.

उपरोक्त विषयी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अध्यक्ष, साई संगम प्रतिष्ठाण, शिरडी शहर यांना दि. ३१/०१/२०१२ रोजी साईभजन संध्या कार्यक्रमासाठी साईनगर मैदान देण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.१३४ शिर्डी येथे दिनांक १७.०१.२०११ ते दिनांक १९.०१.२०११ या कालावधीत झालेल्या श्री साईससच्चरित महापारायण सोहळयाचे खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक १७/०१/२०११ ते १९/०१/२०११ या कालावधीत शिरडी येथे साईनगर मैदानावर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी तर्फे व श्री साईबाबा संस्थान एम्प्लॅाईज क्रेडीट को-ऑप सोसायटी तसेच शिरडी ग्रामस्थ यांचे सहकार्याने श्री साईसच्चरित महापारायण सोहळा आयोजित करण्यास व्यवस्थापन समितीचे दिनांक १३/०२/२०१० चे सभेतील निर्णय क्रंमाक ०२ (०९) अन्वये मान्यता मिळाली होती.

यानूसार उपरोक्त कालावधीत श्री साईसच्चरित महापारायण सोहळयात ५२२४ पारायणार्थीनी भाग घेतला असून सदर सोहळा मोठया थाटामाटात संपन्न झाला असून संस्थानला खालील तपशिलप्रमाणे खर्च आलेला आहे.

| अ.नं. | तपशिल | खर्च रक्कम |
|---|---|---|
| ०१ | पार्टीशन, रथ सजावट, स्टेज डेकोरेशन सजावटीसह | ६५,००४.०० |
| ०२ | कलाकार बिदागी - (रंग व वेषभुषा मानधन ड्रेस भाडेसह) | १,८७,४००.०० |
| ०३ | प्रसाद खर्च- (आचारी मजूरीसह) | ९,८५,१४७.०० |
| ०४. | लाईट व साऊंड सिस्टीम खर्च(भाडोत्री जनरेटर व इंधन खर्चासह) | १,३९,६००.०० |
| ०५. | छपाई, जाहिरात व बोर्ड खर्च (श्री साईसचरित्र छपाई व अलौंसिंग खर्चासह) | १,४०,२६५.०० |
| ०६. | कंत्राटी कर्मचारी खर्च | ६२,११९.०० |
| ०७. | पोथी कव्हर कापडासह शिलाई व झेंडे शिलाई सह | ८९,०२०.०० |
| ०८. | बांधकामासंबधीत खर्च - ( मैदान लेव्हल कामी डिझेल, वाळु, मुरुम, प्लायवूड, कुरीयर , रांगोळी व फर्निचर खर्च) | ५६,८०२.०० |
| | अक्षरी रु. सतरा लाख अठ्ठाविस हजार, तिनशे सत्तावन्न मात्र. | १७,२८,३५७.०० |

उपरोक्त पारायणाकरीता उभारलेल्या मंडपाचा एकूण खर्च रुपये ३,२१,०००/- श्री साईबाबा संस्थान एम्प्लॅाईज क्रेडीट को-ऑप सोसायटी शिर्डी यांनी केला आहे.

तसेच सदर पारायणाकरीता रक्कम रु. ७,३४,११२/- देणगी रुपाने संस्थानमध्ये जमा झालेली आहे.

तरी सदर पारायणाकरीता संस्थान मार्फत झालेल्या एकूण रक्कम रु. १७,२८,३५७-०० चे खर्चाची व्यवस्थापन समितीत नोंद घेणेसाठी सविनय सादर,

**निर्णय क्र.१३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे दिनांक १७.०१.२०११ ते दिनांक १९.०१.२०११ या कालावधीत झालेल्या श्री साईससच्चरित महापारायण सोहळयाकरीता संस्थानमार्फत झालेल्या एकूण रक्कम रु. १७,२८,३५७/- चे खर्चाची नोंद घेण्यात आली. झालेल्या खर्चाबाबत संबधित विभागाने उशिरा प्रस्ताव का सादर केला याबाबत संबधितास कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागवावा असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी०५)

---

**विषय नं.१३५ जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अहमदनगर यांना, सन २०११ चे सशस्त्र सेना ध्वजदिनी निधी संकलनास आर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.डॉ.संजीव कुमार, जिल्हाधिकारी अहमदनगर तथा अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अहमदनगर, यांनी जा.क्र.१३१२/१/जिसैका-३, दि.१७ ऑक्टोबर २०११ चे पत्रात खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

देशाच्या संरक्षणाबरोबरच देशाअंतर्गत उद्‌भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्था, भुकंप, महापूर, या सारख्या नैसर्गिक आपत्तीस धावुन जाणाऱ्या सैनिकांना वीरगती प्राप्त होतात, तसेच असंख्य जखमी व अपंग होतात. अशा वीरांच्या कुटंबाकरीता कल्याणकारी योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडुन यावर्षी अहमदनगर जिल्हयासाठी रुपये ९९ लाखाचे उदिष्ठ ठरवून देण्यात आलेले आहे. सदरचे उद्दिष्ट पुर्ततेसाठी श्री साईबाबा संस्थानकडून या कार्यास रु.११ लाख मदत मिळावी.

**१)** मा.डॉ.अन्बलगन, जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी दि.१३/०२/२००९ चे पत्रान्वये, संस्थानकडून ध्वजदिन निधीसाठी रु.११ लाखाची मागणी केली होती.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३१६ नुसार संस्थान कर्मचाऱ्यांकडून खालील प्रमाणे रक्कम कपात करुन जमा होणारी रक्कम व उर्वरीत संस्थानची रक्कम असे रुपये ५ लाख मदत देण्यास मान्यता दिलेली होती.

| अ.नं. | वेतनबॅन्ड | वसुल करावयाची रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी | ३०० |

| | | |
|---|---|---|
| २ | १५६००-३९१०० | ३०० |
| ३ | ९३००-३४८०० | २४० |
| ४ | ५२००-२०२०० | १२५ |
| ५ | ४४४०-७४४० | ७५ |
| ६ | ३५००० (फिक्स पे) | ३०० |
| ७ | ३०००० (फिक्स पे) | ३०० |
| ८ | २७००० (फिक्स पे) | २५० |
| ९ | १२००० (फिक्स पे) | १०० |
| १० | ८००० (फिक्स पे) | ७० |
| ११ | ७५०० (फिक्स पे) | ७० |
| १२ | ५५०० (फिक्स पे) | २५ |
| १३ | ५००० (फिक्स पे) | २५ |
| १४ | ४५०० (फिक्स पे) | २५ |
| १५ | ४००० (फिक्स पे) | २५ |
| १६ | २५०० (फिक्स पे) | २५ |
| १७ | २००० (फिक्स पे) | २५ |

त्यास अनुसरुन कर्मचाऱ्यांकडून जमा झालेली रक्कम रु.२,६६,७६५/- एवढी व उर्वरीत रक्कम रु.२,३३,२३५/- संस्थानकडून असे एकूण रुपये ५ लाख ध्वजदिन निधीसाठी दिलेले आहेत.

**२)** मा.डॉ.अन्बलगन, जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी दि.३०/०७/२०१० चे पत्रान्वये, संस्थानकडून सन २०१० चे ध्वजदिन निधीचे उद्दीष्ट पुर्ततेसाठी रु.११ लाख निधीची मागणी केली होती. त्यास अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७२ नुसार संस्थान कर्मचाऱ्यांकडून गतवर्षाप्रमाणे रक्कम कपात करुन रु.२,७८,३५०/- एवढी व संस्थानकडून उर्वरीत रक्कम रु.८,२१,६५०/- असे एकूण रुपये ११ लाख ध्वजदिन निधीसाठी दिलेले आहेत.

सन २००४ चा अधिनियम क्र.१७ (२) (ण) मानव जातीचे कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. तसेच अधिनियम क्र.१७ (६) या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. अशी तरतुद आहे. सदरच्या तरतुदीनुसार अशा प्रस्तावास शासनाची मान्यता घेणे आवश्यक नाही.

**३)** मा.डॉ.संजीव कुमार, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अहमदनगर, यांनी दि.१७ ऑक्टोबर २०११ चे पत्राने सन २०११ चे उद्दीष्ट पुर्ततेसाठी रु.११ लाख ध्वजदिन निधीसाठी मिळणेस विनंती केली आहे.

**निर्णय क्र.१३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २००४ चा अधिनियम कलम १७(०२) (ण( व कलम १७(६) मधील तरतूदीस अधीन राहून समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्य व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. सदर तरतूदीनुसार प्रस्तावास शासनाची मान्यता घेणे आवश्यक नसल्याने मागील वर्षाप्रमाणे कर्मचाऱ्यांकडून रक्कम कपात करुन जमा होणारी रक्कम व उर्वरीत संस्थानची रक्कम असे रुपये ११ लाख जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अहमदनगर यांना, सन २०११ चे सशस्त्र सेना ध्वजदिनी निधी संकलनास आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**विषय नं.१३६** **अहमदनगर जिल्हयात सन २०११-१२ या वर्षामध्ये आयोजित राष्ट्रीय राज्य शालेय क्रिडा स्पर्धांना आर्थिक मदत मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** मा.जिल्हाधिकारी अहमदनगर तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा परिषद अहमदनगर यांनी जा.क्र./राज्य/ राष्ट्रीय/ क्रीस्पआ/ ११-१२, चे पत्रात खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

अहमदनगर जिल्हयास सन २०११-२०१२ या वर्षामध्ये आयोजित होणाऱ्या धुर्निविद्या, कुस्ती, नेटबॉल, ग्रामीण धनुर्विद्या अशा विविध खेळांच्या चार शासकीय शालेय राज्य क्रीडा स्पर्धा व धनुर्विद्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजनाचा मान जिल्हयास मिळालेला आहे. आपल्या जिल्हयात देशातून / राज्यातून येणाऱ्या खेळाडूंना उत्तम प्रकारच्या क्रीडा, निवास, भोजन, इत्यादी सुविधा देण्यासाठी शासनाकडून अनुदान मिळते परंतु अनुदान अल्प असल्याने व स्पर्धांचा खर्च मोठा असल्याने आपण स्पर्धा आयोजनास रु.२ लाख आर्थिक मदत दिनांक १५ नोव्हेंबर २०११ पर्यंत उपलब्ध करुन द्यावी.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) (एक), मध्ये शासकीय संस्था अगर शासनाचे विभागांना आर्थिक मदत देण्याची तरतुद नाही.

**निर्णय क्र.१३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, अहमदनगर जिल्ह्यात सन २०११-१२ या वर्षामध्ये आयोजित राष्ट्रीय राज्य शालेय क्रिडा स्पर्धा होऊन गेलेल्या असल्याने सदरहू प्रस्ताव मागे घेण्यात आला.**

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**विषय नं.१३७ शिर्डी पोलिस स्टेशन शिर्डी यांना बॉम्ब शोधक व नाशक पथकाकरीता संगणक संच व प्रिंटर मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. डी.एस.पवार, पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन शिर्डी यांनी दि.०२/०९/२०११ च्या पत्राने, श्री साईबाबा मंदिराची जागतिक व्याप्ती लक्षात घेता मा.पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेशाने शिर्डी येथे सन २००९ मध्ये नव्याने बॉम्ब शोधन व नाशक पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर पथकास कार्यालयीन कामकाज करणे सोयीचे व्हावे, या करीता एक संगणक संच व एक प्रिंटर मिळणेस विनंती केली आहे.

सन २००५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.४ चा कलम २१ (२) मध्ये शासनाचे विभागांना साहित्य देणे अगर आर्थिक सहाय्य देण्याची तरतुद नाही.

दि.२८/०६/२००९ रोजीचे छाननी समितीचे सभेतील निर्देशानुसार , शासकीय विभांचे अनुदान मागणीचे प्रस्ताव छाननी समितीचे अखत्यारीत येत नसल्यामुळे जि.प.अहमदनगर, ग्रामपंचायत, नगरपालिका यांचे अनुदान मागणीचे प्रस्ताव पुढील निर्णयासाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात आलेले होते.

**निर्णय क्र.१३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी पोलिस स्टेशन शिर्डी यांना बॉम्ब शोधक व नाशक पथकाकरीता संगणक संच व प्रिंटर मिळणेबाबत पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन शिर्डी यांनी केलेली विनंती अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**विषय नं.१३८ संस्थान सेवेत असताना मयत झालेल्या कर्मचाऱ्याचे एका नातेवाईकास कंत्राटी पध्दतीने कामास घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान सेवक आकृतीबंधानुसार वर्ग-४ कर्मचा-यांची एकूण १२३९ पदे मंजूर असून १३९९ पदे भरलेली आहेत. सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग-४ ची १६० पदे जादा आहेत. तसेच आकृतीबंधानुसार कायमस्वरुपी कंत्राटी पध्दतीची एकुण १९१८ पदे मंजूर असून सध्या संस्थानकडे कंत्राटी कामगारांची एकूण पट संख्या २१८९ आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या उपरोक्त (मागील टिपणीमध्ये दर्शविलेले १४ अर्जदार) कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे."

उपरोक्त निर्णयानुसार १४ अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे.

संस्थान सेवेत असतांना खालील नामनिर्देशित कर्मचाऱ्याचे नांवासमोर दर्शविलेल्या तारखेस निधन झालेले आहे.

| अ.क्र. | मयत कर्मचाऱ्याचे नांव, हुद्दा व विभागाचे नांव | नेमणूक तारीख व झालेली सेवा | मयत झाल्याची तारीख | संस्थानकडे नोकरी मिळणेसाठी अर्ज केलेल्या वारसदाराचे नांव व नाते |
|---|---|---|---|---|
| ०१ | शशिकांत गंगाधर कोरडे, वर्ग ४ कर्मचारी, प्रसादालय | ०५/१२/२००६ ०३ वर्ष ११ महिने | २४/११/२०१० | श्रीमती कविता शशिकांत कोरडे, पत्नी |

मयत शशिकांत गंगाधर कोरडे यांचे जागेवर त्यांची पत्नी नामे श्रीमती कविता शशिकांत कोरडे यांनी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे.

तरी श्रीमती कविता शशिकांत कोरडे यांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१३९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती कविता शशिकांत कोरडे यांना कंत्राटी पध्दतीने लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१३९ श्रीरामपूर येथील भू-संपादन कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांचा मानधनात वाढ मिळणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-१६ व १७ जुलै २००० रोजीच्या सभेतील निर्णय क्र. २३८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीकरीता भूसंपादनाची कामे करणेकामी मा. उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर (महसूल) यांचे पर्यवेक्षणाखाली श्रीरामपूर येथे कक्ष स्थापन करणेत आलेला आहे. त्यानुसार सदर कक्षाकडे कामे करणेकामी खालील प्रमाणे कर्मचारी वृंद मंजूर करण्यात आलेला असून त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे वेतन/मानधन ठरविण्यात आले आहे.

| अ.नं. | तपशील | मागणी संख्या | देण्यात येत असलेले मानधन |
|---|---|---|---|
| ०१ | तहसिलदार संवर्गातील | ०१ | ७०००/- |
| ०२ | अव्वल कारकुन संवर्गातील कर्मचारी | ०२ | ५०००/- |
| ०३ | लिपीक संवर्गातील कर्मचारी (कुशल ) | ०२ | ४०००/- |
| ०४ | शिपाई | ०१ | २५००/- |
| ०५ | वाहन-चालक | ०१ | ४०००/- |

त्यानुसार सध्या सदर कक्षाकडे खालीलप्रमाणे कर्मचारी वृंद कामे पहात असून त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे वेतन/मानधन देण्यात येत आहे.

| अ.नं. | कर्मचा-यांचे नांव | सख्या | प्रति माह देण्यात येत असलेले मानधन |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. बी.आर. वाव्हळ, सेवानिवृत्त नायब तहसीलदार | ०१ | ७०००/- |
| ०२ | श्री.रामचंद्र भा. नागरे अव्वल कारकून | ०१ | ४५००/- |
| ०३ | कंत्राटदारामार्फत लिपीक-टंकलेखक (संवर्ग ) | ०४ | दरमहा रु. ४०००/- ( प्रत्येकी ) |
| ०४ | कंत्राटदारामार्फत शिपाई | ० १ | किमान वेतनाप्रमाणे |

उपरोक्त पैकी अ.नं. ०१ वरील कंत्राटी कर्मचारी श्री. बी.आर. वाव्हळ सल्लागार यांनी दि.२८/११/२०११ रोजी अर्ज करुन त्यात 'सध्या मला मिळत असलेले मानधन हे सन-२००० मध्ये मंजूर केलेले आहे. त्या मानधनाची रक्कम वाढवून दरमहा रु.१०,०००/- मात्र मानधन मिळावे म्हणून मी अर्ज केलेले आहेत. तथापी मला मानधन वाढवून मिळालेले नाही. जा.नं.एसएसएस/वशी-०१/३९९४/२०११ दि.०४/११/२०११ चे आदेशाने दि.०१/०८/२०११ पासून पुढे ०९ महिने आहे त्याच मानधनावर मुदतवाढ देण्यात आलेली आहे. म्हणजेच पुर्वीचे मानधनात वाढ देण्यात आलेली नाही. तरी माझे मानधनात वाढ करुन दरमहा रु.१२०००/- इतके मानधन वाढवून मिळावे. अशी विनंती केली असून सदरची विनंती मान्य नसल्यास सध्या मिळत असलेले मानधनाचे रक्कमेवर (रु. सात हजार मात्र ) मी सल्लागार म्हणून काम करु इच्छित नाही म्हणून दि.०१/०१/२०१२ पासून मी या पदाचा राजीनामा देत आहे. तरी दि.०१/०१/२०१२ पासून सल्लागार पदाचा माझा राजीनामा मंजूर करावा व मला कार्यमुक्त करावे आपले नियमानुसार एक महिना ही नोटीस देत आहे. असे नमूद केले आहे.

अ.नं. ०२ वरील कंत्राटी कर्मचारी श्री.रामचंद्र भा. नागरे यांनीही दि.२८/११/२०११ रोजी अर्ज करुन मला सध्या रु.४५००/-इतके मानधन मिळत असून त्यात कमीतकमी रु.१०,०००/- पर्यंत वाढ करुन मिळावी अशी विनंती केली आहे.

अ.नं. ०३ वरील कंत्राटदारामार्फत नेमण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी यांनी दि.०८/०१/२०११ व दि. ०२/१२/२०११ रोजी अर्ज करुन "आम्हा कुशल कामगारांना दरमहा रक्कम रु.४०००/- एकत्रित वेतन मंजूर केलेले आहे. आम्हास दरमहा रु.४०००/- वेतन न मिळता जी.पी.एफ. वजा जाता रु.२९५० ते ३००० वेतन मिळते. सध्या किमान वेतन दरानुसार रोजंदारीने काम करणा-या कंत्राटी कर्मचा-यांना आमच्या पेक्षा जास्त वेतन मिळते. आम्हालाही इतर (कुशल) कंत्राटी कर्मचा-याप्रमाणे किमान वेतन दराने वेतन मिळावे अशी विनंती केली आहे.

सध्या संस्थानकडे कंत्राटदारामार्फत कामे करत असलेल्या कंत्राटी (कुशल) कर्मचा-यांना किमान वेतन दर प्रति दिनी रु.२२७.४२ या प्रमाणे देण्यात येत आहे. त्यानुसार सदर कर्मचा-यांना चार आठवडा सुट्ट्या वजा करुन एकूण २६ दिवसांचे रु.५९१२.९२ इतकी रक्कम आदा केली जाते.

तरी श्रीरामपूर कक्षाकडील कंत्राटी पध्दतीने कामे करत असलेल्या व कंत्राटदारामार्फत कामे करत असलेल्या कुशल कर्मचा-यांचे मानधन /वेतन वाढीबाबतचे अर्जावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.१४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामपूर भू-संपादन कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत कामे करत असलेल्या कुशल कर्मचा-यांची मानधन /वेतन वाढ मिळणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली.**

**उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे बोलावून सध्या चालू असलेली भूसंपानाची कामे किती दिवसात पूर्ण होतील, याबाबत आढावा घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.१४० श्री एस.जयपाल राज कंत्राटी पद्धतीने वाहन चालक,मुंबई कार्यालय यांचा मुदतवाढ व मानधनात वाढ मिळणेचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री एस.जयपाल राज, कंत्राटी पध्दतीने वाहनचालक, मुंबई कार्यालय यांनी दि. २६/१२/२०११ रोजीचे अर्जात खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

"माझी संस्थानच्या मुंबई कार्यालयाकडे कंत्राटी पध्दतीने वाहन चालक या पदावर नेमणूक करण्यात आली होती सदर नेमणूक दि.०२/०१/२०१२ रोजी संपत आहे. सदर पदावर माझी पुन्हा काम करण्याची इच्छा आहे. गेली ०३ वर्ष मी रु.७,०००/- मानधनावर कार्यरत आहे सध्याच्या महागाईचा विचार करता मला कमीत कमी रु. १०,०००/- मानधनावर कृपया पुढील एक वर्षाकरीता कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या नेमणूकीची मुदतवाढ मिळावी हि नम्र विनंती."

श्री जयपाल राज यांचे विहीत वयोमान पूर्ण झालेने त्यांना दि.३१/१२/२००८ चे मध्यानोत्तर सेवानिवृत्त करण्यात आले होते. त्यानंतर श्री जयपाल राज यांचे विनंती अर्जानुसार मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार दि.०३/०१/२००९ पासून एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने वाहन चालक या पदावर रु.७,०००/- या एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आली होती. तद्नंतर मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार त्यांना वेळोवळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यांना जा.नं.एसएसएस वशी ०१/६३०४/२०१० दि.२०/१२/२०१० अन्वये देण्यात आलेल्या मुदतवाढीची मुदत दि.०२/०१/२०१२ रोजी संपूष्ठात येत आहे. श्री एस. जयपाल राज यांचे आज मितीस वय ६३ वर्ष आहे. आता त्यांनी उपरोक्त अर्जान्वये मुदतवाढ व मानधनात वाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ नुसार संस्थानचे कामकाज विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे नियंत्रणाखाली चालते त्यामुळे संस्थान कामाकरीता मुंबई येथील कामकाजा करीता मा.अध्यक्ष महोदय यांना वाहनाची / वाहनचालकाची आवश्यकता असते.

श्री जयपाल राज यांचे मुंबई येथे बरीच वर्षे वास्तव्य तसेच वाहन चालविण्याचे काम केलेले असून त्यांना मुंबई येथील रस्त्याचे, सिग्नलचे सखोल ज्ञान असून ते जबाबदारीने वाहन चालविण्याचे काम करीत असतात.

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मंत्रालय मुंबई -३२ दि.०७/०८/२००९ अन्वये मंजूर झालेल्या आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र.०८ समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही. असा आहे.

वेतन बँड ५२००-२०२०० + ग्रेड वेतन रु.१९०० नुसार मुंबई कार्यालयाकडे वाहन चालकाचे स्थायी पदावर आकृतीबंधातील नियमानुसार रितसर नेमणूक केल्यास अशा कर्मचाऱ्यास खालीप्रमाणे वेतन द्यावे लागेल.

मुळवेतन ५८३०/- + ग्रेडवेतन रु.१९००/- + महागाई रु. ४४८३/- + घरभाडे रु. २३१९/- = एकूण रु. १४,५३२/-.

श्री जयपाल राज यांना कंत्राटी पध्दतीने सध्या दरमहा रु.७,०००/- मानधन देण्यात येत आहे म्हणजेच संस्थानची दरमहा रु.७,५३२/- ची अर्थीक बचत होत आहे.

श्री जयपाल राज यांची विनंती व उपरोक्त परिस्थिती तसेच आकृतीबंधातील अट क्र.०८ विचारात घेऊन श्री जयपाल राज यांना पुढील एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ व मानधनात वाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१४१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री एस.जयपाल राज कंत्राटी पद्धतीने वाहन चालक,मुंबई कार्यालय यांचा मुदतवाढ व मानधनात वाढ मिळणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/वाहन विभागप्रमुख)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ श्री साईनाथ रुग्णालयाचे इ.एन.टी शस्त्रक्रिया गृहामध्ये Boyles मशिनसाठी व्हेंटीलेटर खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत**

**निर्णय क्र.१४२ सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२ श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ओ.टी विभागासाठी कटर खरेदीकामी मे.मनमन,पुणे यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाने दि.०८/०३/२०११ रोजीचे मागणी पत्रान्वये दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी लागणारे Electrically Operated Angled Hand Piece ची मागणी केलेली आहे. तसेच सदर विभागात मनमन हया कंपनीचे ड्रिल मशिन वापरात असून त्यासाठी मनमन हया कंपनीचेच Craniotomy Cutter दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी वापरावे लागत असतात. सदर कटर हे सतत वापरुन खराब होतात, त्यामुळे त्यांनी २० सेट (१ Set = ५ Nos.) ची मागणी केलेली आहे.

सदर हॅन्डपीस व कटर विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,४६,५००/- चे खर्चास मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१२/०६/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३७० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. १६१३ दि.०१/०७/२०११ अन्वये एकुण १२ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारकांकडून दि.१५/०७/२०११ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनूसरुन फक्त ३ कोटेशन प्राप्त झालेले आहेत, ते खालीलप्रमाणे-

१. M/s. Manman, Pune
२. M/s. Imperial Surgical Co., Mumbai
३. M/s. Synthes Medical (P) Ltd., Pune

वरीलपैकी M/s. Synthes Medical (P) Ltd., Pune यांचे कोटेशन श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामधील मशिनरी/इक्वीपमेंट दुरूस्ती व देखभाल करणेसाठी कन्झ्युमेबल स्पेअरपार्ट खरेदीकामीच्या प्राप्त निविदा हया दि.२८/०८/२०११ चे मा. व्यवस्थापन समिती सभेत निविदा उघडते वेळी कन्झ्युमेबल स्पेअरपार्टची निविदा म्हणून उघडले गेले होते. परंतु प्रत्यक्षात ते हॅन्डपीस व कटरचे कोटेशन होते. तसेच अ.नं.१ व २ यांचे प्राप्त सिलबंद कोटेशन दि. २९/०९/२०११ रोजी मा. उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष उघडण्यात आलेले होते.

उपरोक्त प्राप्त कोटेशनचा तुलनात्मक तक्ता बनविण्यात येऊन तो संबंधित विभागाचे न्युरो सर्जन डॉ. मोदगी यांना दाखविण्यात आला असता, त्यांनी Handpiece कामी कोटेशन धारकांकडून Demo मागवून त्यांचे शिफारशीनंतर प्राप्त कोटेशन धारकांचे दरानुसार सदर खरेदीकामी अंदाजे रु.५ लाखापेक्षा जास्त खर्च येऊ शकतो. त्यामुळे त्याकामी पुन्हा स्वतंत्र जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदी करावे लागणार आहे. तर Cutter खरेदीकामी मे. मनमन, पुणे यांच्या मशिनसाठी त्यांचेच Cutter ची शिफारस केलेली आहे.

तेंव्हा मे. मनमन, पुणे यांचे प्राप्त दरानुसार प्रती नग रु.५५००/- प्रमाणे २० नगांसाठी रु.१,१०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तेंव्हा Cutter साठी मे. मनमन, पुणे यांना समक्ष बोलावून अजुन सुट मिळणेकामी चर्चा / वाटाघाटी करता येईल.

उपरोक्त Handpiece कामी Demo नंतर प्राप्त शिफारशीनुसार फेर प्रस्ताव ठेवण्यास तसेच Cutter खरेदीकामी मे. मनमन, पुणे यांना अजुन सुट मिळणेकामी आजचे सभेपुढे चर्चा /वाटाघाटी बोलविण्यात आलेले आहे, तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१४३ सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४ समाधी मंदिराचे उत्तरेकडील बाजूस देणगी दाखल पी.व्ही.सी फॅब्रीक वापरुन छत उभारणी करणे बाबत**

**प्रस्ताव-** समाधी मंदिराचे उत्तर बाजूस व गुरुस्थान मंदिरासमोरील मोकळया जागेत आवश्यक त्या ठिकाणी एम. एस. स्ट्रक्चर असलेले पॉलीकार्बोनेट शीटस् अथवा पी.व्ही.सी. फॅब्रिक वापरुन छत उभारणीचे काम बँकामार्फत देणगी स्वरुपात करुन घेणेस व त्यांचे योग्य आकाराची नांवाची प्लेट शेडवर बसविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि. २१.०५.२०११ रोजीचे सभेत निर्णय क्र. २८२ अन्वये मान्यता देणेत आली आहे. उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार सदरचे काम देणगी दाखल करुन देणेकामी खालील प्रमाणे दोन प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

१. व्हिस्तास् मिडीया प्रा. लि., मालाड, मुंबई
२. श्री. राजीव मेहता, दिल्ली

**(अ)** वरिल प्रमाणे प्रस्तावापैकी अ. नं. ०१ चे प्रस्ताव सादरकर्ते व्हिस्तास् मिडीया प्रा. लि., मुंबई यांनी दि. ११ नोव्हेंबर, २०११ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, देणगी दाखल शेड उभारणीकामी येणारा खर्च

संबंधीत कंपन्यांचे जाहिरतीचे ३'x३' आकाराचे बोर्ड शेडचे पोलवर बसवून सदर जाहिरातीव्दारे उपलब्ध होणारे रकमेव्दारे शेड उभारणी करणार असल्याचे कळविले आहे.

**(ब)** अ. नं. ०२ चे प्रस्ताव सादरकर्ते श्री. राजीव मेहता यांनी दिनांक २९ डिसेंबर, २०११ रोजीचे इ-मेलव्दारे देणगी दाखल करावयाचे शेड जाहिरातीची अट न घालता संस्थानने परवानगी दिल्यास ते स्वखर्चाने शेडची उभारणी करणेस तयार असल्याचे कळविले आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले प्रस्तावापैकी श्री. राजीव मेहता यांनी कुठलिही जाहिरातीची अट न घालता देणगी दाखल शेड उभारणी करणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. करीता सदरचे काम त्यांचेकडून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिराचे उत्तरेकडील बाजूस देणगी दाखल पी.व्ही.सी फॅब्रीक वापरुन छत उभारणी चे काम श्री. राजीव मेहता, दिल्ली यांचेकडून करुन घेण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५ विविध बांधकामांना मुदतवाढ देणे बाबत**

**प्रस्ताव- अ) साई आश्रम प्रकल्पातील खोल्या / हॉलसाठी कॉटस् पुरवठा करणेकामाचे पुरवठादार मे. स्पेसवूड फर्निशर्स प्रा.लि., नागपूर यांना मूदतवाढ देणेबाबत.**

साई आश्रम प्रकल्पाचे खोल्या/ हॉलसाठी एम.एस.(सी.आर.सी.ए) फ्रेम स्ट्रक्चर असलेले ५५६८ नग सिंगल बेडस् (कॉटस् ) खरेदी करणेकामी मे. स्पेसवूड फर्निशर्स प्रा.लि.,नागपूर यांना दि.०९/०८/२०११ रोजी पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. त्यानुसार पुरवठादार यांनी कॉट पुरवठा सुरु केला आहे. आजपोवतो पुरवठादार यांनी २९०० नग बेडस् / कॉटस्चा साहित्या पुरवठा कार्यस्थळावर केलेला आहे. पुरवठादार यांचेशी झालेल्या करारनाम्यानुसार सदर कॉटचा पुरवठा करणे कामाची मूदत दि.२२/०८/२०११ ते दि.२१/१२/२०११ अखेर अशी एकूण ०४ महिन्यांची होती. सदरहू मूदत संपुष्टात आलेली आहे.

पुरवठादार यांनी दि.१६/१२/२०११ रोजीचे पत्रान्वये पूरवठा करणेकामी खालीलप्रमाणे आलेल्या अडचणी नमूद करुन दि.१५/०२/२०१२ पर्यंत मूदतवाढ मिळणेची विनंती केली आहे.

०१. निविदेमधील स्पेशिफिकेशनप्रमाणे CRCA Pipe हे TATA व Sail या कंपनीचे होते. पंरतू सदरहू कंपन्या हया CRCA पाईपस् उत्पादीत करत नसल्यामुळे त्याऐवजी मित्तल या कंपनीच्या स्टील टयुब्ज वापरण्याची परवानगी संस्थानकडे मागितली होती. त्यासाठी जवळपास एक महिना अवधी लागलेला आहे.

०२. १००० नग बेडस्/ कॉटस्च्या साहित्याचा पुरवठा केलेनंतर संस्थानने जागा उपलब्ध नसल्यामुळे काही काळ पुरवठा खंडीत ठेवावा म्हणून सांगीतले होते. त्यामुळे बरेच दिवस वाया गेले.

उपरोक्त बाबींचा विचार करता पुरवठादार यांना कॉटचा पुरवठा करणेस विलंब झालेला आहे.

०३. निविदेमधील समाविष्ट असलेल्या Tata व Sail या कंपन्या CRCA पाईपस् उत्पादीत करत नसल्यामुळे दि.२४/०९/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत पुरवठादार मे.स्पेसवूड, पुणे यांनी सादर केलेला मे. मित्तल प्रेसिजन स्टील टयुबज, पुणे या कंपनीचे स्टील टयुबजस् वापरणेबाबत निर्णय पारीत करण्यात आलेला आहे. त्यानुसार पुरवठादार यांना दि.२२/१०/२०११ रोजी कळविण्यात आलेले आहे. याकामी जवळपास एक महिन्याचा कालावधी लागला तद्नंतर पुरवठादार यांनी रितसर पुरवठा सुरु केलेला आहे.

०४. स्पेसवूड यांनी कार्यस्थळावर कॉटस् साहित्य पाठविणेस सुरुवात केल्यानंतर दि.२१/१०/२०११ व दि.०९/११/२०११ रोजीचे ई- पत्राव्दारे देणगीदार साईभक्त मा.श्री.के.व्ही.रमणी यांनी सदरहू साहित्य साई आश्रम प्रकल्पाच्या इमारतीत ठेवू नये असे सुचविले कारण इमारतींचे अंतिम टप्प्यातील कामे सुरु आहे. त्यामुळे साई आश्रम इमारतींमध्ये साठविण्यात आलेले बेडस् / कॉटस् नविन मध्यवर्ती भांडार येथील नव्याने तयार करण्यात आलेल्या शेडमध्ये ठेवण्यात आलेले आहे व उर्वरीत येणारा माल हा संस्थानचे जुन्या भोजनगृहाचे हॉलमध्ये उतरविण्यात येत आहे. त्यामुळे दरम्यानचे कालावधीत पुरवठा करणेस अडचणी आल्या होत्या.अद्यापपर्यंत साई आश्रम प्रकल्पाच्या इमारती संस्थानचे ताब्यात घेण्यात आलेल्या नाही. त्यामुळे कॉटस्चे Installation करण्याचे काम प्रलंबित आहे.

तरी उपरोक्त बाबींचा व पुरवठादार यांचे विनंतीचा विचारकरता मे.स्पेसवूड फर्नीशर्स प्रा.लि., नागपूर यांना पुरवठा करणेस दि.१५/०२/२०१२ पर्यंत मूदतवाढ देणेकामी मान्यता मिळणेस विनंती.

**ब) साई आश्रम प्रकल्पाचे परिसर विकास (Civil work, External Plumbing, Roads & Pathways & Electrification) कामाचे ठेकेदार शापुरजी पालोनजी ॲण्ड कं.,लि; यांनी केलेल्या मुदतवाढ मागणीबाबत.**

शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम प्रकल्पाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पातील परिसर विकासाचे काम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे. संस्थानमार्फत साई आश्रम प्रकल्पाचे परिसर विकासाचे कामांसाठी ठेकेदार मे. शापुरजी पालोनजी ॲण्ड कं. लि; नाशिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार ठेकेदार यांनी सदरहू कामांस सुरुवात केलेली आहे व काही कामे अंतिम टप्प्यात आहेत. सदर प्रकल्पाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**A) साईआश्रम परिसर विकास कामांचा तपशिल :-** (रस्ते, कंपाऊंड वॉल, पाथवे, परिसर विद्युतीकरण, डी.जी. रुम, ड्रेनेज लाईन, स्टॉर्म वॉटर लाईन, प्लबींग)**:-**

| | |
|---|---|
| Name of work: - | Construction of External Services (Civil Work, Roads, Pathways, Plumbing and Electrification) for Sai Ashram Project Package - I in S. No. 107, 108, 109P at Shirdi and Package - II in G. No. 172 at Nimgaon- Korhale, Tal - Rahata. |
| Contractor: - | Shapoorji Pallonji & Co. Ltd., Nashik |
| Architects: - | Ar. D. O. Nikam, Pune. |
| Project Management Consultants:- | Dorsch Consult (India) Pvt. Ltd; Mumbai. |
| No. & Date of Resolution awarding the wo | No.346, dt.05/04/2009. |
| Work order no. & date: - | No.SSST/WS- CONST/3402/2009, dt.25/03/2009. |
| Contract Value: - | Civil Work - Rs.19,46,19,506.00<br>Electrical Work - Rs.01,66,78,438.00<br>**Total - Rs.21,12,97,944/-.** |
| Date of Commencement: - | 9th April 2009. |
| Time for Completion: - | Ten calendar months. |
| Scheduled date of completion:- | 9th February 2010. |
| Extended date of completion:- | First Extension upto 31st Dec.2010.<br>Second Extension upto 31st March 2011.<br>Third Extension upto 30th November 2011. |

ठेकेदार यांना यापुर्वी तिन वेळा मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यापैकी शेवटी दिलेली वाढीव मूदत दि.३०/११/२०११ रोजी संपुष्टात आलेली आहे. ठेकेदार यांचे साईटवरील प्रगतीचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. no. | Description of Work | Progress Status |
|---|---|---|
| **A** | **Package – I -** | |
| i | Compound wall | 90% Completed |
| ii | Road, Pathways, Parking work | 60% Completed |
| iii | Plinth Protection work | 60% Completed |
| iv | External Plumbing work | 60% Completed |
| v | D.G. Room work | 98% Completed |
| vi | Electrical work | 53% Completed |
| **B** | **Package – II-** | |
| i | Compound wall | 80% Completed |
| ii | Road, Pathways, Parking work | 75% Completed |
| iii | Plinth Protection work | 50% Completed |
| iv | External Plumbing work | 90% Completed |
| v | D.G. Room work | 98% Completed |
| vi | Electrical work | 58% Completed |

तसेच ठेकेदार यांचे साईटवर खालीलप्रमाणे कामे प्रगतीपथावर आहेत.

१. कम्पाउंड वॉल, मुख्य प्रवेशव्दार बांधकाम करणे.
२. रोड, पार्किंग व पाथवेज विकसीत करणे.
३. प्लिंथ प्रोटेक्शन व पेव्हर ब्लॉक बसविणे.
४. ड्रेनेज, स्टॉर्मवॉटर, टेलीफोन व इलेक्ट्रीकल केबल लाईन्स टाकणे.
५. पिण्याचे व फ्लशींग वॉटर जी.आय.लाईन्स टाकणे.
६. परिसर विद्युतीकरण करणे.

७. लॅण्डस्केपींग करणेकामी सिव्हिल वर्क.

८. डी.जी. रुम व मेन गेट कौल फिटींग चालू

ठेकेदार शापुरजी पालोनजी, नाशिक यांनी दि.२७/११/२०११ रोजीचे पत्रान्वये सदरहू कामे करणेसाठी झालेल्या विलंबास खालीलप्रमाणे कारणे नमूद केली आहेत.

१. साई आश्रम भाग-I येथे A-८ ते A-१२ (IWC) या इमारतीचे डक्टमध्ये पार्श्वनाथ डेव्हलपर्स यांचे कामाचे रॅबीट मटेरीअल साचलेले आहे. ते काढणे गरजेचे आहे. तसेच सदरहू इमारतीचे भोवतीचे वाळू व इतर तत्सम साहित्य असल्याने कामास अडचणी येत आहे. त्यामुळे वेळेत काम पूर्ण करणे शक्य झालेले नाही.

२. R- Block चे उत्तर बाजुचे जागेमध्ये पार्श्वनाथ डेव्हलपर्स यांची लेबर कॉलनी असले कारणाने, कामास अडचणी येत आहेत. तसेच परिसरामध्ये नगर-मनमाड रोड लगत मेन गेटेच बाहेर वाढीव पार्किंग विकसीत करण्यात येत आहे. तसेच A-८ चे उत्तर बाजुला पाथवे वगळून त्याठिकाणी रस्ता बनविण्यात येत आहे. त्यामुळे सदरहू कामांसाठी विलंब झालेला आहे.

३. साई आश्रम भाग-II येथे इमारतीचे डक्टची कामे बाकी असल्याने कामास विलंब झालेला आहे.

उपरोक्त बाबींमुळे वेळेत काम पूर्ण करणे शक्य झाले नाही. तरी पार्श्वनाथ डेव्हलपर्स यांचे काम पूर्ण झालेनंतर ०२ महिने मूदतवाढ मिळावी अशी विनंती मे. शापुरजी पालोनजी अॅण्ड कं., लि., नाशिक यांनी केली आहे. प्रकल्पाचे व्यवस्थापन सल्लागार मे. डॉर्श कन्सल्ट (इं) प्रा. लि., मुंबई यांनी त्यांचे दि.३०/१२/२०११ रोजीचे पत्रान्वये ठेकेदार यांनी नमूद केलेल्या उपरोक्त बाबींचा विचार करता व काम हे पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि., यांचेशी संलग्न असल्याने तसेच काही वाढीव कामे करावी लागत असल्याने मे.शापुरजी पालोनजी अॅण्ड कं., लि., नाशिक यांना सदर कामासाठी दि.३१/०३/२०१२ पर्यंत मूदतवाढ देणेस हरकत नाही असे कळविले आहे.

तरी सल्लागार यांचे शिफारशीनुसार ठेकेदार मे. शापुरजी पालोनजी अॅण्ड कं. लि; नाशिक यांना काम पूर्ण करणेसाठी दि.३१/०३/२०१२ अखेर मूदतवाढ देणेस मंजुरी मिळणेस विनंती.

**क) संस्थान परिसरातील अंतर्गत रस्ते व पार्किंग डांबरीकरण कामाचे ठेकेदार मे. जगताप कन्स्ट्रक्शन अॅण्ड इंजी.कं., कोल्हार यांचे मूदतवाढ मागणीबाबत ...**

संस्थान परिसरातील अंतर्गत रस्ते व पार्किंगचे तसेच श्री साई प्रसादालयाकडे जाणाऱ्या निमगांव शिव रस्त्याचे डांबरीकरण करणेचे काम ठेकेदार मे. जगताप कन्स्ट्रक्शन अॅण्ड इंजि.कं.कोल्हार यांना जा.नं.११६८/२०११ दि.०१/०६/२०११ रोजीचे कार्यादेशान्वये देण्यात आलेले आहे. निविदा व करारनाम्यानुसार काम पूर्ण करणेचा कालावधी सहा महिने (दि.१८/०६/२०११ ते दि.१७/१२/२०११) असा आहे. सदरहू कालावधीमध्ये ठेकेदार यांनी श्री साई प्रसादालयाकडे जाणाऱ्या निमगांव शिर्डी शिव रस्त्याचे व जुने प्रसादालय पार्किंग डांबरीकरणाचे काम पूर्ण केले आहे.

ठेकेदार मे. जगताप कन्स्ट्रक्शन अॅण्ड इंजि कं.कोल्हार यांचे दि.१९/१२/२०११ रोजीचे पत्रान्वये सदर कार्यादेश पावसाळ्याच्या सुरुवातीला मिळाला होता. पावसाळयात खाणीमध्ये पाणी साचल्याने आवश्यकतेनुसार खडी उपलब्ध होऊ शकली नाही. तसेच खडी ओली असल्याने डांबरीकरणाचे काम करणे शक्य नव्हते. त्याअनुषंगाने आक्टोबर मध्ये डांबरीकरणाचे काम सूरु केलेले असून सदर काम पूर्ण करणेकामी दि.३१/०३/२०११ पर्यंत मूदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. ठेकेदार यांनी नविन भक्तनिवासस्थान व साईनगर येथील डांबरीकरणापुर्वीचे खड्डे असलेल्या ठिकाणी WBM, BBM करण्याचे काम सुरु केलेले आहे. अद्याप ठेकेदार यांची खालिल कामे बाकी आहेत.

०१. निमगांव शिर्डी शिव रस्त्याचे कडेने श्री साई प्रसादालय प्रवेशव्दारापर्यंत पेव्हींग ब्लॉक बसविणे.

०२. जुने प्रसादालय पार्कींग येथिल उर्वरित भागाचे डांबरीकरण.

०३. साईनगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण.

०४.नवीन भक्तनिवासस्थान मुख्य रस्ता, अंतर्गत रस्ते व पार्कींग डांबरीकरण.

०५.हेलीपॅड डांबरीकरण

सदरची कामे दि.२९/०२/२०१२ अखेर पूर्ण होणे अपेक्षीत आहे.

तरी संस्थान परिसरातील अंतर्गत रस्ते व पार्किंगचे पृष्ठभागाचे डांबरीकरण करणेस ठेकेदार यांना दि.२९/०२/२०१२ अखेर मूदतवाढ देण्यात हरकत नाही.

**ड) शिर्डी बस स्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारतीचे बांधकाम ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन अॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,पुणे यांचे मूदतवाढ मागणीबाबत.**

शिर्डी येथिल सर्व्हे क्र. १७१/२ मध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचे बसस्थानक व त्यावरील संस्थान वापरासाठींचे भक्तनिवास इमारतीचे संपूर्ण बांधकाम संस्थानचे निधीतून करण्यात येत आहे. त्याचा संक्षिप्त तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | :- | शिर्डी बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास संस्थान निधीतून विकसीत करणे. |
| ०२ | आर्किटेक्ट | :- | मे. काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक |
| ०३ | ठेकेदार | :- | मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे |
| ०४ | मंजूर निविदा रक्कम | :- | रु. ७,६०,९०,०८९/- |
| ०५ | कार्यादेश क्र. व दिनांक | :- | जा.क्र.६८२१/१०, दि.२९/०४/२०१० |
| ०६ | करारनाम्यानुसार काम सुरु करण्याचा दिनांक | :- | १४/०५/२०१० |
| ०७ | प्रत्यक्ष काम सुरु केलेलर दिनांक | :- | २६/०६/२०१० |
| ०८ | काम पूर्ण करण्याचा कालावधी | :- | १५ महिने |
| ०९ | करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याचा दिनांक | :- | १३/०८/२०११ |
| १० | कामाची सद्यस्थिती | :- | नियोजीत इमातरीचे मुळ ढाच्याचे / पायाचे एकूण ८० आर.सी.सी. कॉलम्स पैकी ६९ कॉलम पूर्ण केले असून त्यावरील तळमजल्याचे ८०% स्लॅबचे कॉंक्रीटींग पूर्ण केले आहे. पहिल्या मजल्याचे ३२ कॉलमचे कॉंक्रीटींग केले असून स्लॅब शटरींगला सुरुवात केली आहे. |

उपरोक्त ठेकेदार यांनी दि.२५/०८/२०११ चे पत्राव्दारे सदर बांधकाम पूर्ण करणेसाठी मूदतवाढ मिळणेची विनंती केली आहे. तसेच त्यानंतर दि.३०/०९/२०११ रोजीचे पत्राव्दारे दि.३१/०७/२०१२ अखेरपर्यंत मूदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे. सदर कामाचे आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांनी दि.०३/११/२०११ चे पत्राव्दारे याबाबत खालिलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"जुने बसस्थानकाचे जागेवरील काही भाग ताब्यात नसल्याने पूर्ण बांधकाम करण्यास ठेकेदार यांना अडचणी येत असल्याने त्यांचे मागणी प्रमाणे दि.३१/०७/२०१२ पर्यंत मूदतवाढ देणत यावी तसेच उपलब्ध भागातील कामाचा वेग वाढविणेबाबत समज देणेत यावी."

म.रा.मा.प. महामंडळ यांचेकडून अद्यापही बसस्थानक इमारतीतील बुक स्टॉल, कॅन्टीन, पान स्टॉल, रसवंती, फ्रुट ज्युस सेंटर, झुणका भाकर केंद्र, एस.टी.डी. बुथ आदी वाणिज्य आस्थापनां खालील जागेचा ताबा मिळालेला नसल्याने ११ कॉलम्स उभारणीचे काम करता आलेले नाही. त्यामुळे नियोजीत इमारतीचे तळमजल्यावरील ४३७ चौ.मी. क्षेत्रफळातील पायापासूनचे बांधकाम अद्याप सुरु करता आलेले नाही.

तरी वरील काम पूर्ण करणेसाठी ठेकेदार यांना दि.३१/०७/२०१२ अखेर मूदतवाढ मंजूर होणेस विनंती.

**निर्णय क्र.१४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेल्या बांधकामाना मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६ शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रथम प्राधान्यगटातील रस्त्यांपैकी संस्थानमार्फत विकसित करण्यात येत असलेल्या सहा रस्त्याचे ठेकेदार रोमन टारमॅट लि.यांचे पत्राबाबत**

**प्रस्ताव-** शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील अंदाजे रुपये ८८ कोटी मात्र इतक्या रकमेचे ११ रस्ते विकसीत करणेचे काम संस्थान व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचेमार्फत सुरु आहे. सदर कामापैकी रु.२८ कोटी रक मेस शासन मान्यता प्राप्त आहे. संस्थानमार्फत शिर्डी शहरातील ७.२९ किमी. लांबीचे रस्ते विकसित करणे प्रकल्पाचे काम मे.रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे सदर कामांबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या माध्यमातून विकसीत करावयाचे रस्ते -०६ रस्ते |
|---|---|---|
| ०१ | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार | युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे |
| ०२ | बांधकाम ठेकेदार | मे.रोमन टारमॅट लि.,नवी मुंबई |
| ०३ | मंजूर निविदा रक्कम | रु. ३३.८३ कोटी |
| ०४ | निविदा टक्केवारी | १०% कमी |
| ०५ | कार्यादेश क्रमांक / दिनांक | जा.क्र ८८३७ दि.०६/०८/२०१० |
| ०६ | कामाची मुदत | १५ महिने (दि.०५/११/२०११ अखेर) |
| ०७ | ठेकेदार यांना सल्लागार यांचे प्रमाणपत्रानुसार दि.२०/१२/२०११ अखेर २ रे रनिंग बिलाअखेर अदा केलेली रक्कम | रु. ४,७८,९५,८९९/- |
| ०८ | यापुर्वी आदा केलेले मोबिलायझेशन | रु. १,६९,१६,३१०/- (बँक गॅरंटी घेवून) |

| | |
|---|---|
| | ॲडव्हान्स रक्कम |

**विकसीत करावयाचे रस्त्यांचा तपशील-**

| रस्ता क्र. | रस्त्याचे नाव | लांबी (मी.) | रुंदी (मी.) | कामाची सद्य :स्थिती |
|---|---|---|---|---|
| अ) संस्थान मार्फत विकसीत करावयाचे रस्ते. | | | | |
| ०१. ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., यांचेमार्फत चालू असलेले रस्ते. | | | | |
| ०३ | नांदुर्खी रस्ता कॉंक्रीटीकरण /डांबरीकरण करणे. (नगर मनमाड रस्ता ते नांदुर्खी शीव रस्ता | २००० | १८ | नगर-मनमाड रस्ता ते प्रस्तावीत १८ मी. वळण रस्ता या ५४० मी. अंतरामध्ये फक्त कॉंक्रीटीकरण पुर्ण केले आहे. उर्वरीत भागातील GSB, DLC, पेव्हींग ब्लॉक बसविणे व इतर कामे प्रगतीपथावर आहेत. |
| ०६ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.(नवीन पिंपळवाडी रस्ता ते १८ मीटर रिंग रस्ता आरक्षण क्र.३१ पोहच ) | ५५० | १५ | या भागातील रिटेनिंग वॉल, सबबेस, स्टॉर्मवॉटर ड्रेनेज इ. कामे पुर्ण. GSB व इतर कामे प्रगतीपथावर आहेत. अद्याप कॉंक्रीटीकरण कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. |
| ०७ | विकास योजनेतील २४ मीटर वळण रस्ता डांबरीकरण करणे. (नगर मनमाड रस्ता ते साईश्रध्दा हौसिंग सोसायटीचा रस्ता) | ४५० | २४ | या भागातील रिटेनिंग वॉल, सबबेस, स्टॉर्मवॉटर ड्रेनेज इ. कामे पुर्ण. WBM व इतर कामे प्रगतीपथावर आहेत. अद्याप डांबरीकरण कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. |
| ०८ | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील दक्षिणोत्तर (पिंपळवाडी रस्ता - निमगांव शीव रस्ता) | ४५० | १८ | या भागातील सबबेस, स्टॉर्मवॉटर ड्रेनेज, GSB, WBM इ. कामे पुर्ण. अर्ध्या भागातील कॉंक्रीटीकरण काम पुर्ण. उर्वरीत भागातील DLC पुर्ण. कॉंक्रीटीकरणासाठी पुर्वतयारी , पेव्हींग ब्लॉक बसविणे व इतर कामे प्रगतीपथावर आहेत |
| ०२. अद्याप काम सुरु न केलेले रस्ते. | | | | |
| ०५ | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा वळण रस्ता डांबरीकरण करणे. (आरक्षण क्र. ३१ चा दक्षिण-पश्चिम कोपरा ते नाला क्र.३४ पर्यन्त) | १५०० | १८ | अद्याप प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. दि. १४/०९/२०११ रोजी रस्ता काम करणेसाठी हस्तांतरीत करणेत आला आहे. |
| ०९ | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. (नगरमनमाड रस्ता /लक्ष्मीनगर ते १८ मीटर वळण रस्ता पर्यन्त) पुर्व - पश्चिम रस्ता) | ८४० | १८ | अद्याप प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. दि.२८/०७/२०११ पुर्वी रस्ता काम करणेसाठी हस्तांतरीत करणेत आला आहे. |
| ९ अ | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा रस्ता डांबरीकरण करणे. (नगर मनमाड रस्ता ते १८ मीटर रिंग रस्ता पर्यन्त आरक्षण क्र. ३१पोहच) | १५०० | १८ | भुसंपादन कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नाही. अद्याप प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. |

उपरोक्त तकत्यातील रस्त्यांपैकी रस्ता क्र. ०५, ०९ व ९अ या रस्त्यांचे कामास ठेकेदार यांनी अद्याप सुरुवात केलेली नाही. सुरु असलेल्या रस्त्यांचे कामाची गती ही अत्यंत धिमी आहे. सदरचे कामाची १५ महिने मुदत दि.०५/११/२०११ रोजी संपुष्टात आली असून कामाची गती वाढविणेबाबत ठेकेदार यांचे समवेत वेळोवेळी झालेल्या प्रगती आढावा बैठकीत सुचना देवूनही ठेकेदार यांनी कामाची अपेक्षित अशी गती अद्याप वाढविलेली नाही व उपरोक्त तिन रस्त्यांचे कामास सुरुवातही केलेली नाही.

**(अ)** आता, ठेकेदार रोमन टारमॅट लि. यांनी त्यांचेकडील दि.२८/११/२०११ चे पत्रान्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

".. Past 15 months, we lost very heavily in the form of idling of our resources, manpower, plant & equipments, in executing the road work on piecemeal basis.Due to encumbrances on the road alignment.

As we have lost heavily in the above slow process, our CMD had requested yourself to allow us to complete the job of the above mentioned roads only and foreclose the contract.

सदरचे कामात त्यांना मोठया प्रमाणात तोटा सहन करावा लागल्याने त्यांचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक यांनी दि.१५/१०/२०११ रोजी मा.अध्यक्ष साो. यांना शिर्डी शहरातील रस्त्यांबाबत झालेल्या प्रगती आढावा बैठकीचे वेळी वरील पैकी प्रगतीपथावर असलेल्या चार रस्त्याचे कामच ते पुर्ण करतील व त्यानंतर सदर काम बंद करतील अशी विनंती केली होती. "

**(ब)** तद्नंतर ठेकेदार यांनी परत दि.०७/०१/२०१२ चे पत्रान्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

".. चार रस्त्यांची कामे प्रगतीपथावर असून, उर्वरीत दोन (०२) रस्त्यांचे काम सुरु करण्याचा कंपनीचा विचार आहे. मागिल वर्षाभरातील कामांचा आढावा घेता असे निदर्शनास आले आहे की, सदर चार (०४) रस्त्यांचे काम करतानां कंपनीस आलेल्या स्थानिक अडचणीमुळे कामाची योग्य गती साधता आली नाही. त्यामुळे कंपनीस मोठा आर्थिक तोटा सोसावा लागत आहे. सदर कामे ही श्री साईबाबांच्या भक्तपरिवारांना चांगले रस्ते उपलब्ध व्हावे ह्या उदात्त हेतूने कमी दराने घेण्यात आलेली आहे.

उर्वरीत दोन रस्त्यांच्या कामाकरिता आम्हांस ना नफा ना तोटा या प्रमाणे निविदेच्या दरामध्ये १५% वाढ करुन काम करण्यास आपण सहमती दिल्यास कंपनी संपूर्ण गुणवत्तेसह आणि कमी वेळेत दोन्ही रस्त्यांची कामे पूर्ण करण्यास बांधील राहील. तसेच सुरु असलेल्या कामामध्ये आलेल्या स्थानिक अडचणीमुळे सदर रस्यांची कामे देण्यात आलेल्या वेळेमध्ये पूर्ण करता आलेली नाही. तरी सदर सर्व रस्त्यांची कामे पूर्ण करण्यास आम्हांस मुदतवाढ देण्यात यावी असे कळविले आहे."

ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., मुंबई यांचेकडील दिनांक २८ नोव्हेंबर, २०११ चे पत्रानुसार ते उपरोक्त तक्ता क्र. ०२ मधील रस्ता क्र. ०५, ०९ व ९ अ या रस्त्यांची कामे करणेस इच्छुक दिसत नाही. तथापि, त्यांचे शिर्डी साईटचे प्रतिनीधींनी दिनांक ०७ जानेवारी, २०१२ अन्वये दिलेल्या पत्रामध्ये नमुद केलेली १५% दरवाढ व सदर सर्व रस्त्यांची कामे पूर्ण करणेस मुदतवाढ दिल्यास काम पुर्ण करण्यास इच्छुक आहोत असे कळविले आहे.

उपरोक्त बाबींबाबत प्रकल्प सल्लागार व ठेकेदार यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चेस बोलवून, त्यांचेशी चर्चा करुन याबाबत निर्णय घेता येईल, असे मत आहे.

तरी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त कामाचे सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे व ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., मुंबई यांना स्थानिक उपसमितीचे सभेपूढे बोलाविण्यात येऊन निर्णय घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **नियोजित साई गार्डन प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस, प्रा.लि. नवी दिल्ली यांचे फी मागणी बाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे विवीध निर्णयांन्वये, मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. १९८,१९९, २०० व २०१ मधील जागेत साई गार्डन प्रकल्पाचे काम करणेस मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार नियोजित साईगार्डन प्रकल्पासाठी लेजर शो उभारणीचे कामांसाठी आराखडे, अंदाजपत्रके व निविदा कागदपत्रे तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२४१ अन्वये रु.४६ कोटी खर्चाचे प्रस्तावास मान्यता देणेत आली होती. सदर काम तीन टप्प्यात करण्याचे ठरले होते. तसेच आर्कीटेक्ट माथुर अँड काप्रे असोसिएटस् प्रा. लि., नवी दिल्ली यांची प्रकल्पाचे किंमतीचे २.५% अधिक सर्व्हिस टॅक्स याप्रमाणे फीवर नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली आहे.

**०१.** आर्कि. काप्रे यांनी संस्थानमार्फत करावयाचे नियोजित साई गार्डन प्रकल्पासाठी जुलै, २००९ मध्ये प्रथम अंदाजपत्रक, नकाशे व निविदा मसुदा तयार केले होते. यावर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ सप्टेबर, २००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७३१ (८) अन्वये, खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे यांचेमार्फत याकामी सविस्तर आराखडा व अंदाजपत्रक तयार केलेले आहेत, त्यानुसार ३० वर्षाचे कालावधी करिता बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (B.O.T.) या तत्वावर उपरोक्त नमूद केल्यानुसार साईगार्डनची निर्मिती करण्यास व याकामी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (B.O.T.) या तत्वावर साईगार्डन निर्मितीसाठी इच्छुकांकडून कालावधी, अपेक्षीत खर्च, संस्थानसाठी यामधून किती उत्पन्न मिळेल यासर्व बाबींसह सविस्तर प्रस्ताव मागविणेत यावेत, असे ठरले."

**०२.** उपरोक्त निर्णयानुसार काप्रे यांनी तयार केलेले अंदाजपत्रक, नकाशे व निविदा पुस्तीका रद्द करुन त्यांना BOT तत्वावर साईगार्डन प्रकल्पाची उभारणी करणेसाठी आवश्यक असणारे RFP Document, नकाशे तयार करुन घेणेत आले व त्यानुसार प्रस्ताव मागविणेत आले होते. सदरचे प्राप्त इ

ाालेले प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५ सप्टेंबर, २०१० रोजीचे सभेत उघडणेसाठी सादर करणेत आले. सदर सभेतील निर्णय क्रमांक ६९३ अन्वये, खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रकल्प हा BOT तत्वावर राबविणेऐवजी थेट संस्थानतर्फे राबविण्यात यावा, असे ठरले. त्यामुळे BOT तत्वावरील प्रकल्पासाठी प्राप्त झालेले दोन प्रस्ताव रद्द करण्यात यावेत. याकामी लेझर शो उभारणीसाठी जागतिक पातळीवर निविदा मागविणेत याव्यात. लेझर-शोचे उभारणीसाठी आवश्यक सिव्हील वर्क व संपूर्ण गार्डन विकसीत करणेसाठी आवश्यक असलेल्या इतर कामांसाठी स्वतंत्ररित्या राष्ट्रीय पातळीवर निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.

तसेच, ४D शो व इतर वैशिष्ट्यपूर्ण कामांचे परिपूर्ण उभारणीसाठी राष्ट्रीय पातळीवर निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले."

वरीलप्रमाणे निर्णयानुसार कार्यवाही करणेत येवून साईगार्डन प्रकल्पासाठी खालीलप्रमाणे कार्यादेश देणेत आलेले आहेत.

| **S.No** | **Project** | **Contractor** | **Estimated Cost** |
|---|---|---|---|
| 01 | Sai Garden Civil Work | KRR Infra Project Ltd; Hyderabad | Rs.30.95 Cr |
| 02 | Sai Garden Laser Show | Laservision Ltd; Hong Kong | Rs.24.75 Cr |
| | | **Total:** | **Rs.55.70 Cr** |

आर्कीटेक्ट यांचे करारनाम्यातील अटी शर्तीनुसार साईगार्डन प्रकल्पातंर्गत लेजर-शोसह साईगार्डनसाठी आवश्यक सिव्हील वर्क करणेसाठी ठेकेदार मे. के. आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्टस् लि., हैद्राबाद यांना देणेत आलेल्या रु.३०,९५,२७,६६६/- रकमेच्या कार्यादेशानुसार आर्किटेक्ट काप्रे यांना २.५% फी अधिक सर्व्हिस टॅक्ससह एकुण रु.८५,३५,२२६/- मात्र इतकी रक्कम फीपोटी द्यावी लागणार आहे. त्यापैकी आर्किटेंक्ट यांनी दिलेल्या सेवेनुसार त्यांना आजपावेतो सर्व्हिस टॅक्ससह रु.१७,०७,०४५/- मात्र फी अदा करणेत आली आहे. उर्वरीत फी त्यांना करारनाम्यातील शर्तीनुसार टप्प्याटप्प्याने अदा करणेत येईल.

**(ब)** आर्किटेक्ट यांचे समवेत झालेल्या करारनाम्यानुसार सदर प्रकल्पासाठी आर्किटेक्ट यांना प्रकल्पाचे किंमतीच्या २.५०% फी अधिक सर्व्हिस टॅक्ससह खालील टप्प्याने फी अदा करावयाची आहे.

| | | |
|---|---|---|
| Stage-1 | On signing of contract, awarding the architectural work | 5% of total fees payable |
| Stage-2 | on approval of plans & estimates | 10% of total fees payable, less amount paid at Stage 1. |
| Stage-3 | on award of the work to the contractor finally selected for its execution and release of working drawings | 20% of total fees payable, less amount paid up to Stage 2. |
| Stage-4 | During the progress and on completion of the construction work. | 70% of the total fees payble at prorata with the progress of work. |
| Stage-5 | On Completion of the project. | Balance 10% of the total fees payable on successful completion of the project and commissioning of all equipments and on release of as-built drawings. |

आर्किटेक्ट काप्रे यांनी यापूर्वी वरिल **"अ"** मधील ०१ व ०२ नुसार दिलेल्या सेवांचे तसेच लेजर शो उभारणी करीता लेजर व्हिजीन लि, हॅंगकॉंग यांना बहाल केलेले कामापोटी मिळून एकुण रुपये ३३,३६,०२४/- अतिरीक्त बिलाची मागणी केली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **Sr. No.** | **Fee Stage** | As per architect's bill | | Laser Show (Laservision Ltd.) Rs.25/- crores |
|---|---|---|---|---|
| | | Initial Estimate Rs.23.66 crores | RFPDocuments made for BOT, Rs.23.66 crores | |
| | | **A** | **B** | **C** |
| 01 | Stage-1 (5% of total fees payable) On signing of contract, awarding the architectural work | 295750/- | 0.00 | 312500/- |
| 02 | Stage-2 (10% of total fees payable) on approval of plans & estimates | 295750/- | 0.00 | 312500/- |
| 03 | Stage-3 (20% of total fees payable, less amount paid up to Stage 2.) on award of the work to the contractor finally selected for its execution and release of working drawings | 591500/- | 591500/- | 625000/- |
| | Total Amount of fees | 1183000/- | 591500/- | 1250000/- |
| | Add Service tax @ 10.30% | 121849/- | 60925/- | 128750/- |
| | Total Amount Rs. | 1304849/- | 652425/- | 1378750/- |
| | | 19,57,274/ | | 13,78,750/- |
| | **Total A+B+C Rs.** | **33,36,024/-** | | |

उपरोक्त तपशिल विचारात घेता A व B या दोन बाबींसाठी तयार करणेत आलेले बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक हे सर्वसाधारणपणे एकाच संकल्पनेवर आधारीत होते. मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयाचे अनुषंगाने त्यातच आवश्यक त्या सुधारणा करुन सध्याचे सिव्हील वर्कचे आराखडे व निविदा अंतीम करणेत आले. त्यामुळे त्यासाठी आर्कीटेक्ट यांचे मागणीनुसार अतिरिक्त फी रु.१९,५७,२७४/- देय होत नाही. तथापी याबाबत आर्कीटेक्ट यांचेशी समक्ष चर्चा करून निर्णय घेता येईल.

लेजर शो उभारणीसाठी आर्किटेक्ट काप्रे यांचेकडून RFP Document तयार करुन घेण्यात आले व त्यानुसार प्रस्ताव मागविण्यात आले. सदर लेजर शोचे काम लेजर व्हिजन लि., हाँगकाँग याना बहाल करणेत आले आहे. त्यासाठी आर्किटेक्ट यांनी नव्याने RFP तयार करणे, त्यासंबंधातील तज्ञांची मते विचारात घेवून दुरुस्ती करणे, RFP अंतिम मसूदा तयार करणे, प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे मुल्यांकन करून त्याबाबत अभिप्राय देणे इत्यादी सेवा दिलेल्या आहेत.

लेजरव्हिजन लि. हाँगकाँग यांचेमार्फत उभारण्यात येणारे लेजर शोचे काम हे अतिविशिष्ठ स्वरुपाचे आहे. त्यामुळे सामान्यपणे आर्कीटेक्ट यांचेमार्फत सिव्हील वर्कसाठी देण्यात येणाऱ्या सेवांची तुलना सदर कामाशी करता येणार नाही. त्यामुळे सदर लेजर शो प्रकल्पासाठी आर्कीटेक्ट यांचेकडून घ्यावयाच्या सेवांचे स्वरुप व त्यासाठी अदा करावयाची फी निश्चित करणे आवश्यक आहे. तरी त्याबाबत आर्किटेक्ट काप्रे यांचेशी समक्ष चर्चा करुन निर्णय होणेस विनंती. तसेच त्यांनी साईगार्डन प्रकल्पांतर्गत लेजर शो उभारणीकामी यापुर्वी दिलेल्या सेवांसाठी वरीलप्रमाणे मागणी केलेल्या फी बाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नियोजित साई गार्डन प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस, प्रा.लि. नवी दिल्ली यांना व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे समक्ष चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फूड प्रोसेसिंग युनिट उभारणे बाबत**

**प्रस्ताव-** दिनांक १०/०१/२०१० रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उपरोक्त विषयासंदर्भात खालिलप्रमाणे निर्णय क्र.१९२ संमत करण्यात आलेला आहे.

"मा. विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सूचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या -

(०८) प्रसादालय विभागाकडे प्रसाद लाडुची मागणी दर वर्षी २०% ने वाढत आहे. यामुळे जागा कमी पडत आहे. तसेच यापुढे पेरु बर्फी बनविण्यासाठी जागेची गरज आहे. त्यासाठी स्वतंत्र लाडू व पेरु बर्फीचे फूड प्रोसेसिंग युनिट बनविण्यासाठी मान्यता देण्यात आली.

यासाठी जागा, माल ये-जा करण्याची वाहतूकीचा मार्ग, मोठ्या प्रमाणात दाळ दळण्याची मिल, लाडू वाळविण्यासाठी हवेशिर शेड याबाबत सविस्तर अहवाल व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करावा असे ठरले."

त्यानंतर दिनांक ०५/०९/२०१० रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत खालिलप्रमाणे निर्णय क्र. ७५१ संमत करण्यात आलेला आहे.

"मा. विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सूचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या -

०६) प्रसादालय विभागाकडे प्रसाद लाडूची मागणी दर वर्षी २०% ने वाढत आहे. त्यामुळे जागा कमी पडत आहे. यासाठी जागा, माल ये-जा करण्याची वाहतूकीचा मार्ग, मोठ्या प्रमाणात दाळ दळण्याची मिल, लाडू वाठविण्यासाठी हवेशिर शेड इत्यादीसाठी प्रसादालयाजवळ जागा निश्चित करण्यात आलेली आहे. परंतू सदर जमीनीचा झोन बदलण्याची कार्यवाही चालू असलेबाबत मा. कार्यकारी अधिकारी यांनी सभेत सांगितले. याबाबत आराखडे तयार करणेकामी श्री सुरेश बाबू, मुंबई यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करण्यात यावी. याकामी योग्य ते मानधन देण्यात यावे असे ठरले. "

त्यानंतर दिनांक १३/०२/२०११ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत खालिलप्रमाणे निर्णय क्र. १२४ संमत करण्यात आलेला आहे.

"मा. विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सूचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या -

(०२) स्वतंत्र लाडू विभाग सुरु करणेकामी मा. विश्वस्त श्री शैलेश कुटे, श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री. अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी जागेची पहाणी करुन, जागा निश्चत झालेनंतर आर्किटेक्ट श्री शक्ती परमार यांची नेमणूक करावी."

याबाबत मा. विश्वस्त डॉ. एकनाथ गोंदकर व श्रीमती उर्मिला जाधव यांनी दि.०९/१२/२०११ रोजी मौजे निमागांव कोऱ्हाळे येथिल संस्थान मालकीच्या जागांची पहाणी केली. सदर पहाणी अंती मौजे निमगांव कोऱ्हाळे येथिल गट नं. २१८ मधिल जागा (क्षेत्र ०१ हेक्टर) प्रसाद लाडू प्रकल्पासाठी निश्चित

करणेत यावी असे मा. विश्वस्त डॉ.एकनाथ गोंदकर व श्रीमती उर्मिला जाधव यांनी सूचित केले आहे. तसेच सदर काम हे उत्पादन प्रक्रीयेशी निगडीत असल्याने त्यासाठी मुंबई येथिल आर्किटेक्ट ऐवजी स्थानिक आर्कीटेक्टची नेमणूक करावी असेही सुचविले आहे. मा. व्यवस्थापन समिती सभेत संमत करण्यात आलेल्या निर्णयांनुसार तयार करणेत आलेल्या आर्कीटेक्टचे पॅनलवर खालिल स्थानिक (अहमदनगर जिल्ह्यातील) आर्कीटेक्टस्‌ची नेमणूक करणेत आलेली आहे.

०१. आर्कीटेक्ट येवले विजयसिंह बाळासाहेब, राहुरी (लॅण्ड मार्क कन्सल्टंट)
०२. आर्किटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर
०३. आर्किटेक्ट शितल पी. जोशी, श्रीरामपूर
०४. आर्किटेक्ट निकम पा.असो.,श्रीरामपूर
०५. आर्किटेक्ट भुतडा असोसिएटस्‌, श्रीरामपूर
०६. कांकरीया असोसिएटस् , अहमदनगर

तरी वरीलप्रमाणे प्रसाद लाडू निर्मिती व्यवस्थेसाठी मौजे निमगांव को-हाळे गट नं. २१८ मधिल ०१ हेक्टर क्षेत्र निश्चित करणेबाबत तसेच सदर कामासाठी वरीलपैकी एका आर्कीटेक्टची नेमणूक करुन त्यांची फी ठरविणेबाबत मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसाद लाडू निर्मिती व्यवस्थेसाठी मौजे निमगांव को-हाळे गट नं. २१८ मधिल ०१ हेक्टर क्षेत्र निश्चित करण्यात यावे. तसेच या कामासाठी मे.निकम पाटील असोसिएटस्.श्रीरामपूर यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करुन त्यांचेमार्फत नियोजित प्रकल्पाचे संकल्पन करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०९ साई आश्रम भाग १ व २ करिता वॉटर कुलर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्त मा.श्री.रमणीसर यांचे देणगीतून साईभक्तांच्या निवासाकरीता बांधण्यात येत असलेल्या साईआश्रम - ए व साईआश्रम - बी या इमारत समूहाचे बांधकाम पूर्णत्वाकडे आहे. हे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करतेवेळी त्याठिकाणी दैनंदिन कामासाठी लागणा-या विविध साधनाची पूर्तता करावी लागणार आहे

दि.२८-१२-२०११ रोजी साईआश्रम इमारतींच्या कामकाजासंबंधी झालेल्या सभेत इमारतींचा साईभक्तांना निवासासाठी वापर चालू होते वेळी साईभक्ताना थंड पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून त्याठिकाणी वॉटरकुलर बसविण्यात यावेत असे ठरले आहे. पाणीपुरवठा विभागाने दि. ३०-१२-२०११ रोजी साईआश्रम कडे खालीलप्रमाणे वॉटरकुलर्स लागतील म्हणून मा.प्र. अ. प्र. अ.सो ( निवासस्थाने ) यांचे मार्फत लेखी कळविले आहे.

यासाठी खालीलप्रमाणे वॉटरकुलर्स खरेदी करावे लागतील.

| अ.क्र. | इमारती | नग | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | **वॉटरकुलर -**<br>क्षमता- ४० लिटर, कंपनी- उषा / व्होल्टास / ब्लू स्टार, बॉडी - स्टेनलेस स्टील | | | |
| ०१) | साईआश्रम - ए<br>(अ) एकुण इमारती -१२ प्रत्येक इमारतीस ०४ याप्रमाणे ४८<br>(ब) ऑफीस व कॅन्टीन - आर ब्लॉक करीता ०४<br>(क) पॅसेज- जनरल करीता ०६ | ५८ | रु. २५,०००/- प्रती नग | रु.१४,५०,०००/- |
| ०२) | साईआश्रम - बी<br>(अ) एकुण इमारती - ०६ प्रत्येक इमारतीस ०४ याप्रमाणे २४<br>(ब) ऑफीस व कॅन्टीन - आर ब्लॉक करीता ०४<br>(क) पॅसेज- जनरल करीता -०३ | ३१ | रु.२५,०००/- प्रती नग | रु.०७,७५,०००/- |
| | | एकुण रक्कम :- | | रु.२२,२५,०००/- |

तरी वरीलप्रमाणे वॉटरकुलर खरेदी करणेकामी एकुण अंदाजे रक्कम रुपये २२,२५,०००/- /-( रु. बावीस लाख पंचवीस हजार मात्र) इतका खर्च येणे अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास तसेच वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा बोलाविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भाग १ व २ करिता आवश्यक असणारे ३१ नग वॉटर कुलर आर.ओ प्लॅन्टस खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **विद्युत विभागासाठी वार्षिक साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून सूट दरपत्रके घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** विद्यूत विभागाचे दि. ८.११.२०११ चा मंजूर प्रस्तावाने वार्षिक साहित्य खरेदीस व त्याकामी अंदाजे रु. ३५,८६,४७५.४५ पैसे मात्रचे अपेक्षित खर्चाचा विषय दि.१९.११.२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेस्तव सादर करणेत आलेला आहे. त्यानुसार विहित पध्दतीने खरेदीची कार्यवाही करणेकामी जनसंपर्क विभागामार्फत दि.१३.१२.२०११ चे सामना वृत्तपत्रात जाहिरात देवून २०निविदा तयार करुन मुंबई कायार्लयात ०१ ते १० व शिर्डी कार्यालयात ११ ते २० निविदा विक्रीस ठेवण्यात आल्या होत्या. जाहिरातीत दि. ३०.१२.२०११ अखेर मुदत देण्यात आली होती. त्यानुसार खालील ६ सिलबंद निविदा मुदतीत प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नांव व गांव | आवक नंबरःतारीख | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | मे. ठाकूर श्राफ ॲण्ड इलेक्ट्रीक,पुणे | १७७०५/३०.१२.२०११ | बंद २ पाकिटे |
| ०२ | मे. इंटरनॅशनल इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर | १७६५२/२९.१२.२०११ | बंद २ पाकिटे |
| ०३ | मे. विनायक इंजिनिअर,मुंबई | १२९०/२८.१२.२०११ | बंद २ पाकिटे |
| ०४ | मे. मार्क इंडस्ट्रीज्, मुंबई | १२९१/३०.१२.२०११ | बंद २ पाकिटे |
| ०५ | मे. एक्सल ट्रेडिंग कंपनी,मुंबई | १२९५/३०.१२.२०११ | बंद २ पाकिटे |
| ०६ | मे. हिंदूस्थान टूल्स ॲण्ड इंजिनिअरींग कंपनी, मुंबई | १२९७/३०.१२.२०११ | बंद २ पाकिटे |

उपरोक्त प्राप्त झालेल्या ६ सिलबंद निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेस तसेच वरील ६ निविदा सादरकर्त्यांना एकत्रित स्वरुपात घेण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित दर देऊ केले.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नांव व गांव | चर्चेअंती देऊ केलेले सुधारित दर |
|---|---|---|
| ०१ | मे. ठाकूर श्राफ ॲण्ड इलेक्ट्रीक,पुणे | २% सुट |
| ०२ | मे. इंटरनॅशनल इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर | अनुपस्थित |
| ०३ | मे. विनायक इंजिनिअर,मुंबई | अनुपस्थित |
| ०४ | मे. मार्क इंडस्ट्रीज्, मुंबई | अनुपस्थित |
| ०५ | मे. एक्सल ट्रेडिंग कंपनी,मुंबई | २.५% सुट |
| ०६ | मे. हिंदूस्थान टूल्स ॲण्ड इंजिनिअरींग कंपनी, मुंबई | अनुपस्थित |

**निर्णय क्र.१५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यातील मे. मार्क इंडस्ट्रीज्, मुंबई यांनी सन- २०११ चे साहित्याचा पुरवठा आदेश पुर्ण न केल्याने तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. ०२ चे निम्नतम दर स्विकारणेत येऊन संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच ज्या साहित्याचे दर आलेले नाहीत अशा साहित्याचे खरेदीसाठी फेर कोटेशन मागणी करावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **आरोग्य विभागासाठी वार्षिक साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून सूट दरपत्रके घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** आरोग्य विभागाचे दि. ५.१०.२०११ चा मंजूर प्रस्तावाने वार्षिक साहित्य खरेदीस व त्याकामी अंदाजे रु. १६,६३,९५०/- मात्रचे अपेक्षित खर्चाचा विषय दि.१९.११.२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेस्तव सादर करणेत आलेला आहे. त्यानुसार विहित पध्दतीने खरेदीची कार्यवाही करणेकामी जनसंपर्क विभागामार्फत दि.१३.१२.२०११ चे सामना वृत्तपत्रात जाहिरात देवून २० निविदा तयार करुन मुंबई कायार्लयात ०१ ते १० व शिर्डी कार्यालयात ११ ते २०निविदा विक्रीस ठेवण्यात आल्या होत्या. जाहिरातीत दि. ३०.१२.२०११ अखेर मुदत देण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ४ सिलबंद निविदा मुदतीत प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नांव व गांव | आवक नंबरःतारीख | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | भिंगारवाला एन्टरप्राईझेस,अहमदनगर | १७५३४/२७.१२.२०११ | बंद १ पाकिट |
| ०२ | आर.के. एन्टरप्राईझेस,नासिक | १७७०६/३०.१२.२०११ | बंद २ पाकिटे |
| ०३ | साई सेल्स कार्पोरेशन,संगमनेर | १७७०९/३०.१२.२०११ | बंद २ पाकिटे |
| ०४ | आशिष डायकेम कार्पोरेशन,मुंबई | १७७१०/३०.१२.२०११ | बंद २ पाकिटे |

उपरोक्त प्राप्त झालेल्या ४ सिलबंद निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेस तसेच वरील ४ निविदा सादरकर्त्यांना एकत्रित स्वरुपात घेण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित दर देऊ केले.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नांव व गांव | चर्चेअंती देऊ केलेले सुधारित दर |
|---|---|---|
| ०१ | भिंगारवाला एन्टरप्राईझेस, अहमदनगर | ७% सुट |
| ०२ | आर.के. एन्टरप्राईझेस,नासिक | २% सुट |
| ०३ | साई सेल्स कार्पोरेशन,संगमनेर | २% सुट |
| ०४ | आशिष डायकेम कार्पोरेशन, मुंबई | अनुपस्थित |

**निर्णय क्र.१५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन आरोग्य विभागाच्या अभिप्रायानुसार त्यातील निम्नतम दर स्विकारणेत येऊन संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच ज्या साहित्याचे दर आलेले नाहीत अशा साहित्याचे खरेदीसाठी फेर कोटेशन मागणी करावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **बगीचा विभागासाठी वार्षिक साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून सूट दरपत्रके घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** बगीचा विभागाचे दि. १८.१०.२०११ चा मंजूर प्रस्तावाने वार्षिक साहित्य खरेदीस व त्याकामी अंदाजे रु. १,२२,११०/- मात्रचे अपेक्षित खर्चाचा विषय दि.१९.११.२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेस्तव सादर करणेत आलेला आहे. त्यानुसार विहित पध्दतीने खरेदीची कार्यवाही करणेकामी जन-ासंपर्क विभागामार्फत दि.१३.१२.२०११ चे सामाा वृत्तपत्रात जाहिरात देवून २० निविदा तयार करुन मुंबई कायार्लयात ०१ ते १० व शिर्डी कार्यालयात ११ ते २० निविदा विक्रीस ठेवण्यात आल्या होत्या. जाहिरातीत दि. ३०.१२.२०११ अखेर मुदत देण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ३ सिलबंद निविदा मुदतीत प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नांव व गांव | आवक नंबर:तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | मे. किशोर ट्रेडर्स,सावळविहीर | १७५७०/२८.१२.२०११ | बंद २ पाकिटे |
| ०२ | साई सेल्स कार्पोरेशन, संगमनेर | १७७०७/३०.१२.२०११ | बंद २ पाकिटे |
| ०३ | आशिष डायकेम कार्पोरेशन,मुंबई | १७७०८/३०.१२.२०११ | बंद २ पाकिटे |

उपरोक्त प्राप्त झालेल्या ३ सिलबंद निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेस तसेच वरील ३ निविदा सादरकर्त्यांना एकत्रित बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किवा कसे याबाबत त्यांना सुट दरपत्रके देवून ते लेखी स्वरुपात घेण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | साहित्याचा तपशिल | मागणी | मे. किशोर ट्रेडर्स, सावळविहीर | | साई सेल्स कार्पोरेशन, संगमनेर | | आशिष डायकेम कार्पोरेशन,मुंबई | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मूळ दर | सूट दर व्हॅटसह | मूळ दर | सूट दर व्हॅटसह | मूळ दर | सूट दर व्हॅटसह |
| ०१ | राऊंडअप-इंडोफिल/अडव्हान्स | ५० लि.. | ३५४.०० | ३४६.९२ | -- | -- | **२३५.००** | -- |
| ०२ | ब्लायटॉक्स-रॅलिज/पुर्वा | ५ किलो | ५७०.०० | ५५८.६० | -- | -- | **४१२.००** | -- |
| ०३ | सल्फॉन-एक्सेल | २ किलो | ३००.०० | **२९४.००** | -- | -- | -- | -- |
| ०४ | डायथेन/एम-४५-इंडोफिल | ३ किलो | ४४८.०० | ४३९.०४ | -- | -- | **३६५.००** | -- |
| ०५ | कॉन्टाफ-रॅलिज | ३ लिटर | ६६०.०० | ६४६.८० | -- | -- | **४६०.००** | -- |
| ०६ | रोगर-रॅलिज | ५ लिटर | ३६०.०० | २५२.८० | ३८०.०० | -- | **३००.००** | -- |
| ०७ | न्यूऑन-रॅलिज | ५ लिटर | ७७५.०० | ७५९.५० | ९२५.०० | -- | **५००.००** | -- |
| ०८ | क्लोरोपायरी-५० टक्के-टाटा | २ लिटर | ६६०.०० | ६४६.८० | -- | -- | **४५०.००** | -- |
| ०९ | कॉन्फिडॉर-रॅलिज | २ किलो | २८९५.०० | २८३७.१० | -- | -- | **१७७५.००** | -- |
| १० | इंडोसल्फान-एक्सेल | २ लिटर | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ११ | थायमेट-सायनामाईट | २० किलो | ८८.०० | ८६.२४ | -- | -- | **५७.००** | -- |
| १२ | डिएपी-जयकिसान | १५ गोणी | १४४०.०० | १४११.२० | -- | -- | **९६६.००** | -- |
| १३ | युरिया-उज्वला/नर्मदा | २० गोणी | ४००.०० | ३९२.०० | -- | -- | **२८३.००** | -- |
| १४ | निबोंळी पेंड-एशियन | ६० गोणी | ७५०.०० | ७३५.०० | -- | -- | **४६०.००** | -- |
| १५ | १०:२६:२६-झुआरी | १० गोणी | १९४०.०० | **१९०१.२०** | -- | -- | -- | -- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | सुपर फॉस्फेट-लिबर्टी | ३० गोणी | ४२०.०० | ४११.६० | -- | -- | **३०२.००** | -- |
| १७ | पोटॅश-जयकिसान | ३० गोणी | ९६०.०० | ९४०.८० | -- | -- | **५९२.००** | -- |
| १८ | सुतळी-चांगल्या प्रतिची | १०० किलो | ५३.०० | **५१.९४** | -- | -- | ५५.०० | -- |
| १९ | गेरु -चांगल्या प्रतिचा | २० किलो | ४०.०० | ३९.२० | -- | -- | **१२.००** | -- |
| २० | चुना-चांगल्या प्रतिचा | १०० किलो | ६५.०० | **६३.७०** | -- | -- | ७०.०० | -- |
| २१ | प्लास्टीक डस्टबिन-चांगले | २५ नग | ८८.०० | **८६.२४** | -- | -- | ९५.०० | -- |
| | | | | | | | | |

**निर्णय क्र.१५२ उपरोक्त तक्त्यातील अधोरेखीत न्यूनतम दर मान्य करण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३ पाणीपुरवठा विभागासाठी वार्षिक साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून सूट दरपत्रके घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** पाणी पुरवठा विभागाचे दि. २८.१०.२०११ चा मंजूर प्रस्तावाने वार्षिक साहित्य खरेदीस व त्याकामी अंदाजे रु. ३३,६२,९२५/- मात्रचे अपेक्षित खर्चाचा विषय दि.१९.११.२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेस्तव सादर करणेत आलेला आहे. त्यानुसार विहित पध्दतीने खरेदीची कार्यवाही करणेकामी जनसंपर्क विभागामार्फत दि.१३.१२.२०११ चे सामना वृत्तपत्रात जाहिरात देवून २० निविदा तयार करुन मुंबई कायार्लयात ०१ ते १० व शिर्डी कार्यालयात ११ ते २० निविदा विक्रीस ठेवण्यात आल्या होत्या. जाहिरातीत दि. ३०.१२.२०११ अखेर मुदत देण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ४ सिलबंद निविदा मुदतीत प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नांव व गांव | आवक नंबर:तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | मे. विनायक इंजिनिअर,मुंबई | १२९१/२८.१२.२०११ | बंद २ पाकिटे |
| ०२ | मे. मार्क इंडस्ट्रीज्, मुंबई | १२९३/३०.१२.२०११ | बंद २ पाकिटे |
| ०३ | मे. एक्सल ट्रेडिंग कंपनी,मुंबई | १२९६/३०.१२.२०११ | बंद २ पाकिटे |
| ०४ | मे.अनुराधा ॲग्रो सर्विस,लोणी | १७७११/३०.१२.२०११ | बंद २ पाकिटे |

उपरोक्त प्राप्त झालेल्या ४ सिलबंद निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेस तसेच वरील ४ निविदा सादरकर्त्यांना एकत्रित बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किवा कसे याबाबत त्यांना सुट दरपत्रके देवून ते लेखी स्वरुपात घेण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित दर देऊ केले.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नांव व गांव | चर्चेअंती देऊ केलेले सुधारित दर |
|---|---|---|
| ०१ | मे. विनायक इंजिनिअर,मुंबई | अनुपस्थित |
| ०२ | मे. मार्क इंडस्ट्रीज्, मुंबई | अनुपस्थित |
| ०३ | मे. एक्सल ट्रेडिंग कंपनी,मुंबई | २.५% सुट |
| ०४ | मे.अनुराधा ॲग्रो सर्विस,लोणी | ५% सुट |

**निर्णय क्र.१५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यातील मे. मार्क इंडस्ट्रीज्, मुंबई यांनी सन- २०११ चे साहित्याचा पुरवठा आदेश पुर्ण न केल्याने तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. ०२ चे निम्नतम दर स्विकारणेत येऊन संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच ज्या साहित्याचे दर आलेले नाहीत अशा साहित्याची खरेदी संबंधीत विभागाने फेर कोटेशन मागणी करुन करावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ ध्वनीक्षेपन विभागासाठी वार्षिक साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून सूट दरपत्रके घेणे बाबत**

**प्रस्ताव-** ध्वनीक्षेपन विभागाचे दि. २०.१०.२०११ चा मंजूर प्रस्तावाने वार्षिक साहित्य खरेदीस व त्याकामी अंदाजे रु. २,५७,९००/- मात्रचे अपेक्षित खर्चाचा विषय दि.१९.११.२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेस्तव सादर करणेत आलेला आहे. त्यानुसार विहित पध्दतीने खरेदीची कार्यवाही करणेकामी जनसंपर्क विभागामार्फत दि.१३.१२.२०११ चे सामना वृत्तपत्रात जाहिरात देवून २० निविदा तयार करुन मुंबई कायार्लयात ०१ ते १० व शिर्डी कार्यालयात ११ ते २०निविदा विक्रीस ठेवण्यात आल्या होत्या.

जाहिरातीत दि. ३०.१२.२०११ अखेर मुदत देण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे २ सिलबंद निविदा मुदतीत प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नांव व गांव | आवक नंबरःतारीख | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | नेट टेक सोलुशन्स, अहमदनगर | १७६५१/२९.१२.२०११ | बंद १ पाकिट |
| ०२ | इंटरनॅशनल इलेक्ट्रीकल,अहमदनगर | १७६५२/२९.१२.२०११ | बंद २ पाकिटे |

उपरोक्त प्राप्त झालेल्या २ सिलबंद निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेस तसेच वरील २ निविदा सादरकर्त्यांना एकत्रित बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किवा कसे याबाबत त्यांना सुट दरपत्रके देवून ते लेखी स्वरुपात घेण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित दर देऊ केले.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नांव व गांव | चर्चेअंती देऊ केलेले सुधारित दर |
|---|---|---|
| ०१ | नेट टेक सोलुशन्स, अहमदनगर | २% सुट |
| ०२ | इंटरनॅशनल इलेक्ट्रीकल,अहमदनगर | अनुपस्थित |

**निर्णय क्र.१५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यातील निम्नतम दर स्विकारणेत येऊन संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच ज्या साहित्याचे दर आलेले नाहीत अशा साहित्याची खरेदी संबंधीत विभागाने फेर कोटेशन मागणी करुन करावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **श्री साईभक्तांना मोबाईल बँकींगव्दारे देणगी सुविधा उपलब्ध करुन देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईभक्तांना ऑनलाईन देणगी व इतर सुविधा देण्यासाठी संस्थानने HDFC व Axis बॅकेचा पेमेंट गेटवे तसेच नेटबैकींगसाठी HDFC Bank, Axis Bank, State Bank of India, Union Bank of India, Bank of Baroda इ. बँकामार्फत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. ऑनलाईन देणगीसाठी या सुविधांवर भक्तांचा मोठा प्रतिसादही मिळत आहे. या सुविधा वापरण्यासाठी भक्तांना संगणक किंवा लॅपटॉपचा वापर इंटरनेट सुविधेसाठी करावा लागतो. सध्या आधुनिक तंत्रज्ञानाव्दारे या सर्व सुविधा मोबाईलवर उपलब्ध होत आहेत. भक्तांना हव्या त्या ठिकाणाहून हव्या त्या वेळेस आपल्या मोबाईलवर संस्थानला देणगी देण्याची सोय मोबाईल बँकींगव्दारे उपलब्ध झालेली आहे. संस्थानला या सेवा पुरविण्यासाठी आंध्र बँक, शिर्डी व बँक ऑफ इंडिया, शिर्डी या दोन्ही बँकांनी त्यांचे प्रस्ताव सादर केले आहेत.

मोबाईल बँकींगव्दारे देणगी देण्याची सुविधा कशी उपलब्ध होते याचे प्रात्यक्षिक मा. कार्यकारी अधिकारी साो., मा. उप-कार्यकारी अधिकारी साो. व इतर संस्थान अधिकाऱ्यांना दाखविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे त्यांना हे प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी मा. व्यवस्थापन समितीसमोर बोलाविण्यात आलेले आहे.

मोबाईल बँकीगव्दारे उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या सेवा या पुर्णपणे मोफत रहाणार असून बँका या सेवेसाठी संस्थान अगर भक्तांकडून कोणताही आकार आकारणार नाही. भक्तांचे नाव, पत्ता, रक्कम व देणगी फंडाचे नाव इ. माहितीचे रिपोर्ट बँक प्रत्येक आठवड्यास संस्थानला सादर करील. त्याप्रमाणे संस्थान सदर भक्तांना त्यांचे दिलेले पत्त्यावर देणगी पावती व उदी-प्रसाद पाठविण्यात येईल. या सेवेसाठी वरील दोन्ही बँकांनी बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडण्याची विनंती केली आहे.

उपरोक्त विवेचनाप्रमाणे श्री साईभक्तांकडून मोंबाईल बँकींगव्दारे देणगी स्विकारणेसाठी बँक ऑफ इंडिया व आंध्र बँक यांचेकडून आलेले प्रस्ताव मान्य करणेस, भक्तांना देणगी सुविधा सुरु करणेबाबत बॅकेस द्यावयाचे पत्रास व या सुविधेसाठी सदर बँकेत स्वतंत्र बचत खाते उघडण्यास मान्यता मिळावी, ही विनंती

**निर्णय क्र.१५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईभक्तांकडून मोंबाईल बँकींगव्दारे देणगी स्विकारणेसाठी बँक ऑफ इंडिया व आंध्र बँक यांचेकडून आलेल्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली, भक्तांना देणगी सुविधा सुरु करणेबाबत बॅकेस पत्र देण्यात यावे व या सुविधेसाठी सदर बँकेत स्वतंत्र बचत खाते उघडण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **मकर संक्रात -२०१२ निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री आंनद इंगवले नवी मुंबई. यांनी कळविले की, मकर संक्रांती दिवशी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान इ.ठिकाणी फुलांची सजावट करुन देण्यास तयार आहे. यासाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे.

संस्थान, संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करते. सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी म्हणुन सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

मकर संक्रात-२०११ या निमित्ताने साई फ्लोरिस्ट डेकोरेटेर्स,नवी मुंबई., श्री रामनवमी उत्सव -११ या निमित्ताने श्रीमती रिम्पल लोहीया , विश्वस्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी .,श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०११. या निमित्ताने के.सी. सुब्रामणी राजु ,बंगलोर यांनी., श्रीमती. अंबिका व्ही नायर, मुंबई. यांनी , श्री पुण्यतिथी उत्सव -२०११., श्री रविंद्र तलवार,दिल्ली यांनी दिपावली -२०११ व श्री डंग, दिल्ली.यांना श्री दत्त जयंती निमित्ताने व श्री राजस जैन,पुणे यांनी नववर्ष -२०१२ निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरास फुलांची सजावट करणेस परवानगी देण्यात आलेली होती.

साई फ्लोरिस्ट डेकोरेटेर्स,नवी मुंबई.यांनी मागील वर्षी मकर संक्रांती निमित्ताने फुलांची सजावट केली होती. त्याप्रमाणे या वर्षी श्री आंनद इंगवले नवी मुंबई त्यांना मंदिर व मंदिर परिसरात फुलाची सजावट करणेस व दर्शनासाठी पास, जेवणासाठी पास व सजावटीचे सामान ठेवणेसाठी हॉल देता येईल. त्यास मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.१५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री श्री आंनद इंगवले नवी मुंबई यांना मकर संक्रात -२०१२ निमित्ताने फुलांची सजावट करणेस व त्यांना दर्शनासाठी,भोजनासाठी पास व सजावटीचे सामान ठेवणेसाठी कारागीरांना हॉल देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **चपाती/ पुरी, मोतीचूर लाडू व बर्फी, अन्नपाकिटे तयार करणारे ठेकेदार यांना पुढील एक वर्षासाठी दरवाढीसह मुदतवाढ देणे बाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०३/२०११ चे सभेतील निर्णय क्र.२४२ ने सन २०११-२०१२ करीता साईभक्तांना प्रसाद भोजनामध्ये चपाती / पुरी, श्रींचा प्रसाद म्हणून विक्री करण्यात येत असणारे मोतीचूर लाडू व बर्फी, तसेच अल्पोपहार म्हणून विक्री करण्यात येणारी अन्नपाकीटे तयार करणेकामी खालील ठेकेदार यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. त्याकामी जा.नं.एसएसएस-वशी/प्रसादा/१२९०१/ २०११ दि.२९/०३/११ (चपाती),जा.नं.एसएसएस-वशी/प्रसादा/१२९०२/११ दि.२९/०३/११ (लाडू व बर्फी), जा.नं. एसएसएस-वशी/प्रसादा/१२९०३/११ दि.२९/०३/११.(लाडू व बर्फी),जा.नं.एसएसएस-वशी/प्रसादा / १२९००/ ११ दि.२९/०३/११.(अन्नपाकीटे) नुसार कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | कामाचे स्वरुप | सन २०११-२०१२ |
|---|---|---|---|
| १) | श्री प्रेमशंकर हरीशंकर जोशी, जसवंतगढ | चपाती / पुरी तयार करणे | (सर्व करांसह) प्रति क्विंटल - रु.९००/- |
| २) | श्री दिपक माधव नाईकवाडी, अंदरसुल | मोतीचूर लाडू व बर्फी तयार करणे | (सर्व करांसह) लाडू प्रति हजारी रु. १७५/-<br>(सर्व करांसह) प्रति क्विं.साखरेस रु.१५०/- |
| ३) | श्री शिवसाई केटरर्स & लेबर कॉन्ट्रक्टर, शिर्डी | मोतीचूर लाडू व बर्फी तयार करणे | (सर्व करांसह) लाडू प्रति हजारी रु. १७५/-<br>(सर्व करांसह) प्रति क्विं.साखरेस रु.१५०/- |
| ४) | सौ.रोहीणी राजेंद्र कोते, साईसिध्दी महिला बचत गट, शिर्डी | अन्नपाकीटे तयार करणे | (सर्व करांसह) प्रति नग पाकीट ०१/२० पै. |

प्रेमशंकर हरीशंकर जोशी हे चपाती/पुरी बनविणेचे काम करतात. त्यांचे कामगारांना सुरवातीपासून निवास, दोन वेळ भोजन व दोन वेळ चहा विनामुल्य देण्यात येतो. अ.नं.२ दिपक माधव नाईकवाडी यांचे कामगारांना निवासाकरीता संस्थानचे प्रचलित दराने सेवा आकार घेऊन खोल्या देण्यात येतात तसेच कर्मचारी संख्येनूसार दोन वेळ भोजन व चहा विनामुल्य देण्यात येतो. अ.नं.३ श्री शिवसाई केटरर्स & लेबर कॉन्ट्रक्टर यांचे कामगारांना निवासाकरीता संस्थानचे प्रचलित दराने सेवा आकार घेऊन खोल्या देण्यात येतात. तसेच कर्मचारी संख्येनूसार दोन वेळ भोजन व चहा विनामुल्य देण्यात येतो. अ.न.४ सौ.रोहीणी राजेंद्र कोते, साईसिध्दी महिला बचत गट,शिर्डी यांचे कामगारांना एक वेळ भोजन व चहा विनामुल्य देण्यात येतो.

वरील चारही ठेकेदारांची कामाची मुदत दि.३१/०३/२०१२ रोजी संपणार असून पुढील मुदतीकरीता ते काम करण्यास तयार आहेत. श्री प्रेमशंकर हरीशंकर जोशी, चपाती ठेकेदार यांचा दि.२८/१२/११ चा अर्ज, श्री दिपक माधव नाईकवाडी, लाडू व बर्फी ठेकेदार यांचा दि.०५/०१/१२ रोजीचा

अर्ज, श्री शिवसाई केटरर्स अ‍ॅण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, लाडू व बर्फी ठेकेदार यांचा दि.०९/०१/२०१२ रोजीचा अर्ज व साई सिध्दी महिलाबचत गट, शिर्डी अन्नपाकीटे ठेकेदार यांचा दि.०६/०१/१२ रोजीचा अर्ज या चारही ठेकेदारांनी पूर्वीच्या सवलती + दरवाढसह मुदतवाढ मिळावी अशी सदरच्या अर्जांद्वारे विनंती केलेली आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे दरवाढ मागितलेली आहे.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | सन २०११-२०१२ ची मंजूर रक्कम | मागितलेली दरवाढ | सन २०१२-२०१३ करीता दरवाढीसह होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | श्री प्रेमशंकर हरीशंकर जोशी, चपाती ठेकेदार | प्रति क्विंटल - रु. ९००/- (सर्व करांसह) | २०% (रु.१८०/-) | प्रति क्विंटल रु.१०८०/- (सर्व करांसह) |
| २) | श्री दिपक माधव नाईकवाडी, अंदरसुल | लाडू प्र.हजारी - रु. १७५/- (सर्व करांसह)<br>बर्फी प्र.क्विं.साखर- रु.१५०/- (सर्व करांसह) | ७०% (रु.१२२.५०)<br>७०% (रु.१०५/-) | लाडू प्रति हजारी रु. २९७.५०/ (सर्व करांसह)<br>बर्फी प्रति क्विं.साखरेस रु.२५५/- (सर्व करांसह) |
| ३) | श्री शिवसाई केटरर्स,& लेबर कॉन्ट्रॅक्टर | लाडू प्र.हजारी - रु. १७५/- (सर्व करांसह)<br>बर्फी प्र.क्विं.साखर - रु.१५०/- (सर्व करांसह) | ४४% (रु.७७/-)<br>५६% (रु.८४/-) | लाडू प्रति हजारी रु. २५२/ (सर्व करांसह)<br>बर्फी प्रति क्विं.साखरेस रु.२३४/ (सर्व करांसह) |
| ४) | सौ.रोहीणी राजेंद्र कोते साईसिध्दी महिला बचत गट, शिर्डी | प्रति नग पाकीट - रु.०१/२० पै. (सर्व करांसह) | ३०% (०.३६ पै.) प्रति पाकीट | प्रति नग पाकीट ०१/५६ पै. (सर्व करांसह) |

तरी वरीलप्रमाणे चारही ठेकेदार यांचे विनंती अर्जानुसार दरवाढसह मुदतवाढबाबत अथवा उपरोक्त कामासाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन निवीदा मागणी करणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१५७ यावर सविस्तर चर्चा होऊन,सन २०१२-१३ रीता प्रसादालयातील चपाती/ पुरी, मोतीचूर लाडू व बर्फी, अन्नपाकिटे तयार करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८ जिल्हा पोलिस कल्याण निधीचे शिर्डी येथील पेट्रोल पंप चालविणेस घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** अहमदनगर जिल्हा पोलीस कल्याण निधीचे अखत्यारीत नगर - मनमाड हायवेवर श्री साईचे मंदीरापासुन सुमारे एक कि.मी. अंतरावर शिरडी मौजे निमगाव कोऱ्हाळे शिवारात पेट्रोल पंप सुरु करण्यात आलेला आहे. सदरचा पेट्रोल पंप संस्थानने चालविणेस घेणे बाबत दि.२२/०५/२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन समिती चे सभेमध्ये निर्णय क्रं.५१६ खालील प्रमाणे झालेला आहे.

सदरचा पेट्रोल पंप संस्थानने चालविण्यास घ्यावा व त्या बदल्यात जिल्हा पोलीस कल्याण निधी करीता संस्थानकडुन दरमहा रु.एक लाख मात्र देण्यात यावे. अशी तत्वतः मान्यता देण्यात आली. तसेच याप्रकरणी मान्यतेसाठी मा.नामदार श्री आर.आर.पाटील, गृहमंत्री महाराष्ट्र राज्य यांचेकडे लेखी प्रस्ताव पाठविण्यात यावा.

उपरोक्त निर्णयानुसार सदरचा पेट्रोल पंप संस्थानकडे चालविण्यास देणेबाबत दि.२५/०५/२०१० रोजी मा.ना.आर.आर.पाटील, गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांना पत्र देउुन विनंती करण्यात आली होती.

त्यापुढे मा.कक्ष अधिकारी, गृहविभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचेकडील दि.२०/१०/२०११ रोजीचे पत्राने शिरडी येथील पोलीस कल्याण निधी अंतर्गत सन ८०/०२ ब या पोलीस विभागाचे जागेवर स्थित असलेला भारत पेट्रोलियम कार्पो .लि.कंपनीचा पेट्रोल पंप श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना खालील अटी शर्तीच्या आधीन राहुन भाडे तत्वावर देण्यास मान्यता देणेत आलेली आहे.

१. श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना दरमहा रु.१,००,०००/- ( अक्षरी रुपये एक लाख फक्त ) इतके मासिक भाडे आकारण्यात यावे.

२. सुनियोजित पेट्रोल पंप हा श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांना ११ महिन्याच्या कराराने चालविणेस देण्यात येईल.

३. सदरचा पेट्रोल पंप श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना भाडेतत्वावर चालविणेस देवून पेट्रोल पंपाच्या वार्षिक नप्याप्रमाणे १० टक्के रक्कम दरवर्षी करारात वाढवून घेण्यात येईल.

४. पेट्रोल पंपासाठीची पाणीपट्टी , लाईट बील व इतर सर्व कर हे पोलीस कल्याण निधीत दरमहा जमा करवयाची रक्कम रुपये १,००,०००/- या वेगळे जमा करण्यात येतील. तसेच सदरची देयके पोलीस कल्याण निधीचे नावाने प्राप्त होतील व पोलीस कल्याण निधीतून भरण्यात येतील. सदरच्या रकमेची प्रतीपूर्ती श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी रु.१,००,०००/- व्यतिरिक्त पोलीस कल्याण निधीत जमा करण्यात येतील.

५. अहमदनगर जिल्हयातील सर्व पोलीस वाहनांना तसेच शिर्डी येथे पोलीस बंदोबस्तासाठी येणाऱ्या सर्व पोलीस वाहनांना इंधन उधारीने क्रेडीट बेसवर पुरविणेत यावे. इंधन बीले पारीत झाल्यानंतर इंधन बिलाची रक्कम संस्थानला अदा करण्यात येईल.

६. मासिक भाडेची रक्कम रुपये १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख फक्त) महिन्याच्या ०५ तारखेच्या आत पोलीस कल्याण निधीत जमा करणे बंधनकारक राहील.

७. पेट्रोल पंप संबंधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांनी भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड यांनी ठरवून दिलेल्या सर्व अटी व नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहील.

८. पेट्रोल पंपाच्या व्यवहाराबाबत काही गैर आढळल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता पेट्रोल पंपासंबंधीचा करार संपुष्टात आणण्याचे सर्व अधिकार पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना असतील.

९. शिर्डी येथील पेट्रोल पंप पोलीस कल्याण निधी अंतर्गत बांधण्यात आला असल्याने पेट्रोल पंपाचे स्वामीत्व पोलीस विभागाकडेच राहील. तसेच पेट्रोल पंपाचा परवाना श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना हस्तांतर करता येणार नाही व सदरचा परवाना भाडेतत्वावर देण्यात येणार नाही. फक्त पेट्रोल पंप व जागा कराराप्रमाणे भाडेतत्वावर देण्यात येईल.

जिल्हा पोलीस कल्याण निधीचा शिरडी येथील पेट्रोल पंप संस्थानने चालविणेस घेणे बाबत उपरोक्त प्रमाणे पोलीस विभागाकडून ज्या अटी शर्ती कळविलेल्या आहेत. त्यामधील अट क्रं.०५ अडचणीची वाटते. कारण अहमदनगर जिल्ह्यातील सर्व पोलीस वाहनांना तसेच पोलीस बंदोबस्तासाठी शिर्डी येथे येणाऱ्या सर्व वाहनांना उधारीने क्रेडीट बेसवर इंधन पुरवायचे आहे. व पुरविण्यात आलेल्या इंधनाची बिले मंजूर झाल्यानंतर बीलांची रक्कम संस्थानला मिळणार आहे. तसेच हा पेट्रोल पंप संस्थानने चालवायचा झाल्यास त्यासाठी मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची परवानगी घ्यावी लागेल, असे मत आहे. त्याच बरोबर हा पेट्रोल पंप आउटसोर्स पध्दतीने चालवायचा किंवा कसे या बाबतही विचार करावा लागेल.

**निर्णय क्र.१५८ आजचे सभेत पोलिस उपअधिक्षक मा.श्री.श्रीकांत जावळे उपस्थित होते. त्यांचेशी झालेल्या चर्चेत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप सोसायटी ही संस्था श्री साईबाबा संस्थान कर्मचाऱ्यांचीच संस्था आहे व तो पेट्रोलपंप चालविण्यास तयार आहे. त्यावर श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप सोसायटी, शिर्डी यांना पेट्रोलपंप चालविण्यास देण्यात यावा, असे पोलिस विभागास कळविण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९ सिडनी ऑस्ट्रेलिया येथील साई भजन संध्या कार्यक्रमाचे खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनीयम २००४ मधील कलम नं.१७ ड नुसार "समिती श्री साईबाबांच्या जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील" अशी तरतूद आहे.

या तरतुदीनुसार मा व्यवस्थापन समितीचे दिनांक २६/०३/२०११ व २४/०७/२०११ रोजीच्या सभेत सिडनी (ऑस्ट्रेलिया) येथे भजन संध्या कार्यक्रम आयोजित करण्यास व कार्यक्रमाचे वेळी प्रसाद रुपाने दयावयाचे साहित्य, विमान प्रवास खर्च, व्हीसा, वाहतूक, पॅकिंग व फॅारवर्डींग वगैरेकरीता येणारे खर्चास मान्यता देणेत आलेल्या आहेत.

यानुसार दिनांक ०६/०८/२०११ रोजी सिडनी येथे भजन संध्या कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. या कार्यक्रमाकरीता आलेल्या खालील प्रमाणेखर्चासह, सदरचे कार्यक्रमाचा तपशिलवार अहवाल मा व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/०८/२०११ रोजीचे सभेपुढे नोंद घेण्यात करीता ठेवण्यात आला होता.

| अ.नं. | तपशिल | खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | व्हीसा व विमान प्रवास खर्च | १,४०,४००.०० |
| ०२ | श्री साईसच्चरित , फोटो, सि.डी., शॅाल वगैरे खर्च | ४,६९,८००.०० |

| | | |
|---|---|---|
| ०३ | वाहतूक, पॅकीग व फॅारवर्डींग चार्जेस | २,६८,३०६.०० |
| | एकूण खर्च | ८,९६,५०६.०० |

यावर सदरचे सभेत निर्णय क्रं ६६० ने "यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त ऑस्ट्रेलिया येथील साईभजन संध्या कार्यक्रमाचे अहवालाची नोंद घेण्यात आली आहे." असा निर्णय झालेला आहे.

सदरचे विषय सादर केल्यानंतर सदरचे भजन संध्या कार्यक्रमाकरीता झालेल्या खर्चाची काही विभागाकडील बीले जमा नावे झालेने याकार्यक्रमाचे एकूण खर्चात रु ५०७०/- ची वाढ झालेली असून सदर कार्यक्रमाकरीता खालील तपशिलाप्रमाणे एकूण खर्च आलेला आहे.

| अ.नं. | तपशिल | खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | व्हीसा व विमान प्रवास खर्च | १,४०,४००.०० |
| ०२ | श्री साईसच्चरित , फोटो, सि.डी., शॅाल वगैरे खर्च | ४,६९,८००.०० |
| ०३ | वाहतूक, पॅकीग व फॅारवर्डींग चार्जेस | २,८७,९१२.०० |
| ०४ | ट्रॅव्हल कार्ड खर्च | ३,४६४.०० |
| | एकूण खर्च | ९,०१,५७६.०० |

तरी सिडनी ऑस्ट्रेलिया येथील भजन संध्या कार्यक्रमाकरीता एकूण आलेल्या रु ९,०१,५७६.०० चे खर्चाची सुधारीत नोंद व्यवस्थापन समितीचे सभेत घेणे करीता सदरचा विषय व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात येत आहे.

**निर्णय क्र.१५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, सिडनी ऑस्ट्रेलिया येथील साई भजन संध्या कार्यक्रमाकरीता एकूण आलेल्या सुधारीत रक्कम रु ९,०१,५७६/- चे खर्चाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२० साई भजनसंध्या व श्री साई लक्ष्मी यज्ञ या कार्यक्रमासाठी साईनगर मैदान देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्रीमती शैलजाताई गायकवाड , साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट, शिर्डी यांनी दिनांक ०४/१२/२०११ चे पत्रान्वये "यावर्षी दि. १४/०१/२०१२ रोजी साईभजन संध्या व दिनांक १५/०१/२०१२ रोजी श्री साई लक्ष्मी यज्ञ हे कार्यक्रम आयोजित केलेले असून या कार्यक्रमासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेकडून साईनगर मैदानाचा वापर करण्यास परवानगी मिळावी तसेच या कार्यक्रमामुळे संस्थानच्या कुठल्याही प्रकारच्या मालमत्तेची हानी होणार नाही याची आम्ही काळजी घेऊ . " अशी विनंती केलेली आहे.

श्रीमती शैलजाताई गायकवाड , साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट, शिर्डी यांनी या वर्षी प्रथमच साईभजन संध्या व श्री साई लक्ष्मी यज्ञ कार्यक्रम करण्यास साईनगर मैदान वापरास परवानगी मिळणेस विनंती केलेली आहे. मागील वर्षी त्यांनी फक्त साई लक्ष्मी यज्ञ केला होता व त्या करीता खुले नाटयगृहाची जागा वापरली होती.

अध्यक्ष, साईसंगम प्रतिष्ठाण, शिर्डी यांना प्रतिवर्षी साई भजन संध्या कार्यक्रम सादर करण्यास्स सदर कार्यक्रम धार्मिक/स्थानिक ग्रामस्थांचा असल्याने खालील अटी शर्तीवर साईनगर मैदान व्यवस्थापन समितीचे मान्यतेने देण्यात येते.

तरी उपरोक्त कार्यक्रमास खालील अटी शर्तीवर साईनगर मैदान देणे बाबत व्यवस्थापन समितीच्या सभेत निर्णर्य होणेस विनंती आहे.

**<u>अटी शर्ती-</u>**

०१. सदर कार्यक्रमासाठी पोलिस निरीक्षक व नगरपंचायत शिर्डी यांच्या आवश्यकत्या परवानग्या आयोजकास घ्याव्या लागतील.

०२. कार्यक्रमा करीता स्टेज, मंडप, विद्युत व ध्वनीक्षेपण व्यवस्था मंडळास स्वखर्चाने करावी लागेल.

०३. परिसरातील राहणारे संस्थान कर्मचारी व साईबाबा हॉस्पीटल मधील रुग्णांना आवाजाचा त्रास होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

०४. कार्यक्रमाचे वेळी ध्वनीक्षेपणाचा आवाज व वेळेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

०५. परिसरात स्वच्छता ठेवावी.

**निर्णय क्र.१६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती शैलजाताई गायकवाड, साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट, शिर्डी यांना दि. १४/०१/२०१२ रोजी साईभजन संध्या व दिनांक १५/०१/२०१२ रोजी श्री साई लक्ष्मी यज्ञ कार्यक्रमासाठी साईनगर मैदान देण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२१** **मुंबई येथे झालेल्या श्री साईसच्चरित महापारायणास बसलेल्या पारायणार्थींना सप्रेम भेट दिलेल्या श्री साईबाबा थ्री डी ॲक्रेलिक स्टॅंण्ड (कृष्णधवल) फोटो ७००० नगाचे खर्चास मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** मुंबई येथे दि.१५.१२.२०११ ते दि.१७.१२.२०११ अखेर श्री साईसच्चरित महापारायण सोहळा आयोजित करण्यात आलेला होता. पारायणास बसलेल्या अंदाजे ७००० पारायणार्थींना पारायण सोहळ्याचे स्मरणार्थ श्री साईबाबा थ्रीडी (कृष्णधवल) ॲक्रेलिकसह स्टॅंन्डी ६"x८" साईजचा सप्रेम भेट देणेबाबतचे निर्देश मा.अध्यक्ष महोदय यांनी दिले होते. अशा प्रकारचे फोटो सिडनी (ऑस्ट्रेलिया) येथे झालेल्या श्री साईभक्त संमेलनास उपस्थित भक्तांना देणेत आले होते. सदर फोटो मे.साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांचेकडून प्रती नग रु.१७१/- दराने खरीदणेत आले होते. आता आवश्यक ७००० फोटो छपाईसाठी त्यांचेकडे दुरध्वनीवरुन दराची विचारणा केली असता त्यांनी मागील मंजूर दर रु.१७१/- प्रमाणे ७००० फोटो छपाई करुन देणेस तयार असलेबाबत कळविले होते.

मागील मंजूर दरानेच फोटो छपाई करुन देणेस तयार असल्याने त्यांचेकडून ७००० नग फोटो छपाई करुन घेतले असून, याकामी प्रती नग रु.१७१/- दराने रु.११,९७,०००/- मात्र खर्च झालेला आहे.

सबब मे. साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई यांचेकडून स्टॅन्डी फोटो तयार करुन घेणेकामी झालेल्या रु.११,९७,०००/- चे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.१६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मुंबई येथे झालेल्या श्री साईसच्चरित महापारायणास बसलेल्या पारायणार्थींना सप्रेम भेट दिलेल्या श्री साईबाबा थ्री डी ॲक्रेलिक स्टॅंण्ड (कृष्णधवल) फोटो ७००० नगाचे खर्चास व याकामी आलेल्या रक्कम रुपये ११,९७,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२२** **खुले नाट्यगृह व त्या समोरील जागेत भजनाचे कार्यक्रमास परवानगी बाबत**

**प्रस्ताव-** श्री गुरुजी राम प्रसाद, शिर्डी साई मंदिर, बॅंगलोर यांनी दि. १८/१२/२०११ चे पत्रान्वये दिनांक ०९/०२/२०१२ ते १६/०२/२०१२ या कालावधी अखंड साई नाम जप भजन सप्ताह कार्यक्रम करणे करीता खुले नाटयगृह मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

सदरचे मंडळास मागील वर्षी अखंड साई नाम जप भजन सप्ताहाकरीता खुले नाटयगृह देण्यात आलेले होते. यावर्षी त्यांना खुले नाटयगृह देणे बाबत मा. विश्वस्त श्री अशोकराव भिमाशंकर खांबेकर यांनी शिफारस पत्र दिलेले आहे.

सदरची जागा व्दारकामाई समोर असलेने तसेच अर्जदार यांनी दिनांक ०९/०२/२०१२ ते १६/०२/२०१२ या ८ दिवसांचे कालावधीत रात्रंदिवस भजन करणे करीता सदरची जागा मागणी केलेली असून या कालावधीत दिनांक ०९/०२/२०१२ रोजी गुरुवारची पालखी , तसेच दुसरा शनिवार व रविवार असलेने व्दारकामाई समोर या साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. त्यामूळे साईभक्तांना याकार्यक्रमामुळे अडचण होऊ शकते.

तरी उपरोक्त अर्जदार यांना त्यांचे मागणीनूसार अखंड साईभजन कार्यक्रमास साई भजन सप्ताह करणेस खुले नाटयगृह वापरास परवानगी देणे बाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.१६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुजी राम प्रसाद, शिर्डी साई मंदिर, बॅंगलोर यांना दिनांक ०९/०२/२०१२ ते १६/०२/२०१२ या कालावधीत अखंड साई नाम जप भजन सप्ताह कार्यक्रम करणे करीता खुले नाटयगृह देण्यात यावे.**

**परंतू पुढील वर्षापासून अखंड साई नाम जप भजन सप्ताह कार्यक्रमासाठी खुले नाट्यगृह देण्यात येणार नाही अशी स्पष्ट समज श्री गुरुजी राम प्रसाद, शिर्डी साई मंदिर, बॅंगलोर यांना देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२३** **श्री चंद्रकान्त जयवंत रणशूर, कंत्राटी सल्लागार, बांधकाम विभाग यांचा मुदतवाढ मिळणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री चंद्रकांत जयवंत रणशूर, कंत्राटी सल्लागार, बांधकाम विभाग यांनी दि.०३/०१/२०११ चे अर्जाने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

"मला जा.नं.एसएसएस वशी ०१/३२२२/२०११ दि.२६/०९/२०११ अन्वये दि.०१/०९/२०११ पासून बांधकाम विभागाकडील भू-संपादन कक्षाकडे कंत्राटी सल्लागार म्हणून ०६ महिन्याकरीता मुदतवाढ मिळालेली आहे. माझी प्रकृती चांगली असून मी इमाने इतबारे काम करीत आहे. मी बांधकाम विभागाकडील भूसंपादन कक्षाकडे जमीन खरेदी, बिनशेती प्रकरणे, मा.जिल्हाधिकारी, अ.नगर यांचेकडे सादर करण्यात आलेल्या भूसंपादन प्रस्तावांबाबत कार्यवाही आदी कामे करीत आहे. सध्या माझेकडे जे कामे आहेत ती चांगल्या रितीने पूर्ण करुन मा.वरिष्ठ अधिकाऱ्यांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे/करीत आहे. मी रु.८५००/- मात्र दरमहा वेतनावर काम करीत आहे. कृपया उपरोक्त नमूद केलेल्या बाबींचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन तसेच माझे कामाचे मूल्यमापन करुन मला कंत्राटी सल्लागार म्हणून किमान एक वर्ष मूदतवाढ मिळावी व मला रु.१२,०००/- मात्र दरमहा मानधन मिळावे. "

सदर अर्जावर वरिष्ठ मुख्य अभियंता बांधकाम विभाग यांनी "श्री रणशूर यांनी अर्जात नमूद केलेप्रमाणे मा.व्य.स.मान्यतेने कामाच्या संलग्नतेच्या दृष्टीने त्यांना किमान एक वर्ष मूदतवाढ देणेस व त्यांचे मानधनात उचित वाढ करणेबाबतच्या त्यांचे विनंती अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार होणेस विनंती." असे अभिप्राय दिलेले आहे.

श्री रणशूर यांना जा.नं.एसएसएस वशी ०१/३२२२/२०११ दि.२६/०९/२०११ अन्वये दि.०१/०९/२०११ पासून सहा महिन्यांकरीता मूदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर मुदतीचा कालावधी दि.२९/०२/२०१२ रोजी संपुष्ठात येत आहे.

श्री रणशूर यांचे आज मितीस वय ७० वर्षे ०४ महिने असे आहे.

श्री रणशूर यांची उपरोक्त अर्जातील विनंती व वरिष्ठ मुख्य अभियंता बांधकाम विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांना मुदतवाढ व मानधनात वाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१६३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री चंद्रकान्त जयवंत रणशूर, कंत्राटी सल्लागार, बांधकाम विभाग यांना दि.२९/०२/२०१२ पासून पूढे एक वर्ष कालावधीवर दरमहा रुपये ११,०००/- या एकत्रित मानधनावर मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४ एमपीए फायनान्शील सर्व्हिसेस लिमिटेड यांनी कोलकत्ता येथे संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेसाठी देऊ केलेली जागा स्वीकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री. अशोक जैस्वाल, कार्यकारी संचालक, एमपीए फायनान्शील सर्व्हिसेस लिमिटेड, कोलकत्ता यांनी पुर्वी दिनांक २३ नोव्हेंबर, २००९ रोजीचे पत्राने, पश्चिम बंगालमधील साईभक्तांच्या सोयी-सुविधेसाठी कोलकत्ता येथे संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेस मान्यता देणेबाबत तसेच सदर माहिती केंद्रासाठी त्यांचे संस्थेची जागा उपलब्ध करुन देणेस तयार असलेबाबत कळविले होते.

विषयांकित संस्थेच्या पत्रासोबत मा. विश्वस्तांनी दिलेल्या दिनांक २८ नोव्हेंबर, २००९ रोजीचे अभिप्राय पत्रानुसार, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेस्तव सादर करणेत आलेला होता. मा. व्यवस्थापन समितीने दिनांक २७ जानेवारी, २०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १९४ नुसार, सदरचा प्रस्ताव अमान्य केलेला आहे. मा. व्यवस्थापन समितीचा उपरोक्त प्रस्ताव अमान्यतेचा निर्णय विषयांकित संस्था एमपीए फायनान्शील सर्व्हिसेस लिमिटेड, कोलकत्ता यांना इकडील दिनांक ०३ एप्रिल, २०१० रोजी कळविणेत आलेला आहे.

**(ब)** आता, एमपीए फायनान्शील सर्व्हिसेस लिमिटेड, कोलकत्ता यांनी त्यांचेकडील मा. विश्वस्तांना अग्रेषित केलेल्या दिनांक ०९ जानेवारी, २०१२ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे विनंती केली आहे :

आम्ही यापूर्वी आपणांस दिनांक २३ नोव्हेंबर, २००९ रोजीचे पत्राने कोलकत्ता येथे संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेसाठी आम्हांस परवानगी द्यावी म्हणून विनंती केलेली आहे. आमचे उपरोक्त विनंतीबाबत संस्थानने सकारात्मक निर्णय घेतलेला आहे, असे समजते.

आम्ही आपणांस कळवू इच्छितो की, संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेसाठी आमचे संस्थेच्या साई टॉवर्स, ३२ हरिश मुखर्जी रस्ता, कोलकत्ता - ७०० ०२५ या ठिकाणी स्थित असलेल्या कार्यालयीन इमारतीत जागा देणेस तयार आहोत. तसेच या माहिती केंद्रासाठी आवश्यक असणारे साहित्य जसे फर्निचर, संगणके, दूरध्वनी व फॅक्स तसेच मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेस तयार आहोत.

तरी कृपया आपले विश्वस्तव्यवस्थेच्या मा. विश्वस्तांना उपरोक्त जागेची पहाणी व पर्यवेक्षण करणेसाठी पाठवावे, ही विनंती.

**(क)** उपरोक्त विवेचनास अनुसरुन, एमपीए फायनान्शील सर्व्हिसेस लिमिटेड, कोलकत्ता यांनी पुनःश्च उपरोक्त परिच्छेद ब मध्ये नमुद केलेल्या विनंतीस अनुसरुन, पश्चिम बंगाल राज्यातील कोलकत्ता येथे संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेसाठी प्रस्तावित केलेली जागा मध्यवर्ती ठिकाणी आहे किंवा कसे, तेथे पोहचण्यासाठी कोणत्या प्रकारची सुविधा उपलब्ध आहे, सदरची जागा ते किती वर्ष व कोणत्या तत्वावर उपलब्ध करुन देणार याबाबत त्यांचेशी चर्चा करुन व प्रत्यक्ष जागा पहाणी करुन उचित निर्णय घेता येईल, असे मत आहे.

**(ड)** तरी वर नमुद केलप्रमाणे, कोलकत्ता (पश्चिम बंगाल) येथे भक्तांच्या सोयी-सुविधेसाठी माहिती केंद्र सुरु करणेत यावे किंवा कसे, माहिती केंद्र सुरु करावयाचे ठरल्यास, एमपीए फायनान्शील सर्व्हिसेस लिमिटेड, कोलकत्ता यांनी कोलकत्ता (पश्चिम बंगाल) येथील प्रस्तावित केलेली जागा स्वीकारणेपूर्वी जागेची प्रत्यक्ष पहाणी करुन, जागा उचित व योग्य असल्यास, ती उपलब्ध करुन घेणेकामी काय अटी शर्ती असाव्यात याबाबत सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.१६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, एमपीए फायनान्शील सर्व्हिसेस लिमिटेड, कोलकत्ता यांनी संस्थानला माहितीकेंद्र सुरु करणेसाठी कोलकत्ता (पश्चिम बंगाल) येथील देऊ केलेल्या प्रस्तावित जागेची मा.विश्वस्तांनी पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा. जागा पसंती झाल्यास जागा उपलब्ध करुन घेणेबाबत काय अटी-शर्ती रहातील याबाबत संबधित संस्थेचे प्रतिनिधीशी चर्चा करण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५** **सन २०१२-१३ सालाकरीता प्रसादालय, मंदिर व कॅन्टीन माल खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१२-२०१३ सालामध्ये प्रसादालय, मंदिर व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापराकरीता खरेदी करावयाचे गहू, हरबरा इ.धान्य तसेच तांदुळ, तूप, तेल, साखर, चहा, दूध विविध प्रकारचा किराणा माल, बिस्कीटे इत्यादी मालाचा तपशीलवार तक्ता सोबत सादर केलेला आहे. सन २०१२-२०१३ ची अंदाजे मागणी दाखवितांना गेल्या ३ वर्षाच्या प्रसादालय व कॅन्टीन विभागाकडील प्रत्यक्ष वापराची आकडेवारी दिलेली असून त्यात भक्तनिवासस्थान येथे केलेली जेवणाची व्यवस्था, श्री साईबाबा रुग्णालय विभागात रुग्णांना देण्यात येणारे जेवण व गर्दीचे कालावधीमध्ये इतर ठिकाणी आवश्यकतेनुसार स्वयंसेवी प्रसादभोजन कक्ष चालू करण्यात आले असल्याने २५% वाढ गृहीत धरलेली आहे. तसेच श्री साईभक्तांना प्रसादरुपाने अल्पदरात नाष्टा व प्रसादलाडू देण्यात येतो, त्याची दिवसेंदिवस होणारी वाढ विचारात घेऊन त्यासाठी आवश्यक असणारा किराणा माल वाढविलेला आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

**अ) मोंढयावरुन जाहिर लिलाव पध्दतीने खरेदी...**

| | | | |
|---|---|---|---|
| गहू - | १३००० क्विंटल | मेथी- | २.५० क्विंटल |
| हरबरा- | ११०० क्विंटल | सफेद तीळ- | १०.०० क्विंटल |
| खिसमिस- | २२५ क्विंटल | मोहरी- | ५०.०० क्विंटल |
| भाजीपाला - | आवश्यकतेनुसार अंदाजे खर्च १,२०,००,०००/- | | |

दरवर्षी गहू, हरभरा, मेथी व सफेद तिळ इ.ची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समितीचे कोपरगाव, राहाता, कोल्हार इ.ठिकाणच्या मोंढयावरून मा.स्थानिक विश्वस्तांचे उपस्थितीमध्ये जाहिर लिलाव पध्दतीने करणेत येतो. सन २०१२-१३ करीता ही कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोपरगांव, कोल्हार व राहाता इत्यादी ठिकाणच्या मोंढयावरून जाहीर लिलावाने खरेदी करुन, खरेदी केलेला माल मध्यवर्ती भांडारातील दोन्ही गोडाऊनमध्ये साठवून जागा अपुरी पडल्यास राज्य वखार महामंडळाचे कोपरगांव येथील गोदामामध्ये ठेवावा लागेल. सदरील खरेदी मार्च २०१२ पासून मा.विश्वस्तांचे उपस्थितीत सुरू करणेस मान्यता असावी. बाजारात मोहरी, सफेद तीळ व मेथीची आवक कमी असल्याने मोंढयावरुन तसेच निविदेत समावेश करुन खरेदी करता येईल.

मागील वर्षाप्रमाणे सन २०१२-१३ मध्येही प्रसादालयासाठी आवश्यक खिसमिस कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पिंपळगांव बसवंत, तासगांव, सांगली पंढरपूर येथील मोंढयावरून जाहीर लिलावाने खरेदी करणेस तसेच मे.प्रवरा फळे, भाजीपाला खरेदी विक्री व प्रक्रिया शेतकरी सहकारी संस्था मर्यादित, प्रवरानगर यांचेकडील नमुने पाहून मा.विश्वस्तांचे उपस्थितीत खरेदी करणेस व सदर माल अहमदनगर येथील गुगळे कोल्ड स्टोअरेज यांचे शितगृहात साठविणेस मान्यता असावी.

प्रसादालयाचे दैनंदिन वापराकरीता आवश्यक भाजीपाला कृषी उत्पन्न बाजार समिती कोपरगांव, शिरडी, सावळीविहीर, राहाता इ. ठिकाणचे मोंढयावर जाहीर लिलावाने खरेदी करणेत येत आहे. उत्सव, महोत्सव आदी गर्दीच्या काळात साईभक्तांची गर्दी वाढल्यास नाशिक येथून भाजीपाला खरेदी करणेत येतो. सन २०१२-१३ मध्येही कृषी उत्पन्न समितीचे कोपरगांव, शिरडी सावळीविहीर, राहाता इत्यादी

ठिकाणचे मोंढयावरून जाहिर लिलाव पध्दतीने तसेच आवश्यकतेनुसार नाशिक व इतर ठिकाणाहून भाजीपाला खरेदी करणेस मान्यता असावी.

**ब) कोटेशन मागवून खरेदी..साखर १४००० क्विंटल (एम ३०/एस ३० ग्रेड)**

सन २०१२-१३ मध्ये कॅन्टीन तसेच प्रसादलाडू बनविणेसाठी आवश्यक साखर खरेदीसाठी मागील प्रचलित पद्धतीप्रमाणे अ.नगर जिल्हयातील कोपरगांव, राहाता व श्रीरामपूर तालूक्यातील ५० कि.मी.च्या परिसरातील कारखान्याकडून कारखाना तसेच संस्थान वाहनाने वाहतूक अशा दराचे टेंडर मागवून व वाहतुक खर्चाबाबत शहानिशा करून खरेदीस अथवा एकच कोटेशन प्राप्त झाल्यास त्यांचे मान्य दराने खरेदीस मान्यता असावी.

**क) जाहिर निविदा मागवून खरेदी..**

**०१. किराणा माल, कडधान्ये व मसाल्याचे पदार्थ**

प्रसादालयाचे दैनंदिन वापरासाठी लागणारा किराणा माल, कडधान्ये व मसाले पदार्थ इत्यादी खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देउन को-या निविदांची विक्री करून ठराविक मुदतीत निविदा व मालाचे नमुने मागवून, मा.विश्वस्त समितीचे सभेमध्ये नमुने निवडून, तसेच संबंधितांना समक्ष चर्चेसाठी बोलावून त्यांनी दिलेल्या सुट दरांचा विचार करुन तसेच नमुने पाहून अंतिम निर्णय घेतला जातो. त्याप्रमाणेच सन २०१२-१३ साठीचे खरेदीकामी कार्यवाहीस मान्यता असावी. तसेच गोडा मसाला आवश्यकतेनुसार बचतगटांकडून नमुने व दर यांचा विचार करुन खरेदी करणेस मान्यता असावी.

**०२. तांदुळ- ८०५० क्विंटल**

सन २०११-१२ मध्ये प्रसादालयासाठी आवश्यक असणाऱ्या तांदूळाची निविदेत मागणी केलेली होती. प्रसादालयासाठी आवश्यक असणारा तांदुळ एकाचवेळी खरेदी केला जात असल्याने व त्याचा सिझ ान हा जानेवारी पासून सुरु होत असल्याने जानेवारी/फेब्रुवारी मध्ये स्वतंत्र वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, कोटेशन मागवून मा.विश्वस्तांच्या उपस्थितीत आंध्रप्रदेश किंवा इतर उत्पादक प्रदेशामधून अथवा जानेवारी/फेब्रुवारी मध्ये शक्य न झाल्यास निविदेमध्ये समाविष्ट करुन तांदुळ खरेदी करणेस मान्यता असावी.

**०३. गावरान तूप- ७३०० क्विंटल**

प्रसादालयामध्ये प्रसाद लाडू तयार करणेकामी व मंदिरात श्री सत्यनारायण प्रसाद (शिराप्रसाद) बनविणेकामी आवश्यक असणारे गावरान तूप सन २०११-१२ मध्ये मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दोन टप्प्यात, निविदा मागवून खरेदी करणेत येत आहे. सन २०१२-१३ साठीही दि.०१.०४.२०१२ ते ३०.०९.२०१२ व दि.०१.१०.२०१२ ते ३१.०३.२०१३ अशा २ सहामाहीसाठी वेगवेगळया निविदा मागवून तसेच १५ किग्रॅ. डब्यातील ॲगमार्क तूपासाठी निविदा मागणी करून खरेदी करावी असे नम्र मत आहे.

**०४. चहा- २११ क्विंटल व कॉफी-१७ क्विंटल**

कॅन्टीन विभागासाठी सन २०१२-१३ मध्ये ब्रुक बॉण्ड सुपर डस्ट, टाटा सीटीसी डस्ट व सपट सीटीसी डस्ट तसेच कॉफीसाठी ब्रुक बॉण्ड कॅफे गोल्डची तसेच इतर नामवंत ब्रॅण्डसाठी निविदा मागणी करून खरेदीस मान्यता असावी.

**०५. बिस्कीटे - पार्ले, ब्रिटानिया व सनफिस्ट**

कॅन्टीनमध्ये दैनंदिन विक्रीकामी आवश्यक असणारे पार्ले प्रॉडक्टसचे ८२/२१० ग्रॅम, क्रॅकजॅक व मोनॅको तसेच ब्रिटानीया प्रॉडक्टसचे ८८/२२५ ग्रॅम, फिफ्टी-फिफ्टी, स्नॅक्स व सनफिस्ट प्रॉडक्टस बिस्कीटे कंपनीच्या विक्रेत्यांकडून खरेदी करणेस तसेच श्री साईभक्तांचे मागणीनुसार शुगर फ्री मारी गोल्ड बिस्कीटे खरेदी करणेस मान्यता असावी.

**०६. पॅकेज्ड् ड्रिकींग वॉटर -०१ लिटर व ५०० एमएल पॅकींग**

शासनाच्या नियमानुसार आयएसआय स्टॅण्डर्ड मान्यता प्राप्त पॅकेज्ड् ड्रिकींग वॉटर उत्पादनाच्या निविदा मागणी करून १ लिटर व ५०० एमएल पॅकींगमध्ये ड्रिकींग वॉटर खरेदीस मान्यता असावी.

**०७. गाय दूध - दररोज अंदाजे ३४०० लिटर**

कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठीचे गाय दूध ३.५ ते ३.८ फॅट व ८.५ एसएनएफ गूणवत्तेचे दूध खरेदी कामी निविदा मागणी करून खरेदीस मान्यता असावी.

**०८. थर्माकोल चार कप्प्याची व प्लेन पत्रावळी**

प्रसादालय विभागामार्फत गर्दीचे कालावधीत ठिकठिकाणी मंडप टाकणेत येऊन साईभक्तांचे जेवणाची स्वंयसेवी भोजन व्यवस्था करणेत येते, त्यासाठी थर्माकोल चार कप्पे असलेल्या पत्रावळीचा

वापर केला जातो. तसेच काही वेळेस पाण्याची टंचाई निर्माण झाल्यासही पत्रावळीचा वापर केला जात असल्याने कप्पे असलेल्या पत्रावळीचा निविदेत समावेश केलेला आहे.

**०९. लिक्वीड सोप व क्लिनींग पावडर-**

संस्थानचे पाणीपुरवठा विभागाकडे लिक्वीड सोप तयार केले जात असून आवश्यकतेनुसार प्रसादालयास पुरवठा होत असल्याने त्याचा निविदेत समावेश केलेला नाही. तथापि आवश्यकता भासल्यास कोटेशन मागवून खरेदी करता येईल. क्लिनींग पावडर व भांडे धुण्याच्या मशिनसाठी आवश्यक असणारे डिश वॉशिंग मशीन लिक्वीड सोपचा वापर कमी असल्याने ते कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

**१०. प्लॅस्टिक रोल -**

देणगीदारांना पोस्टाने उदीप्रसाद पाठविणेकामी प्लॅस्टिक रोल आवश्यक असून खरेदीकामी रु.५.०० लाख खर्च अपेक्षित आहे. सध्या प्लॅस्टिक रोल देणगीदाखल मिळत आहे. देणगी उपलब्ध न झाल्यास विहित पद्धतीने खरेदीस मान्यता असावी.

**११. प्लॅस्टिक पिशवी -**

लाडू प्रसाद विक्रीकामी ५x६.५ व अन्नपाकिटे विक्रीसाठी ८x१०, ४x६ साईजच्या प्लॅस्टिक पिशवीचा वापर केला जातो. सदर प्लॅस्टिक पिशवीसाठी पी.पी.व एल.डी.चे कच्चा माल वापरला जातो. तथापि मा.व्य.समिती सभा दि.२१.११.१० निर्णय क्र.९०१ नुसार पर्यावरणपुरक प्लॅस्टिक पिशवी खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असा निर्णय झाला आहे. त्यानुसार दोन्ही प्रकारच्या प्लॅस्टिक पिशव्या खरेदीकामी निविदा मागविता येतील त्यास मान्यता असावी.

सन २०१२-१३ करीता आवश्यक किराणा मालासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| **अ)** | मोंढयावरुन लिलाव पद्धतीने करावयाची खरेदी<br>(गहु,हरबरा,मोहरी,सफेद तिळ,खिसमीस,भाजीपाला) | रु. ३,८३,४७,५००/- |
| **ब)** | कारखांन्याकडून कोटेशन मागवून करावयाची खरेदी (साखर) | रु. ४,९०,००,०००/- |
| **क)** | निविदा मागवून करावयाची खरेदी | रु. ४६,९१,१६,८५०/- |
| | | ---------------------- |
| | **एकुण अंदाजे किंमत** | **रु.५५,६४,६४,३५०/-** |

सन २०११-१२ मध्ये निविदा मागणी करतांना आर्थिक उलाढालीबाबत निकष देण्यात आलेला असल्याने योग्य क्षमतेच्या पुरवठादाराकडून निविदा सादर केल्या गेल्या होत्या. सन २०१२-१३ मध्येही खालीलप्रमाणे वार्षिक उलाढालीबाबत निकष देवून मागणी करावी असे नम्र मत आहे.

| अ.नं. | तपशिल | संस्थानला करावयाची अंदाजे खरेदीची रक्कम | पुरवठाधारकाची अपेक्षित वार्षिक उलाढाल |
|---|---|---|---|
| ०१. | किराणामाल-<br>दाळी, कडधान्ये व इतर | ११,१६,३०,३५०/- | रु.५०,००,०००/- |
| ०२. | तांदुळ | २,४१,५०,०००/- | रु.५०,००,०००/- |
| ०३. | खादयतेल (सुर्यफूल/मका ) | २,८०,००,०००/- | रु.५०,००,०००/- |
| ०४. | गावरान तूप (सहामाही खरेदी) | २३,७२,५०,०००/- | रु.१,००,००,०००/- |
| ०५. | चहा व कॉफी | ४८,३५,०००/- | रु.१०,००,०००/- |
| ०६. | गाय दुध | ३,२५,००,०००/- | रु.१,००,००,०००/- |
| ०७. | बिस्कीटे | १,१७,३५,०००/- | रु.२०,००,०००/- |
| ०८. | पॉलिकप | ५१,३०,०००/- | रु.२०,००,०००/- |
| ०९. | प्लॅस्टीक पिशवी | ७९,१७,५००/- | रु.५०,००,०००/- |
| १०. | मिनरल वॉटर | ५६,६९,०००/- | रु.१०,००,०००/- |

साधारणतः जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवडयात किंवा फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवडयात प्रथेप्रमाणे वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसिद्ध करावी लागेल. जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवस कोरे निविदा फॉर्म्स विक्री केली जाऊन १५ दिवसाचे आत नमुने व भरलेल्या निविदा स्विकारल्या जातील. फेब्रुवारी महिन्यात मा.विश्वस्त मंडळाचे सभेत निविदा उघडण्यात येऊन नमुने निवडण्यात येतील. माहे मार्च महिन्यात ज्यांचे नमुने निवडणेत आले आहेत अशा निविदा धारकांना चर्चेसाठी निमंत्रीत करुन त्यांनी दिलेली सुट स्विकारुन व नमुन्यांचा विचार होऊन पुरवठा आदेश दिले जातील. १ एप्रिल, २०१२ पासून मालाचा पुरवठा सुरु होईल.

तरी प्रसादालय, मंदिर व कॅन्टीन विभागासाठी माल खरेदीकामी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.१६५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसादालयाकरिता आवश्यक असणारे गावरान तुप खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या असल्याने गावरान तुप वगळता उर्वरित**

**प्रसादालय, मंदिर व कॅन्टीनसाठी आवश्यक असणारा माल खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात, याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२६** **किटकनाशक फवारणी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी.अधिनस्त साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान, द्वारावती भक्तनिवासांमधील खोल्यामध्ये दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ अखेर किटकनाशक औषध फवारणीचे काम मे.यशोमंगल फर्निचर अॅन्ड पेस्टकंट्रोल,पुणे यांना कार्यादेश क्र.एसएसएस/ वशी-साभनि /१४८० /२०११.दि.२२/०६/२०११ अन्वये देण्यात आलेले आहे.त्यांनी आज पर्यंत एकुण ४ फवारण्यापुर्ण केलेल्या आहेत.

मे.यशोमंगल फर्निचर अॅन्ड पेस्टकंट्रोल,पुणे हे करत असलेली किटकनाशक औषध फवारणी प्रभावी नसल्याचे वेळोवेळी केलेल्या समक्ष पाहणीमध्ये आढळुन आल्याने व साईभक्तांनी तक्रार केल्याने त्यांना साईप्रसाद निवासस्थान विभाग व साईबाबा भक्तनिवसस्थान विभाग यांचे कडुन वेळोवेळी पत्रे पाठवुन करारनाम्यातील अटी / शर्तीस अनुसरुन कामकरणेबाबत,कामाचा दर्जा सुधारणे बाबत व चांगला रिझल्ट देणे बाबत कळविण्यात आलेले आहे.

त्रस्त भक्तगणांच्या तक्रारीमध्ये वाढ झाल्याने त्याचप्रमाणे मे.यशोमंगल फर्निचर अॅन्ड पेस्टकंट्रोल, पुणे यांचे प्रतिनिधी श्री काटकर यांनी प्रभावी कामापेक्षा निव्वळ कागदी प्रपंच वाढवण्यावर भर दिल्याने त्यांना दि.२६/११/२०११ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचे समोर पाचारण करुन खालील प्रमाणे सक्त निर्देश दिले.

१) व्यर्थ कागदी प्रपंच न वाढवता प्रभावी किटकनाशक फवारणी करावी व रिझल्ट दाखवुन दयावा.

२) फवारणी प्रभावा बाबत फक्त संबंधित निवासस्थान विभागांचे अधिक्षक यांचेशीच चर्चा, निरिक्षणे, तपासण्या कराव्यात.

३) अनाधिकृत पाहणी, तपासणी, निरिक्षण करु नये.त्याचप्रमाणे संबंधित माळयावरील मदतनिसांच्या स्वाक्ष-या घेऊ नयेत.

उपरोक्त बाबीस श्री काटकर यांनी मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष होकार दिला, तरी सुध्दा आतापर्यंत किटकांचा प्रादुभार्व १०० % कमीझालेला नाही.खोल्यांमध्ये ढेकणांचा प्रादुर्भाव वाढलेला आहे.चार फवारण्या होऊनही अदयापपर्यंत श्री काटकर यांनी त्यांचेकडे काम करत असलेल्या कर्मचारी वर्गाच्या भविष्यनिर्वाह निधी बाबत कार्यवाही केलेली नसल्याने त्यांनी केलेल्या तीन फवारण्यांचे बीले प्रलंबीत आहे.या बाबत त्यांना वारंवार फोन वरुन व समक्ष कळवुनही अदयाप पर्यंत कार्यवाही कलेली नाही त्याचप्रमाणे ते दखल घेत नाहीत.

कामाचा दर्जा, कार्यलयीन कागदपत्राची वेळेत पुर्तता,कामाचे सातत्य त्याचप्रमाणे जबाबदारी या महत्वाचे गोष्टींचा अभाव मे.यशोमंगल फर्निचर अॅन्ड पेस्टकंट्रोल,पुणे यांचेमध्ये असल्याचे वरील सर्व बाबींवरुन स्पष्ट होते.

श्रीक्षेत्र शिरडी हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे धार्मीकस्थान आहे या ठिकाणी येणा-या भाविकास पुर्ण समाधान व आवश्यक त्या मुलभुत सुखसोई प्रदान करण्याचे काम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थे कडुन अहोरात्र करण्यात येतें. मे.यशोमंगल फर्निचर अॅन्ड पेस्टकंट्रोल,पुणे यांचे प्रभावहिन, किटकनाशक, औषधफवारणी मुळे किटकांचा प्रादुर्भाव पुर्णपणे कमी झाला नसल्याने संस्थानचे नावलौकिकास बाधा येत आहे मे.यशोमंगल फर्निचर अॅन्ड पेस्टकंट्रोल,पुणे यांना दिलेल्या वर्कऑर्डरची मुदत माहे- मे २०१२ अखेर संपत आहे. मे.यशोमंगल फर्निचर अॅन्ड पेस्टकंट्रोल,पुणे यांचे काम समाधानकारक नसल्याने नविन ठेकेदार नियुक्तीसाठी जाहीरात देऊन टेंडर मागविणेसाठी मान्यता असावी.नविन ठेकेदाराची नियुक्ती झाल्यावर मे.यशोमंगल फर्निचर अॅन्ड पेस्टकंट्रोल,पुणे यांचे टेंडर रद्द करता येईल.

**निर्णय क्र.१६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.यशोमंगल फर्निचर अॅन्ड पेस्टकंट्रोल,पुणे यांचे काम समाधानकारक नसल्याने नविन ठेकेदार नियुक्तीसाठी जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. नवीन ठेकेदाराची नियुक्ती झालेनंतर मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल, पुणे यांची निविदा रद्द करण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवास्थान)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२७** **श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सोसायटी, शिर्डी यांना तसेच इतर संस्थांना नविन भक्तनिवासस्थान येथे दिलेल्या गाळयाचे जाहीर लिलावांबाबत/ मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** नविन भक्त निवासस्थान इमारतीमधील १७ गाळे विविध संस्था व खाजगी व्यावसायिकांना (दि.१९/०३/२००९ प्रथमतः लिलाव मंजूरीने) दि.०१/०४/२००९ ते दि.२८/०२/२०१० अखेर लिव्ह अँड लायसन्स तत्वावर वापरांस दिलेले होते. त्यानंतर पुढील कालावधीसाठी म्हणजे दि.०१/०३/२०१० ते दि.३१/०१/२०११ साठी गाळे वापरांस देणेसाठी दि.१८/०२/२०१० रोजी सदर १७ गाळयांचा लिलाव ठेवणेत आला परंतू प्रत्यक्षात ९ (१४-१५ एकत्रित) गाळ्यांचा लिलाव करणेत आला व ७ गाळयांबाबत पूर्वीचेच व्यवसायिकांना लायसन्स फीमध्ये १० % वाढ करुन दि.०१/०३/२०१० ते दि.३१/०१/२०११ अखेर गाळे वापरांस देणेत आले. परंतू मुदत संपूष्टात येणेपूर्वीच ५ गाळेधारकांनी भाडे परवडत नसल्यामुळे गाळे सोडून गेले. दि.०४/०७/२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये प्रस्तुतचे गाळे संस्थान वापरांसाठी उपयोगांत आहेत. दि. १३/०२/२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये उर्वरीत १२ गाळयांचे १० % मासिक परवाना फी मध्ये वाढ करुन दि.०१/०२/२०११ ते दि.३१/१२/२०११ पावेतो वापरांस मुदतवाढ देणेत आली. पैकी भाडे परवडत नसल्यामुळे आणखी ३ गाळेधारक (१४-१५ एकत्रित) सोडून गेले. सद्यःस्थितीत एकंदरीत ८ लिलावधारकांनी (गाळा नं.१४-१५ एकत्रित)भाडे परवडत नसलेने गाळे सोडलेनंतर सदरच्या गाळयांचा वापर संस्थान वापरांत करीत आहेत. ८ गाळेंमध्ये सहकारी संस्था व खाजगी व्यवसायीकांना वापरांस दिलेले आहेत व त्यांची करार मुदत दि.३१/१२/२०११ पावेतो आहे. त्या व्यतिरिक्त ५ गाळे श्री साईबाबा संस्थान एम्लॉईज क्रेडीट.को.ऑप सोसायटी, शिर्डी हे चालवित आहेत. लिव्ह अँड लायसन्स तत्वावर वापरांत असलेले प्रस्तुतचे गाळ्यांची मुदत दि.३१/०५/२०१० अखेर संपुष्टात आलेली आहे.

दि.०६/०३/२०१० व दि.०४/०७/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार प्रस्तुत गाळयांचे डिपॉझीट व लायसन्स फीवर लिव्ह अँड लायसन्स तत्वावर वापरांस देणेकामी (११ महिने कालावधीसाठी) लिलाव करणे आहे. लिलाव होईपावेतो पूर्वीचेच दराने परवाना फी आकारत आहेत. या गाळयांचा दि.२७/०५/२०१० व दि.२६/०५/२०११ रोजी लिलाव ठेवणेत आला होता. परंतु साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी भक्तांचे सोयीसाठी प्रस्तुतचे गाळेंचा लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर लिलाव न करता त्यांना वापरांस परवानगी देणेसाठी विनंती करीत आहे. सदर बाबतीत मा.अध्यक्षसाो. यांचेशी चर्चा होऊन मा.विश्वस्त नामदार श्री विखेसाो. व इतर विश्वस्तांशी चर्चा होऊन पुढील निर्णय होणे आहे.

तरी **१)** श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी यांना नविन भक्तनिवासस्थान इमारतीमधील ५ गाळे (क्लोकरुम+दुधस्टॉल+ प्रसाद नॉव्हेल्टी-३) दि.०१/०६/२०१० ते दि.३१/०५/२०११

या कालावधीसाठी यापूर्वीचे सालासाठी आकारणेत आलेले लायसन्स फी आकारुन गाळा वापरांस मान्यतेसाठी विचारार्थ सादर. तसेच

**२)** प्रस्तुत उपरोक्त सोसायटीचे ताब्यात असलेले ५ गाळे दि.०१/०६/२०११ पासून पुढील ११ महिनेसाठी सदर गाळे लिव्ह अँड लायसन्स तत्वावर (सद्या अदा करत असलेल्या मासिक परवाना रु. ५,१००/- प्रति गाळा + क्लोकरुम रु.५,६६३/- एकत्रित) फी मध्ये दुपटीने वाढ करुन) वापरांस देणेबाबतचे मान्यतेसाठी किंवा मागील परवाना फी प्रमाणे फी वसुल करुन पुढील ११ महिन्या करीता लिलाव पध्दतीने गाळे लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर वापरांस देणेसाठी गाळयांचे लिलावाचे मान्यतेसाठी व विचारार्थ सादर. तसेच-

**३)** सद्यःस्थितीत संस्थान वापरांसाठी ९ गाळे उपयोगात आहेत. खालील तक्त्यातील ८ गाळे सहकारी संस्था व खाजगी व्यावसायीकांना ११ महिने कालावधीसाठी लिव्ह अँड लायसन्स तत्वावर वापरांस दिलेले आहेत व त्यांची करार मुदत दि.३१/१२/२०११ रोजी संपुष्टात येत आहे.

प्रत्येक गाळयासाठी डिपॉझिट रक्कम रुपये- १,००,०००/- (अक्षरी रुपये-एक लाख मात्र )

| अ.नं (०१) | विंग व गाळा नंबर (२) | मागिल मासिक भाडे (०३) | १०% मासिक भाडे वाढ (०४) | एकुण गाळयाचे मासिक भाडे (०३+०४)=०५ | लिलाव गाळा धारकांचे नांव (०६) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | अे-आतिल-०१ | रु. ४९,६१०/- | रु.४,९६१/- | ५४,५७१/- | सौ.रत्ना नंदु कोळपकर,शिरडी |
| ०२ | डी-आतिल-०७ | रु. ५०,८२०/- | रु.५,०८२/- | ५५,९०२/- | श्री अशोक सुर्यभान पवार,शिरडी |
| ०३ | डी-आतिल-०८ | रु. २६,६२०/- | रु.२,६६२/- | २९,२८२/- | प्रवरा फळे भाजीपाला उत्पा. प्रवरानगर |
| ०४ | डी-बाहेरील-१३ | रु. ०६,१७१/- | रु.६१७/- | ६,७८८/- | श्री किरणकुमार आर.येमुलपल्ली |
| ०५ | डी-आतिल-०५ | रु. ५६,८७०/- | रु.५,६८७/- | ६२,५५७/- | श्रीरामपुर दुध संघ बाभळेश्वर, |
| ०६ | डी-बाहेरील-११ | रु. २६,६२०/- | रु.२,६६२/- | २९,२८२/- | कर्मचारी संघटना -रा.सो.जगताप, शिरडी |
| ०७ | डी-बाहेरील-१२ | रु. १५,१२५/- | रु.१,५१३/- | १६,६३८/- | श्री साई संस्थान एम्लॉईज को.ऑप. सो. |
| ०८ | अे-बाहेरील-०६ | रु. ०६,०५०/- | रु.६०५/- | ६,६५५/- | श्री विजय रामचंद्र गोलाणी, रा.शिरडी |

उपरोक्त गाळ्यांचाही पुढील कालावधीसाठी दि.०१/०१/२०१२ ते दि.३०/११/२०१२ या मुदतीसाठी लिव्ह अँड लायसन्स तत्वावर (सद्या अदा करत असलेल्या मासिक परवाना फी मध्ये १० % वाढ करुन) वापरांस देणेबाबतचे मान्यतेसाठी **किंवा**

पुढील ११ महिन्या करीता प्रस्तुतचे गाळ्यांचा फेर-लिलाव करुन गाळे लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर वापरांस देणेसाठी गाळयांचे लिलावाचे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.१६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेले उपरोक्त ०८ गाळे दि.०१/०१/२०१२ ते दि.३०/११/२०१२ या ११ महिने कालावधीसाठी लिव्ह अँड लायसन्स तत्वावर (सद्या असलेल्या मासिक परवाना फी मध्ये १० % वाढ करुन) वापरांस देण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८** **नवीन टायर्स खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील वापरात असलेल्या खालील वाहनांचे सध्याचे टायर्स खराब झालेने त्यांना नवीन टायर्स (टयुब, फ्लॅबसह) खरेदी करणे आवश्यक आहे, त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | वाहन क्र. | वाहन प्रकार/ वापर | सध्याचे टायरचा एकुण वापर | आवश्यक टायर्स साईज | टायरची कंपनी | टायर्स नग |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | एमएच- १७/ टी- २८११ | टाटा- ११०९/ मालवाहतूक | ६०५१२ | ८-२५-२० | अपोलो | ०४ |
| ०२ | एमएच- १७/ एजी- २४२० | टाटा- ४०७/ शववाहीका | ५४०२९ | ७-००-१६ | अपोलो | ०६ |
| | | | | | एकुण टायर्स- | १० |

वरीलप्रमाणे दोन वाहनांकरीता १० टायर्स (टयुब, फ्लॅबसह) खरेदीकामी रु.१,१०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त वाहनांकरीता नवीन टायर्स अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून कोटेशन बोलावून खरेदी करण्यात येतील.

तरी वरीलप्रमाणे दोन वाहनांकरीता १० टायर्स (टयुब, फ्लॅबसह) खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रु. १,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे दोन वाहनांसाठी आवश्यक असणारे नवीन १० नग टायर्स (टयुब, फ्लॅबसह) अपोलो कंपनीचे अधिकृत डिलरकडून कोटेशन्स मागवून खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८अ** **शिक्षणसेवकांचे मानधनात वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासनाने दि.२७.०२.२००३ च्या शासन निर्णयानुसार राज्यासाठी सुधारित शिक्षण सेवक योजना कार्यान्वित केलेली आहे. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षण सेवकांना मिळणारे मानधन निश्चित करुन अकरा वर्षा पेक्षा अधिक कालावधी झाला असल्याने त्यात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाने दि.०७.०९.२०११ रोजी राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील यांचे पदनाम शिक्षण सेवक ऐवजी सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन) तसेच शिक्षण सेवकांचे मानधनात वाढ करण्याचा वरील संदर्भीय शासन निर्णयानुसार दि.०१.०१.२०१२ पासून लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या शिक्षण सेवकांचा कालावधी ३ वर्षे असून त्यात कोणताही बदल नाही.

याचप्रमाणे दि. ०१ जानेवारी २०१२ पासून, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डीमध्ये कार्यरत असणारे व यापुढे नियुक्त करावयाचे शिक्षण सेवक/ सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन)/ शिक्षकेतर कर्मचारी यांना पुढील प्रमाणे मानधन व नेमणूक ३ वर्षे कालावधीसाठी नेमणूक देता येईल.

| अ.नं. | सध्याचे पदनाम, मानधन | नवीन पदनाम, मानधन |
|---|---|---|
| ०१ | शिक्षण सेवक (प्राथमिक) रु.३०००/- | सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन) (प्राथमिक) रु.६०००/- |
| ०२ | शिक्षण सेवक (माध्यमिक) | सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन) |

| | | |
|---|---|---|
| | रु.४०००/- | (माध्यमिक) रु.८०००/- |
| ०३ | शिक्षण सेवक (उच्च माध्यमिक- पूर्णवेळ) रु.५०००/- | सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन) (पूर्णवेळ- उच्च माध्यमिक) रु.९०००/- |
| ०४ | तबलजी रु.२०००/- | तबलजी रु.४०००/- |
| ०५ | शिक्षण सेवक (उच्च माध्यमिक- अर्धवेळ) रु.२५००/- | सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन) (अर्धवेळ- उच्च माध्यमिक) रु.४५००/- |

**निर्णय क्र.१६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक ०१ जानेवारी २०१२ पासून, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डीमध्ये कार्यरत असणारे व यापुढे नियुक्त करावयाचे (परिविक्षाधीन)/ शिक्षण सेवक/ सहाय्यक शिक्षक तसेच तबलजी व इतर शिक्षकेतर कर्मचारी यांना शासनाच्या अधिसुचनेप्रमाणेच मानधन नेमणूक देण्यात यावी,असें ठरलें.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/प्राचार्या,कन्या विद्या मंदीर/प्र.प्राचार्य,कनिष्ठ महाविद्यालय)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८** **विश्वस्तांच्या सुचनेबाबत.**

**निर्णय क्र.१७०** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

०१) व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.११.२०११ चे सभेत निर्णय क्र.८४४ अन्वये स्टेट बॅक ऑफ इंडिया यांचे संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील वापरास देण्यात आलेल्या जागेस बाजारभावाप्रमाणे दर देणेबाबत सांगण्यात यावे. याकामी त्यांनी समक्ष चर्चेसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपूढे बोलविण्यात यावे असे ठरले होते. त्यानुसार स्टेट बॅक ऑफ इंडिया, शिर्डी शाखेचे व्यवस्थापक श्री नरेंद्र कुलकर्णी हे आजचे सभेत उपस्थित होते. त्यांचेशी सभेने चर्चा केली असता त्यांना देण्यात आलेल्या जागेस बाजारभावाप्रमाणे दर देणेबाबत त्यांनी मान्य केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांचे सल्ल्याने बाजारभावानुसार करारनामा करण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी)

०२) मा.विश्वस्तांचे येणारे फोन व त्यांचेकडून येणारे व्ही.आय.पी. ची दर्शन व रुमची व्यवस्था व्हावी याकरीता जनसंपर्क कार्यालयासाठी स्वतंत्र फोन व एका कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात यावी. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

०३) साईआश्रम नं.०१ व ०२ करीता आऊटसोर्सीग पध्दतीने लॉण्ड्री चालविण्यास द्यावी सदर लॉण्ड्रीसाठी संस्थानमार्फत फक्त जागा उपलब्ध करुन द्यावी. (कार्यवाही-अधिक्षक, द्वारावती निवास्थान)

०४) श्री साईबाबा रुग्णालयाकडे कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात यावायचे पॅरामेडीकल स्टाफ, शैक्षणिक संकुलाकडे नेमणूक करण्यात यावयाचे शिक्षण सेवक, आय.टी.आय.कडील शिक्षक या पदांच्या मुलाखती स्थानिक विश्वस्तांचे उपस्थितीत दिनांक २१.०१.२०१२ रोजी आयोजित करण्यात याव्यात. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/प्राचार्य,कन्या विद्या मंदिर/ प्राचार्य- आय.टी.आय.)

०५) समाधी मंदीरात होणाऱ्या श्रींच्या आरत्या कॅसेटमध्ये रेकॉर्डीग केलेल्या ध्वनीक्षेपण विभागा मार्फत लावून आरती करण्यात यावी. (कार्यवाही-अधिक्षक मंदीर विभाग)

०६) शिरडी शहरातील कचरा डेपोसाठी संस्थानचे नावावर जागा घेऊन सदरहू जागा भाडे तत्वावर नगरपंचापयतीस देण्यात यावी. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

०७) श्रीं च्या दर्शनासाठी दररोज दर्शन व आरतीचे पेड पासेस चालु ठेवणेबाबत प्रशासनाने नियमावली तयार करावी. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

०८) संस्थानमार्फत चालु करण्यात आलेल्या विविध ठिकाणचे माहिती केंदांचे दरवर्षी ऑडिट करण्यात यावे. तसेच प्रत्येक माहिती केंद्राकडून दरमहा रिटन सादर होणे आवश्यक आहे. (कार्यवाही मुख्य लेखाधिकारी)

०९) संस्थानचे प्रसादालयाचे फुड प्रोसेसिंगसाठी स्वतंत्र कर्मचाऱ्याची नियुक्ती करणेकामी पुणे विद्यपीठाशी संपर्क साधून, नेमणूक करण्यात यावी. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

१०) शिर्डी शहरातील मुख्य गावठाणातील संपूर्ण स्वच्छता करणे, कचरा उचलणे, डेपोपर्यंत वाहतूक करणे या पध्दतीने स्वच्छतेबाबतची अनुषंगिक सर्व कामे आऊटसोर्सिग पध्दतीने करुन घेणेकामी ठेकेदार नेमणेत यावा त्यासाठी निविदा तयार करणे, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्याचे काम शिर्डी नगरपंचायतीने करावे. त्यानुसार प्राप्त होणाऱ्या निविदा संस्थान व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडून, निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा. निवड करण्यात आलेल्या ठेकेदारास कार्यादेश शिर्डी नगरपंचायत,शिर्डी

यांनी दयावा. या कामावर शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी पुर्णपणे पर्यवेक्षण व नियंत्रण करावे. मात्र शिरडी मुख्य गावठाणाव्यतिरिक्त वाड्या व वस्त्यांवरील स्वच्छतेची कामे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी करावीत. (कार्यवाही- आरोग्य विभाग प्रमुख)

११) जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या प्राथमिक शाळांना बेंचेस वाटप करण्यासाठी रु.१० कोटी निधी मंजूर करण्यात आलेला होता. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना बेंचेस वाटप करण्यात आलेले असून त्यासाठी रु. ९,२३,४३,२४१/- एवढा निधी खर्च झालेला असून रुपये ७६,५६,७५९/- एवढा निधी शिल्लक आहे.

शिल्लक राहिलेल्या सदरच्या निधीमध्ये कोपरगांव,श्रीरामपुर, राहुरी व नेवासा या तालुक्यातील प्राथमिक शाळांसाठी बेंचेस खरेदी करुन मा.विश्वस्तांचे सुचनांप्रमाणे संबंधीत शाळांना वाटप करण्यात यावे. प्राथमिक शाळांची नांवे व बेंचेसची संख्या मा.विश्वस्तांना विचारुन निश्चित करण्यात यावी, असे ठरलेले आहे.

या अगोदर मे.गोदरेज ॲण्ड बॉईज मॅन्यु.कं. मुंबई यांचेकडून बेंचेस खरेदी करण्यात आलेले आहेत. सदरचे कार्यवाहीस सुमारे दिड वर्षे झालेले आहे. पूर्वी खरेदी करण्यात आलेल्या बेंचेसच्या किंमतीमध्ये स्टील, एम.डी.एफ.बोर्ड, कार्टुन पावडर, कोटींग, या बेंचेस तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या साहीत्याच्या किंमतीमध्ये मोठयाप्रमाणात वाढ झालेली आहे. त्यास अनुसरुन मे.गोदरेज ॲण्ड बॉईज मॅन्यु.कंपनी यांनी दिनांक ११/०१/२०१२ चे कोटेशन्सनुसार बेंचेससाठी खालीलप्रमाणे सुधारीत दर दिलेले आहेत.

| अ.नं. | बेंचेस तपशील | नग | पुर्वीचे दर (व्हॅटसह) | सुधारित दर (व्हॅटसह) |
|---|---|---|---|---|
| १ | इ.१ ली ते इ.४ थी | १ | २७८९ | ३१८९ |
| २ | इ.५ वी ते ७ वी | १ | ३१३८ | ३६१७ |

मे.गोदरेज ॲण्ड बॉईज मॅन्यु.कंपनी यांनी या अगोदर पुरवठा केलेले बेंचेसची प्रतवारी व्यवस्थीत असल्याने बेंचेस खरेदीकामी उपरोक्त प्रमाणे त्यांचेकडून देण्यात आलेले सुधारीत दर मान्य करण्यात आले व त्यांना, शिल्लक असलेल्या रु. ७६,५६,७५९/- एवढया निधीमध्ये इ.५ वी ते इ.७ वी या वर्गासाठी बेंचेस खरेदीसाठी पुरवठा आदेश देण्यात यावा व सदरचे बेंचेस खालील शाळांना वाटप करण्यात यावेत, असे ठरले.

| अ.नं | शाळांचे नांव | बेंचेस सख्या |
|---|---|---|
| ०१ | नगरपालिका शाळा राहूरी | ६५५ |
| ०२ | नगरपालिका शाळा,श्रीरामपूर | ६५५ |
| ०३ | नगरपरिषद शाळा,कोपरगांव | ३५० |
| ०४ | येसगांव तालूका कोपरगांव शाळा | ३५० |
| ०५ | दिनमित्रकार विद्यालय,तरोडी ता.नेवासा | १०० |

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी/प्राचार्य,आय.टी.आय/प्रशासनशाखा वशी-०३)

१२) महाराष्ट्र शासनाकडून कोपरगांव,राहाता व पूणतांबा येथील पाणीपुरवठ्यासाठी एकूण खर्चाच्या १० टक्के लोकवर्गणीची रक्कम मंजूर झालेली आहे. त्यापैकी राहाता व पूणतांबा येथील पाणीपुरवठ्यासाठी मंजूर झालेली रक्कम संस्थानकडून आदा करण्यात आलेली आहे. मात्र कोपरगांव पाणीपुरवठ्यासाठी शासनाकडून मंजूरी असलेली १० टक्के लोकवर्गणीची रक्कम रुपये ४७,८३,४५८/- अद्याप आदा करण्यात आलेली नाही.

कोपरगाव शहरास पिण्याचे पाणीपुरवठा योजनेसाठी शासनाने मंजूर केलेली लोकवर्गणीची रक्कम मिळावी यासाठी मा.अध्यक्षा, नगरपरिषद कोपरगांव यांनी दिनांक १४.०१.२०१२ चे पत्राने मागणी केलेली आहे. त्यानुसार सदरची रक्कम नगरपरिषद कोपरगांव यांना आदा करण्यात यावी व ही रक्कम सन २०११-१२ या वर्षात खर्ची टाकण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

१३) सस्थानचे निमगाव-कोऱ्हाळे येथील स.नं.१७२ मध्ये व्ही.आय.पी.साठी निवासस्थाने बांधणेकामी सविस्तर प्रस्तावर व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करावा.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुंख)

१४) श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरिता स्टाफ नर्सेसची आवश्यक आहे. यापूर्वी संस्थानचे रुग्णालयात नर्सेस भरती करणेकामी तोंडी मुलाखती व प्रात्यक्षिक घेऊन प्रतिक्षा यादी तयार करण्यात आलेली आहे. तरी वैद्यकीय संचालक यांनी सदरहू यादीतील दोन्ही रुग्णालयासाठी आवश्यक असणाऱ्या नर्सेस ठेकेदारामार्फत प्रति महा रुपये ११,०००/- मेहनताना देऊन घेण्यात याव्या. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

१५) सस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकडील जे वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल स्टाफ संस्थानकडे कायम स्वरुपी नोकरीत असून इतर बाहेरील हॉस्पिटलकडे कामे करतात अशा कर्मचाऱ्यांची माहिती वैद्यकीय संचालक यांनी व्यवस्थापन समितीस सादर करावी

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

१६) नियोजित साईगार्डन व शिर्डी शहरातील रस्त्याचे कामे काम अतिशय मंद गतीने चालू असल्याने संबधित ठेकेदार मे.के.आर.आर इन्फ्रा. प्रोजेक्ट प्रा.लि. हैद्राबाद व मे.रोमन टरमॅट लि.मुबई यांना दिनांक २१.०१.२०१२ चे उपसमितीसमोर समक्ष चर्चसाठी बोलविण्यात यावे.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र ०१ ते १७० सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरित-
(किशोर रा.मोरे )
कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

स्वाक्षरित-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)